# लोकलेखा समिती

## (२०१२-२०१३)

(बारावी महाराष्ट्र विधानसभा)

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन ११९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा अहवालावरील

# चौदावा अहवाल

( हा अहवाल विधानसभा / विधानपरिषद सभागृहास
दिनांक जुलै, २०१३ रोजी सादर करण्यात आला )

महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय
विधान भवन, मुंबई.
जुलै, २०१३.

# लोकलेखा समिती

# २०१२-२०१३

## (बारावी महाराष्ट्र विधानसभा)

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन ११९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा अहवालावरील**

# चौदावा अहवाल

# लोकलेखा समिती
## २०१२-२०१३

**समिती प्रमुख**

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.

(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.

(४) श्री.सुनिल केदार, वि.स.स.

(५) श्री.बसवराज पाटील, वि.स.स.

(६) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.

* (७) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. (दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

(७अ) श्री.राहुल बोंद्रे, वि.स.स. (दिनांक ११ जुलै, २०१३ रोजीपासून)

(८) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.

** (९) श्री.संजय सावकारे, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

*** (१०) श्री.दिलीप सोपल, वि.स.स. (दिनांक १० जून, २०१३ रोजीपर्यंत)

(११) श्री.ए.टी.पवार, वि.स.स. (दिनांक ५ जानेवारी, २०१३ रोजीपर्यंत)

**** (११अ) श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. (दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजीपासून)

(१२) श्री.विक्रमसिंह पाटणकर, वि.स.स.

(१३) श्री.बदामराव पंडित, वि.स.स.

(१४) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

(१५) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.

(१६) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.

(१७) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.

(१८) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.

(१९) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.

(२०) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.

(२१) श्री.जयप्रकाश छाजेड, वि.प.स.

(२२) प्रा.सुरेश नवले, वि.प.स.

(२३) श्री.विनायक मेटे, वि.प.स.

(२४) श्री.विजयसिंह मोहिते-पाटील, वि.प.स.

(२५) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.

**निमंत्रित**

(२६) श्री.दिवाकर रावते, वि.प.स.(दिनांक ३१ ऑक्टोबर, २०१२ रोजीपर्यंत)

***** (२६अ) श्री.विनायक राऊत, वि.प.स. (दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ रोजीपासून)

(२७) श्री. मनिष जैन, वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक ३१ मे, २०१२ रोजी विधानसभा व दिनांक १ जून, २०१२ रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधामंडळ सचिवालय,**

(१) डॉ.अनंत कळसे, प्रधान सचिव.
(२) श्री.उ.की.चव्हाण, अतिरिक्त सचिव.
(३) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार.
(४) श्री.ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
(५) श्री.दिलीप येवाला, अवर सचिव (समिती).
(६) श्री.सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स. यांचे दिनांक २७ जानेवारी, २०१३ रोजी निधनामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.राहुल बोंद्रे , वि.स.स. यांची मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक ११ जुलै, २०१३ रोजी नामनियुक्ती केली आहे.**

**** श्री.संजय सावकारे, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

***** श्री.दिलीप सोपल, वि.स.स. यांचा दिनांक ११ जून, २०१३ रोजी मंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने सदर जागा रिक्त आहे.**

****** श्री.ए.टी.पवार, वि.स.स. यांचे जागी मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी श्री.लक्ष्मण जगताप, वि.स.स. यांची समिती सदस्य म्हणून दिनांक ७ जानेवारी, २०१३ रोजी नामनियुक्ती केली.**

******* श्री.दिवाकर रावते, वि.प.स. यांचे जागी मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी श्री.विनायक राऊत, वि.प.स. यांची निमंत्रित म्हणून दिनांक १ नोव्हेंबर, २०१२ नामनियुक्ती केली.**

## लोकलेखा समिती
## २०१०-२०११

**समिती प्रमुख**

१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

२) श्री.कालिदास कोळंबकर - वि.स.स.
३) श्री.निलेश देशमुख-पारवेकर - वि.स.स.
४) डॉ.नामदेव उसेंडी - वि.स.स.
५) श्री.अमित देशमुख - वि.स.स.
६) श्री.रामप्रसाद कदम-बोर्डीकर - वि.स.स.
७) श्री. रवि राणा - वि.स.स.
८) श्रीमती मिनाक्षी पाटील - वि.स.स
९) श्री.ए.टी.पवार - वि.स.स.
१०) श्री.नवाब मलिक - वि.स.स.
११) श्री.विलास लांडे - वि.स.स.
१२) श्री.शिवेंद्रसिंह भोसले - वि.स.स.
१३) श्री.संजय सावकारे - वि.स.स.
* १४) श्री.सुधीर मुनगंटीवार - वि.स.स.
१४(अ) प्रा. राम शिंदे- वि.स.स.
१५) श्री.गिरीष महाजन - वि.स.स.
१६) श्री.नानाभाऊ पटोले - वि.स.स.
१७) श्री.सुर्यकांत दळवी - वि.स.स.
१८) श्री.आर.एम.वाणी - वि.स.स.
१९) श्री.एकनाथ शिंदे - वि.स.स.
२०) श्री.बाळा नांदगावकर - वि.स.स.
२१) श्री. सुरेशदादा देशमुख - वि.प.स.
२२) श्री.भाई जगताप - वि.प.स.
** २३) श्री. राजेंद्र जैन - वि.प.स.
*** २४) श्री. विनोद तावडे - वि.प.स.
२४(अ) श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स.
२५) डॉ. दिपक सावंत - वि.प.स.

**सदरहू समिती दिनांक २४ फेब्रुवारी, २०१० रोजी विधानसभा व दिनांक २ मार्च, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यांच्या नामनिर्देशनाद्वारे गठीत करण्यात आली.**

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

१) डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव.
२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव.
३) श्री. सु. सा. गायकवाड, वित्तीय सल्लागार.
४) श्री. ऋतुराज ज. कुडतरकर, अवर सचिव.
५) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती).
६) श्री. सोमनाथ न. सानप, कक्ष अधिकारी.

*** श्री.सुधीर मुनगंटीवार, वि.स.स यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्यत्वाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर प्रा. राम शिंदे, वि.स.स. यांची मा. अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा यांनी दिनांक २० ऑक्टोबर, २०१० रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

**** श्री.राजेंद्र जैन, वि.प.स. यांची दिनांक ५ डिसेंबर, २०१० रोजी विधानपरिषद सदस्यत्वाची मुदत संपली.**

***** श्री.विनोद तावडे, वि.प.स. यांची दिनांक २३ डिसेंबर, २०११ रोजी विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद पदी निवड झाल्यामुळे रिक्त झालेल्या जागेवर श्री.पांडुरंग फुंडकर, वि.प.स. यांची मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद यांनी दिनांक ६ फेब्रुवारी, २०१२ रोजी समिती सदस्य म्हणून नामनियुक्ती केली.**

## लोकलेखा समिती
## (२००८-२००९)

**समिती प्रमुख**

(१) श्री. दत्ताजी नलावडे (समिती प्रमुख), वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री. वल्लभ बेनके, वि.स.स.
(३) श्री. विलास लांडे, वि.स.स.
* (४) श्री. उत्तमराव भालेराव, वि.स.स.
(५) श्री. सुरेश वरपुडकर, वि.स.स. (दिनांक ८ डिसेंबर, २००८ रोजीपर्यंत )
(६) श्री. हरिदास भदे, वि.स.स.
(७) श्री. चंद्रशेखर भोसले, वि.स.स.
(८) श्री. गोपाळदास अग्रवाल, वि.स.स.
** (९) श्री. कालीदास कोळंबकर, वि.स.स.
(१०) श्री. भास्करराव पाटील-खतगांवकर, वि.स.स.(दिनांक २६ मे,२००९ रोजीपर्यंत)
(११) श्री. अशोक जाधव, वि.स.स.
(१२) श्री. प्रतापराव पाटील-चिखलीकर, वि.स.स.
(१३) श्री. संजय देशमुख, वि.स.स.
(१४) श्री. आर.एम.वाणी, वि.स.स.
(१५) श्री. राजेंद्र पाटणी, वि.स.स.
(१६) श्री. सुनिल धांडे, वि.स.स.
(१७) श्री. एकनाथराव गणपतराव खडसे (पाटील), वि.स.स.
(१८) श्री. गिरीष बापट, वि.स.स.
(१९) श्री. अमरसिंह पंडीत, वि.स.स.
(२०) श्री. चंद्रशेखर कदम, वि.स.स.
(२१) श्री. सुरेश देशमुख , वि.प.स.
(२२) प्रा. बी.टी देशमुख, वि.प.स.
(२३) श्री. राजेंद्र जैन, वि.प.स.
*** (२४) श्री. विनोद तावडे, वि.प.स.(दिनांक १६ जून,२००९ पासून निलंबित)
(२५) श्री. दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

(१) श्री. अनंत कळसे, प्रधान सचिव,
(२) श्री. अ.मा.शिंदेकर, सचिव,
(३) श्री. भा.ना. कांबळे, सह सचिव,
(४) श्री. विलास आठवले, अवर सचिव,
(५) श्री. ज.य.विचारे, कक्ष अधिकारी
(६) श्री. राजेश तारवी, कक्ष अधिकारी,

**सदरहू समिती दिनांक १३ ऑगस्ट, २००८ रोजी गठित झाली.**

*** श्री.सुरेश वरपुडकर, वि.स.स. यांचा दिनांक ९ डिसेंबर २००८ रोजी राज्यमंत्री म्हणून मंत्रिमंडळात समावेश झाल्याने रिक्त आहे.**

*** * श्री. भास्करराव पाटील - खतगांवकर, वि.स.स. यांची दिनांक २६ मे, २००९ रोजी लोकसभा सदस्य पदी निवड झाल्याने रिक्त आहे.**

*** * * श्री. विनोद तावडे, वि.प.स. यांना १६ जून, २००९ रोजी पासून निलंबित केल्याने रिक्त आहे.**

( )

# प्रस्तावना

मी, लोकलेखा समितीचा समिती प्रमुख, समितीने अहवाल सादर करण्याचा अधिकार दिल्यावरुन महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण मंडळाचे सन १९९५-९६ ते सन २००६-०७ या वर्षाचे वार्षिक लेखे व लेखा अहवाल यावर विचार करुन लोकलेखा समितीचा चौदावा अहवाल (बारावी महाराष्ट्र विधानसभा) सभागृहास सादर करीत आहे.

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षाच्या वार्षिक लेखे व लेखा अहवालासंदर्भात महालेखापरिक्षकांनी दिलेल्या अभिप्रायाच्या संदर्भात गृहनिर्माण विभागाने पुरविलेली स्पष्टीकरणात्मक ज्ञापने विचारात घेऊन समितीने १९९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षाच्या लेखे व लेखा विवरणपत्र अहवालासंदर्भात गृहनिर्माण विभागाच्या सचिवांची साक्ष घेतली. सन १९९५-१९९६ ते २००६-२००७ वार्षिक लेखे व लेखा अहवाल विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांना सादर करण्यात आला होता. त्यावर समितीने दिनांक २४ फेब्रुवारी, २००९, १२ ऑक्टोबर, २०१० आणि १८ जानेवारी, २०११ रोजी श्री.सिताराम कुंटे, सचिव, श्री.गौतम चॅटर्जी, प्रधान सचिव तथा उपाध्यक्ष म्हाडा तसेच श्री.सतीश गवई, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी व इतर विभागीय प्रतिनिधी यांची विधान भवन मुंबई येथे साक्ष घेतली.

लोकलेखा समितीने १८ जानेवारी, व ११ मे, २०११ रोजीच्या बैठकीत महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्या कामकाज / कार्यपध्दतीबाबत बांद्रा, मुंबई येथिल कार्यालयास भेट देण्यासाठी श्री.नवाब मलिक वि.स.स. यांच्या अध्यक्षतेखाली ७ सदस्याची उपसमिती नियुक्त करण्याचा निर्णय घेण्यात आला. उपसमितीने दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी म्हाडा कार्यालयास भेट देवून कामकाज / कार्यपध्दतीबाबत माहिती घेतली. सदर उपसमितीची माहिती अहवालात समाविष्ट करण्यात आली आहे.

श्रीमती अनीता पट्टनायक, प्रधान महालेखाकार महाराष्ट्र १, मुंबई या निमंत्रणावरुन बैठकींना उपस्थित होत्या. त्यांनी समितीला केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल व सहकार्याबद्दल समिती त्यांची अत्यंत आभारी आहे.

तसेच श्रीमती रंजना सिन्हा, प्रधान सचिव व श्री.राजेश अग्रवाल, सचिव, वित्त विभाग (लेखा व कोषागरे) यांनी समितीच्या बैठकींना उपस्थित राहून समितीला दिलेल्या सहकार्याबद्दल आणि संबंधित विभागाच्या सचिवांनी समितीसमोर साक्ष देऊन समितीला सहकार्य केले त्याबद्दल समिती त्यांची देखील आभारी आहे.

समितीच्या बैठकीच्या कामकाजाचे कार्यवृत्त स्वतंत्ररित्या ठेवण्यात आले असून तो अहवालाचा भाग आहे. बैठकीच्या कामकाजाच्या अनुषंगाने विभागाकडून प्राप्त झालेली आश्वासीत माहिती व परिपत्रके परिशिष्ट "अ" मध्ये देण्यात आलेली आहेत. समितीच्या झालेल्या बैठकांचे संक्षिप्त कार्यवृत्त परिशिष्ट "ब" मध्ये देण्यात आलेले आहे.

समितीने दिनांक २५ जुलै, २०१३ रोजी झालेल्या बैठकीत हा अहवाल विचारात घेतला व काही फेरफारासह त्यास मान्यता दिली.

**विधान भवन**
मुंबई,
दिनांक : २५ जुलै, २०१३

**गिरीश बापट,**
**समिती प्रमुख**
**लोकलेखा समिती**



**अनुक्रमणिका**

| अ.क्र. (१) | विभाग व तपशील (२) | पृष्ठ क्रमांक (३) |
|---|---|---|
| (१) | प्रस्तावना | |
| (२) | सन १९९५-९६ ते सन २००६-२००७ या वर्षांची लेखापरीक्षण व्यवस्था | |
| (३) | सन १९९५-९६ ते सन २००६-२००७ पर्यंतच्या आयव्यय पत्रकांचा तुलनात्मक गोषवारा | |
| (४) | सन १९९५-९६ ते २००६-२००७ या वर्षाचे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या लेख्यासंबंधीचे महालेखापालांचे आक्षेप व विभागाचा खुलासा | |
| (५) | परिशिष्ट- "अ" | |
| (६) | परिशिष्ट- "ब" समितीच्या बैठकीचे संक्षिप्त कार्यवृत्त | |

# गृहनिर्माण विभाग

## महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन १९९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षाचा लेख्यावरील लेखापरीक्षण अहवाल

**१.** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास अधिनियम १९७६ च्या कलम ३ अनुसार दिनांक ५ डिसेंबर, १९७७ रोजी मुख्यत्वेकरुन तत्कालीन संलग्न मंडळाचा जसे महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ, विदर्भ गृहनिर्माण मंडळ, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ आणि महाराष्ट्र झोपडपट्टी सुधारणा मंडळ, इत्यादीचा कार्यक्रम राबविण्याच्या दृष्टीने बांधकाम, गाळ्यांचे वाटप व विविध गृहनिर्माण योजना खालील विविध गटातील लाभार्थींच्या निवासी इमारतीची देखभाल, झोपडपट्टी निर्मुलन आणि पुनर्विकास कार्यक्रम, मुंबई बेटावरील जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींची दुरुस्ती आणि पुनर्बांधणी इत्यादी कार्यक्रम राबविण्याचे उद्दिष्ट नजरेसमोर ठेवून प्राधिकरणाची स्थापना करण्यात आली.

**प्राधिकरणाच्या अखत्यारित खालील १० मंडळे/प्रकल्प कार्यरत आहेत.**

अ) मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (मुंबई मंडळ)

ब) कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (कोकण मंडळ)

क) पुणे गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (पुणे मंडळ)

ड) नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (नाशिक मंडळ)

इ) औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (औरंगाबाद मंडळ)

फ) नागपूर गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (नागपूर मंडळ)

ग) अमरावती गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ (अमरावती मंडळ)

ह) मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ (दुरुस्ती मंडळ)

ळ) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ (झोपडपट्टी सुधार मंडळ)

ज) राजीव गांधी झोपडपट्टी सुधार व निवारा प्रकल्प (राजीव गांधी प्रकल्प)

प्रत्येक मंडळाचे/प्रकल्पाचे लेखे स्वतंत्रपणे ठेवण्यात येतात. वित्त नियंत्रक यांच्याकडे ठेवण्यात येणाऱ्या सर्व मंडळ/प्रकल्पासाठी असलेल्या एकत्रित लेख्यामध्ये सुद्धा स्वतंत्र लेखे दाखविण्यात येतात. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) कडून उभारलेले

कर्ज, मिळालेले अनुदान आणि त्याचा भरणा इत्यादीचा अंतर्भाव असतो. अशा प्रकारे ११ स्वतंत्र लेख्यांपासून म्हाडाचा एकत्रित लेखा तयार करण्यात येतो.

**२. सन १९९५-१९९६ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-**

**२.१ लेख्यांचा नमुना :**

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य तत्त्वानुसार ठेवण्यात येतात. परंतु बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखे पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्राधिकरणांतर्गत प्रत्येक मंडळ/घटक आपापले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद स्वतंत्ररित्या तयार करतात. नंतर त्याचे प्राधिकरण स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक ६ ऑगस्ट, १९९८ रोजी संपन्न झालेल्या १५२ च्या बैठकीमध्ये १९९५-१९९६ चे लेखे प्राधिकरणाकडून स्विकारण्यात आले.

**२.२ लेखा परिक्षण व व्यवस्था :-**

राज्य शासनाने विनंती केल्यावरुन भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक अधिनियम १९७१ च्या कलम २० (१) (कर्तव्ये, अधिकार व सेवाशर्ती) अनुसार प्राधिकरणाच्या लेख्यांचे लेखापरीक्षण करतात. सन १९९७-१९९८ पर्यंतच्या कालावधीच्या प्राधिकरणाच्या लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

**३. सन १९९६-१९९७ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-**

**३.१ लेख्यांचा नमुना :-**

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य तत्त्वानुसार ठेवण्यात येतात. परंतु बांधकामबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखे पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्राधिकरणांतर्गत प्रत्येक मंडळ/घटक आपापले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद स्वतंत्ररित्या तयार करतात. नंतर त्याचे प्राधिकरण स्तरावर एकत्रितकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक १३ जून, २००२ रोजी संपन्न झालेल्या बैठकीत १९९६-१९९७ चे लेखे प्राधिकरणाकडून स्वीकारण्यात आले.

**३.२ लेखा परिक्षण व व्यवस्था :-**

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक यांच्या वतीने अधिनियम, १९९७ च्या कलम २० (१) (कर्तव्य, अधिकार सेवा शर्ती) अनुसार प्राधिकरणाच्या लेख्यांचे परिक्षण करण्यात आले आहे. सन २००२-२००३ पर्यंतच्या प्राधिकरणाच्या लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

## ४. सन १९९७-१९९८ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-

### ४.१ लेख्यांचा नमुना :-

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात. परंतु बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्राधिकरणातील प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद स्वतंत्ररित्या तयार करतात व त्यानंतर त्यांचे प्राधिकरण स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक ३१ मार्च, २००१ रोजी झालेल्या बैठकीत सन १९९७-१९९८ या वर्षाचे प्राधिकरणाकडून स्विकारण्यात आले.

### ४.२ लेखा परिक्षण व व्यवस्था :-

भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांच्या वतीने अधिनियम १९७१ च्या कलम २० (१) (कर्तव्य अधिकार, सेवा शर्ती) अनुसार प्राधिकरणाच्या लेख्यांचे लेखापरिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांच्याकडे सोपविण्यात आले आहे.

### ४.३ लेख्यावरील भाष्य :-

प्राधिकरणाचा ताळेबंद आणि उत्पन्न आणि खर्च लेखांवरील सविस्तर लेखा-खालीलप्रमाणे

१) लेखा ठेवण्याच्या पद्धतीत उणीव व लेख्यांवरील टिप्पणी.

प्राधिकरण तसेच प्राधिकरणांतर्गत मंडळांच्या लेख्यातून लेख्याविषयी विशिष्ट धोरण स्पष्ट होत नाही. त्यामध्ये लेख्यांवरील टिप्पणीचा समावेश नसतो.

## ५. सन १९९८-१९९९ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-

### ५.१ लेख्याचा नमुना :-

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात. बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद तयार करतात आणि प्राधिकरणाच्या स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक २५/२/२००२ रोजी झालेल्या बैठकीत सन १९९८-९९ चा वार्षिक लेखा मंजूर करण्यात आलेला आहे.

### ५.२ लेखा व्यवस्था :-

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्य अधिकार, सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते. सन २००२-२००३ पर्यंतच्या

लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

**६. सन १९९९-२००० या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-**

**६.१ लेख्याचा नमुना :-**

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात. बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद तयार करतात आणि प्राधिकरणाच्या स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक १२/७/२००२ रोजी झालेल्या बैठकीत सन १९९९-२००० चा वार्षिक लेखा मंजूर करण्यात आलेला आहे.

**६.२ लेखा व्यवस्था :-**

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्य अधिकार, सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते, सन २००२-२००३ पर्यंतच्या लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

**७. सन २०००-२००१ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-**

**७.१ लेख्याचा नमुना :-**

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात. बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद तयार करतात आणि प्राधिकरणाच्या स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक ३/९/२००२ रोजी झालेल्या बैठकीत सन २०००-२००१ चा वार्षिक लेख मंजूर करण्यात आलेला आहे.

**७.२ लेखा परिक्षण व व्यवस्था :-**

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्य अधिकार, सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते. सन २००२-२००३ पर्यंतच्या लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

प्राधिकरणाच्या ताळेबंद तसेच प्राप्ती व लेखा खर्च यावरील लेखापरीक्षण व भाष्य तपशीलवार खाली नमूद केले आहे.

**८. सन २००१-२००२ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-**

**८.१ लेख्याचा नमुना :-**

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात. बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद तयार करतात आणि प्राधिकरणाच्या स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक १०/११/२००२ रोजी झालेल्या बैठकीत सन २००१-२००२ चा वार्षिक लेखा मंजूर करण्यात आलेला आहे.

**८.२ लेखा परिक्षण व व्यवस्था :-**

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्य अधिकार, सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते. सन २००७-२००८ पर्यंतच्या लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

**९. सन २००२-२००३ या वर्षाचे लेखापरिक्षण व व्यवस्था :-**

**९.१ लेख्याचा नमुना :-**

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात. बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद तयार करतात आणि प्राधिकरणाच्या स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक १०/११/२००३ रोजी झालेल्या बैठकीत सन २००१-२००२ चा वार्षिक लेखा मंजुर करण्यात आलेला आहे.

**९.२ लेखा परिक्षण व व्यवस्था :-**

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्य अधिकार, सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते. सन २००७-०८ पर्यंतच्या लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

## १०. सन २००३-२००४ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-

### १०.१ लेख्याचा नमुना :-

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पध्दतीने ठेवण्यात येतात. बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पध्दतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे लेखे आणि तोळेबंद तयार करतात आणि प्राधिकरणाच्या स्तरावर एकत्रिकरण करण्यात येते. प्राधिकरणाच्या दिनांक २१/६/२००५ रोजी झालेल्या बैठकीत सन २००३-२००४ चा वार्षिक लेखा मंजूर करण्यात आलेला आहे.

### १०.२ लेखा परिक्षण व व्यवस्था :-

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरीक्षक (कर्तव्य अधिकार, सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते. सन २००७-२००८ पर्यंतच्या लेख्याच्या लेखापरीक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

## ११. सन २००४-२००५ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-

### ११.१ लेख्याचा नमुना :-

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात आणि बांधकामसंबंधीचे लेखे हे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपआपले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद स्वतंत्रपणे तयार करतात आणि तद्नंतर ते प्राधिकरण स्तरावर एकत्रित तयार करण्यांत येतात. १८ मार्च २००६ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या बैठकीत सन २००४-२००५ या वर्षीच्या लेख्यांना मंजूरी देण्यांत आली.

### ११.२ लेखा परीक्षण व्यवस्था :-

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक (कर्तव्य, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते.

प्राधिकरणाच्या लेख्यांच्या लेखापरीक्षणाचे कामाचा कालावधी भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांचेकडे २००७-२००८ पर्यंत वाढविण्यात आला आहे.

## १२. सन २००५-२००६ या वर्षाचे लेखापरीक्षण व व्यवस्था :-

### १२.१ लेख्याचा नमुना :-

प्राधिकरणाचे लेखे वाणिज्य पद्धतीने ठेवण्यात येतात. बांधकामाबाबतचे लेखे सार्वजनिक बांधकाम लेखा पद्धतीनुसार ठेवण्यात येतात. प्रत्येक मंडळ/घटक आपापले जमा खर्चाचे लेखे आणि ताळेबंद तयार करतात आणि प्राधिकरणाच्या स्तरावर एकत्रिकरण करण्यांत येते. प्राधिकरणाच्या दिनांक ११ जानेवारी २००७ रोजी झालेल्या बैठकीत सन २००५-२००६ चा वार्षिक लेखा मंजूर करण्यांत आला.

### १२.२ लेखा परीक्षण व्यवस्था :-

भारताचे नियंत्रक आणि महालेखापरिक्षक (कर्तव्य, अधिकार आणि सेवा शर्ती) अधिनियम १९७१, नियम २० (१) नुसार म्हाडाचे लेखापरीक्षण करण्यात येते. सन २००७-२००८ पर्यंतच्या लेख्याच्या लेखापरिक्षणाचे काम भारताचे नियंत्रक व महालेखापरिक्षक यांचेकडे सोपविण्यात आले आहे.

**सन २००६-२००७**

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९६-९७ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**ज्ञापन :**
**सन १९९५-१९९६**

### १२.३ लेख्यामधील सर्वसाधारण त्रुटी :

अ) प्राप्य/अप्राप्य/बुडीत कर्जाच्या वर्गीकरणाची पध्दत ठेवली नाही. अप्राप्य कर्जाकरित तरतूद नाही. १९७७ मध्ये प्राधिकरणाची निर्मिती झाल्यापासून कित्येक कर्जे प्रलंबित होती. बुडीत कर्जे म्हणून कधीही रकमांचे निर्लेखिकरण केलेले नाही.

ब) ठेवी रकमाचे विक्री रकमेमध्ये करावयाचे समायोजन मोठ्या प्रमाणात बाकी आहे. जेथे गाळ्यांची संपूर्ण रक्कम भरण्यात आलेली आहे. अशा प्रकरणीसुध्दा समायोजन केलेले नाही. परंतु परिच्छेद ८.२ मध्ये काही विशिष्ट प्रकरणे अंशत: निरीक्षण करतेवेळी, निदर्शनास आली. थकबाकी किती प्रमाणात आहे हे खालील उदाहरणावरुन स्पष्ट होते.

| वर्ष | वर्षातील बांधकाम (अनुसूची-९) | विक्री (वर्षातील)(अनुसूची २०) (रु. लाखात) | | | खर्चाच्या प्रमाणात विक्रीची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| | | गाळे | भूखंड | एकूण | |
| १९८०-८१ | १६५६.६३ | २४३.०५ | ३९.२१ | २८२.२६ | -- |
| १९८१-८२ | १७९५.६२ | -- | -- | -- | -- |
| १९८२-८३ | १५२९.०५ | -- | -- | -- | -- |
| १९८३-८४ | २९७४.९३ | -- | ४८७.३७ | ४८७.३७ | -- |
| १९८४-८५ | २५०४.४८ | ८९२.३५ | -- | ८९२.३५ | -- |
| १९८५-८६ | २६५८.९२ | ६६९.२६ | -- | ६६९.२६ | -- |
| १९८६-८७ | २६३५.७३ | ३५.६४ | -- | ३५.६४ | -- |
| १९८७-८८ | ३९५१.५९ | १०.७८ | -- | १०.७८ | -- |
| १९८८-८९ | ४३३७.८६ | ५.९० | -- | ५.९० | -- |
| १९८९-९० | ३९६९.२१ | ७२.३१ | -- | ७२.३१ | -- |
| १९९०-९१ | ३७३९.७७ | ३.०२ | ११.४४ | १४.४६ | -- |
| १९९१-९२ | ५२८०.८७ | १३.५८ | ८.५६ | २२.१४ | -- |
| १९९२-९३ | ७४०८.०५ | १०.१४ | ४५०.३३ | ४६०.४७ | -- |
| १९९३-९४ | ९००२.५३ | २८९.४३ | १०५४.४८ | १३४३.९१ | -- |
| १९९४-९५ | १०१२४.७० | २१९.७० | १६०.७९ | ३८०.४९ | -- |
| १९९५-९६ | ९६६९.२५ | २००.५० | ५४.९४ | २५५.४४ | -- |
| **एकूण :** | **७३२३९.१९** | **२६६५.६६** | **२२६७.१२** | **४९३२.७८** | **६.७३** |

टिप : १) मार्च १९८० अखेरपर्यंतच्या कालावधीत नोंदविलेला एकूण खर्च रु.१०,०२६.५२ लक्ष होता.

२) मार्च १९९६ अखेरपर्यंत नोंदविलेला खर्च रु. ८२,१३३.४७ लक्ष होता.

३) एकूण खर्चाची सुरुवातीची शिल्लक मागील वर्षाच्या अखेरची शिल्लक यामध्ये तफावत आहे.

१९८०-८१ व १९८१-८२

१९८३-८४ व १९८४-८५

१९८४-८५ व १९८५-८६

१९८५-८६ व १९८६-८७

१९८६-८७ व १९८७-८८

१९९३-९४ व १९९४-९५

४) अनुसूची ९ मध्ये नोंदविलेल्या रकमा १९८६-८७ (जागतिक बँक प्रकल्प) १९८९-९० (जागतिक बँक प्रकल्प) आणि १९९२-९३ (गृहनिर्माण) च्या जमा व खर्च खात्यामध्ये आणलेल्या रकमा यामध्ये तफावत आहे.

१९८०-८१ ते १९९५-९६ या कालावधीतील एकूण बांधकामावरील खर्च (गृहनिर्माण व जागतिक बँक प्रकल्प मिळून) रु. ७३२३९.१९ लक्ष तर त्याच कालावधीकरिता (गाळे व भूखंड यांची एकूण विक्री रु. ४९३२.७८ लक्ष जी एकूण खर्चाच्या ६.७३ टक्के असल्याचे वरील तक्त्यावरुन दिसून येते.) विक्रीच्या रकमा मोइया प्रमाणात ठेव या शीर्षकाखाली नोंदण्यात आल्या असून त्या कालावधीसाठी विक्रीखाली दर्शविण्याचे राहून गेलेल्या आहेत.

क) लेख्याच्या लेखा पध्दतीची टिप्पणी लेख्यांच्या पृष्ठयर्थ देण्यात आलेली नाही.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

म्हाडाच्या कोणत्याही मंडळाने अप्राप्य अथवा बुडीत कर्जाबद्दल काहीही कळविलेले नाही. तसा प्रस्ताव असल्यास तरतूद करता येऊ शकेल. यापूर्वी म्हाडाने जेव्हा जेव्हा गरज पडली तेव्हा तेव्हा निर्लेखन केले आहे.

ठेवी रकमांचे विक्री रकमात रुपांतर करण्यात खालील अडचणी आहेत.

१) गाळे धारकांच्या सहकारी संस्था स्थापन करण्यासाठी ते पुढे येत नसल्यामुळे अनेक प्रकरणात इमारतींचे हस्तांतरण होऊ शकलेले नाही.

२) अभिहस्तांतरण स्विकारण्यापूर्वी इमारतींची दुरुस्ती मंडळाने करुन घ्यावी, अशी सर्वसाधारण मागणी आहे. तथापि हे खर्चाच्या दृष्टीने मंडळांच्या आवाक्याबाहेर आहे.

३) गाळेधारकांकडून थकबाकी वसुल करण्यात उशीर होत असल्यामुळे व वसुली प्रलंबित असल्यामुळे अभिहस्तांतरणात अडचणी येतात.

४) बृहन्मुंबई अनेक इमारतींना एक अशी सामायिक पाण्याची व्यवस्था आहे. जोवर प्रत्येक इमारतीस वेगळी पाण्याची व्यवस्था होत नाही तोवर अभिहस्तांतरण करुन घेण्यास गाळेधारकांच्या सहकारी संस्था तयार होत नाहीत व हे काम मंडळाच्या आर्थिक आवाक्याच्या बाहेर आहे.

५) अभिहस्तांतरणच्या वेळी मोठ्या प्रमाणावर स्टँपड्युटी आकाली जात असल्यामुळे सुध्दा अभिहस्तांतरणात अडचणी येतात.

असे असले तरी प्राधिकरणाने आपल्या दिनांक २४/१०/२००१ च्या परिपत्रक-८ नुसार ठेवींचे त्या त्या जमेत वर्गीकरण करुन रकमा वेगळ्या करण्याचे आदेश निर्गमित केले आहेत व अभिहस्तांतरण न होताही हे करण्यात यावे असे आदेश दिले आहेत. वर्गीकरणाचे कार्य प्रगतीपथावर आहे.

**१३. भांडवली निधी (अनुसूची १)**

**१३.१ मुंबई मंडळ**

झोपडपट्टी निर्मुलन योजनेसाठी स्थानिक प्राधिकरणाकडून (१९७७-७८ मध्ये) मिळालेल्या रु. ७७.७६ लक्ष अर्थसहाय्य प्राप्त झाले होते. परंतु लेख्यामध्ये शासनाकडून प्राप्त झालेली रक्कम चुकीने दाखविण्यात आली. बांधकाम खर्चाच्या अनुसूचीमध्ये फक्त रु. २२.५४ लक्ष एवढी रक्कम दाखविण्यात आलेली आहे. रु. ५५.२२ लक्ष शिल्लक रकमेचा तपशिल यापूर्वीच्या अहवालात (ले.प.१९९२-९३ परिच्छेद ७.१ ले.प.१९९३-९४ परिच्छेद ५ आणि ले.प.१९९४-९५ परिच्छेद ५) निदर्शनास आणून देऊन सुध्दा उपलब्ध करण्यात आला नाही.

एकूण रु. ७७.७६ लक्ष रकमेपैकी रु. ५५.२२ लक्ष रोकड रुपाने होते आणि रु. २२.५४ लक्ष खर्च होता असे प्राधिकरणाने (ऑक्टोबर १९९८) अन्वये कळविले आहे. शिल्लक रु. ५५.२२ लक्ष रकमेचा तपशिल अद्याप देण्यात न आल्यामुळे, वरील उत्तर स्विकारण्यात आलेले नाही.

**१४. विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**१४.१ मुंबई मंडळ**

झोपडपट्टी निर्मुलन योजनेसाठी स्थानिक प्राधिकरणाकडून प्राप्त झालेली रक्कम वर्ष १९९४-९५ च्या वार्षिक लेख्यात चुकीने शासनाकडून प्राप्त झाल्याचे दाखविण्यात आले. ही वर्गीकरणाची चूक दुरुस्त करुन सन १९९५-९६ च्या वार्षिक लेख्यात योग्य ठिकाणी लिहिण्यात आली असून महालेखापाल (ले.प.) यांना दाखविण्यात येईल.

झोपडपट्टी निर्मुलन योजनेखाली दिनांक ४/१२/१९७७ पर्यत रुपये ११.९६ कोटी इतका खर्च करण्यात आला. त्यापैकी रु. २२.५४ लक्ष एवढी रक्कम मुंबई महानगरपालिकेकडून कामाच्या स्वरुपात प्राप्त झाली होती म्हणून ती लेख्यात तशीच वेगळी दाखविण्यात आली. याचा अर्थ तेवढीच रक्कम खर्च झाली असा लावणे चुकीचे होईल. एकूण रक्कम रुपये ११.९६

कोटी खर्चामध्ये संपूर्ण प्राप्त रुपये ७७.७६ लक्षचा अंतर्भाव तर आहेच. शिवाय त्या तारखेला स्थानिक प्राधिकरण जसे मुंबई महानगरपालिका रुपये ११.५९ लक्ष आणि मालेगाव पालिका रुपये २.५० लक्ष अशी एकूण रुपये १४.०९ लक्ष इतकी रक्कम अजूनही सबसिडी पोटी येणे आहे.

**१५. राखीव व शिलकी (अनुसूची २)**

**१५.१ वित्त नियंत्रक / प्राधिकरण**

निवृत्ती वेतन राखीव निधी (दु. व पु.) यामध्ये असलेल्या रु. ५२.६८ लाख जमेत १९८९-९० पासून दुरुस्ती मंडळ आणि झोपडपट्टी मंडळ यांच्याकडून जमा झालेल्या निवृत्ती वर्गणीचा समावेश आहे. निधीशी संबंधित व्यवहार नोंदवहीमध्ये स्पष्टपणे नोंदविण्यात आलेला नाही. खातेवही तसेच तेरीजमध्ये शिल्लक स्वतंत्रपणे आढळून येत नाही.

जे शासकीय कर्मचारी प्राधिकरणाच्या सेवेत सामावून घेण्यात आलेले आहेत त्यांचे निवृत्ती वेतन आणि इतर निवृत्तीचे फायदे भागविण्यासाठी जरी वर्गणी निधीचा उद्देश असला तरी अद्यापपर्यंत खर्चाची नोंद झालेली नाही. हाच मुद्दा लेखापरीक्षण अहवाल १९९४-९५ चा परिच्छेद ६.२ मध्ये घेण्यात आलेला आहे.

**१६. विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**१६.१ वित्त नियंत्रक/प्राधिकरण**

हा राखीव निधी शासनाकडे वर्ग करण्यात येत असल्याचे उत्तर दिनांक २६ व २७/९/२००० रोजी झालेल्या बैठकीत लोकलेखा समिती पुढे देण्यांत आलेले होते.

भूतपूर्व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ व गलिच्छ वस्ती सुधार मंडळातील कर्मचाऱ्यांची प्राधिकरणाकडे जमा होणारी निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम शासनाकडे जमा करण्यांत यावी किंवा कसे याविषयी शासनाच्या आदेशासाठी या कार्यालयाचे पत्र क्रमांक प्राधि/मुंइदुवपुमं/निवे/विनि-१३/२३५० दिनांक २०/१०/२००१ रोजी शासनाला स्मरणपत्र देखील पाठविण्यांत आले आहे. शासन स्तरावर कार्यवाही चालू आहे.

**१६.२ महसुली राखीव**

१) एकूण महसुली राखीव रु. ४५५१.७४ लक्ष मध्ये अनुक्रमे रु. ५७०.६९ लक्ष आणि रु. ३७७.४६ लक्ष दुरुस्ती आणि पुनर्रचना मंडळ आणि झोपडपट्टी सुधारणा मंडळ यांच्या प्रत्यक्ष आस्थापना खर्चापेक्षा जास्त टक्केवारी खर्च समाविष्ट आहे की जी मुंबई मंडळापासून विभाजनानंतर डिसेंबर १९९२ मध्ये ते मंडळ स्वतंत्रपणे स्थापना होण्यापूर्वीच्या कालावधीचा आहे. महसुली राखीव संबंधित मंडळाकडे हस्तांतरीत न केल्यामुळे मुंबई मंडळाच्या महसुली राखीव रु. ९४८.१५ लक्ष एवढयाने जास्त दिसतो.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर १९९८) असे कळविले आहे की महसुली राखीवचे संबंधित मंडळामध्ये संविभाजन करण्याची आवश्यकता नाही. कारण यामध्ये मोठा गुंता आहे आणि प्राधिकरणाकडे राखीव ठेवण्यात आलेला आहे. ह उत्तर समर्थनीय नाही कारण मंडळाचे स्वतंत्र अस्तित्व आहे. लेखाचे खरे चित्र दिसण्यासाठी महसुली राखीवचे त्यांच्यामध्ये संविभाजन होणे आवश्यक आहे.

२) शिवाय महसुल राखीवमध्ये मंडळाच्या लेखामध्ये महसुल म्हणून दाखविण्यात आलेल्या प्रत्यक्ष आस्थापना खर्चापेक्षा जास्त असलेल्या रु. २१५.७० लक्ष टक्केवारी खर्चही समाविष्ट आहे. मार्गदर्शक तत्वाच्या मुख्य अटीप्रमाणे प्राधिकरण प्रत्यक्ष आस्थापना खर्चापेक्षा जास्त टक्केवारी खर्च लावू शकत नाही. म्हणून महसुली राखीव रु. २१५.७० लक्ष अवास्तविक महसुल आहे. त्यामुळे महसुल राखीव रु. २१५.७० लक्ष जास्त दाखविला आहे.

**१६.३** दु.व.पु.मंडळ आणि झो.सु.मंडळ ५/१२/७७ पासून मुंबई गृ.व.क्षेत्रविकास मंडळाचा एक भाग म्हणून काम करत होते. हा एक स्वतंत्र कार्यक्रम आहे व तसा तो स्वतंत्र दिसावा म्हणून या विभागाचे लेखे स्वतंत्र दाखविले जात. मुंबई गृ.व क्षेत्रविकास मंडळ ही प्रमुख संस्था असून वरील दोन्ही विभागांची जबाबदारी व कार्य ते पार पाडीत असे. अनुसूची २१ मध्ये दर्शविलृल्याप्रमाणे आस्थापना खर्च अधिक प्रमाणात भांडवलीकृत करण्यात आला आहे. ते मंडळाचे उत्पन्न म्हणून दिसत असून अंतिमत: मंडळाच्या अधिक्यात वाढ झालेली आहे. जर हे संचित उत्पन्न वरील मंडळामध्ये विभागले गेले तर मुंबई गृ. व क्षेत्रविकास मंडळाने या दोन विभागावर केलेला खर्च जसे की देयकाची तपासणी, त्यांना पुरविलेली स्टेशनरी व छापिल मजकुरांची कागदपत्रे कर्मचाऱ्यांना वर्षानुवर्ष दिलेला गणवेश, छत्र्या कार्यालयासाठी पुरविण्यात आलेला उपस्कर व वेतन व भत्ते यांचा खर्चही या दोन मंडळावर विभागावा लागेल. या उत्पन्नाची व खर्चाची विभागणी करणे अशक्य आहे.

**१६.४** प्रती वर्षी फार मोठ्या प्रमाणावर बांधकामे हाती घेण्यात येतात. प्राधिकरणाने असा निर्णय घेतलेला आहे की प्रती वर्षी सर्व कामांवर सरसकट १० टक्के प्रमाणे आस्थापना खर्च आकारावा प्रत्यक्ष खर्चाचे बांधकामावर लादण्याचे ठरविल्यास त्यासाठी स्वतंत्र परिगणना करावी लागेल. अशा प्रकारे निश्चित दराने आस्थापना खर्च लादणे संयुक्तिक आहे. जर संस्थेने मोठ्या प्रमाणावर कामे हाती घेवून पार पाडल्यास त्या संस्थेच्या कार्यकुशलतेचे श्रेय त्यास मिळणे आवश्यक आहे. हे तत्व या ठिकाणी अवलंबिलेले आहे. कामे कमी झाल्यास भांडवलीकरणाचे प्रमाण वाढविणे भाग पडेल. असे करणे संस्थेच्या दृष्टीकोनातून योग्य ठरणार नाही.

**१७. दुरुस्ती मंडळ :**

घसारा निधी रु. ५९.८५ लक्ष मध्ये रु. ५९.२५ लक्ष वाहनांचा घसारा, लाकडी सामान आणि कार्यालयीन साधनसामुग्री, हत्यारे आणि संयंत्रे इ. यांच्या घसाऱ्याचा समावेश आहे. (किंमत रु. १५.३४ लक्ष) १९९३-९४ मध्ये मुंबई मंडळाकडून हस्तांतरीत करण्यात आलेला नाही. मालमत्तेची मूळ भांडवली किंमत रु. ४३.९१ लक्ष होती त्यापेक्षाही घसारा निधी जास्त हस्तांतरीत केला आहे आणि त्याचा परिणाम घसारा निधी तेवढ्या प्रमाणात फुगविला गेला. यापूर्वीच्या १९९४-९५ च्या लेखा परीक्षण अहवाल परिच्छेद ६.३.१ अहवालात अशी विचारणा केली होती. परंतु मंडळाने मालमत्तेच्या मूळ किंमतीपेक्षा जास्त घसारा निधी हस्तांतरण केल्याची कारणे दिलेली नाहीत.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर १९९८) कळविले आहे की,रु. ५९.२५ लक्ष राखीव घसारा नसून, मंडळाच्या विभाजनाच्या वेळी दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला दायित्वांपेक्षा मालमत्ता जास्तने हस्तांतरीत केली. हे उत्तर समर्थनीय नाही दायित्वापेक्षा मालमत्तेची किंमत जास्त असल्याने ते घसारा राखीव खाली न दर्शविता योग्य लेखाशिर्षाखाली दाखविणे जरुरीचे आहे.

**१७.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

लाकडी सामान, कार्यालयीन साधनसामुग्री व हत्यारे आणि सयंत्रे यांच्या घसाऱ्यापोटी असलेली रु. ५९.२५ लक्ष रक्कम मुंबई मंडळाने कोणतीही सबळ माहिती न देता, हस्तांतरीत केली (सन १९९३-१९९४ मध्ये) मुंबई मंडळाने दर्शविल्याप्रमाणे सदरची रक्कम ही वार्षिक लेख्यात राखीव घसारा म्हणून दर्शविण्यांत आली होती. याबाबत तपासणी केल्यानंतर मुंबई

मंडळास या कार्यालयाच्या पत्र क्रमांक ९२२ दिनांक ३०/३/२००२ अन्वये स्पष्टीकरण मागितले असता त्यांनी रु. ५९.२५ लक्ष ही रक्कम राखीव घसारा नसून राखीव निधी असल्याचे या कार्यालयास कळविले आहे. त्यानुसार रक्कम रु. ५९.२५ लक्ष वार्षिक लेखे २००१-२००२ मध्ये राखीव निधी म्हणून दर्शविण्यात येईल.

**१८. कोकण मंडळ**

योग्य कागदपत्रांच्या अभावी भाडेकरुंकडूनच्या ठेवी खालील शिलकोचे खरेपणाबाबत खातरजमा करणे शक्य झाले नाही.

**१८.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

योग्य ते दप्तर तयार करण्यात येत आहे व ते पुढील लेखा परीक्षणाला उपलब्ध करुन देण्यात येईल.

**१९. दुरुस्ती मंडळ :**

संरचनात्मक दुरुस्तीच्या कमाल खर्चाच्या मर्यादेपेक्षा जास्त झालेला खर्च मिटविण्याकरिता भाडेकरुची भाग रक्कम रु. ६३३.६६ लक्ष ठेवीखाली आहे. या प्रवर्गामध्ये मोठ्या प्रमाणात साठविलेल्या ठेव रकमेवरुन असे दिसून येते की एकतर दुरुस्तीचे काम केले नाही किंवा खर्च केलेल्या रकमेचे ठेवी मधून समायोजन केले नाही. नोंदी अपुऱ्या होत्या. त्यामुळे प्रत्यक्ष स्थिती आणि शिलकेची सत्यता तपासणे शक्य झाले नाही.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर १९९८) मध्ये कळविले आहे की, १९९७-९८ च्या वार्षिक लेख्यामध्ये योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

**१९.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**दुरुस्ती मंडळ :**

भागभांडवलाचे समायोजन करण्याबाबत सहाय्यक लेखाधिकारी, उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयास वेळोवेळी समायोजन करण्याबाबत सूचना देण्यांत आलेल्या असून अद्यापपर्यंत या कार्यालयाकडून पूर्तता अहवाल प्राप्त झालेला नाही. तथापि याबाबत कामाचे स्वरुप लक्षांत घेता भागभांडवलाबाबतच्या नोंदीचे समायोजन लवकरात लवकर करण्याच्या दृष्टीने संगणकावर एक कार्यक्रम तयार करुन त्यानुसार समायोजन करण्याचा प्रयत्न चालू आहे.

**२०. मुंबई मंडळ :**

गृहनिर्माण या शीर्षाखाली किरकोळ देणी रु. ६४६.११ लक्ष मध्ये १९८३-८४ ते १९९३-९४ या कालावधीतील रु. ३७४.५९ लक्ष देण्याचा अंतर्भाव आहे. मंडळाने देय रकमांची वसूली/समायोजन न होण्याबाबतची कारणे दिली नाहीत. देय रकमांची प्रत्यक्ष वसूलीची माहिती त्यामुळे काढण्यात आली नाही.

**२०.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :**

वार्षिक लेख्याच्या अनुसूचीमध्ये किरकोळ ऋणको या शिर्षकाखाली खालील रकमा दाखविण्यांत आलेले आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | आगाऊ अंशदान योजना | रु. ४९.०३ लाख |
| २) | एक रकमी खरेदीवरील गाळे | रु.११४.८४ लाख |
| ३) | इतर रक्कम | रु. १७.२२ लाख |
| | | रु.१८१.०९ लाख |
| ४) | सिमेंट कंपनीकडून व्याजापोटी वसुल करण्याची रक्कम | रु. ९.२१ लाख |
| ५) | प्रतिनियुक्ती वरील शासनाचे कर्मचाऱ्यांचे रजेचे पगार | रु. ९.८० लाख |
| ६) | मागासवर्गीय गृ.नि.संस्थेकडून देखरेख व व्याजापोटी वसूल करावयाची रक्कम | रु.१०२.७३ लाख |
| ७) | बृहन्मुंबई महानगरपालिका | रु. ५८.८७ लाख |
| ८) | स्थानिक प्राधिकरणे | रु. १२.३१ लाख |
| ९) | संजय गांधी निराधार योजनेकडून वाहन चालकाचे वेतन व भत्ते | रु. ०.४० लाख |
| १०) | आयकर विभागाकडून आयकर वापसी रक्कम | रु. ०.१८ लाख |
| | | रु.३७४.५९ लाख |

१, २ व ३ सदर रकमेचे समायोजन करावयाचे आहे. त्याबाबतची सविस्तर माहिती मिळकत व्यवस्थापकाकडून मागविण्यांत आलेली आहे.

४ सदर रक्कम सिमेंट कंपनीकडून वसूल करावयाची आहे.

सदर रक्कम आगाऊ सिमेंट कंपनीकडे पुरवठ्यासाठी जमा करण्यांत आली होती. ती त्यांच्याकडे पडून आहे. त्याबाबत शासनाशी पत्रव्यवहार चालू आहे.

५ प्रतिनियुक्तीवरील अधिकाऱ्यांचे रजेचे पगार शासनाच्या विविध विभागाकडून वसूल करावयाचे आहेत. सदर रक्कम वसुलीबाबत प्रयत्न करण्यांत येत आहेत.

६ सदर रक्कम मागासवर्गीय गृहनिर्माण संस्थेसाठी गुंतवलेल्या भांडवलीवरील व्याज व देखरेखीबाबतच्या भारामुळे झालेल्या नुकसानीबद्दल प्रतिपूर्तीची असून सदर रक्कम शासनाकडून वसूल करावयाची आहे.

७ बृहन्मुंबई महानगरपालिकेला दिलेल्या जागेचे किंमतीपोटी वसूल करावयाची रक्कम.

८ सदर रक्कम स्थानिक विकास प्राधिकरण गलिच्छवस्ती सुधार योजनेकरिता सहभागाची रक्कम.

९ शासनाकडून वसुल करावयाची रक्कम.

१० पत्रव्यवहार चालू आहे.

**२१. प्रशासकीय आणि इतर खर्च (अनुसूची १६)**

**दुरुस्ती मंडळ**

**२१.१** प्रशासकीय आणि इतर खर्चावरील एकूण खर्च रु. २९४.६० लक्ष परंतु बांधकाम आणि दुरुस्ती काम तसेच आय आणि व्यय खाते यावर एकत्रित रु. ३०१.१८ लक्ष (रु. ८५.४५ लक्ष अनुसूची ९ ए रु. ३७.५० लक्ष, अनुसूची १८ आणि रु. १७८.२३ लक्ष आय व व्यय खाते) उणे खर्च रु. ६.५८ लक्ष सोडून हस्तांतरीत केले. उणे खर्च अनुसूची २३ मध्ये टक्केवारी खर्चाच्या ऐवजी जमा म्हणून घेतले.

रु. २९४.६० लक्ष एकूण खर्चापैकी फक्त रु. ८५.४५ लक्ष बांधकाम खर्चाच्या १० टक्के भांडवलीकरणासाठी योग्य होते. उर्वरित रु. २०९.१५ लक्ष आय आणि व्यय खात्याला परस्पर आकारण्याजोगे होते. त्याऐवजी आय आणि व्यय खात्याला रु. २१५.७३ लक्ष (रु. १७८.२३ लक्ष + रु. ३७.५० लक्ष) आकारण्यात आले. त्यामुळे खर्च तसेच जमा रु. ६.५८ लक्षने फुगवून दाखविले.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर १९९८) कळविले आहे की सोईच्या दृष्टीने बांधकाम खर्चाच्या सरसकट १० टक्के दराने भांडवलीकरण केले जाते. जास्त केलेल्या कामाच्या भांडवलीकरणामुळे विक्रीच्या किंमतीत वाढ होईल आणि मालमत्तेची किंमत वाढेल. म्हणून हे

समर्पक नाही. कळविले आहे की सोईच्या दृष्टीने बांधकाम खर्चाच्या सरसकट १० टक्के दराने भांडवलीकरण केले जाते. जास्त केलेल्या कामाच्या भांडवलीकरणामुळे विक्रीच्या किंमतीत वाढ होईल आणि मालमत्तेची किंमत वाढेल. म्हणून हे समर्पक नाही. कळविले आहे की सोईच्या दृष्टीने बांधकाम खर्चाच्या सरसकट १० टक्के दराने भांडवलीकरण केले जाते. जास्त केलेल्या कामाच्या भांडवलीकरणामुळे विक्रीच्या किंमतीत वाढ होईल आणि मालमत्तेची किंमत वाढेल. म्हणून हे समर्पक नाही.

**२१.२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**दुरुस्ती मंडळ**

आस्थापनाखर्चात अनेक प्रकारच्या कार्मचाऱ्यांच्या जसे प्राधिकरणातील इंजिनिअर्स, आर्किटेक्ट असिस्टंट इ. पगारावरील खर्च अंतर्भूत असतो व प्रत्यक्ष खर्च काढणे अवघड असते. त्यामुळे प्राधिकरणाने १० % सरसकट आस्थापनाखर्च योजनेवर आकारण्यात यावा असा निर्णय घेतला आहे. त्यामुळे जरी आस्थापना खर्चाचे प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त भांडवलीकरण झाले तरी ते एका विशिष्ट धोरणामुळे झाले आहे.

**२१.३** विटा निर्मिती योजना १९८०-८१ पासून कार्यान्वित होती, जी नंतर बंद करण्यात आली. त्यावरील खर्च रु. १०.९३ लक्ष होता. (अनुसूची २२ ए) संबंधित तपशीलाच्या अभावी चालू मालमत्तेवर सत्यता पडताळता आली नाही.

**२१.४ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

१९७४ मध्ये वेगवेगळ्या मंडळाकरिता विटा निर्माण करण्याची कल्पना अंगी करण्यांत आली. त्याबाबतचा वार्षिक संयुक्तिक खर्च खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | त्या वर्षामधील खर्च रक्कम | एकूण |
|---|---|---|
| १९७४-७५ | ८०८०७१ | ८०८०७१ |
| १९७५-७६ | १२५७२५ | ९३३७९६ |
| १९७६-७७ | (-) २०५७३ | ९१३२२३ |

| | | |
|---|---|---|
| १/४/७७ ते ४/१२/७७ | १४१४९५ | १०५४७१८ |
| १९७७-७८ | २८०९ | १०५७५२७ |
| १९७८-७९ | १४१९८ | १०७१७२५ |
| १९७९-८० | १५४५५ | १०८७१८० |
| १९८०-८१ | ५८७९ | १०९३०५९ |

दुर्दैवाने सदर योजना साकार झाली नाही परिणामी गृहनिर्माण मंडळाने ठेकेदार श्री.आर.के.माने यांच्यावर थकबाकी रुपये १,४७२,५५८/- वसुलीबाबत दावा दाखल केला. सदर दावा न्यायालयामध्ये प्रलंबित आहे.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९६-९७ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**ज्ञापन :**

**२२. पुणे मंडळ**

अनुसूची ८ मध्ये चालू वर्षातील वसुलीची रुपये १.१८ लाख रकमेची नोंद करण्यात आली असूनदेखील, महापालिकेमार्फत झोपडीधारकांना कर्जापोटी देण्यासाठी प्राधिकरणाला द्यावयाच्या रुपये ३५.४३ लाख एवढ्या रकमेचे दायित्व तसेच पुढे चालू ठेवण्यात आले आहे. महापालिकेकडून वसूल केलेल्या रकमांचे दायित्व मंडळाने प्राधिकरणाला समायोजित न केल्यामुळे दायित्वाची रक्कम रुपये १.१८ लाख एवढया प्रमाणात वाढलेली दिसते.

प्राधिकरणाने (ऑगस्ट १९९९) असे कळविले की, योग्य ते समायोजन सन १९९७-९८ च्या वार्षिक लेख्यामध्ये करण्यात आले आहे.

**२२.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**पुणे मंडळ**

सोलापूर महानगरपालिका व कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे झोपडपट्टी धारकांना दिलेल्या एकूण रु. ४२.२३ लक्ष रकमेपैकी रु. ५.५० लक्ष रकमेचे समायोजन खालीलप्रमाणे करण्यांत आले आहे.

| | | रुपये |
|---|---|---|
| १) | सन ९८-९९ | २.०० लक्ष |
| २) | सन ९०-९१ | १.९१ लक्ष |
| ३) | सन ९१-९२ | ०.४१ लक्ष |
| ४) | सन ९६-९७ | १.१८ लक्ष |
| | **एकूण रु.** | **५.५० लक्ष** |

संबंधित नगरपालिकांकडून कर्जाच्या रकमेच्या वसुलीसाठी प्रयत्न करण्यात येत आहेत.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९७-९८ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**ज्ञापन :**

**२३. ताळेबंद (मुंबई मंडळ)**

नियोजित कामाकरिा आगाऊ अंशदान खाली खर्च करण्यात आलेले असताना देखील रु. १०४.१६ लाख रकमेचे समायोजन करण्यात आले नाही.

**२३.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :**

मुंबई गृहनिर्माण मंडळाने ठेवींमधून करावयाची कामे हाती घेतली होती. मंडळांकडे आलेली ठेवींमधून करावयाची कामे भांडवली लेख्यामध्ये दर्शविलेली आहे. हे वर्गीकरण चुकीचे झाले आहे परंतु या संदर्भातील जुना तपशील उपलब्ध होत नसल्यामुळे समायोजन प्रलंबित आहे. सदर रकमा शोधण्याचे काम चालू आहे.

**२३.२** गृहनिर्माण शीर्षाखाली गाळे धारकांची भाग रक्कम संरचनात्मक कामावरील दुरुस्तीची मर्यादा रक्कम रु. ४७९.६४ लाखांचे समायोजन करण्यात आले नाही. रु. २४५.५४ लाख ही रक्कम खर्चापोटी समायोजित करण्यासाठी असूनसुध्दा दस्तऐवज रु. २३४.१० लाख हिशेबात भरण्यात आली नाहीत. त्याचप्रमाणे ठेवी गाळेधारकांची भाग रक्कम संरचनात्मक दुरुस्तीवरील

मर्यादा दप्तरामध्ये भरुन रु. ११.५१ लाखांनी फुगवून दाखविण्यात आलेली ही रक्कम दुय्यम दस्तऐवजात विचारात घेण्यात आली नाही.

**२३.३ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :**

"संकीर्ण ठेवी" रकमेतील तफावतीचा ताळमेळ घालण्यात आला असून वार्षिक लेख्यात दाखविण्यात आलेली रक्कम ठेवी रजिस्टरमधील रकमेशी जुळत आहेत.

**२४. मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ :**

रुपये ४७९.६४ पैकी रुपये २३४.१० दुरुस्ती व पुनर्रचना मंडळासंबंधी असून सदर रक्कम लाभधारकांनी भरलेल्या भागभांडवलासंबंधीची आहे. लाभधारकांनी भरलेल्या भागभांडवलाच्या नोंदवह्या स.ले.अ (द) (उ) यांनी ठेवलेल्या आहेत. सदर नोंदवही अद्यावत केली असून ती मासिक लेखांशी जुळत असल्याचे स.ले.अ.(उ) यांनी कळविले आहे. लाभधारकांनी भरलेल्या भाग भांडवलातील फरक त्यापोटी झालेल्या खर्चाचे समायोजन सहाय्यक लेखाधिकारी (द) कार्यालयाने न केल्यामुळे येत आहे.

सहाय्यक लेखाधिकारी (द) यांच्य कार्यालयातील ठेव नोंदवह्या भाग भांडवलाचा खर्च/ परतावा इत्यादीचे समायोजन झालेले नाही. आता सहाय्यक लेखाधिकारी (द) यांचेकडून तपासणीचे काम हाती घेतले असून पुढील लेखेमध्ये योग्य ते समायोजन करण्यांत येईल.

**२४.१ मुंबई मंडळ :** लेखापरीक्षकांनी नजरेस आणलेली बाब सत्य आहे.

**१)** मुंबई मंडळाने प्राधिकरणाच्या निधीतून रुपये १४१.३० लक्ष व हुडको निधितून रुपये ३९७.१६ लक्ष असे एकूण ५३८.४६ लक्ष संरचनात्मक दुरुस्ती वरील खर्च करण्यांत आला होता. सदर खर्च अनुसूची क्रमांक २२ मध्ये रुपये १०४४.६२ लक्ष मध्ये अंतर्भूत आहे. सदर खर्चाच्या अनुषंगाने प्राप्त झालेली वसुली अनुसूची क्रमांक ४ मध्ये ठेवी सदराखाली रुपये २४५.५३ लक्ष असून अनुसूची क्रमांक ६ मध्ये रुपये १६.३२ लाख रक्कम येणे म्हणून दिसते. सदर प्रकरणी शोधम घेऊन २००४-२००५ च्या वार्षिक लेख्यांत समायोजन करण्यांत येईल. सध्या वसूल करण्यात आलेली रक्कम अनुसूची ४ मध्ये दर्शविण्यात आलेली आहे.

**२४.२ स्थावर :**

रोजकिर्दमध्ये उणे एकूण शिल्लक रक्कम रु. २४.१३ लाखांनी नोंदविण्यात आली आहे. मात्र बँकेतील चालू खात्यात शिल्लक रु. ४६३७.८४ लाखांनी जास्त दाखविण्यात आली आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**२४.३ मुंबई मंडळ :**

ही अतिशय जुनी बाब असल्यामुळे पूर्ण तपासणीनंतर त्यानुसार लेखापरीक्षा अधिकारी यांना कळविण्यात येईल.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९८-९९ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**ज्ञापन :**

**२५. लेख्यावरील भाष्य :**

**२५.१ बँक ताळमेळाचे मोठ्या प्रमाणातील प्रलंबित काम :**

प्राधिकरणांतर्गत सर्व मंडळांचे बँक ताळमेळाचे काम मोठ्या प्रमाणावर प्रलंबित आहे. कामाची व्याप्ती एप्रिल १९९१ ते ऑक्टोबर १९९८ अशी आहे. ज्या प्रकरणी बँक ताळमेळाचे काम करण्यात आलेले आहे. अशा बाबतीत त्यातील विसंगती दूर करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनियमितता आणि फसवणूक होण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**२५.२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

सर्व मंडळाकडून बँक ताळमेळ अहवाल मागवून आढावा घेण्यांत येत आहे. काही बँक खाते जूने असल्यामुळे काही अभिलेखे जसे की रोखवही, बँक स्टेटमेंट उपलब्ध होत नसल्याने प्रलंबित राहिले आहेत. या बाबतीत मंडळाकडून बँक ताळमेळ अद्यावत करण्याचे प्रयत्न चालू आहे.

बँक ताळमेळाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | मंडळाचे नांव/विभाग | बँकेचे नांव व खाते क्रमांक | बँक ताळमेळाचा तपशील |
|---|---|---|---|
| १) | वित्त नियंत्रक / प्राधिकरण | बँक ऑफ महाराष्ट्र (BOM) दिल्ली | वित्त नियंत्रक / प्राधिकरण कार्यालयातील बँक ताळमेळ अद्यावत म्हणजे माहे एप्रिल - २००३ मध्ये माहे मार्च २००३ पर्यंत पूर्ण करण्यांत आलेले आहे.<br>जोडपत्र २ नुसार बँकमधील खात्यांचा तपशील खालीलप्रमाणे :-<br>अ) बँक ऑफ महाराष्ट्र दिल्ली :-<br>हुडको व्याजाची टेलिग्राफ ट्रान्सफरद्वारे परतफेड करण्याकरिता बँक ऑफ महाराष्ट्र दिल्ली येथे फक्त खात उघडण्यांत आलेले आहे इतर व्यवहारासाठी या खात्याचा वापर करण्यांत येत नाही. |
| | | पंजाब नॅशनल बँक (PNB) दिल्ली | ब) पंजाब नॅशनल बँक दिल्ली :-<br>दिल्ली येथे पंजाब नॅशनल बँकेत खात उघडण्यांत आलेले नाही, तथापि ती रक्कम रोकड वहीत माहे एप्रिल १९९२ पासून जमा दाखविण्यांत आली आहे. त्या रक्कमेचा शोध घेण्यांत येत आहे. शोध लागताच कळविण्यांत येईल.<br>सहा महिन्यापेक्षा जुन्या प्रलंबित बाबी :-<br>सहा महिन्यापेक्षा जुन्या सर्व प्रलंबित बाबींचा निपटारा माहे फेब्रुवारी २००३ पर्यंत करण्यांत आलेले आहे. |
| २) | मुंबई मंडळ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- १०<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ३२<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते | माहे जुलै २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण करण्यांत आले आहे.<br>माहे जुलै २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण करण्यांत आले आहे.<br>सदरहू बँक खाते जुलै ९५ ला बंद झाले |

| | | | |
|---|---|---|---|
| | | क्रमांक- ३३<br><br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- १००२२<br>पंजाब नॅशनल बँक खाते क्रमांक- ७४०<br>सिंडिकेट बँक खाते क्रमांक- १४०९ | आहे. बँक ताळमेळाचे काम प्रगतीपथावर आहे.<br>माहे जुलै २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे.<br>माहे जुलै २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे.<br>माहे जुलै २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे. |
| ३) | पुणे मंडळ | सोलापूर खाते क्रमांक- ४१९<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- २ | ही दोन बँक खाती सन २००० मध्ये बंद करण्यांत आलेली आहेत. बँक ताळमेळ पूर्ण केलेले आहे. |
| ४) | कोकण मंडळ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ५०<br>कॅनरा बँक खाते क्रमांक-२०५<br><br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ४५२ | माहे मार्च २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे.<br>माहे मे २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे.<br>माहे मार्च २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे. |
| ५) | नाशिक मंडळ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- २६३६ | माहे सप्टेंबर २००३ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे. |
| ६) | औरंगाबाद मंडळ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ९ लातूर<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ६२९ उस्मानाबाद<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- १०३९ लातूर<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ९६४ बीड<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ९९ तुळजापूर<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ११९२ | सदरहू बँक खाते क्रमांक- ९, ६२९, १०३९, ९६४ व ९९ ही खाती २००१ मध्ये बंद करण्यांत आली असून बँक ताळमेळाचे काम पूर्ण करण्यांत आलेले आहे.<br><br>माहे जून २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण केलेले आहे. |

| | | | |
|---|---|---|---|
| ७) | नागपूर मंडळ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ५७५७<br>पंजाब नॅशनल बँक खाते क्रमांक- ५४३<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- १८६३<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ५९२७ | माहे मार्च २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे.<br>माहे मार्च २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे.<br>माहे मार्च २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे.<br>बँक ताळमेळाचे काम प्रगतिपथावर आहे. |
| ८) | अमरावती मंडळ | बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- २३९<br>पंजाब नॅशनल बँक खाते क्रमांक- २६०४ | माहे मार्च २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे.<br>माहे मार्च २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे. |
| ९) | मुं.इ.दु व पु मं | बँक ऑफ इंडिया खाते क्रमांक- २९४२<br>बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ३० | माहे मे २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे.<br>माहे जून २००४ पर्यंत बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे. |
| १०) | मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ | --- | --- |
| ११) | राजीव गांधी निवारा प्रकल्प | बँक ऑफ महाराष्ट्र खाते क्रमांक- ०३७<br>अलाहाबाद खाते क्रमांक- १२२<br>देना बँक खाते क्रमांक- पी १०२<br>कॅनरा बँक खाते क्रमांक-२७९<br>कॅनरा बँक खाते क्रमांक-३१२<br>बँक ऑफ महाराष्ट्र, मुंबई सेंट्रल, खाते क्रमांक- २९९२<br>अलाहाबाद बँक खाते क्रमांक- २४६<br>पंजाब नॅशनल बँक खाते क्रमांक- ८३५ | बँक ताळमेळाचे काम पूर्ण झाले. |

| | | | |
|---|---|---|---|
| | | कॅनरा बँक खाते<br>क्रमांक-२४८<br>अजाहाबाद बँक खाते<br>क्रमांक- १०० | |

**१९९९-२०००**

**२५.३ ताळेबंद :**

नियोजित कामाकरिता ठेव अंशदान योजना अंतर्गत खर्च होऊन देखील रुपये १०४.१६ लाख या रकमेचे त्याखाली समायोजन करण्यात आले नाही.

**२६. विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :**

मुंबई गृहनिर्माण मंडळाने ठेवीमधून करावयाची कामे हाती घेतली होती. मंडळाकडे आलेली ठेवीमधून करावयाची कामे भांडवली लेख्यामध्ये दर्शविलेली आहेत. नियोजित कामासाठी प्राप्त झालेली अग्रिम स्वरुपातील रक्कम भांडवल निधी म्हणून लेख्यामध्ये १९७९-८० पासून दाखविण्यात येत आहे. हे वर्गीकरण चुकीचे झाले आहे. परंतु या संदर्भातील जुना तपशील उपलब्ध होत नसल्यामुळे समायोजन प्रलंबित आहे. सदर रक्कमा शोधण्यांत येत आहेत.

**२६.१कमी दाखवणे**

**२६.२ :-** रक्कम लेख्यामध्ये समाविष्ट करण्यात न आल्यामुळे गाळेधारकांकडील ठेवीची रक्कम रुपये ३०.८८ लाखांनी कमी दाखविण्यात आली.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**अमरावती मंडळ :-**

सन १९८८-९९ पासून गलिच्छ वस्ती सुधार कामाच्या देयकामधून १२.५% दराने जमा रक्कम तजा करुन ठेवण्यांत आलेली आहे. परंतु जुलै १९९८ मध्ये नगर परिषद, अचलपूर

यांना देण्यांत आलेल्या देयकातून १२.५०% रक्कम कपात करण्यांत आलेली नाही. ती लेखा परीक्षक यांनी सूचित केल्याप्रमाणे अचलपूर नगर परिषद यांना यापुढे देण्यांत येणाऱ्या देयकामधून सदर रक्कम वसूल करण्यांत येईल व त्यानुसार लेखा परीक्षा अधिकारी यांना कळविण्यांत येईल.

**२६.३ कोकण मंडळ :-**

रुपये २५.३२ लाख रकमेचा ताळमेळ केला असून वार्षिक लेखा व संबंधित रजिस्ट्रर याचेशी जुळत आहे.

**२६.४ औरंगाबाद मंडळ :-**

लेखा परीक्षण पथकाने नमूद केलेली फरकाची रक्कम रुपये १८७०६२/- याचा शोध घेतला असता वार्षिक लेख्यामध्ये दाखविण्यांत आलेली रक्कम व लेखा परीक्षण पथकाने नमूद केलेली रक्कम यामध्ये लेखा परीक्षण पथकाने त्यांच्या अहवालात मंडळाने दंड समपहरणापोटी समायोजन नोंदीद्वारे खर्ची घालण्यांत आलेली रक्कम रुपये १८७०६२/- विचारात न घेतल्यामुळे फरक दिसून येत होता.

**२६.५ दुरुस्ती मंडळ :-**

रु. ३०.८८ लक्ष पैकी ३.१७ लक्ष ही रक्कम दुरुस्ती मंडळाशी संबंधित आहे. उपमुख्य अधिकारी / सं.गा. आणि पु.गा. या कार्यालयाकडून सदर रजिस्टर ठेवलेले आहे. आता रजिस्टरमधील नोंदी अद्ययावत करण्यात आलेल्या असून पुढील लेखा परीक्षणाच्या वेळी त्याची तपासणी होऊ शकते.

**२६.६ :-** कंत्राटदाराकडील अनामत रक्कम / सुरक्षा ठेव रक्कम रुपये ३०५.०७ लाखांनी कमी दाखविण्यात आली. ही रक्कम दुय्यम दस्ताऐवजामध्ये दिसते. परंतु लेख्यांमध्ये समाविष्ट करण्यात आलेली नाही.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**२६.७ पुणे मंडळ :-**

गाळे वितरण अनामत रक्कम रुपये १३१.६८ लाख मार्च ९९ मधील मिळकत विभागातील गाळे वितरणासाठी अनामत रक्कम या लेखाशिर्षाखाली जमा रक्कमेची नोंद मुख्य

लेखा अधिकारी विभागातील लेजरमध्ये घेण्याचे राहून गेले होते. सदर रक्कमेची नोंद करण्यांत आली असून सदर लेखाशिर्षाखाली वार्षिक लेख्यात दर्शविलेली रक्कम व लेजरमधील रक्कम जुळत आहे.

**२६.८ मुंबई मंडळ :-**

लेखा परीक्षा अधिकाऱ्यांनी ठेव नोंदवहीतील शिल्लकेबाबत विसंगती दर्शविलेली आहे. अनुसूची ४ मध्ये दर्शविण्यांत आलेल्या रकमा दुय्यम लेखाविधीशी पृथक रित्या जुळत नाहीत. (Item to item) परंतु ठेवी नोंदवही व लेखावरील बेरीज जुळत आहे. ठेवी नोंद वह्या अद्यावत करण्याचे काम हाती घेण्यांत येत असून ते पूर्ण झाल्यावर जुळवणी होईल अशी अपेक्षा आहे.

**२६.९ औरंगाबाद मंडळ :-**

अनामत ठेव नोंदवहीच्या ताळमेळाचे काम आता अद्यावत करण्यांत आले असून लेखा परीक्षण पथकाने नमूद केलेली रक्कम रुपये १९१३८/- चा शोध घेण्यांत आला आहे व त्याची नोंद संबंधित रजिस्टरला घेण्यांत आली आहे. आता सुरक्षा ठेव नोंदवहीतील रक्कमा वार्षिक लेख्यामधील रक्कमेशी जुळत आहे.

**२६.१० दुरुस्ती मंडळ :-**

रुपये ३.२४ लक्ष हा फरक जो लेखा परिक्षकाने दर्शविला आहे तो लवकरात लवकर निकाली काढण्यात येईल. याबाबतची कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**२७. दायित्वाची चलनवाढ :-**

**२७.१** विक्री करण्यात आलेल्या गाळ्यांचा घसारा समायोजन न केल्यामुळे आणि स्थावर मालमत्तेच्या किंमतीपेक्षा अधिक घसारा निर्माण केल्यामुळे घसारा राखीव रुपये १,५२५.८९ लाखांनी वाढलेला दिसतो.

**२७.२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**अमरावती मंडळ :-**

सन २००१-२००२ च्या वार्षिक लेख्यामध्ये आवश्यक समायोजन जे.व्ही. क्रमांक २० दिनांक ३१/३/२००२ अन्वये करण्यांत आले आहे.

**२७.३ मुंबई मंडळ :-**

जमा घसारा निधीसहीत राखीव घसारानिधी १५८०.३६ लाख हा वेगवेगळ्या मंडळाच्या खाती आहेत. वस्तुस्थिती अशी आहे की गाळ्यांच्या घसारा निधी वेगवेगळ्या गृहनिर्माण योजना म्हणजे अत्यल्प उत्पन्न गट व आर्थिकदृष्ट्या दुर्बलगट या योजनेखाली गाळ्यांचा एकूण घसारा निधीमध्ये जमा करण्यांत आलेला आहे. याबाबतीत अभिहस्तांतरणानंतर उचित कार्यवाही करण्यात येईल.

**२७.४ दु व पु मंडळ :-**

एकूण रक्कम रुपये १५२५.८९ लाखापैकी रुपये ५९.२५ लाख दुवपु मंडळासंबंधित आहे. ही रक्कम घसऱ्याची नसून महसुली आधिक्याची असल्याने मुंबई मंडळाने कळविले आहे व त्या आधारावर या रकमेचा २००२-०३ मध्ये अनुसूची १ मध्ये जे.व्ही.नं. द्वारे योग्यरितीने अंतर्भाव करण्यात आला आहे.

**२८. ना पडताळणी :-**

मूळ दस्ताऐवज किंवा अपुरी कागदपत्रे यामुळे खालील रकमांची सत्यता पडताळून पाहता येत नाही.

(रुपये लाखात)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १) | भांडवल निधीखाली स्थावर दायित्वापेक्षा जास्त | .. | .. | ७३७.७२ |
| २) | एस.आर.डी. कामाकरिता भांडवली अर्थसहाय्य दुसरे | .. | .. | १९.१३ |
| ३) | राजीव गांधी प्रकल्पाकडील भांडवली निधी हस्तांतरी | .. | .. | १३९४०.३८ |
| ४) | आयडीपी आणि उच्च खरेदी योजनेच्य ठेवी | .. | .. | ४६२३.५६ |
| ५) | गाळेधारकांकडून ठेवी | .. | .. | २२८६.२३ |
| ६) | ठेकेदारांकडून ठेवी | .. | .. | २८९२.०५ |
| ७) | संकीर्ण ठेवी | .. | .. | ४७६९.१४ |
| ८) | परस्पर विक्री योजनेखालील जमा ठेवी | .. | .. | ६६६.४८ |
| ९) | ठराविक मुदती हप्ता ठेवी | .. | .. | ४९.३९ |
| १०) | एसीएस खाली जमा ठेवी | .. | .. | २२१.६८ |
| ११) | दुकानांच्या किंमतीच्या ठेवी | .. | .. | ७.७५ |
| १२) | मध्यवर्ती कार्यालय बांधण्याकरिता वापरलेल्या ठेवी | .. | .. | ८२.३९ |
| १३) | महानगरपालिकांकडून ठेवी आणि नुकसान भरपाई | .. | .. | २४३.५४ |

१४) विधानसभा, विधानपरिषद लोकसभा करावयाच्या कामाच्या ठेवी .. .. ४६९.५७

१५) दायित्वाची तरतूद .. .. ३०५.७८

**२८.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

१) सदर प्रकरणाची छाननी चालू असून याबाबतचा तपशील लवकरच सादर करण्यात येईल.

२) तत्कालीन राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडून खुलासेवार अहवाल व नोंदणी या कायालयाकडे अद्यापपर्यंत आलेल्या नाहीत.

३) सन २००२-०३ या वर्षांमध्ये रुपये ७६.१६ लाख भाडेकरुकडून अनामत रक्कम मिळाले. सन २००२-२००३ या वर्षाध्ये १२६.३२ लाख परत करण्यांत आले.

४) सन १९९९-२००० या वर्षी समायोजन क्र.३५ प्रमाणे रुपये ९.८८ लाख ही रक्कम समायोजित करण्यांत आली. यानंतर प्रशासकीय कार्यालयीन इमारतीची घसाऱ्याची रक्कम ही कमी करण्यांत येईल व त्यानुसार सदर रक्कम भाडेकरुच्या अनामत रक्कमेखाली जमा होईल.

५) सन २००२-२००३ मधील ३.१६ लाख रुपये ही रक्कम परत करण्यांत आली व बाकी ४.१२ शिल्लक राहिली.

६) सदर प्रकरणाची छाननी चालू आहे.

७) इसारा रक्कम रुपये १.६२ लाख ही रक्कम सन २००२-२००३ साली परत करण्यांत आली.

८) सदर प्रकरणाची छाननी चालू आहे.

**२८.२ नागपूर मंडळ :-**

चुकीची दुरुस्तीची रक्कम रुपये ४९.९४ लक्ष ही रक्कम फार आधीच्या कालावधीची आहे आणि सदर रक्कमेचे दस्ताऐवज या कार्यालयात उपलब्ध नाही.

**२८.३ वित्त नियंत्रक / प्राधिकरण :-**

खालील दोन बाबी रुपये १२७८.६३ लक्ष (रुपये १३९४०.३८) लेखाधिकारी / आर.जी.एन.पी यांनी त्यांचे नांवे जमा सूचनापत्र क्रमांक ४४५७ दिनांक ३०/१०/२००० अन्वये ३२८०२६५६८/- एवढी शिल्लक राखीव निधी बदली केलेला आहे. ज्यामध्ये रुपये १२,७८,६३,४०५/- या दुरुस्ती व देखभाल निधी व राखीव निधीचा समावेश आहे. तरी सुध्दा नावे जमा सूचनापत्र बरोबर राजीव गांधी निवारा प्रकल्प कार्यालयने रक्कमेचा तपशिल सादर केलेला नाही. या संदर्भात या कार्यालयाचे पत्र क्रमांक २३९९ दिनांक ६/११/२००० अन्वये लेखाधिकारी / आर.जी.एन.जी.सेल / म्हाडा यांना आवश्यक तो तपशील आतापर्यंत उपलब्ध करुन देण्याची विनंती या संदर्भात या कार्यालयाचे पत्र क्रमांक १६६० दिनांक १/७/२००२ व क्रमांक ७९३ दिनांक ५/४/२००३ अन्वये पुन्हा स्मरणपत्र पाठविण्यांत आलेले असून आवश्यक ती माहिती प्राधान्याने पाठविण्याची विनंती केलेली आहे.

रुपये ३२६.८५ लक्ष (रुपये ४७६९.१४ लक्षपैकी) :- आर.जी.एन.पी. या कार्यालयाचे कामकाज बंद झाल्यानंतर त्या कार्यालयाच्या संबंधित नस्त्या बदली करण्यांत आल्या. परंतु संबंधित नस्त्या गहाळ झाल्याचे निदर्शनास आले. सदर नस्त्या शोधण्यांत येत असून लवकरात लवकर उपलब्ध करुन त्या परीक्षकांस तपासणी करीता देण्यांत येतील.

**२८.४ अमरावती मंडळ :-**

प्रत्येक शीर्षाचे वर्ष निहाय सविस्तर अभिलेखे हया कार्यालयात ठेवण्यांत आला आहे.

**२८.५ पुणे मंडळ :-**

पुणे मंडळाशी संबंधित बाबी खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | तपशील | एकूण रक्कम प्राधिकरण | पुणे मंडळाशी संबंधित रक्कम लाखात |
|---|---|---|---|
| १) | गाळेधारकांकडून ठेवी | २२८६.२३ | ८३४.०८ |
| २) | ठेकेदाराकडून ठेवी (अनामत व सुरक्षा) | २८९२.०५ | ३.१५ (इ.एम.डी)<br>३४.६५ (एस.डी) |
| ३) | किरकोळ ठेवी | ४७६९.१४ | १०५.०६ |
| ४) | देण्यासाठी तरतूद | ३०५.७८ | २५.२९ |

१/- गाळेधारकांकडून स्विकारलेल्या ठेवीसाठी नोंदवही ठेवण्यांत आली आहे व नोंदी घेतलेल्या आहेत. गेल्या बऱ्याच वर्षापासून रक्कम साठत आलेली आहे. त्याचा ताळमेळ घालण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

२/- रक्कम रुपये ३७.८० लक्ष ही ठेकेदाराकडून ठेवीची रक्कम असून (रुपये ३.१५ लक्ष अनामत ठेव व रुपये ३४.६५ लक्ष सुरक्षा ठेव) रुपये १०५.०६ किरकोळ ठेवीची रक्कम आहे. नोंदवह्या ठेवण्यांत आल्या आहेत.

४/- दायित्वाच्या तरतुदींची रक्कम रुपये २५.२९ लक्ष पुणे मंडळाशी संबंधित असून त्यांचे समायोजन सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यांत करण्यात आले आहे.

**२८.६ कोकण मंडळ :-**

कोकण मंडळाने खालीलप्रमाणे नोंदवह्या ठेवल्या आहेत.

१) गाळे वितरणासाठी रुपये ४०५.१३ लक्ष गाळेधारकांकडून स्विकारलेली अनामत रक्कम व रुपये१४६.२४ लक्ष गाळ्यापोटी घेतलेली अनामत रक्कम ही रजिस्टरच्या नोंदीशी व वार्षिक लेख्यांशी जुळत आहे.

२) ठेकेदारांकडून रुपये १०.७८ लक्ष घेण्यांत आलेली अनामत रककम वार्षिक लेख्यांत दाखविली असून ती रजिस्ट्ररमधील नोंदीशी मिळती जुळती आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संकीर्ण अनामत | संकीर्ण अनामत रजिस्ट्ररमध्ये दाखविण्यांत आलेली संकीर्ण अनामत रक्कम रुपये ११५.७० लक्ष वार्षिक लेख्याशी मिळती जुळती आहे. |
| २) | लीज हप्त्याची अनामत | रजिस्ट्ररमध्ये दाखविण्यांत आलेली संकीर्ण रक्कम रुपये ४९.३९ लक्ष वार्षिक लेख्याशी मिळती जुळती आहे. |
| ३) | दुकानांच्या किमतीपोटी अनामत | रजिस्ट्ररमध्ये दाखविण्यांत आलेली संकीर्ण रक्कम रुपये ७.७५ लक्ष वार्षिक लेख्याशी मिळती जुळती आहे. |

एकरक्कमी अनामत रक्कम रुपये ६६६.४८ लक्ष व आगाऊ अंशदान रक्कमेचे रजिस्ट्रर ठेवले आहे.

**२८.७ दुरुस्ती मंडळ :-**

दिनांक ४/१२/७७ रोजी दायित्वपेक्षा जास्त असलेली मत्ता रक्कम रु.७३७७१९८४/- ही मुंबई मंडळाकडून वर्ग करण्यात आलेली आहे. सदर रक्कमेचा तपशिल मुंबई मंडळाकडून

अद्याप प्राप्त झालेला नाही. त्याचा मुंबई मंडळाशी पाठपुरावा करण्यात येत असून तपशिल उपलब्ध झाल्याप्रमाणे किंवा वरिष्ठ कार्यालयाकडून मार्गदर्शन घेऊन सन २००४-०५ मध्ये निर्णय घेण्यात येईल.

**२८.८ राजीव गांधी निवास प्रकल्प**

रु. १३९४०.३८ लक्ष यापैकी रु. ३०७९.०९ लक्ष दुरुस्ती मंडळाशी संबंधित रककम राजीव गांधी निवास प्रकल्प बंद झाल्यानंतर मत्ता व दायित्व दुरुस्ती मंडळ व मुंबई मंडळ यांच्यामध्ये विभागण्यात आली. त्याप्रमाणे शासनाचे अनुदान रु. ३०,७९,०८,५९३/- दुरुस्ती मंडळास वर्ग करण्यात आले. भांडवली जमा व खर्च या बाबीच्या वर्गीकरणाबाबत ठराविक मार्गदर्शन तत्व नसल्यामुळे दुरुस्ती मंडळ व मुंबई मंडळास वर्गीकृत केलेली रक्कम ही प्रत्यक्ष खर्चावर आधारित होती आणि हा खर्च शेड्यूल ऑफ वर्क्समध्ये दर्शविलेल्या खर्चानुसार आहे.

**२८.९ रु. २२८६/- लक्ष यापैकी रु. ४६९.४९ लक्ष एवढा खर्च दुरुस्ती मंडळाशी संबंधित आहे.**

रक्कम गाळेधारकांच्या भाग रकमेशी संबंधित आहे. भाग रक्कम रजिस्टर उपमुख्य अधिकारी / सं.गा. व पु.गा. या कार्यालयांनी ठेवलेला आहे. आता सदर रजिस्टर वरील कार्यालयांना अद्ययावत केली आहेत.

**२८.१० दुरुस्ती मंडळ (रु. २६.३४ लक्ष)**

रु. २८९२.०५ लक्ष या रक्कमेपैकी रु. २६.३४ लक्ष ही रक्कम दुरुस्ती मंडळाशी संबंधित आहे. सदर रक्कम ठेकेदाराकडून घेतलेली अनामत रक्कम आहे. अनामत रक्कम रजिस्टर सर्व डी.डी.ओ. कार्यालयाकडून ठेवलेले आहे. अनामत रक्कमेचा ताळमेळ लेखा व संबंधित नोंद वह्या यांचेबरोबर वर्ष निहाय घातलेला नाही. तथापि दुरुस्ती मंडळाचा लेखा एप्रिल २००२ पासून संगणीकृत करण्यात आले असून सर्व प्रकारच्या अनामत रक्कमेचा तपशील एप्रिल २००२ व त्यापुढील कालावधीसाठी उपलब्ध आहे.

**२८.११ दुरुस्ती मंडळ (रु. १०८४.९६ लाख, रु. ८.७० लाख, रु. १९२५.१३ लाख)**

रुपये ४७६९.१४ लक्ष यापैकी रु. १०८४.९६ लक्ष, रु. ८.७० लक्ष आणि रु. १९२५.१३ लक्ष या रकमा दुरुस्ती मंडळाशी संबंधित आहेत. रु. १०८४.९६ लक्ष आणि रु. ८.७० लक्ष याबाबत नमूद करण्यात येते की, सदर रक्कम संकीर्ण अनामत रक्कम असून ती ठेकेदारांच्या देयकामधून पाणी आकारापोटी वसूल केलेली आहे. ती अनामत रक्कम म्हणून जमा खाती ठेवलेली आहे. सदर रककम सहाय्यक लेखाधिकारी / दक्षिण या कार्यालयाकडून महसूल

खाती जमा करण्याची कार्यवाही व्हायची आहे. सहाय्यक लेखाधिकारी / दक्षिण या कार्यालयास सदर पाणी आकारापोटी वसुल केलेली व अनामत म्हणून ठेवलेली रक्कम महसूल खाती जमा करण्याबाबत सूचना देण्यात येत आहेत. ठेव नोंद वही अद्ययावत करणेबाबत नमुद करण्यात येते की, सदर काम सहाय्यक लेखाधिकारी / दक्षिण यांचेकडून हाती घेण्यात आले असून ते लवकरच पूर्ण केले जाईल.

रु. १९२५.७० लक्ष याबाबत नमुद करण्यात येते की, रु. १९२५१२९०६/- ही रक्कम पुनर्रबांधणी करण्यात आलेल्या इमारतीमधील गाळेधारकाकडून अतिरिक्त जागेची किंमत यापोटी प्राप्त झालेली आहे. रेटरोल अद्यावत नसल्याने एकत्रित तपशिल लेखा परीक्षकांना उपलब्ध करुन देणे शक्य झाले नाही. तथापि इमारत निहाय तपशिल आता उपलब्ध केलेला असून आवश्यक ते समायोजन सन २००३-०४ या वर्षाच्या वार्षिक लेखामध्ये केलेले आहे.

**२८.१२ दुरुस्ती मंडळ (रु. २४३.५४ लाख)**

रु. २४३.५४ लक्ष या रकमेपैकी रुपये ०.५० लक्ष ही दुरुस्ती मंडळाशी संबंधित आहे. याबाबत नमूद करण्यात येते की, सदर रक्कम ही नुकसान भरपाई पोटी मिळणारी इन्शुरन्सची रक्कम असून याबाबतचा दस्तऐवज उपमुख्य अधिकारी, सं.गा. या कार्यालयाकडे उपलब्ध आहे. लेखा परिक्षकांनी कृपया त्याची तपासणी करावी.

**२८.१३ दुरुस्ती मंडळ**

रु. ३०५.७८ लक्ष या रक्कमेपैकी रु. ८६.०६ लक्ष व रु. १.८१ लक्ष ही रक्कम दुरुस्ती मंडळाशी संबंधित आहे. रु ८६.०६ लक्ष याबाबत नमूद करण्यात येते की, वेळोवेळी मुंबई महानगर पालिकेशी पत्रव्यवहार करुनही मुंबई महानगर पालिकेने इमारत निहाय केलेल्या खर्चाचा तपशील अद्याप दिलेला नाही. मुंबई महानगर पालिकेने याबाबत कळविले आहे की, अशा प्रकारचा तपशिल उपलब्ध करुन देता येत नाही. म्हणून रुपये ८६.०६ लक्ष या रक्कमेचे दायित्व सन २००३-०४ या वर्षीच्या वार्षिक लेख्यामधून काढून टाकण्यात येत आहे. रु. १८१२०१/- या रक्कमेपैकी रु. १५९७८३/- रक्कम सन २००१-०२ या वर्षाच्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजित केलेली आहे. रु. २१४१८/- या रक्कमेच्या दायित्वाबाबत नमूद करण्यात येते की, सदर रक्कम जे अधिकारी प्रतिनियुक्तीवर या कार्यालयात काम करीत आहेत त्यांची लिव्ह सॅलरी रक्कम आहे. सदर रक्कम शासनाकडून वसुली योग्य आहे. याबाबत शासनाशी संपर्क साधण्यात येत असून रक्कम शासनाकडून प्राप्त झाल्यानंतर योग ते

समायोजन करण्यात येईल. रु. ७१००/- या रक्कमेचा तपशील अद्यापी प्राप्त झालेला नसून त्याची तपासणी चालू आहे.

**२८.१४ वित्त नियंत्रक / प्राधिकरण :- रुपये १२७८.२३ लाख :-** ही रक्कम लेख्यांत अनुसूची-२ मध्ये दुरुस्त व देखभाल राखीव येथे नजर चुकीने दाखविण्यांत आली. वास्तविक ही रक्कम घसारा राखीव निधीची आहे. या रक्कमेचे तपशिलवार माहिती राजीव गांधी निवारा प्रकल्प/कक्ष यांच्याकडे उपलब्ध आहे.

**रुपये ३२६.८५ लाख :-** ही किरकोळ अनामत रक्कम असून या रक्कमेचे तपशीलवार नोंदवही राजीव गांधी निवारा प्रकल्प / कक्ष यांच्याकडे उपलब्ध आहे.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २०००-०१ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**ज्ञापन :**

**२९. कमी दाखवणे**

कपात केलेली पाठवावयाची रक्कम याखाली उणे शिल्लक तसेच बाकीच्या उणिवा दिसतात. यास्तव चालू दायित्वाची रक्कम रुपये ३.४७ कोटीनी कमी दाखविण्यात आली.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**२९.१ मुंबई मंडळ :- रु. २५५.९३ लक्ष :-** हा फरक पगाराच्या देयकातून वसूल करण्यात येणारे घरभाडे, भविष्य निर्वाह निधी, सर्वसाधारण भविष्य निर्वाह निधी, आयकर कर, समुह गट विमा योजना, कामगार कल्याण निधी, पतपेढी, इतर या शिर्षाखाली येत आहे. याबाबतचे तफावत शोधण्याचे काम चालू आहे.

**२९.२ (दु. व पु.मंडळ) वजातीचा खर्च**

रु.३४६.७२ लाखापैकी रु.९०.७९ लाख दु.व पु.मंडळासंबंधी आहे. याबाबत सादर करण्यात येते की, चुकीच्या लेखा संकेतांकामुळे उणे शिल्लक दिसून येत आहे. या उणे शिलकी मागील बऱ्याच कालावधीपासून ओढत आणल्या जात आहे. तपासणीचे काम हाती घेण्यात आले असून शक्य तितक्या लवकर पूर्ण करण्यात येईल.

**३०. ना पडताळणी :-**

मूळ दस्ताऐवज नसणे किंवा कागदपत्रे अपुरी असणे यामुळे दायित्वमधील खालील रकमांची सत्यता पडताळून पाहता येत नाही.

| अ.क्र. | तपशिल | (रुपये कोटींमध्ये) |
|---|---|---|
| १) | भांडवल निधीखाली स्थावर दायित्वापेक्षा जास्त | ७.३८ |
| २) | एस.आर.डी. कामाकरिता भांडवली अर्थसहाय्य ताटे | ०.१९ |
| ३) | राजीव गांधी प्रकल्पाकडील भांडवली निधी हस्तांतरीत | ८३.२३ |
| ४) | राखीव घसारा | १२.६३ |
| ५) | कर्ज | १.२७ |
| ६) | गाळेधारकांकडून ठेवी | ४५.३६ |
| ७) | ठेकेदारांकडून ठेवी | १६.२३ |
| ८) | भाडे खरेदी योजनेखाली आयडीपी व एम आय अंतर्गत ठेवी | ४५.७६ |
| ९) | संकीर्ण ठेव | ३९.७५ |
| १०) | विक्री योजनेखालील जमा ठेवी | ४.४२ |
| ११) | आगाऊ अंशदान योजनेखाली | ६९.४२ |
| १२) | विधानसभा, विधानपरिषद लोकसभा निधीतून करावयाच्या कामाच्या ठेवी | ४.७६ |
| १३) | दायित्वाची तरतूद | ८.४२ |
| १४) | दायित्वापेक्षा जास्त मालमत्ता | ०.१२ |
| १५) | भरणा | ०.३६ |
| | **एकूण** | **३३९.३०** |

प्राधिकरणाने मे २००५ मध्ये असे सांगितले की वित्त नियंत्रक प्राधिकरण पुणे मंडळ व अमरावती मंडळाच्या बाबतीत तपशील उपलब्ध झाला असून तो तयार ठेवला आहे. बाकीच्या मंडळाच्या बाबतीत असे सांगण्यात आले की अभिलेखे अद्ययावत करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**३०.१ वित्त नियंत्रक / प्राधिकरण**

**रु. ८२.०४ लक्ष :-** हुडकोकडून प्राप्त झालेली कर्जाची रक्कम व्याजासहीत मुदत रक्कम म्हणून लेख्यात दर्शविण्यात आलेली होती. सदर चुकीची दुरुस्ती कर्जाच्या तक्तामध्ये करण्यात आलेली आहे.

**रु. ०.५६ लक्ष :-** नॅशनल हौसिंग अजेंडा स्किमकरिता हुडकोकडून प्राप्त झालेले रु. ८६.३१ लक्ष नाशिक मंडळाला समायोजन क्र. १९ द्वारे देण्यात आलेले आहेत. रु. ०.५६ लाख ही रक्कम व्हाऊचर क्र. २० दिनांक १६/४/९९ रोजी प्राप्त झाले.

**रु. ८१.४७ लक्ष :-** मागील वर्षातील कर्जावरील पारीत केलेली व्याजाची रक्कम नजरचुकीने मूळ कर्जामध्ये दर्शविण्यात आली होती. सदर चुकीची दुरुस्ती करण्याकरिता आरंभीच्या रक्कमेमध्ये बदल करण्यात आला होता व ही पद्धत अयोग्य होती. यापुढे याबाबतची काळजी घेण्यात येईल.

**रु. ४५.५७ लक्ष :-** मागिल वर्षातील कर्जावरील पारीत केलेली व्याजाची रक्कम नजरचूकीने मूळ कर्जामध्ये दर्शविण्यात आली होती. सदर चूकीची दुरुस्ती करण्याकरीता आरंभीच्या रकमेमध्ये बदल करण्यात आला होता व ही पध्दत अयोग्य होती. यापुढे याबाबतची काळजी घेण्यात येईल.

**रु. ३२६.८५ लक्ष :-** सदर किरकोळ ठेवीची रक्कम भूतपूर्व राजीव गांधी प्रकल्पाकडून १९९८-९९ यावर्षी प्राप्त झाली त्याकरिता वित्त नियंत्रक / प्राधिकरणच्या लेख्यामध्ये अनुसूची क्र. ४ मध्ये निराळी दर्शविण्यात आली याबाबतचा तपशिल भूतपूर्व राजीव गांधी प्रकल्पाकडे उपलब्ध आहे.

**३०.२ मुंबई मंडळ. १९.१३ लक्ष :-** नि.ले.प/प्रा. यांनी टा.टे या सदराखाली रु. १९.१३ लक्ष एवढी रक्कम दाखविली आहे. १९९९-२००० च्या वार्षिक लेख्यात रु. ६०.६१ लाख दाखविण्यात आले आहे. यामधील रु. ५९.९४ लाख खालील बाबीवर खर्च झालेले आहे.

| | | |
|---|---|---|
| अ) | संगणक खरेदी | रु. ३६.२० लक्ष |
| ब) | झेरॉक्स यंत्र खरेदी | रु. ००.७१ लक्ष |
| क) | व्हिडिओ रेकॉर्ड खरेदी | रु. ००.५४ लक्ष |

| | | |
|---|---|---|
| ड) | प्रशिक्षण व इतर खर्च | रु. २२.५१ लक्ष |
| | **एकूण रु.** | **रु. ५९.९६ लक्ष** |

उर्वरित रक्कम रु. ०.६७ लक्ष चा शोध घेऊन निवासी लेखा परिक्षा अधिकारी यांा कळविण्यात येईल.

**२) रु. ५२४०.५२ लक्ष :-**

सदर रक्कम सूचना पत्र क्र. ४४६३ व ४४७१ दि. ३०.१०.२००० रोजी तत्कालीन रा.गा.निवारा प्रकल्पांकडून मिळालेली असून सन १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यामध्ये दाखविण्यात आलेली आहे. कारण प्रकल्पाकडून पुढील माहिती अपेक्षित आहे.

**१) रु. ४८४.६४ लक्ष :-**

**२) रु. (-) ६२६.८७ :-**

**३) रु. ५४१.४५ लक्ष :-**

**४) रु. २४१.१४ लक्ष, रु. ५५१.७२ लक्ष, रु. ४६.६२ लक्ष :-** ही रक्कम तत्कालीन रा.गा.नि. प्रकल्पांची असून पुढील माहिती अपेक्षित आहे.

**५) रु. ७८०.४३ लक्ष :-** शोध घेण्यात येत आहे.

**रु. ८६९ लक्ष :-** शोध घेण्यात येत आहे.

**रु. ४७५.९९ :-** शोध घेण्यात येत आहे.

**रु. २०९.९६ लक्ष :-** ही रक्कम तत्कालीन रा.गा.नि.प्रकल्पांची असून सन १९९८ पासून वार्षिक लेख्यात दिसत आहे.

**३०.३ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २००१-०२ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**ज्ञापन :**

**२.१.२ राखीव व अधिक्य रुपये**

**२) १.२.२ :-** विक्री करण्यात आलेल्या गाळ्यांचा घसारा समायोजीत न केल्यामुळे तसेच मालमत्तेच्या किंमतीपेक्षा राखीव घसारा जास्त निर्माण केल्यामुळे राखीव घसारा रुपये २०.४२ कोटींनी वाढलेला दिसतो.

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये मुंबई, नागपूर, अमरावती व औरंगाबाद मंडळाकडून आलेली उत्तरे पाठविली असे सांगितले की घसारा राखीव गुंतवणूकीचा निर्णय प्राधिकरणाच्या अधिकारात असून त्याबाबतीत त्यांनी पुढे काहीही स्पष्टीकरण दिलेले नाही. ही उत्तरे समर्पक नसून परिच्छेदामध्ये घेतलेल्या आक्षेपांना धरुन नाहीत. दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बाबतीत समायोजन सन २००२-०३ च्या वार्षिक लेख्यामध्ये केले नसून नाशिक मंडळाच्या बाबतीत प्रकरण तपासले जात आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :-**

सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यामध्ये जे.व्ही.क्र.४२ व ४३ अन्वये अनुक्रमे रु.१८.९१ लक्ष व ३८.१३ लक्ष इतक्या जास्तीच्या रकमांची सुधारणा करुन आवश्यक त्या नोंदी घेण्यात आल्या आहेत.

**३०.४ अमरावती मंडळ :-**

सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यामध्ये जे.व्ही.क्र.११ व १२ दि. ३१/३/२००९ द्वारे रु.९.३४ लक्षाच्या जास्तीच्या रकमेची योग्य ती सुधारणा करुन आवश्यक नोंदी घेण्यात आली आहे.

**३०.५ मुंबई मंडळ :-**

**रु. १८.४७ कोटी**

वर्षानुवर्षे स्थिरमालमत्तेच्या मूळ किंमतीवर वाढीव घसारा आकारल्यामुळे रु. १८.४७ कोटी इतक्या रकमेने अतिरिक्त घसारा राखीव उद्‌भवला आहे.

मागील वर्षामध्ये आकारलेल्या अतिरिक्त घसाऱ्याचे जे.व्ही.क्र.४६ अन्वये मालमत्तेचे अतिरिक्त मूल्यांकन, जे.व्ही.क्र.४७ अन्वये कमीचे मूल्यांकन व जे.व्ही.क्र.४८ अन्वये हत्यारे व संयत्रे, कार्यालयीन सामग्री, वाहने यांच्याशी संबंधित रु.२.०२ कोटीचा अतिरिक्त घसारा सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यामध्ये काढून घेऊन/समायोजन करुन सुधारित नोंदी घेण्यात आल्या.

**३०.६ दु. व पु. मंडळ :-**

घसारा राखीव रक्कम रुपये ५९.२५ लाख मुंबई मंडळाला १९९३-९४ मध्ये हस्तांतरीत करण्यात आली परंतु तपासणी केली असता लक्षात आले की, सदर रक्कम घसारा निधी नसून राखीव आधिक्य असल्याने त्याप्रमाणे आवश्यक समायोजन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यात करण्यात आले. जे.व्ही.क्र.७ अन्वये

**३०.७ नाशिक मंडळ :-**

नाशिक मंडळाने दाखविलेले रु.३०.४३ लाखाचे घसारा राखीव बरोबर दाखविले असून विकल्या गेलेल्या वस्तूवर तसेच जास्तीच्या मालमत्तेच्या किंमतीवर घसारा आकलेला नाही.

**३०.८ कोकण मंडळ :-**

रु.२०.४२ कोटीपैकी रु.४७.०२ लक्ष ही कोकण मंडळाची घसारा राखीवही आहे.

मालमत्तेच्या किंमतीपेक्षा जास्त असलेली घसारा राखीव रक्कम सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६४ व ७२ अन्वये समायोजन करण्यात आले आहे.

**३०.९** चालू जमेतून कर्जाच्या हप्त्यांची परतफेड नियमितपणे करण्यात येऊनसुध्दा कर्ज विमोचन राखीव रुपये ३२.८४ कोटी या रकमेचा सतत वापर न केल्यामुळे तसेच समायोजन न केल्यामुळे दायित्वाच्या रक्कमेत त्या प्रमाणात वाढ झालेली दिसते.

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की संबंधित मंडळाच्या बाबतीत नागपूर मंडळ सोडून योग्य ते समायोजन सन २००३-२००४ व २००४-२००५ मध्ये करण्यांत आले आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :-**

कर्ज विमोचन राखीव निधी रु. ४४.९१ लाखाचे समायोजन वार्षिक लेखा २००५-०६ मध्ये (जे.व्ही) सामान्य पावती (जे.व्ही) क्र.२० दि.३१.३.२००६ द्वारे मार्च २००५ मध्ये करण्यात आली आहे.

**औरंगाबाद मंडळ :-**

**३०.१० रु. २६२.१७ लाख**

सन २००४-०५ च्या वार्षिक लेख्यामध्ये जे.व्ही.क्र.७ नुसार समायोजन केलेले आहे.

**३०.११ अमरावती मंडळ :-**

कर्ज नियोजन राखीव निधी रु. ०.३५ लाख दर्शविण्यात आले होते. सदर रक्कम वित्त नियंत्रक/प्रा. यांच्या निर्देशानुसार सन २००४-०५ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.११ दि.३१.३.२००५ द्वारे समायोजित करण्यात आले आहेत.

**३०.१२ मुंबई मंडळ :-**

**रु. २४.२४ कोटी**

कर्ज विमोचनाची रक्कम रु. २४.२४ कोटी महसुली अधिक्यामध्ये २००४-२००५ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६ अन्वये समायोजित केलेली आहे.

**३०.१३ नाशिक मंडळ :-**

रक्कम रु. १६.६९ चे महसूल अतिरिक्त म्हणून सन ०४-०५ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.५० दि.३१.३.२००५ अन्वये समायोजन करण्यात आले आहे.

**३०.१४ पुणे मंडळ :-**

एकूण कर्ज रक्कम रुपये ३२.८४ कोटीपैकी रुपये ३६८.३८ लक्ष पुणे मंडळाशी संबंधित असून सदर कर्ज रक्कम सन २००२-०३ मध्ये परतफेड केली गेली आहे. त्यामुळे सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजन नोंद क्र.३३ द्वारे रुपये ३१६.१७ लक्ष इतकी रक्कम समायोजित केली असून उर्वरित रक्कम रुपये सन २००४-०५ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजन नोंद क्र.३३ द्वारे समायोजित केली आहे.

**३०.१५ कोकण मंडळ :-**

रु. ३२.८४ कोटीपैकी रु. १६७.०८ लक्ष कोकण मंडळाची आहे. दि. ३१.०३.२००४ पर्यंतची उर्वरित रक्कम रु. १७९.६० लक्ष सन २००४-०५ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.२८ अंतर्गत समायोजित केली आहे.

**२.१.२.५ :-**

समायोजन न करण्यात आल्याने रिक्त व वसुल अधिक्य रक्कम रुपये १.०६ कोटींनी वाढलेली दिसते.

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की, पुणे मंडळ व औरंगाबाद मंडळ यांच्या बाबतीत समायोजन सन २००३-०४ मध्ये करण्यांत आले आहे व मुंबई, कोकण, नाशिक व औरंगाबाद मंडळाच्या बाबतीत समायोजन प्रलंबित आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**३०.१६ औरंगाबाद मंडळ :-**

**रु. ०.१२ लक्ष**

रिक्तता व बुडीत येणी राखीव या शिल्लक रकमेचे या कार्यालयाने सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यात समायोजन नोंद क्रमांक ९ अन्वये समायोजन केले असून आता या शिर्षाखाली शिल्लक निरंक आहे.

**३०.१७ अमरावती मंडळ :-**

**रु. १.७५ लक्ष**

रिक्त व वसुल अधिक्य रु. १.७५ लाखाचे समायोजन प्राधिकरणाच्या निर्देशानुसार जे.व्ही.क्र.१९ दि.३१.३.२००४ द्वारे करण्यात आले आहे.

**३०.१८ मुंबई मंडळ :-**

**रु. ०.९३ लक्ष**

बुडीत कर्जे व त्यावरील व्याज यासाठी रु. ०.९३ कोटी इतक्या रकमेचा राखीव निर्माण केला होता तो वगळण्यात येऊन त्याचे हस्तांतरण सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.४ अन्वये राखीव निधीमध्ये दाखविण्यात येईल.

**३०.१९ नाशिक मंडळ :-**

**रु. ४.१७ लक्ष**

रु. ४.१७ लक्ष वसूल न होणारा राखीव निधीचे समायोजन सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यामध्ये जे.व्ही.क्र.४० दि.३१.३.२००६ अन्वये करण्यात आली आहे. या रकमेमध्ये रु. ४.१७ लक्ष या मूळ रकमेचा समावेश आहे.

**३०.२० कोकण मंडळ :-**

**रु. १.९९ लक्ष**

रु. १.०६ कोटीपैकी १.९९ लक्ष कोकण मंडळाची आहे. आता भाडे तत्त्वावरील गाळेधारक नाहीत. भाडे न भरणे इ. नसल्यामुळे बुडीत ऋणको नाहीत. त्यामुळे बुडीत येणी

राखीव इत्यादीची आवश्यकता नाही. जे.व्ही.क्र.१२ दि.३१.१०.२०१० अन्वये ऑक्टोबर २०१० च्या मासिक लेख्यात समायोजन केले आहे.

**३०.२१ पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रुपये १०६.७५ लाखांपैकी रुपये ४.७४ लक्ष इतकी रक्कम पुणे मंडळाशी संबंधित आहे. रिक्तता व बुडीत कर्ज निधी या सदराखाली निर्माण केलेल्या राखीव निधीची रक्कम रुपये ४.७४ लक्ष सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजन नोंद क्र.३२ द्वारे समायोजित केली आहे.

**३०.२२** महानगरपालिकेला तसेच महापालिकेला देय असलेली रक्कम अदा न केल्यामुळे संकीर्ण ठेव रक्कम रुपये ४.६८ कोटींनी वाढलेली दिसते. तसेच मागील वर्षाची जमा या वर्षीच्या लेख्यामध्ये दाखविली गेल्यामुळे आमदार व खासदार निधीच्या ठेवी रुपये २१.०५ लाखांनी वाढलेल्या दिसतात. प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की लेखापरीक्षण अहवाल उपलब्ध न केल्यामुळे नगरपालिकांना/नगरपरिषदांना रक्कम देणे शक्य झाले नाही.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :-**

**रु. १२१.९८ लक्ष**

रु. १५१.१७ लक्ष या रकमेमध्ये रु. १२१.९८ लक्ष ही रक्कम अंतर्भूत असून ती रक्कम जे.व्ही.क्र.०१ दि.३१.१०.२०१० अन्वये संकीर्ण ठेवीमधून काढून घेऊन महसूल अधिक्यामध्ये जमा केली असून सन २०१०-११ वार्षिक लेख्यात दाखविण्यात येईल.

**३०.२३ अमरावती मंडळ :-**

गलिच्छ वस्ती सुधार योजनेची रु. २४.३९ लाख ही रक्कम संकीर्ण ठेव लेख्यात जमा करण्यात आलेली रक्कम महानगर पालिका, नगर पालिका यांना स्थानिय संस्थाद्वारे परिक्षण करुन अहवाल सादर केल्यानंतर परत करावयाची होती. स्थानिक संस्थाद्वारा लेखा परिक्षण अहवाल प्राप्त झाल्यानंतर सदर रक्कम संबंधित म.न.पा., न.पा. यांना परत करण्यात येईल. व्हाऊचर क्र.८३ दि.१७.३.२०१० अन्वये रु. ११,८५,६८०/- इतकी रक्कम आयुक्त, अकोला महानगरपालिका, अकोला यांना परत करण्यात आल्यामुळे ठेवीमधून रु. ११.८६ लक्ष कमी करण्यात आले.

**३०.२४ नाशिक मंडळ :-**

महानगर पालिका व नगरपालिका यांचेकडून लेखा परिक्षण अहवाल व वापर प्रमाणपत्रे प्राप्त न झाल्यामुळे रक्कम रु. ४२.५३ लक्ष ठेवीमध्ये ठेवण्यात आली होती त्यापैकी रक्कम रु. १९,८८,२३१/- व्यपगत झाल्यामुळे महसुली अधिक्याला जे.व्ही.क्र. २/२०१०-११ दि.१२.११.२०१० अन्वये हस्तांतरीत करण्यात आली असून सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजित करण्यात येईल. तसेच उर्वरित रकमांचा शोध घेऊन संपूर्ण रक्कम महसुली अधिक्यामध्ये जमा करुन सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात दाखविण्यात येईल.

**३०.२५ मुंबई झो.सु.मंडळ :-**

महानगरपालिकेची देयकातून कापून ठेवलेली रक्कम रुपये २७९.३१ लक्षबाबत महानगरपालिकेला त्याचा तपशिल सादर करण्यास वारंवार कळविले आहे. अन्यथा सदर रक्कम म्हाडाचे रेव्हेंन्यू खात्यात जमा करण्यांत येईल असे ही कळविले होते.

महानगर पालिकेकडून कोणतीही कारवाई न झाल्याने रुपये २७९.३१ लक्ष रुपये म्हाडाच्य खात्यात सन २००७-२००८ चे वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.२६ दि.३१.३.२००८ अन्वये करण्यात आली.

**३०.२६ दु.व पु.मंडळ :-**

आमदार निधीतील ताळमेळ न झालेली जास्त दाखविण्यात आलेली रक्कम रु. २१,०४,६३५/- संबंधित कार्यालयांनी पडताळून पाहिली असून ती नोंदवह्याशी जुळत आहे व ते लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहे. मुलभूत दस्तऐवज नसणे किंवा अपुरे असणे. यामुळे रुपये २२५.७० कोटींची रक्कम तपासता येत नाही. अशा तऱ्हेचे भाष्य सन २०००-०१ च्या लेखापरीक्षण अहवालात करण्यात आले होते. परंतु तरी सुध्दा रुपये ३८३.२४ कोटींच्या दिनांक ३१/३/२००२ रोजी असलेल्या रक्कमा अजूनही तपासता येत नाही. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे -

| **रुपये कोटीमध्ये** | | | |
|---|---|---|---|
| | | **३१/३/२००१ रोजी** | **३१/३/२००२ रोजी** |
| **१)** | गाळेधारकांकडून ठेव | ४५.३६ | ५७.५७ |
| **२)** | कंत्राटदारांकडून ठेव | १६.२३ | १३.९८ |
| **३)** | भाडे खरेदी योजनेखाली आयडीपी/ | ४५.७६ | ३.३७ |

| | | | |
|---|---|---|---|
| | एमआय | | |
| ४) | विक्री योजनेखाली ठेवी | ४.४२ | १४.९६ |
| ५) | आगाऊ अंशदान योजनेखाली ठेवी | ६९.४२ | ३.९७ |
| ६) | इएमआय/एलआयएसपी खाली ठेव | --- | ०.८२ |
| ७) | संकीर्ण ठेवी | ३९.७५ | ८३.६४ |
| ८) | रागांनिप्र/दु व पु मंडळ ठेवी | --- | ०.१८ |
| ९) | करावयाचे काम | ४.७६ | ४.७५ |
| | **एकूण** | **२२५.७०** | **१८३.२४** |

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की कोकण, नाशिक, अमरावती व मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व वित्त नियंत्रक यांच्या बाबतीत तपशील आता उपलब्ध आहे. बाकी मंडळाच्या बाबतीत असे सांगितले गेले की दस्तऐवज अद्ययावत करण्याचे काम चालू आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**दु. व पु. मंडळ :-**

गाळेधारकांच्या ठेवी सदराखाली रक्कम रु. ७६४.२७ लक्ष याबाबतचा तपशिल उपमुख्य अधिकारी / संक्रमण गाळे - पुर्नरचित गाळे कार्यालयात उपलब्ध आहे. संबंधित नोंदवहीत काही नोंदी घेतल्या नसल्याने फरक होता, तरी वार्षिक लेख्यात दर्शविलेली रक्कम बरोबर आहे.

भाडेकरुच्या ठेवी सदराखालील रक्कम रु.८६९६५५/- राजीव गांधी निवारा प्रकल्पाची असून याबाबतचा तपशिल उप मु.अ/आर टी या कार्यालयात लेखा परिक्षणासाठी उपलब्ध होत नाही.

भाडेकरुच्या ठेवी सदराखालील रक्कम रु.१५३५२८५/- याबाबतचा आवश्यक तपशिल उपमुख्य अधिकारी/पुनर्रचना यांचे कार्यालयात लेखा परिक्षणसाठी उपलब्ध आहे.

राजीव गांधी निवारा प्रकल्पाच्या ठेवी सदराखाली रक्कम रु. १९,२५,१२,९०६/- चुकीने अनुसूची ४ ठेवी अंतर्गत दर्शविण्यात आल्या. ही रक्कम प्राप्ती सदराखाली असल्याने आवश्यक समायोजन जे.व्ही.क्र.१३ अन्वये वार्षिक लेखा २००३-०४ मध्ये करण्यात आले आहे.

भाडेकरुचा हिस्सा सदराखाली रक्कम रु. २,९९,२५६/- या संबंधातील नोंदवही

सहाय्यक लेखा अधिकारी/ दक्षिण आणि उत्तर कार्यालयात ठेवण्यात आली असून लेखा परिक्षणाच्या तपासणीकरिता सादर केली आहे.

कंत्राटदारांची इसारा ठेव सदराखाली रक्कम रु. १५,२६,३७६/- याबाबतचे आवश्यक नोंदवही सहाय्यक लेखा अधिकारी, उत्तर व दक्षिण कार्यालयात ठेवण्यात आली आहेत व ती लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आले आहेत.

कंत्राटदारांची सुरक्षा ठेवी दसराखाली रक्कम रु. ४,६०,५९,६३७/- याबाबतची नोंदवही सहाय्यक लेखा अधिकारी, उत्तर व दक्षिण या कार्यालयात ठेवण्यात आली असून वार्षिक लेख्यात दर्शविलेली रक्कम मासिक लेख्यानुसार असून बरोबर आहे व ती लेखा परिक्षणाच्या पडताळण्यासाठी उपलब्ध आहे.

किरकोळ ठेवी सदराखालील रक्कम रु. ११८७.५५ ह्या गाळेधारकांकडून प्राप्त झालेल्या ठेवींचा तपशील उ.मु.अ./आर टी ॲण्ड टी सी यांच्या कार्यालयात ठेवण्यात आल्या असून त्या लेखा परिक्षणाच्या पडताळणीसाठी उपलब्ध आहेत.

मालमत्ता कर अदायगी सदराखाली रक्कम रु. (-) १०,०००/- वार्षिक लेख्यात दर्शविलेले बरोबर असून त्या बाबतचा तपशील उपलब्ध आहे.

किरकोळ ठेवी सदराखाली न पडताळणी योग्य दर्शविलेली रक्कम १७,५८,७२५/- या बाबतची ठेव सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यातील अनुसूची ४ अन्वये आवश्यक ते समायोजन करण्यात आले आहे.

**३०.२७ मुंबई झो.सु.मंडळ :-**

एमएमआयबीशी संबंधित सुरक्षा ठेवीखालील रकमा रु. २.३० कोटी विनादावा ठेवीपैकी रक्कम रु. १,४०,९५,८६२ तीन वर्षांपेक्षा जास्त कालावधीपासून प्रलंबित असल्याने म्हाडाच्या महसुलीमध्ये समपहरण करुन जमा करण्यात आल्याचे सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यामध्ये जे.व्ही.८०,८२,९०,९१ व रक्कम रु. १६,८१,४६७/- सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यामध्ये जे.व्ही.क्र. २६,२७ व ३० अन्वये रक्कम रु. १,२४,१४,३९५/- जमा करण्यात आले. आता वर्षवार सुरक्षित ठेव नोंदवह्या आज दिनांकापर्यंत परिरक्षिण्यात आल्या असून स २००८-०९ च्या वार्षिक लेख्याच्या लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात येईल.

रु. २.६२ कोटीच्या संकीर्ण ठेवीबाबतीत ताळमेळ घालून विनादावा शिल्लक रु. १,४२,५६,१२७ म्हाडाच्या महसुलीमध्ये सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र. ६९,८७,

८९,९० व ९१ व रु. ४७,४९,०९२/- व सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यामध्ये जे.व्ही.क्र. २४,२५, २७,३४,४२ व ४४ अन्वये रक्कम रु. ९५,०७,०३५ आता ठेव नोंदवह्या सन २००८-०९ व सन २००९-१० च्या वार्षिक लेख्याशी जुळत आहे.

**३०.२८ नागपूर मंडळ :-**

संकीर्ण ठेव रक्कम रु. ३२३.३४ लक्ष सन १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यात मंडळाचा महसूल म्हणून समायोजित करण्यात आली. मंडळाचे निर्मितीपासून भाडेतत्त्वावर गाळ्याचे आवंटनापासून वेळोवेळी गाळेधारकांकडून प्राप्त झालेली गाळ्याची जमा ठेव, सुरक्षा ठेव इत्यादी संकीर्ण ठेव या लेखा शीर्षाखाली जमा ठेवण्यात आली होती. वाणिज्य लेखा पध्दती अनुसरल्यामुळे १९८७ पासून संकीर्ण ठेव नोंद वही तयार करण्यात आलेली नाही. त्यामुळे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देता आली नाही. कृती आराखड्याप्रमाणे मंडळाने सन २००२-०३ ते २००८-०९ पर्यंत प्रत्येक प्रकारची ठेव नोंदवही तयार केली आहे. सदरच्या नोंदवह्या पडताळण्यासाठी उपलब्ध आहेत.

**३०.२९ अमरावती मंडळ :-**

**रु. ४३.१८ लक्ष, रु. १८७.२४ लक्ष, रु. २०१.७७ लक्ष, रु. ३६.९१ लक्ष, रु. ९३.४८ लक्ष, रु. २३६.२३ लक्ष, रु. १४.२० लक्ष, रु. ७.९१ लक्ष**

प्राधिकरणाच्या निर्देशानुसार व रोड मॅप नुसार सन २००२-०३ ते २००९-१० पर्यंतच्या नोंदवह्या तयार करुन त्या लेखा परिक्षणात दाखविण्यात आल्या. सहाय्य नोंदवह्यामधील नोंदी नियमित घेण्यात येत असून त्याची ताळमेळाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

**३०.३० मुंबई मंडळ :-**

१) अर्जदारांकडून रु. ५.५४ कोटी अनामत ठेव रक्कम/सुरक्षित ठेव

२) अर्जदारांकडून रु. १३.१३ कोटीच्या ठेवी

३) कंत्राटदारांकडून रु. २.२४ कोटी अनामत ठेव रक्कम

४) रा.गां.नि.प्र. कंत्राटदारांकडून रु. ०.२४ कोटी अनामत ठेव रक्कम

५) कंत्राटदारांकडून रु. २.६३ कोटी सुरक्षा ठेवी

६) रु. २२.९७ कोटीच्या संकीर्ण ठेवी

७) रु. ३६.६३ कोटीच्या संकीर्ण ठेवी/अनामत ठेव रकमा इ.

८) करावयाच्या कामाबाबतच्या रु. ४.७५ कोटीच्या ठेवी रु. ८८.९३ कोटी कृती आराखड्यात सुचविल्याप्रमाणे कंत्राटदार व अर्जदार/गाळेधारकांच्या २००५-०६ पर्यंत विनादावा असलेल्या ठेवी व्यपगत झाल्याचे समजण्यात येऊन त्या जे.व्ही.क्र.१९, २०, २१, २२ अन्वये सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात महसूली जमा दाखविण्यात आल्या असून सदर अभिलेखे लेखा परिक्षणाच्य पडताळणीसाठी उपलब्ध आहेत.

**३१. वित्त नियंत्रक/प्रा. :-**

**रु. ३२६.८५ लक्ष :-**

राजीव गांधी प्रकल्प बंद झाल्यानंतर रु. ३२६.८५ लक्ष ही किरकोळ ठेवीची रक्कम सन १९९८-९९ या कालावधीमध्ये हस्तांतरण झाली. सविस्तर माहिती पुष्कळ प्रयत्न करुन सुध्दा सापडली नाही. सदरची रक्कम १० वर्षांपेक्षा जास्त कालावधीसाठी प्रलंबित होती व सदर रकमेची कोणीही मागणी केलेली नाही म्हणून ती रक्कम म्हाडाच्य सर्वसाधारण महसुली अधिक्यामध्य जे.व्ही.६४ दि. ३१/१०/२०१० अन्वये समापहरणाद्वारे जमा करण्यात आली.

**३१.१ कोकण मंडळ :-**

रु. १८३.२४ पैकी रु. ३४४.३८ लक्ष ही गाळेधारकांची अनामत रक्कम व रु. १७३.९६ लक्ष ही गाळेधारकांची ठेव रक्कम आहे. मार्च २००२ पर्यंतची गाळेधारकांची ठेव रक्कम रु. १७३.९६ ही सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात भाडे खरेदी हप्त्यात जे.व्ही.क्र.६० अंतर्गत वर्ग करण्यात आली आहे.

वार्षिक लेख्यात मार्च २००२ पर्यंत गाळेधारकांची अनामत ठेव रक्कम रु. ३४४.३८ लक्ष दर्शविण्यात आली आहे व उर्वरित रक्कम जे.व्ही.क्र.१३ दि.३१/१०/२०१० अन्वये ऑक्टोबर २०१० च्या मासिक लेख्यात व्यपगत ठेवी सदरात समायोजित करण्यात आले.

रु. १६.०९ लक्ष ही दि. ३१/३/२००२ पर्यंतची ऋण अनामत रक्कम होती. रु. २२०३८७४/- ही सिडको यांना अदा केलेली छानणी फी अनामत रक्कमेत चुकीचे वर्गीकरण करण्यात आले. सदर दुरुस्ती सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यामध्ये क्र. २३ अन्वये छाननी शुल्क म्हणून राखीव नोंद घेण्यात आली.

रु. ३६.८१ लक्ष ही दि. ३१/३/२००२ पर्यंतची ठेकेदारांच्या अनामत रक्कमेची उर्वरित ऋण आहे. या रकमेची आवश्यक ती ताळमेळ घालून सन २०१०-१० या वर्षामध्ये समायोजित करण्यात येईल.

रु. ४७.२३ लक्ष ही रक्कम आगाऊ अंशदान योजनेमधून विक्रीमध्ये टाकण्यात आली आहे. तपशील तपासणीकरिता उपलब्ध आहे.

रु. १.११ कोटीपैकी रु. २.४५ लक्ष ही रक्कम कोकण मंडळाची आहे. रु. १,३९,२००/- व रु. १,०५,९८४/- या रक्कमा एक रक्कमी विक्री योजनेअंतर्गतची परतावा केलेली रक्कम असून सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यांमध्ये जे.व्ही.क्र.३४ व ३५ अन्वये समायोजित करण्यात आले.

रु. ११८८.७७ लक्ष ही एकविक्री योजनेअंतर्गतमधून विक्री अकाऊंटमध्ये वर्गीकरण करण्यात आली आहे. तपशील तपासणीकरीता उपलब्ध आहे.

रु. ५६,९७,५४४/- ही भुईभाड्याची रक्कम सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६३ अंतर्गत विक्री अकाऊंटमधून वर्गीकरण करण्यात आली आहे. तपशील तपासणीकरीता उपलब्ध आहे.

रु. १२७९००००/- ही रक्कम आगाऊ अंशदान योजनेअंतर्गत गाळेधारकाकडून वसूल केलेली ठेवीची रक्कम आहे. तपशील मिळकत व्यवस्थापक यांच कार्यालयात तपासणीकरिता उपलब्ध आहे.

रु. ८१९१९९४/- ही रक्कम मासिक हप्त्यांची आहे. रजिस्टर तपासणीकरीता उपलब्ध आहे.

रु. ११९६६७७४/- ही संकीर्ण ठेवीची रक्कम आहे. संकीर्ण ठेवीचे रजिस्टर तपासणीकरीता उपलब्ध आहे.

रु. ९५२१८/- ही रक्कम १९९८-९९ साली चुकीचे वर्गीकरण झाले असून दप्तराची योग्य पडताळणी करुन योग्य समायोजन करण्यात येईल.

रु. ७.५९ लक्ष ही भुईभाडेअंतर्गत चुकीचे वर्गीकरण करण्यात आलेले सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.२ अंतर्गत दुरुस्ती करण्यात आले आहे.

रु. ६९७५३४/- ही प्रत्यक्षात रु. ६८७५३४/- व रु. १०,०००/- अशा दोन रक्कमा आहेत. भ.नि.नि.ची परतावा रक्कम व ठेकेदारांच्या सुरक्षा ठेवीचे चुकीचे वर्गीकरण झालेले आहे. दप्तराची पडताळणी करुन योग्य समायोजन करण्यात येईल.

**३१.२ भरणा**

भरणा या रक्कमेमध्ये झोपडपट्टी श्रेणीवाढ कार्यक्रम व जनतेचा निवारा कार्यक्रमामध्ये सहभाग या लेखाशिर्षाखाली रु. ६.२० लाखाची रक्कम जमा करण्यांत आलेली आहे.

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की पुणे मंडळाने केलेले समायोजन बरोबर आहे. हे उत्तर बरोबर नाही कारण झोपडपट्टी श्रेणीवाढ कार्यक्रम व निवारा कार्यक्रमात जनतेचा सहभाग या शिर्षाखाली रक्कम जमा करण्याऐवजी रक्कम चुकीने भरणा या शीर्षाखाली जमा करण्यांत आलेली आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु. ६.२० लाखांपैकी रु. ६.०० लाख इतकी रक्कम झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेअंतर्गत व रु. ०.२० लाख इतकी रक्कम जनतेचा निवारा कार्यक्रमामध्ये सहभाग या योजनांसाठीची आहे. सन १९९१-९२ मध्ये एकूण रक्कम रु. ३५.७५ लाख इतकी रक्कम प्राप्त झालेली होती. त्याचा तपशिल खालीलप्रमाणे :-

बिडी कामगार योजनांसाठीचे अर्थसहाय्य :- रु.२९,५५,०००/-

झोपडपट्टी श्रेणीवाढ योजनेसाठीच अनुदान :- रु.६,००,०००/-

जनतेचा निवारा कार्यक्रमासाठीचा सहभाग

योजनेसाठीचे अनुदान :- रु. २०,०००/-

एकूण रक्कम रु. ३५,७५,०००/-

रु. ३५.७५ लाख ही संपूर्ण रक्कम सन १९९१-९२ च्या वार्षिक लेख्यामध्ये मध्ये बिडी कामगार योजनांसाठी अर्थसहाय्य म्हणून घेण्यात आली. त्याचवेळी झोपडपट्टी श्रेणीवाढ योजने अनुदान रु.६.०० लाख व जनतेचा निवारा कार्यक्रमासाठीचा सहभाग योजनेसाठीचे अनुदान रु.०.२० लाख हे अनुक्रमे आणि आय व व्यय खाते यामध्ये सुध्दा दाखविण्यांत आलेले होते.

ह्याप्रमाणे एकदा परिशिष्ट-१ मध्ये व दुसऱ्यांदा परिशिष्ट-८ आणि आय व व्यय खाते यामध्ये अशा पध्दतीने एसयुपी व पीपीएस योजनेअंतर्गत प्राप्त अनुदानाचे नकळत दोन वेळा समायोजन झालेले होते. त्यामुळे सन १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यामध्ये जादा स्वरुपात दाखविण्यांत आलेली अर्थसहाय्याची रक्कम म्हाडा वित्तप्रेषणावर खर्ची घालून काढून टाकण्यात आली.

वरीलप्रमाणे स्पष्ट केल्यानुसार चुकीच्या दुरुस्तीची कार्यवाही करण्यात आली.

**३२. स्थिर मालमत्ता :-**

मुलभूत दस्तऐवज उपलब्ध नसणे किंवा अपुरे असणे. यामुळे फर्निचर, साहित्य, यंत्र व अवजारे, गाड्या, कार्यालयीन सामुग्री, संक्रमण शिबीरे इत्यादी स्थावर मालमत्तेची किंमत रुपये ३२.०० कोटी व बांधकामाचा खर्च रुपये ८.५९ कोटी सहजपणे तपासता येत नाही.

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की मुंबई मंडळाच्या बाबतीत कार्यवाही करण्यांत येत आहे. परंतु मुंबई मंडळाने जे विधान केले आहे की वार्षिक लेख्याच्या परिशिष्ठ ६ मध्ये दाखविलेली आहे. पुणे मंडळाच्या व झोपडपट्टी सुधार मंडळाच्या व दुरुस्ती मंडळाच्या बाबतीत तपशील तपासणीसाठी उपलब्ध करुन देण्यात आला आहे. नाशिक मंडळाच्य बाबतीत सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यामध्ये अंशत: समायोजित करण्यांत आले आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

**रु. १०.६४ कोटी**

**रु. ०.२० कोटी, रु. ८.५९ कोटी**

सध्या प्रत्येक मालमत्तेची स्थिर मालमत्ता नोंदवही आज पावेतो परिरक्षित करण्यात आली. त्यामध्ये दाखविलेल्या तपशीलानुसार जसे मालमत्तेचे नाव संख्या, मूळ किंमती, घसाऱ्याच्या किंमती, स्थळ इ. लेखा परिक्षणाला पडताळणीसाठी उपलब्ध आहे.

**३२.१ नाशिक मंडळ :-**

अनुसूची क्र.२२ ए मधील स्थिर मालमत्तेबाबतची स्थिर मालमत्ता नोंदवही तयार करण्यात आली असून लेखा परिक्षणाच्या वेळी इतर नोंदवह्यासह दाखविण्यात आले. रु. ७०.४४ लक्ष रकमेपैकी रु. ०.५१ लक्ष एससीएस गृहनिर्माण योजनेकरिता सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.१६ दि. ३१/३/२००४ अन्वये काढून घेण्यात आली. उर्वरित रक्कम ही स्थिर मालमत्तेचीच आहे.

**३२.२ मु.झो.सु.मंडळ :-**

रक्कम रु. ०.३३ कोटी मु.झो.सु.मं.च्या स्थिर मालमत्तेची आहे. तसेच रक्कम रु.०.३३ कोटी मु.झो.सु.मं.च्या स्थिर मालमत्तेची आहे. तसेच रक्कम रु.०.१९ कोटीचा तपशील उपलब्ध आहे. जुन्या व नादुरुस्त योग्य वस्तू ज्यांची मालमत्तेची किंमत उपलब्ध नाही. ह्यांची समायोजित नोंद जे.व्ही.क्र.६६ अन्वये सन २००८-०९ वार्षिक लेख्यात घेण्यात आलेली आहे व

स्थिर मालमत्तेची नोंदवही परिरक्षिण्यात आली असून सन २००८-०९, २००९-१० च्या वार्षिक लेख्यांशी जुळत आहे.

**३२.३ दु. व पु. मंडळ :-**

राजीव गांधी प्रकल्पाकडून सन १९९८-९९ या कालावधीत हस्तांतरीत झालेल्या स्थिर मत्ता सदराखालील रक्कम रु.१,१४,४८,०४९/- संक्रमण शिबीरातील गाळ्यांची किमती याबाबतच्य बांधकाम खर्चाचा तपशिल लेखा परिक्षण पडताळणीसाठी उपलब्ध आहे.

राजीव गांधी प्रकल्पाहून हस्तांतरीत झालेली मत्ता सदराखालील रक्कम १७,९८,७३,७१६/- मुख्यत: संक्रमण शिबीरातील गाळ्यांची किंमत असून याबाबतचा तपशिल बांधकाम अनुसूची लेखा परिक्षणाच्य उपलब्ध आहे.

**३२.४ पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु.३१९९.५३ लाखांपैकी रु.९८.४२ इतकी रक्कम पुणे मंडळाशी संबंधित आहे. ही रक्कम पुणे येथील बैठे गाळे बांधण्यासाठी झालेल्या खर्चाशी संबंधित व बांधकाम खर्चाच्या परिशिष्टामध्ये अंतर्भूत होती. ह्याबाबतचे संपूर्ण विवरण पुणे मंडळाच्या दफ्तरी आहे. संपूर्ण बैठे गाळे शासनाच्या धोरणानुसार मालकी तत्त्वावर गाळेधारकांना देण्यात आल्यामुळे ही मालमत्ता सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यामध्ये कमी करण्यात आली.

अग्रिम समायोजित न केल्यामुळे तसेच दुय्यम अभिलेखे व लेख्यामध्ये एकूण फरक आल्यामुळे चालू मालमत्ता रुपये १२.४१ लाखांना वाढीव दिसते.

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की, कोकण, औरंगाबाद व नागपूर मंडळाने अनुक्रमे सन २००५-०६, २००२-०३ व २००३-०४ मध्ये समायोजन करण्यात आली आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व अमरावती मंडळाने मात्र समायोजन अजून करावयाचे आहे.दुरुस्ती मंडळाने सुध्दा समायोजन केले आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**अमरावती मंडळ :-**

**रु. ०.१२ लक्ष, रु. ०.८५ लक्ष**

नोंदवही व वार्षिक लेख्यामधील फरकाची रक्कमची तपासणी / ताळमेळ करुन सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जास्तीची रक्कम रु. ०.१२ लक्ष व रु. ०.८५ लक्ष दुरुस्ती करुन आवश्यक रक्कम दर्शविण्यात आली आहे.

**३२.५ मुंबई झो.सु.मंडळ :-**

रु. ०.०९ लक्ष ही रक्कम मु.झो.सु.मं.च्या कर्मचाऱ्यांकडून प्राप्त होणारी आहे. लेखा परिक्षण पथकाने निदर्शनास आणून दिलेली रक्कम रु. ८,७९३ अभिलेख्यावरुन ताळमेळ करण्यात आली व जे.व्ही.क्र.४२ अन्वये २००६-०७ च्या लेख्यामध्ये समायोजित करण्यात आले. सद्या निरंक शिल्लक आहे.

प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या रजा वेतनाची रक्कम वसूल न होणे तसचे सन १९८३-८४ ते १९९३-९४ या कालावधीशी संबंधित वसुली सतत येणे राहिल्यामुळे तसेच शासनाकडून भाड्यापोटी येणे असलेले अनुदान यामुळे किरकोळ ऋणको रुपये ३५.१५ कोटींनी वाढीव दिसते.

प्राधिकरणाने एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की मुंबई मंडळाच्या बाबतीत तपशील उपलब्ध नाहीत. नाशिक मंडळाच्या बाबतीत रक्कम सन २००५-०६ च्या वार्षिक लेख्यामधून काढून टाकण्यात येईल. नागपूर मंडळाच्या बाबतीत अंशत: रक्कम काढून टाकण्यात आली असून राहिलेली रक्कम सन २००५-०६ च्या लेख्यामधून काढून टाकण्यात येईल. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या बाबतीत शासनाशी पत्रव्यवहार चालू आहे व पुणे मंडळाच्या बाबतीत वसुलीची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :-**

या रकमा खालीलप्रमाणे संबंधित आहेत.

| | | **रुपये** |
|---|---|---|
| १) | श्री.सोनबर्से व श्री.खोब्रागडे यांच्या ठेव संलग्न योजनांतर्गतील महाराष्ट्र शासनाकडून येणाऱ्या रकमा | ०.६० |
| २) | प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचाऱ्यांचे रजा वेतन व वेतन अंशदान रक्कम | ०.६६ |
| ३) | महाराष्ट्र शासनाकडून प्राप्त होणारा मुद्रांक शुल्क परतावा | ५.०३ |
| ४) | मागासवर्गीय सहकारी संस्था | ०.१९ |
| | **एकूण** | **६.४८** |

रु.६.४८ लक्ष महाराष्ट्र शासनाकडून येणे आहे असे दर्शविण्यात आले होत. त्यापैकी शासकीय विभागाकडून मंडळात प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे रजा वेतन व

निवृत्ती वेतनाची रक्कम रु.०.६६ लक्ष चुकीने निरनिराळ्या विभागाकडून येणे आहे असे दर्शविण्यात आली होती. आवश्यक समायोजन नोंदीद्वारे सदरवरील रक्कम लेखा शिर्षातून सन जे.व्ही.क्र.४७ दि.३१/३/२००७ अन्वये समायोजन करण्यात आले. त्याचप्रमाणे स्टॅम्प ड्युटी परताव्याची रक्कम रु.५.०३ लक्ष शासनाकडून येणे आहे असे दर्शविण्यात आले होते ती पण रक्कम लेख्यातून काढून टाकण्यात आली आहे. स्टॅम्प ॲक्टनुसार स्टॅम्प निर्गमित केल्यातारखेपासून सहा महिन्याचे आत परतावा मिळण्याबाबतचा हक्क सादर केला नसेल तर तो क्लेम निरस्त (Null & Void) होतो. वरील रक्कम १९८० पूर्वी खरेदी केलेल्या जमिनीशी संबंधित होती. त्यामुळे ती जे.व्ही.क्र.२३ दि.३१/३/२००६ अन्वये सन २००५-०६ वार्षिक वर्षाच्या लेख्यामधून काढून टाकण्यात आलेली आहे. त्यानुसार जास्तीची रक्कम रु.५.६९ लक्ष दुरुस्त करण्यात आली. उर्वरित रक्कम रु.०.७९ लक्ष सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये पडताळणी करुन समायोजन करण्यात आली आहे. वसुलीबाबत पत्रव्यवहार जिल्हाधिकारी, नागपूर यांचेशी सुरु आहे. सध्या कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**३३. उत्पन्न :-**

**३.१.३ दुरुस्ती व पुर्नरचना निधी जमा :-**

संक्रमण शिबीरातील गाळे आणि पुनर्विकास इमारतीतील गाळे यांचे भाडे आणि सेवा शुल्क यापासून मिळालेले उत्पन्न रुपये १३.८३ कोटी मूळ दस्तऐवज उपलब्ध नसल्यामुळे पडताळणी करता येत नाही.

प्राधिकरणाने (एप्रिल २००६) असे नमूद केले आहे की तपशील आता उपलब्ध आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**दु व पु मंडळ :-**

भाडे व सेवाशुल्काची रक्कम रु.७,९५,४१,४५५/- ही संक्रमण शिबीराचे गाळे व पुनर्रचित इमारतीची रक्कम असून उप मु.अ./संक्रमण व आर.टी.यांच्या फील्ड नोंदवहीवरुन घेण्यात आले असून तपासणीकरिता उपलब्ध आहेत. तसेच रु.५,८७,४१,२११/- ही रक्कम एक रकमी भाडे खरेदी योजना व सेवा आकार सेवा तसेच मूळ आरंभीची रक्कम रा.नि.गा.नि.शी संबंधित असून याबाबतचे दस्तऐवज उपलब्ध आहेत.

**३३.१ उत्पन्न व खर्च लेखा (इतर)**

स्थायी मालमत्ता चुकीने महसुली खर्च म्हणून निर्लेखित करण्यात आली म्हणून खर्च रुपये २३.८० लाखांनी वाढवून दाखविण्यांत आला आहे.

प्राधिकरणाने (एप्रिल २००६) नमूद केले की, वार्षिक देयकात आलेले समायोजन बरोबर आहे. उत्तर स्विकारार्ह नाही. कारण कोणतीही विक्री झालेली नसताना स्थावर मालमत्ता महसूली खर्च म्हणून निर्देशित करण्यात आली. भांडवली खर्च महसूली सारा म्हणून कोणत्या आधारे निर्देशित त्यांचे प्राधिकरण करण्यात आलेले नाही.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :-**

सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६० अंतर्गत भाडेतत्त्वावरील गाळयांची किंमत काढून टाकण्यात आली आहे. दप्तर पडताळणी करुन योग्य समायोजन सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यात करण्यात येईल.

**३४. सर्वसाधारण :-**

बँक ताळमेळातील वाढ तसेच विसंगती घालविण्याकरीता कार्यवाही न करणे. मुंबई मंडळाचे माहे मे ९७ ते फेब्रुवारी २००२ या कालावधीतील ४१ बँकेच्या बँक ताळमेळाचे काम प्रलंबित आहे. ज्या प्रकरणात बँक ताळमेळाचे काम झालेले आहे त्याबाबतची विसंगती पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनियमितता, अफरातफर तसेच तपास न लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

प्राधिकरणाने (एप्रिल २००६) नमूद केले की बँक ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे. तथापि मुंबई मंडळाच्या बँक ताळमेळाचा तपशिल देण्यात आलेला नाही.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**३४.१** बँक ताळमेळातील विसंगती घालविण्याबाबत व ते अद्ययावत करण्याबाबतच्या सूचन सर्व मंडळांना निर्गमित केल्या आहेत. याबाबतीत प्राधिकरण स्तरावरुनही पाठपुरावा करण्यात येत नाही.

या व्यतिरिक्त रुपये ३.७० कोटींची स्थावर मालमत्ता (भाडे तत्वावरील गाळे) चालू वर्षात भांडवली निधी (रुपये ३.४६ कोटी) आणि महसुली खर्च (रुपये ०.२४ कोटी) खर्ची दाखवून स्वतंत्ररित्या निर्लेखित करण्यात आली.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २००२-०३ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**३४.२ भांडवली निधी रुपये २६२.६३ कोटी (अनुसूची-१)**

प्राधिकरणाच्या वसाहतीमध्ये सामान्य सेवांची श्रेणीवाढ करण्यासाठी शासनाकडून मार्च २००० पर्यंत अनुदान सहाय्यापोटी मिळालेल्या रुपये १०.०९ कोटी रकमेपैकी रुपये ४.८८ कोटी एवढी रक्कम खर्च झाली. उर्वरित शिल्लक रक्कम रुपये ५.२१ कोटी ही रक्कम खर्च झालेली नाही. कारण मंडळांना विहीत मानकांमध्ये कामांची अंमलबजावणी करता आली नाही. ही सर्व रक्कम केलेल्या खर्चापोटी समायोजन असे न करता दायित्व म्हणून दाखविण्यात आलेली आहे. यामुळे दायित्व रुपये ४.८८ कोटींनी वाढवून दिसते.

प्राधिकरणाने असे नमूद केलेले आहे की (ऑक्टोबर ०६) याबाबत मानके शिथिल करण्यासंबंधी शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात आला आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

**रु.४७९.९२ लक्ष :-**

म्हाडाच्या निरनिराळ्या वसाहतीतील सामायिक सेवेची दर्जावाढ करण्याकरिता प्राप्त झालेल्या अनुदान रु.१०.८९ कोटीमधून माहे मार्च २०१० पर्यंत झालेला खर्च रु.६.६४ कोटी (दि.३१/३/२००२ पर्यंत रु.४.८० कोटी व रु.१.८४ कोटी) जे.व्ही.क्र.१ द्वारे समायोजित केला असून सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये समाविष्ट करण्यात येईल. अखर्चित अनुदान रु.३.४५ कोटी वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांचेकडे दि.१/११/२०१० रोजी वर्ग करण्यात आले आहेत.

**३४.३** झोपडपट्टी सुधार योजनेखाली गाळ्यांची विक्री केल्यामुळे त्याचप्रमाणे शासन आणि स्थानिक संस्था यांजकडून मिळालेले अर्थसहाय्य रक्कमेचे समायोजन न केल्यामुळे भांडवल निधीमध्ये रुपये ५३.६७ लाखांनी वाढ झाली.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर २००६) असे सांगितले आहे की, ही रक्कम शासन/स्थानिक संस्था यांकडे वर्ग करता येत नाही. त्यामुळे ही महसुलीमध्ये वर्ग करण्यात येईल.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**पुणे मंडळ :-**

रु.५३.६७ लक्ष रक्कमेचे सविस्तर विवरण खालीलप्रमाणे :-

शासनाकडून झोपडपट्टी निर्मुलनासाठी : रु.४३,४७,८८२/- प्राप्त अनुदान.

स्थानिक स्वराज्य संस्थेकडून : रु.१०,१८,७५०/- प्राप्त अनुदान.

एकुण : रु.५३,६६,६३२/- समजा रु.५३.६७ लक्ष

झोपडपट्टी निर्मुलनाअंतर्गतच्या वसाहती ह्यापूर्वीच मालकी हक्कामध्ये रुपांतरीत झालेल्या आहेत. त्यांच्या बांधकामासाठी झालेल्या खर्च रु.९८.४२ लक्ष हा मिळालेले अनुदान रु.५३.६७ लाखापेक्षा जास्त आहे. त्यामुळे सन २००६-२००७ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजन नोंद क्र.२९ अन्वये भांडवली निधिला खर्ची घालून व महसूली जमा दर्शवून आवश्यक समायोजन केले आहे.

**३४.४ दु.व पु. मंडळ :-**

राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाल्यानंतर भांडवल निधी रु.३०,७९,०८,५९३/- याबाबतचा तपशिल कार्यालयात उपलब्ध असून ही रक्कम जे.व्ही.क्र.११ द्वारे महसूली अधिक्यामध्ये जमा दाखवून समायोजित करण्यात आली आहे. ही नोंद सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये प्रतिबिंबित होईल.

सन २००१-०२ च्या लेखा अहवालावर भाष्य करुन सुध्दा मूळ दस्तऐवज नसणे अथवा अपुरे असणे यामुळे दिनांक ३१/३/२००३ रोजी खालीलप्रमाणे रक्कम अनिर्बंध राहिल्या आहेत.

| **(रुपये कोटीमध्ये)** | | | |
|---|---|---|---|
| | | **३१/३/२००२ रोजी** | **३१/३/२००३ रोजी** |
| १. | भांडवली अनुदान | ०.४२ | ०.४२ |
| २. | दायित्वापेक्षा जास्तीची मालमत्ता | ७.३८ | ७.३८ |
| ३. | भांडवली निधी | ८३.२० | ८३.२० |
| | **एकूण** | **९१.००** | **९१.००** |

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की, मुंबई मंडळाच्या बाबतीत तपशील उपलब्ध नाहीत. नाशिक मंडळाच्या बाबतीत सन २००४-२००५ मध्ये अंशत: रक्कम समायोजित करण्यात आली. दु व पु मंडळाच्या बाबतीत तपशील मिळविण्यात येत आहेत.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**३४.५ मुंबई मंडळ :-**

**रु.५२.४० कोटी :-**

सदर रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

१) राजीव गांधी निवारा प्रकल्प अनुदान रु.४६.६८ कोटी

२) महानगर रेल्वे वाहतूक - आरजीएनपी - २.१७ कोटी

३) सार्वजनिक बांधकाम विभाग अंधेरी २.७४ कोटी

४) आंतरराष्ट्रीय विमानतळ ०.३६ कोटी

५) व्यपगत ठेवी ०.२४ कोटी

६) मालमत्ता विक्रीतील निव्वळ नफा ०.१८ कोटी

७) बांधकाम न झालेली कार्यायलीन इमारत ०.०३ कोटी

वरील अनु.क्र.१ ते ४ मध्ये एकूण रक्कम ५१.९५ कोटीही बंद राजीव गांधी निवारा प्रकल्पातंर्गत भांडवली निधीची असून मुंबई मंडळाच्या लेख्यात समाविष्ट केलेली आहे. या प्रकल्पातंर्गत एकूण रु.७५.२३ कोटी (माहे मार्च २००९ पर्यंत) खर्चाच्या बदल्यात सदर अनुदानाचे समायोजन बाकी आहे.

सद्यस्थितीत राजीव गांधी निवारा प्रकल्पातंर्गत सर्व योजना पूर्ण असून त्यापोटीचे वरील भांडवली अनुदान त्या अनुषंगाने झालेल्या खर्चानुसार जे.व्ही.क्र.२ (२०१०-११) समायोजित झाल्याचे दर्शविण्यात आले आहे व ते सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये प्रतिबिंबित होईल.

वरील अनु.क्र. ५ ते ७ मधील रकमा या महसूली उत्पन्न स्वरुपाच्या असून त्यांची नोंद चुकीने प्राप्ती व खर्च लेख्याऐवजी ताळेबंदामध्ये घेण्यात आले. यामध्ये जे.व्ही.क्र.३ नुसार योग्य ती दुरुस्ती करण्यात आली असून सन २०१०-११ च्य वार्षिक लेख्यात ही नोंद प्रतिबिंबित होईल.

**३४.६** प्राधिकरणाच्या विनियमात विचार केलेला नसताना देखील प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीम अदा करण्यासाठी वेगळा राखीव निधी निर्माण केला, परिणामी दायित्वाची रक्कम रुपये ५०/- लाखांनी वाढ झाली.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर २००६) मध्ये असे सांगितले की सन २००३-२००४ च्या वार्षिक लेख्यामधून "आगाऊ कर्ज निधी" काढून टाकला आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**वित्त नियंत्रक/प्रा. :-**

**रु.५०.०० लक्ष**

म्हाडाने कर्ज अग्रिम निधीतून रु.५०,००,०००/- काढून घेण्याचा निर्णय प्राधिकरणाचा ठराव क्र.५८७९ दि.९.१.२००४ अन्वये घेण्यात आला. त्यानुसार घरबांधणी अग्रिम निधीतून काढून घेण्यात आलेल्या समायाजन नोंद क्र. अेअ ७९ अन्वये सन २००३-०४ चे वार्षिक लेख्यामध्ये नोंद घेण्यात आली.

**३४.७**

गाळ्यांच्या विक्रीवरील घसाऱ्याचे समायोजन न केल्यामुळे व मालमत्तेच्या किंमतीपेक्षा जास्त घसारा राखीव निर्माण केल्यामुळे घसारा राखीव रुपये १९.६६ कोटीनी वाढला.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की, मुंबई मंडळाच्या प्रकरणी तपासणी करण्यात येत आहे. पुणे मंडळाच्या बाबतीत सन २००३-०४ मध्ये अधिक रक्कम काढून टाकली आहे. कोकण मंडळाच्या बाबतीत प्रकरणाची तपासणी करण्यात येत आहे. नाशिक मंडळाच्या बाबतीत सन २००५-२००६ च्या वार्षिक लेख्यामध्ये जास्तीचा राखीव काढून टाकण्यात येईल.

**३४.८ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

**रु.१८.८२ कोटी**

**अनेक वर्षापासून स्थायी मत्तेच्या मूळ किमतीपेक्षा जास्तीच्या घसारा आकारणीमुळे रु.१८.८२ कोटीचा अधिकचा घसारा राखीव निर्माण झाला आहे.**

यावर आधारित जादा/कमी घसारा आकारणीचे प्रपत्र तयार करुन ही रक्कम जे.व्ही.क्र.४६ नुसार सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यामधून कमी केली, तर जे.व्ही.क्र.४७ नुसार कमी घसारा आकारणीची रक्कम समायोजित केली आहे. जे.व्ही.क्र.४८ नुसार रु.२.०२ कोटी इतक्या रकमेच्या जादा घसारा आकारणीचे (वाहन आणि कार्यालयीन औजारे, टूल्स ॲन्ड प्लॅन्टस) समायोजन करण्यात आले आहे.

सन २००८-०९ पासून घसारा आकारणीसाठी योग्य व निषिध्द आकारणी करण्यात येत असून मत्तानिहाय घसाऱ्याची रक्कम परिगणित केली जात आहे.

गृहनिर्माण इमारती संदर्भात आकारण्यात आलेली जास्तीची घसारा रक्कम रु.७.६२ कोटी (३१/३/२०१० पर्यंत) जे.व्ही.क्र.४ द्वारे कमी करण्यात आली असून नोंद सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये प्रतिबिंबित होईल.

**३४.९ कोकण मंडळ :-**

रु.१९.६६ कोटीपैकी रु.४७,१५,६५८/- कोकण मंडळाशी संबंधित आहेत. सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६४ अंतर्गत मालमत्तेच्या किंमतीपेक्षा जास्त घसारा राखीव विक्री समायोजित करण्यात आला आहे.

**२.१.४ :- ठेव रुपये ५७९.८० कोटी (अनुसूची-४)**

संरचनात्मक दुरुस्ती यावरील मर्यादेपेक्षा जास्त झालेली रक्कम भागविण्यासाठी गाळेधारकांची भाग रक्कम या खाली उणे व बांधकाम खर्च याखाली जमा असा खर्च समायोजित न केल्याने गृहनिर्माण व दुरुस्ती या खाली संरचनात्मक दुरुस्तीच्या मर्यादेपेक्षा जास्त झालेली रक्कम भागविण्यासाठी गाळेधारकांची भाग रक्कम रुपये ४.५३ कोटीने वाढलेली दिसते.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर २००६) मध्ये सांगितले की, मुंबई मंडळाने मिळकत व्यवस्थापनाकडे या संबंधीची माहिती मागविलेली आहे.

**३४.१० विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

**रु.२.४६ कोटी**

संरचनात्मक दुरुस्तीवर होणारा अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी गाळे धारकांकडील भाग रक्कम जे.व्ही.क्र.८ नुसार परिशिष्ठ २२ मध्ये विशेष दुरुस्तीवरील खर्चामध्ये नोंदवून सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजित करण्यात येत आहे.

**३४.११ दु.व पु. मंडळ :-**

मर्यादेपेक्षा जास्त झालेली गाळेधारकांची भाग रक्कम रु.१.९५ कोटी संदर्भात यापूर्वीच्या काही वर्षामध्ये आवश्यक ते समायोजन केले गेले नाही. परंतु सन २००६-०७ पासून गाळे धारक भाग नोंदवही ठेवण्यात आली आहे व त्यानुसार कार्यवाही सुरु आहे.

भांडवल व महसुल यामधील जमेमध्ये चुकीची विभागणी झाल्यामुळे व चुकीच्या वर्गीकरणामुळे भाडेखरेदी योजना अंतर्गत भाडेकरुकडून घेण्यात आलेली प्रारंभिक ठेव आणि मासिक हप्त्यांच्या जमेचा भांडवली भाग रुपये ४.८९ कोटींनी कमी दाखविण्यात आला.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की, मुंबई मंडळाचे २००४-२००५ च्या वार्षिक लेख्यांमध्ये समायोजन केले आहे. पुणे मंडळाच्या बाबतीत योग्य ती कारवाई प्रतिक्षेत असल्याचे सांगितले आहे. औरंगाबाद मंडळाने सन २००४-२००५ च्या वार्षिक लेख्यांमध्ये योग्य ते समायोजन केले आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु.४८८.७४ लाखांपैकी रक्कम रु.१.७९ लाख व रक्कम रु.१.०१ लाख हया रक्कमा पुणे मंडळाशी संबंधित आहेत. मिळकत व्यवस्थापक/पुणे मंडळ यांनी या रकमेची पडताळणी केली असून आवश्यक ते समायोजन सन २०१०-११ च्या लेख्यामध्ये करण्यात येत आहे.

**३४.१२** दुय्यम अभिलेख्यांमधील बाबींचा समावेश लेख्यामध्ये न केल्यामुळे अर्जदारांकडून/ गाळेधारकांकडून घेतलेली ठेव रुपये १.६१ कोटींनी कमी झालेली दिसते.

प्राधिकरणाने असे सांगितले (ऑक्टोबर २००६) की मुंबई मंडळाच्या बाबतीत संबंधित प्रकरणाची तपासणी चालू आहे. पुणे मंडळाच्या मिळकत व्यवस्थापकांना सुधारित कारवाई करण्याबाबत आदेश दिलेले आहेत.

**३४.१३ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

**रु.१.०६ कोटी**

अर्जदारांकडून प्राप्त सर्व ठेवी व परतावे याचा लेखा हा बँक पुस्तकावरुन मासिक लेख्यामध्ये नोंदी घेऊन ठेवला जातो व त्यानुसार गोषवारा काढला जातो. यानुसारच या नोंदी वार्षिक लेख्यांमध्ये समाविष्ट होतात. इसारा रक्कम व सुरक्षा अनामत यांच्या नोंदी स्वतंत्र रजिस्टरमध्ये घेतल्या जात असल्या तरी जुन्या शिल्लकी व्यवस्थित न नोंदवल्याने या रजिस्टरमधील नोंदी वा लेख्याशी जुळत नाहीत.

कोणताही दावा प्राप्त न झालेले सन २००५-०६ पर्यंतच्या ठेवी जे.व्ही.क्र.१९ ते २२ अन्वये व्यपगत करुन सन २००८-०९ च्या वा लेख्यामध्ये महसूल खाती वर्ग केल्या आहेत.

**३४.१४ पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु.१६०.८५ लाखांपैकी रु.५४.११ लाख इतकी रक्कम ही पुणे मंडळाशी संबंधित आहे. मिळकत व्यवस्थापक/पुणे मंडळ यांना स्थितीची तपासणी करुन आवश्यक ती दोषनिवारक कृती करण्याच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

सन २००१-२००२ च्या वार्षिक लेखापरिक्षण अहवालामध्ये भाष्य करुनसुद्धा मुलभूत दस्तऐवज उपलब्ध नसणे अथवा अपुरा असणे. यामुळे ज्या रक्कमांची तपासणी करता आली नाही त्या रकमा दिनांक ३१.३.२००२ अखेर रुपये १८३.२४ कोटी दिनांक ३१.३.२००३ रुपये ३९८.७१ कोटीपर्यंत वाढल्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| **रुपये कोटींमध्ये** | | | |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **ठेवी** | **३१/३/२००२ अखेर** | **३१/३/२००३ अखेर** |
| १) | भाडेकरुंकडील ठेवी | ५७.५७ | ६४.९१ |
| २) | कंत्राअदारांकडील ठेवी | १३.९८ | ६.६१ |
| ३) | भाडे खरेदी योजनेखाली आयडीपी/ एमआय | ३.३७ | १६२.६२ |
| ४) | गाळे धारकांकडून व भावी खरीददार | --- | २०.९८ |

| | | | |
|---|---|---|---|
| | यांच्याकडून ठेवी | | |
| ५) | इएमआय/एलआयएसपी खाली ठेव | ०.८२ | ०.९६ |
| ६) | संकीर्ण ठेवी | ८३.६४ | ११३.२३ |
| ७) | कंत्राटदारांकडील सुरक्षित ठेवी | --- | २.४२ |
| ८) | राजीव गांधी निवारा प्रकल्प/दुरुस्ती मंडळ यांच्याकडील ठेवी | ०.१८ | ०.२६ |
| ९) | करावयाचे काम | ४.७५ | ४.६० |
| १०) | आमदार/खासदार निधीच्या ठेवी | --- | २२.१२ |
| ११) | विक्री योजनेखालील ठेवी | १४.९६ | --- |
| १२) | आगाऊ अंशदान योजनेखाली ठेवी | ३.९७ | --- |
| | **एकूण** | **१८३.२४** | **३९८.७१** |

प्राधिकरणाने (ऑक्टोबर २००६) मध्ये असे सांगितले की नाशिक, नागपूर, अमरावती, कोकण मंडळ आणि वित्त नियंत्रक यांच्याकडील दस्तऐवज तपासणीसाठी उपलब्ध झालेले आहेत. मुंबई मंडळ, पुणे, झोपडपट्टी सुधार आणि दुरुस्ती मंडळाच्या बाबतीत प्रारंभिक दस्तऐवज उपलब्ध झालेले नाहीत.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**अमरावती मंडळ :-**

**रु.४९.८१ लक्ष, रु.२४६.१२ लक्ष, रु.१२५.४० लक्ष, रु.३२.३२ लक्ष, रु.२६.२७ लक्ष, १२४.४६ लक्ष, रु.१४.२० लक्ष, रु.१०.६१ लक्ष**

प्राधिकरणाच्या निर्देशानुसार व रोड मॅपनुसार सन २००२-०३ ते २००८-०९ पर्यंत सर्व आवश्यक नोंदी प्राथमिक लेख्यात घेण्यात आली आहे व सदर लेखे (रजिस्टर) निवासी लेखा परिक्षकांनी अवलोकन केले आहे. या नोंदवह्यातील नोंदी अद्ययावत असून वार्षिक लेख्याशी ताळमेळाचे काम सुरु आहे.

**मुंबई मंडळ :-**

१) रु.५.५४ कोटी - अर्जदारांकडील इसारा/सुरक्षा ठेव रक्कम

२) रु.१३.३२ कोटी - अर्जदारांकडील ठेवी

३) रु.४.६० कोटी - करावयाचे काम

४) रु.२५.०१ कोटी - संकीर्ण ठेवी

५) रु.२.१८ कोटी - ठेकेदाराकडील इसारा रक्कम

६) रु.०.२३ कोटी - राजीव गांधी निवारा प्रकल्पांकडील ठेवी

७) रु.२.४९ कोटी - ठेकेदारांकडील सुरक्षा ठेव

८) रु.०.३२ कोटी - राजीव गांधी निवारा प्रकल्प सुरक्षा ठेव

९) रु.२०.९८ कोटी - आगाऊ अंशदान योजनेखाली ठेवी

१०) रु.३७.५५ कोटी - संकीर्ण ठेवी

**एकूण ११२.२२ कोटी**

**रोडमॅपमध्ये आश्वासित केल्यानुसार सर्व प्रकारच्या ठेवीबाबत सन २००५-०६ पर्यंट मागणी न आल्याने व्यपगत ठरवून जे.व्ही.क्र. १९ ते २२ नुसार वार्षिक लेखा २००८-०९ मध्ये समायोजन केले आहे. सर्व अभिलेख लेखापरिक्षणास उपलब्ध आहेत.**

**मुंबई झो.सु. मंडळ :-**

रक्कम रुपये १७.४३ लक्ष ही ठेव नोंदवह्या व वार्षिक लेख्यातील फरकांची आहे . यासंदर्भात सुरक्षा ठेव नोंदवही पूर्ण करुन मार्च २०१० पर्यंत पूर्ण करण्यात आली आहे व मागणी झालेल्या ठेवी रुपये १,४०,९५,८६२/- या तीन वर्षांपेक्षा जास्त काळ पडून असल्याने व्यपगत करण्यात आल्या व सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात महसुलामध्ये जमा दाखविण्यात आल्या. (जे.व्ही.क्र. ८०, ८२, ९० आणि ९१ रुपये १६,८१,४६७/-) आणि सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यात (जे.व्ही.क्र. २६, २७ आणि ३० नुसार रुपये १,२४,१४,३९५/-) महसुलामध्ये जमा दाखविण्यात आल्या आहेत. सद्यःस्थितीत वर्षनिहाय सुरक्षा ठेव नोंदवही अद्ययावत करण्यात आलेल्या असून लेखापरिक्षक यांना सन २००८-०९ चे वार्षिक लेख्यांची तपासणी करताना निरीक्षणासाठी सादर करण्यात आल्या.

रक्कम रुपये २.६४ कोटीच्या संकीर्ण ठेवीबाबत ताळमेळ घेण्यात आला असून दावे न करण्यात आलेली शिल्लक रक्कम रुपये १,४२,५६,१२७/- व्यपगत करुन सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र. ६९, ८७, ८९, ९० आणि ९१ अन्वये रुपये ४७,४९,०९२/- व सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र. २४, २५, २७, ३४, ४२ आणि ४४ अन्वये रुपये ९५,०७,०३५/- समायोजित करण्यात आले आहेत.

**वित्त नियंत्रक/प्रा. :-**

**रु.३२६.८५ लाख**

राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाल्यानंतर रु.३२६.८५ लक्ष ही किरकोळ ठेवीची जमा सूचना पत्र क्र. ४४५५ दि.३०.१०.२००० अन्वये सन १९९८-९९ च्या वित्तीय वर्षामध्ये वरील पत्राद्वारे या कार्यालयास प्राप्त झाले. याबाबतची परताव्याची मागणी सादर न झाल्याने दि. ३१/३/२०१० रोजी सदरची रक्कम व्यपगत ठरवून जे.व्ही.क्र. ६४, दि. ३१/१०/२०१० नुसार महसुलात वर्ग करण्यात आली.

इसारा रक्कम रु.०.२५ लक्ष व सुरक्षा रक्कम रुपये १.७७ लक्ष :-

रोडमॅपमध्ये आश्वासित केल्यानुसार इसारा रक्कम व सुरक्षा ठेव रकमेच्या नोंदवह्या सन २००६-०७ पासून ठेवण्यात आल्या असून त्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत. सर्व अभिलेख तपासण्यासाठी कार्यालयात उपलब्ध आहे.

**३४.१५ कोकण मंडळ :-**

(१) वार्षिक लेख्यात माहे मार्च २००३ पर्यंतची गाळेधारकांची अनामत ठेव रक्कम रु.३९,६७,३६०/- दर्शविण्यात आली आहे. वि.नि./प्रा. यांचे पत्र क्र.१२९८, दि.२९.०५.२००९ नुसार दि.३१.०५.२००६ पर्यंतची शिल्लक रक्कम "बी" मध्ये सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात दर्शविण्यात आली आहे. सदर रक्कम जे.व्ही.क्र.१३ दि.३१.१०.२०१० नुसार उपगत करुन माहे ऑक्टोबर २०१० च्या मासिक लेख्यामधून समायोजित करण्यात आली आहे.

(२) मार्च २००३ पर्यंतची गाळे धारकांची ठेव रक्कम रु.१,९४,८७,७२१/- एवढी आहे. सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात गाळेधारकांची ठेव रक्कम ही भाडे खरेदी हप्त्यात जे.व्ही.क्र.६० अंतर्गत वर्ग करण्यात आली आहे. आवश्यक नोंद वही ठेवण्यात आली असून लेखापरिक्षणास उपलब्ध आहे.

(३) मार्च २००९ पर्यंत रु.१६,७०,८५४/- ठेकेदारांकडून सुरक्षा ठेवमध्ये ऋण दाखविण्यात आली आहे. वि.नि./प्रा. यांचे पत्र क्र.१२९८, दि.२९.०५.२००९ नुसार दि.३१.०३.२००६ पर्यंतची रक्कम वार्षिक लेखा सन २००८-०९ च्या "बी"मध्ये दर्शविण्यात आली आहे व सदर रक्कम व्यपगत करुन जे.व्ही.क्र.२१ दि.३१.१०.२०१० नुसार मासिक लेखा ऑक्टोबर २०१० समायोजित करण्यात आली आहे.

(४) रु.८६,४१,७४६/- पैकी रु.७८,८२,५६०/- रक्कम प्राप्त झाली व रु.७,५९,१८६/- रक्कम सन २००२-०३ साली गाळेधारकांनी सुरुवातीला भरणा केलेली आहे. ही रक्कम सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६१ अन्वये माहे ३१.०३.२००९ पर्यंतची विक्रीपोटी रक्कम वर्ग करण्यात आली आहे.

(५) रु.२,५४,७९,३९०/- पैकी रु.२,५२,७०,६८९/- रक्कम प्राप्त झाली व रु.२०,८७०/- विक्री योजनेंतर्गत परतावा करण्यात आले आहे की, ज्याचा विचार लेखापरिक्षणामध्ये झालेला नाही. सविस्तर अहवाल तपासणीकरिता उपलब्ध आहे.

(६) रु.३,२३,७५,४२५/- विक्री अंतर्गत विविध लेखाशिर्षातील ठेवीमधील असलेली रक्कम काढून टाकण्यात आली आहे. तपशील तपासणीकरिता उपलब्ध आहे.

(७) रु.९६,०९,३३५/- ही दि.३१.०३.२००३ पर्यंत एल.आय.एस.पी. व घर दुरुस्ती कर्जाची शिल्लक रक्कम आहे. याचा तपशील मि.व्य./कों.मं. यांच्या कार्यालयात उपलब्ध आहे. कर्ज परताव्याची रक्कम गाळेधारकामार्फत विजया बँक, ठाणे मध्ये भरण्यात येते व ती संकेतांक क्र. ७७५ (एलआयएसपी) मध्ये जमा करण्यात येते. बँकेमार्फत ही सर्व एकत्रित रक्कम मुख्य लेखाधिकारी यांच्याकडे नियमितपणे विवरण पत्रासह वर्ग करण्यात येते.

(८) मार्च २००३ पर्यंत रु.१,८७,२९,०४७/- संकीर्ण ठेव अंतर्गतची शिल्लक रक्कम आहे. वि.नि./प्रा. यांनी त्यांचे पत्र क्र. १२९८, दि.२९.०५.२००९ च्या पत्रानुसार दि.३१.०३.२००६ पर्यंतची शिल्लक व्यपगत करुन जे.व्ही.क्र.२१ दि. ३१.१०.२०१० नुसार समायोजित करण्यात आलेली आहे.

**३४.१६ दु. व पु. मंडळ :-**

रु.९.९१ कोटी ही रक्कम प्रामुख्याने गाळेधारकांकडील ठेवी संदर्भातील असून ती या बाबतीतील नोंदवह्या व वार्षिक लेख्यामधील नोंदी यामधील फरकाची रक्कम असल्याचे दिसून येते. तपासणीअंती असे निदर्शनास आले की, नोंदवह्यांमध्ये काही नोंदी घ्यावयाच्या राहून गेलेल्या आहे. परंतु वार्षिक लेख्यांमधील रकमा या तेरीजप्रमाणे असून बरोबर आहेत.

रु.१९.२५ कोटी ही रक्कम बंद झालेल्या राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडील वर्ग केलेल्या ठेवींच्या परिशिष्ठ चार मधील चुकीच्या नोंदीशी संबंधित आहे. ही रक्कम संकीर्ण जमा

म्हणून प्राप्त झली असल्यामुळे याबाबत आवश्यक ते समायोजन जे.व्ही.क्र.१२ नुसार सन २००३-०४ च्या लेख्यामध्ये करण्यात आले आहे व ही रक्क परिशिष्ठ चारमधून कमी करण्यात आली आहे.

गाळेधारकांच्या हिस्स्याची रु.२,९९,१५६/- इतकी रक्कम मु.ले.अ. कार्यालयाकडे वर्ग झालेली आहे. याबाबतीतील सर्व तपशील सहाय्यक लेखा अधिकारी दक्षिण व उत्तर यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.३,१६,३२०/- ही गाळेधारकांकडील इसारा रकमेची असून तिचे समायोजन जे.व्ही.क्र.१६ नुसार सन २००८-०९ मध्ये करण्यात आले आहे.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.१६,३९,५३७/- ही इसारा रकमेची असून ती मासिक लेख्यामधील शिल्लकीनुसार दर्शविली असून याबाबतचे सर्व आवश्यक तपशील सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.११,३६,५८,१२५/- ही संकीर्ण ठेवी शीर्षाखाली असून ती माहे मार्चच्या मासिक लेख्यातील शिलकीनुसार दर्शविली आहे व बरोबर आहे. याबाबतचे सर्व आवश्यक तपशील सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.२६,९९,१७,५६२/- ही संकीर्ण ठेवी शीर्षाखाली असून ती माहे मार्चच्या मासिक लेख्यातील शिलकीनुसार दर्शविली आहे व बरोबर आहे. याबाबतचे सर्व आवश्यक तपशील सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.२,४२,४७,९४४/- ही ठेकेदारांकडील सुरक्षा ठेवी शीर्षाखाली असून ती माहे मार्चच्या मासिक लेख्यातील शिलकीनुसार दर्शविली आहे व बरोबर आहे. याबाबतचे सर्व आवश्यक तपशील मुख्य लेखाधिकारी तसेच सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.८,७९,६५५/- हे राजीव गांधी निवारा प्रकल्पातील गाळेधारकांकडील ठेवींचे असून ती सन १९९८-९९ मध्ये वर्ग करण्यात आली आहे. याबाबतीतील सर्व तपशील उपमुख्य अधिकारी यांच्या कार्यालयात तपासणीस उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.१७,५८,७२५/- ही संकीर्ण ठेवी शीर्षाखाली असून ती माहे मार्चच्या मासिक लेख्यातील शिलकीनुसार दर्शविली आहे व बरोबर आहे. याबाबतचे सर्व आवश्यक तपशील सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.१५,७१,०७,९२२/- ही आमदार व खासदार निधीशी संबंधित ठेवींची असून वार्षिक लेख्यामधील नमूद रकमा ह्या एकत्रित मासिक लेख्यानुसार घेतल्या असून त्या बरोबर आहेत. याबाबतचे सर्व आवश्यक तपशील सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.६,३५,९३,२९३/- ही आमदार व खासदार निधीशी संबंधित ठेवीतील प्रधानाशी निगडीत असून ती मासिक लेख्यातील शिल्लकीनुसार वार्षिक लेख्यांमध्ये नमुद केली असून बरोबर असल्याची खात्री केली आहे. याबाबतचे सर्व आवश्यक तपशील सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.१,७९,०४०/- ही खासदार निधीशी संबंधित असून ती जिल्हाधिकारी कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या रक्कमेनुसार वित्त नियंत्रक/ प्रा. यांचेमार्फत वर्ग झालेली आहे. प्राप्त झालेली रक्कम सहाय्यक लेखाधिकारी (उत्तर) व (दक्षिण) वित्त प्रेषण म्हणून दर्शविली असून त्याचा संपूर्ण तपशिल तपासणीसाठी संबंधित कार्यालयात उपलब्ध आहे.

तपासणीस उपलब्ध नसणारी रक्कम रु.३,७३,०६०/- ही आमदार निधीशी संबंधित ठेवीतील प्रधानाशी निगडीत असून ती मासिक लेख्यातील शिल्लकीनुसार वार्षिक लेख्यांमध्ये नमुद केली असून बरोबर असल्याची खात्री केली आहे. याबाबतचे सर्व आवश्यक तपशील सहाय्यक लेखाधिकारी उत्तर व दक्षिण यांचे कार्यालयात उपलब्ध आहेत.

गाळे धारकाचा हिश्श्याची रक्कम वार्षिक लेख्यांमध्ये नमूद न केल्याने रक्कम रु.३१,१५०/- ची तफावत दिसून येत आहे, ही बाब सहाय्यक लेखाधिकारी (दक्षिण) या कार्यालयाशी निगडीत असून त्या कार्यालयाच्या मासिक लेख्यावरुन सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यांत समाविष्ट करुन याबाबतची दुरुस्ती केली आहे.

संकीर्ण ठेवींमधील जमा व प्रधाने यामधील तफावत रुपये १,४६,३३३/- असून संकेतांक ०५९/००/९०९/००२ मधील सर्व जमांची तपासणी करता असे निदर्शनास आले की, जमेमधून

वजा न केल्याने ही तफावत दिसून येते. परंतु यामुळे वार्षिक लेखा यावर कुठलाही परिणाम झालेला नाही.

रक्कम रु.७२,८९,७९४/- ची तफावत ही मुख्यत्वे आमदार निधीची रक्कम चुकीने ठेकेदारांकडील संकीर्ण ठेव सदरी दर्शवल्यामुळे निर्माण झालेली आहे. परंतु याबाबतची प्रदाने देखील त्याच लेखाशिर्षाखाली दर्शविली असल्याने एकूणच वार्षिक लेख्यांमध्ये नोंदीवर त्याचा परिणाम झालेला नाही.

रक्कम रु.९,३२,६२,४४०/- ची तफावत ही मुख्यत्वे आमदार निधीची रक्कम चुकीने ठेकेदारांकडील संकीर्ण ठेव सदरी दर्शवल्यामुळे निर्माण झालेली आहे. परंतु याबाबतची प्रधाने देखील त्याच लेखाशिर्षाखाली दर्शविली असल्याने एकूणच वार्षिक लेख्यांमध्ये नोंदीवर त्याचा परिणाम झालेला नाही.

रु.४,९५०/- ची तफावत ही ठेकेदारांकडील संकीर्ण सुरक्षा ठेव याचेशी निगडीत असून त्यातून झालेली एकूण प्रदाने अदायगी म्हणून दर्शविण्याऐवजी एकूण जमेमधून वजा केली गेली. परंतु यामुळे वार्षिक लेख्यातील एकंदरीत नोंदीवर कुठलाही विपरीत परिणाम झाल्याचे दिसून येत नाही.

**२.१.५.७ :-**

उणे शिल्लक आणि भरणा करावयाच्या वजातीमधील तफावत यामुळे चालू दायित्व रु.३.७३ कोटींनी कमी झाले.

प्राधिकरणाने (ऑक्टोबर २००६) मध्ये असे सांगितले की, मुंबई मंडळाच्या बाबतीत प्रकरणाचा ताळमेळ घालण्यात येत आहे. नाशिक मंडळाने सन २००४-२००५ च्या वार्षिक लेख्यांमध्ये समायोजन केले आहे. अमरावती मंडळाची अंशत: रक्कम (रुपये ०.१५ लाख) समायोजित केली आहे आणि उर्वरीत रक्कम (रुपये ०.०२ लाख) अजून समायोजित करावयाची आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :- (रुपये २.५४ कोटी)**

रोडमॅपमध्ये आश्वासित केल्यानुसार रक्कम रु.२.५४ कोटीचे समायोजन जे.व्ही.क्र.५३ नुसार सन २००८-०९ च्या लेख्यामध्ये केले असून आता कोणतेही उणेती शिल्लक नाही.

**३४.१७ भरणा**

**२.१.६.१ :-**

आंतर मंडळातील व्यवहारांचे योग्य समायोजन करण्यांत न आल्यामुळे भरणा खालील शिल्लक रु.१.१४ कोटींनी वाढली.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की, कोकण मंडळ, आंतर मंडळाच्या व्यवहारांचा ताळमेळ मुंबई मंडळाबरोबर करीत आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :-**

सन १९८१ साली रु.११४.१२ लक्ष मुंबई मंडळाकडून कोकण मंडळात वर्गीकरण करण्यात आले आहे. दप्तर उपलब्ध नसल्याने खूप वर्षांपसून प्रलंबित आहे. त्यामुळे सदर रक्कम लेख्यामध्ये वेगळी दर्शविण्यात आली आहे. वित्त नियंत्रक/प्रा. यांचे सूचनेनुसार सन २०१०-११ योग्य ते समायोजन करण्यात येईल.

**३४.१८** प्राथमिक दस्तऐवज नसल्यामुळे/अपुरे असल्यामुळे रु.७.७७ कोटीची वित्तप्रेषणाची रक्कम सहजपणे पडताळून पाहता आली नाही.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की, पुणे मंडळ स्थितीचा ताळमेळ करण्यासाठी प्रयत्न करीत आहे. कोकण मंडळाच्या बाबतीत दस्तऐवज तपासणीसाठी आता उपलब्ध करुन देण्यात आले. दु व पु मंडळाच्या बाबतीत समायोजन हाती असलेल्या लेख्यामधून करण्यात येईल.

**३४.१९ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :-**

जमा असलेली रक्कम रु.७४,६४,८५०/- चा तपशिल दप्तर तपासणीकरिता उपलब्ध आहे.

**२.२.१.३ :-**

प्राथमिक दस्तऐवज उपलब्ध न झाल्यामुळे अथवा अपुरे असल्यामुळे स्थावर मालमत्तेची रु.१२.९१ कोटी ही किंमत तपासणीसाठ सहजपणे उपलब्ध होऊ शकली नाही.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की, मुंबई मंडळाने प्राथमिक दस्तऐवज व नोंदवह्या अद्ययावत ठेवण्याबाबत सूचना जारी केल्या आहेत. नाशिक मंडळाच्या

बाबतीत नोंदवही सन २००३-२००४ पर्यंत अद्ययावत करण्यात आली आहे. पुणे मंडळाच्या बाबतीत असे सांगण्यात आले की गाळे, विक्री योजनेखाली विकले गेले असून मालमत्ता व्यपगत करण्यात आली आहे. सदर उत्तर स्विकारार्ह नाही. कारण व्यपगत केलेल्या मालमत्तेचा तपशिल उपलब्ध करण्यात आलेला नाही. झोपडपट्टी सुधार मंडळाच्या बाबतीत असे सांगण्यात आले की मालमत्ता नोंदवही आता ठेवण्यात येत आहे.

**३४.४० विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

**रु.०.२० कोटी**

ताळमेळ पत्रकामध्ये दर्शवावयाची मत्तेनिहाय किंमत व त्यानुसारचे मुल्य सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजित केले आहे. (जे.व्ही.क्र.४६/४७/४८).

मालमत्तानिहाय नोंदवह्या अद्ययावत ठेवल्या असून लेखापरीक्षणासाठी उपलब्ध आहेत.

**२.२.१.४ :-**

स्थावर मालमत्ता असलेल्या रु.२.२१ लाख या गाड्यांच्या किमतीचे चुकीचे वर्गीकरण हत्यारे व औजारे या खाली केल्यामुळे रु.३.७३ लाख या स्थावर मालमत्तेच्या किमतीचे पण चुकीचे वर्गीकरण झाले.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की, सन २००५-२००६ च्या वार्षिक लेख्यामध्ये पुणे मंडळ समायोजन करेल.

**३४.४१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**दु. व पु. मंडळ :-**

वातानुकूलित यंत्रे, पंखे, टाईपरायटर झेरॉक्स मशिन इ.चा खरेदीचा सदराखालील रक्कम रु.३,७२,९८१/- चुकीने हत्यारे व संयंत्रे म्हणून वर्गीकृत झाली ती सुधारुन कार्यालयीन सामुग्री सदराखाली वार्षिक लेखा २०१०-११ मध्ये समायोजित करण्यात येईल.

**२.२.३ चालू मालमत्ता रु.१९४५ कोटी**

**२.२.३.५ :-**

सन १९८२-८३ या कालावधीत इमारत साहित्यासाठी दिलेल्या अग्रीमाची रक्कम वसूल न होणे/समायोजन न करणे यामुळे अग्रीम रुपये ८.९५ लाखांनी वाढलेला दिसतो.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की नागपूर मंडळाच्या बाबतीत वसूल करण्यायोग्य दर्शविलेली रु.७.०८ लाख या रक्कमेपैकी प्रत्यक्ष वसुलीयोग्य रक्कम रु.१.३९ लाख एवढीच परिगणित होते. उरलेली रु.५.६९ लाख ही रक्कम वसुल करण्यायोग्य नव्हती व त्यामुळे ती सन २००५-२००६ च्या वार्षिक लेख्यामधून काढून टाकण्यात आली. अमरावती मंडळाच्या बाबतीत वास्तुशास्त्रज्ञाकडून रक्कम अंशतः वसूल करण्यात आली व उरलेली रक्कम अजून वसुल करावयाची आहे.

**३४.४२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :-**

ह्या रकमा खालील बाबींशी संबंधित आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | संलग्न विमा योजनेअंतर्गत श्री.सोनबरसे आणि श्री.खोबरागडे यांची विम्याची रक्कम शासनाकडून येणे आहे. | रु.०.६० लक्ष |
| २) | प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकारी/कर्मचारी यांची रजा वेतन व निवृत्तीवेतन अंशदान | रु.०.६६ लक्ष |
| ३) | श्री.पापा पंचम माकडे यांना मौजा बोरगाव येथील स.क्र.६०/१ मधील जमीन परत करण्यात आली त्याबाबत नागरी जमीन कमाल धारणा (ULC) विभागाकडून येणे योग्य रक्कम. | रु.०.७९ लक्ष |
| ४) | स्टॅम्प ड्युटीची परतावा रक्कम महाराष्ट्र शासनाकडून येणे आहे. | रु.५.०३ लक्ष |
| | **एकूण** | **रु.७.०८ लक्ष** |

रु.७.०८ लक्ष रकमेपैकी मंडळात निरनिराळ्या विभागाकडून प्रतिनियुक्तीवर आलेल्या अधिकारी/कर्मचाऱ्यांची रजा वेतन व निवृत्ती वेतन अंशदानाची रक्कम रु.०.६६ लक्ष नजरचुकीने त्या त्या विभागाकडू येणे आहे असे दर्शविण्यात आले होते. सदर रक्कम आवश्यक समायोजन करुन सामान्य पावती क्र. २३ दि.३१.३.२००६ द्वारे वार्षिक लेखा २००५-०६ मधून वरील लेखा शिर्षातून काढून टाकण्यात आली आहे. त्याचप्रमाणे शासनाकडून चुकीने येणे दर्शविलेली स्टॅम्प ड्युटी परतावाची रक्कम रु.५.०३ लक्ष देखील लेख्यातून काढून टाकण्यात आली आहे. स्टॅम्प ॲक्टनुसार जर स्टॅम्प ड्युटी परतावा रकमेकरिता शासनाकडे स्टॅम्प निर्गमित केलेल्या तारखेपासून सहा महिन्याचे आत रक्कम सादर केला नाही तर सदर

रक्कम निरस्त होते. वरील रक्कम ही १९८० पूर्वी खरेदी केलेल्या जमिनीशी संबंधित होती. त्यामुळे लेख्यामधून सध्या काढून टाकण्यात आली आहे. रु.०.७९ लाखाचे वसुलीबाबत जिल्हाधिकारी, नागपूर यांचेशी पत्रव्यवहार सुरु आहे. सध्या कार्यवाही प्रगतीपथावर आहे.

**३४.४३ अमरावती मंडळ :- (रु.१.७८ लक्ष)**

रु.१.७८ लक्ष अग्रिमापैकी खालीलप्रमाणे रक्कम वसुल झालेली आहे.

१) जे.व्ही.क्र.४९, दि. १६/१२/२००५ अन्वये रु.२४,०५८/-

२) जे.व्ही.क्र.७७, दि. २८/०२/२००६ अन्वये रु.२०,३८३/-

३) जे.व्ही.क्र.७८, दि. २८/०२/२००६ अन्वये रु.०५,१३७/-

४) जे.व्ही.क्र.७८, दि. २८/०२/२००६ अन्वये रु.१०,६४८/-

**एकूण रु.६०,२२६/-**

अग्रीमाची रक्कम खालीलप्रमाणे शिल्लक आहे.

| | | |
|---|---|---|
| १) | रु. ९२,०५६.०० | मे.के.के. खुबचंदानी, कंत्राटदार (५१ म.उ.ग. खामगांव) |
| २) | रु. २५,६७९.०० | मे.पि.एस. सेठी, कंत्राटदार (६० म.उ.ग.एमआयडीसी अकोला) |
| ३) | रु. ६,७८३.०० | एम.एस.ई.बी. अग्रीम |
| | रु.१,२४,५१८.०० | एकूण |

वरील क्र. १ व २ चे समायोजन संबंधित कंत्राटदारांना देय असलेल्या अंतिम देयकातून वसूल करण्यात येईल.

गाळेधारकांकडून वसुल करावयाची रक्कम महाराष्ट्र राज्य विद्युत मंडळाकडून येणे असलेली रक्कम तसेच जमीन मालकांकडून कोर्टाच्या आदेशाप्रमाणे वसुल करावयाची रक्कम इत्यादी रक्कमांचा आगाऊ खर्चामध्ये समावेश न केल्यामुळे किरकोळ ऋणको रु.२१.३१ कोटींनी कमी झालेले दिसते.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की वित्त नियंत्रक/प्राधिकरण हे सन २००५-२००६ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजन करतील. मुंबई मंडळाच्या बाबतीत प्रकरणाची तपासणी करण्यांत येत आहे. कोकण मंडळाच्या बाबतीत योग्य ते समायोजन सन २००५-२००६ च्या वार्षिक लेख्यामध्ये करण्यात येत आहे. पुणे मंडळाच्या बाबतीत प्रकरणासंबंधी पत्रव्यवहार

चालू आहे. औरंगाबाद मंडळाच्या बाबतीत प्रकरण न्यायप्रविष्ठ असून समायोजन (रु.३२.५४ लाख) कोर्टाचे आदेश प्राप्त झाल्यानंतर करण्यात येईल. येथे पुढे असेही सांगण्यात येते की लोकआवास योजनेसंबंधी (एल.ए.वाय) रक्कमेचे समायोजन करण्यात येईल. नाशिक मंडळाच्या बाबतीत समायोजन सन २००४-२००५ च्या वार्षिक लेख्यामध्ये करण्यात आले आहे. नागपूर मंडळाच्या बाबतीत रक्कम वसुल करण्याबाबत प्रयत्न करण्यात येत आहेत. समाजकल्याण खात्याकडून वसुल करावयाच्या रक्कमेबाबत असे सांगण्यात आले की वसुलीवर प्राधिकरण लक्ष ठेवून आहे.

अमरावती मंडळाच्या बाबतीत प्रकरण विचाराधीन आहे. झोपडपट्टी सुधार मंडळाच्या बाबतीत समायोजन ताळमेळ झाल्यानंतर करणे शक्य होईल.

**३४.४४ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**औरंगाबाद मंडळ :-**

या कार्यालयाने १२ गाळे योजनेतील गाळेधारकाकडून मा.कोर्टाच्या आदेशानुसार वसुल करण्यात आलेल्या रकमेचे (रु.३२.५४ लक्ष) व्याजासह रकमेचे सन २००६-०७ या वर्षाच्या वार्षिक लेख्यात समायोजन नोंद क्रमांक ४८ अन्वये समायोजन करण्यात आले. लोक आवास योजने संदर्भात लाभार्थींना देण्यात आलेली रक्कम रु.१,३९,८५,०००/- वार्षिक लेखा सन २००५-०६ मध्ये स्वतंत्रपणे येणे म्हणून दाखविण्यात आले आहे. (जे.ई.क्र.३५) आता या शिर्षाखाली रक्कम निरंक आहे.

**३४.४५ पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु.२१३१.३७ लाखांपैकी रु.४६.८९ लाख इतकी रक्कम ही पुणे मंडळाशी संबंधित आहे. त्याचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे :-

१) रु.८.४६ लाख :- आगरकरनगर कॉलनी येथील सेवाआकाराची रक्कम.

एकूण सेवा आकार रु.८,४६,३८४/- पैकी आतापर्यंत एकूण रक्कम रु.७,००,३८४/- इतकी रक्कम वसूल झाली असून रु.१,४६,०००/- इतकी रक्कम आगरकरनगर येथील गाळेधारकांकडून वसूल करणे बाकी होते.

२) रु.०.५१ लाख :- ही रक्कम मागणीपेक्षा जास्त वसुली झालेली रक्कम आहे. अशी स्थिती क्वचितप्रसंगी आढळून येते. लेखापरिक्षणातील मुद्दयाची भविष्यासाठी नोंद घेण्यात आलेली आहे.

३) रु.३६.८७ लाख :- लेखापरिक्षणातील निरिक्षणानुसार ही रक्कम पीबीएपी, पुणे यांचेकडून वसुल करावयाची आहे. लेखापरिक्षणाने ही रक्कम परिगणना करताना ३४५४ चौ.फूट क्षेत्रासाठी रु.७/- प्रति चौ.फूट दि.०१.०४.१९८४ ते ३१.०३.१९९४ या कालावधीसाठी तर ९९२ चौ.फूट क्षेत्रासाठी रु.११/- प्रति चौ.फूट दराने ०१.०४.१९९४ ते ३१.०३.२००० या कालावधीसाठी आकारणी गृहित धरलेली आहे. या ठिकाणी असे नमूद करण्यात येते की, आगरकरनगर येथील नविन प्रशासकीय इमारत ही सन १९८८ मध्ये पूर्ण झाली व वापरात आणली. त्यामुळे ०१.०५.१९८४ पासून भाडे आकारणी विचारात घेता येणार नाही. वस्तुत: सदर जागा ही तळमजल्यावरील जागा असून म्हाडाच्या विविध कार्यक्रम व योजना यांचे प्रदर्शनसाठी वापरली जात होती. ज्यामध्ये योजनानिहाय विक्रीसाठी उपलब्धतेबाबतची माहिती योजनानिहाय घरांचे नमुने/मॉडेल्स व नकाशे प्रदर्शित केले जात असत. पीबीए ऑफ इंडिया यांनी त्याच मजल्यावर अंदाजे ३०० चौ.फूट इतके क्षेत्र तात्पुरत्या कालावधीसाठी त्याच प्रदर्शनात सहभाग घेण्यासाठी व्याप्त केलेले होते.

४) रु.०.४८ लाख :- ही रक्कम निर्मिती केंद्र, पुणे यांचेशी संबंधित आहे. खातरजमा केल्यानंतर असे निदर्शनास आले आहे की, आर.के.कन्स्ट्रक्शन यांचेकडून ही रक्कम वसुल करणे किंवा त्यांना देणे नाही. अशा परिस्थितीत किरकोळ ऋणको कमी निर्देशित झालेला नाही.

५) रु.०.१७ लाख :- ही रक्कम उपहारगृहापोटी [श्रीमती मनिषा सातकर] यांचेकडून वसुल करावयाची आहे. कार्यकारी अभियंता-२/पुणे मंडळ यांनी निश्चित केले असून त्यानुसार आवश्यक सामान्य नोंदी (J.E.) घेण्यात आलेले आहे. सदर दुरुस्तीची नोंद सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये प्रतिबिंबीत होईल.

सन २००१-०२ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये अभिप्राय नोंदविण्यात येऊन सुध्दा मुलभूत अभिलेखे उपलब्ध नसणे किंवा अभिलेखे अपुरे असणे यामुळे रक्कमा पडताळून पाहता आल्या नाहीत व यामुळे या रक्कमा दिनांक ३१.०३.२००२ रोजी खाली दर्शविल्याप्रमाणे रु.७०६.१८ कोटी ते रु.१०२४.३७ कोटीपर्यंत वाढल्या.

| क्रमांक | तपशिल | रक्कम (कोटीमध्ये) | |
|---|---|---|---|
| | | ३१/३/२००१ रोजी | ३१/३/२००२ रोजी |
| १) | देय झालेल्या परंतु न आलेल्या व्याजाचे किरकोळ ऋणको | | |
| २) | भाडे व सेवा आकार भाडे खरेदी योजनेचे मासिक हप्ते व भुईभाडे इत्यादी यांचे किरकोळ ऋणको | ४०.३३ | २७.६४ |
| ३) | अंशदान ठेवी व भाडे अनुदान | | |
| ४) | सणाकरिता व इतर अग्रीम | | |
| ५) | संकीर्ण पी.डब्ल्यू.डी. अग्रीम | | |
| ६) | इमारत साहित्याकरिता अग्रीम | १५.३० | ४९.३२ |
| ७) | सहकारी संस्थाना कर्ज | | |
| ८) | तात्पुरता अग्रीम, भाडे अनुदान | | |
| ९) | अल्प मुदतीच्या ठेवी | ४१.१५ | ३३३.१३ |
| १०) | देवाणघेवाणीची रोख रक्कम | ०.०५ | ०.८९ |
| ११) | रोख रक्कम व बँकेची शिल्लक (जा.बँ.प्र) व वित्त नियंत्रक | १२.०७ | १२.०९ |
| १२) | बांधकाम स्थावर मालमत्त व चालू मालमत्ता यावरील खर्च | ५९७.०९ | ६००.९७ |
| १३) | म.रा.विद्युत मंडळ | ०.०४ | ०.०४ |
| १४) | इमारत बांधकाम साहित्य यांच्यासाठी अग्रीम | --- | ०.४७ |
| १५) | राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडून आलेली निव्वळ रक्कम | ०.१५ | --- |
| | **एकूण** | **७०६.१८** | **१०२४.६७** |

प्राधिकरणाने ऑक्टोबर, २००६ मध्ये असे सांगितले की, ज्या प्रकरणी पडताळणी होऊ शकली नाही अशा बाबीबाबत वित्त नियंत्रक, मुंबई मंडळ, नागपूर मंडळ व कोकण मंडळ यांच्याकडून अंतिम कारवाई प्रलंबित आहे. पुणे मंडळ, झोपडपट्टी सुधार मंडह, औरंगाबाद मंडळ, नाशिक मंडळ व दुरुस्ती मंडळ याच्या बाबतीत तपशील उपलब्ध करण्यात आला आहे.

**३४.४६ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**औरंगाबाद मंडळ :-**

या कार्यालयाने आता संबंधित नोंदवह्या अद्यावत केल्या असून आवश्यकत्या रकमेचे समायोजन केलेले असल्यामुळे या बाबीवर लेखापरिक्षणाने पुढील भाष्य केलेले नाही.

**३४.४७ अमरावती मंडळ :-**

नागपूर व अमरावती मंडळाकडील अभिलेख तपासले असता नागपूर मंडळाकडे असे निदर्शनास आले की, विविध सहकारी संस्थांकडे रु.६४,००,६१२/- इतकी रक्कम प्रलंबित आहे.

यापैकी रक्कम रु.२७,१९,६४२/- ही मार्च, २००२ अखेरची आहे. तर सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यावरुन ही प्रलंबित रक्कम रु.१८,७८,३०८/- एवढीच दिसून येते. प्रलंबित रक्कम वसुलीबाबतची कार्यवाही प्रगतीत आहे. (यामध्ये रक्कम रु.२७.१० लक्षचा समावेश आहे.)

**३४.४८ पुणे मंडळ :-**

१) एकूण रक्कम रु.२,७६४.५९ लाखांपैकी रु.१,१२४.६६ लाख इतकी रक्कम ही पुणे मंडळाशी संबंधित आहे. ही रक्कम मासिक भाडे खरेदी हप्त्यांच्या किरकोळ ऋणको पोटीची आहे. ही रक्कम मिळकत व्यवस्थापक यांनी दिलेली मागणी व प्रत्यक्ष वसुली यातील फरकांवरुन आलेली आहे. व्हाऊचर व कॅशबुक उपलब्ध आहे.

२) एकूण रक्कम रु.१२.०३ लाख या रकमेचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे :-

- रु.१.३५ लाख :- ही रक्कम ठेव अंशदान योजनेतील जादा झालेल्या खर्चाची असून हया रक्कमेचे समायोजन सन २००१-०२ ह्या वर्षासाठीच्या वार्षिक लेख्यामध्ये केलेले आहे.
- रु.७.६३ लाख :-

**अ.** रु.२,९०,७७१/- :- ही रक्कम गोखलेनगर, पुणे येथील ३२ गाळे व ४६ गाळे योजनेतील गाळेधारकांकडून आयडीपी व व्याजापोटी वसुल करावयाची रक्कम आहे.

**ब.** रु.४,७२,३००/- :- ही रक्कम गोखलेनगर, पुणे येथील ३२ गाळे उच्च उत्पन्न गट योजनेतील गाळेधारकांकडून वसूल करावयाची उर्वरित किमतीपोटीची आहे.

वरीलप्रमाणे वसुल करावयाच्या रक्कमा ह्या गाळेधारकांकडून वसूल झालेल्या आहेत. त्यामुळे सन २००२-०३ च्या वार्षिक लेख्यामध्ये किरकोळ ऋणको रक्कमेचे एकूण वसुली रक्कमेमध्ये समायोजन केलेले आहे.

**क.** रु.३.०५ लाख :- रु.३,०४,५२५/- इतकी रक्कम शासनाकडून अर्थसहाय्यीत भाड्यापोटी येणे होती व पुणे मंडळाच्या वार्षिक लेख्यामध्ये नोंदविलेली होती. वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांच्या दि.१८ ऑगस्ट १९८१ रोजीच्या पत्रान्वये सदर रक्कम पुणे मंडळाऐवजी नागपूर मंडळाकडे नजरचुकीने हस्तांतरीत झालेली होती. वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांनी योग्य पडताळणीनंतर रु.३,०४,५२५/- ची भाडे अर्थसहाय्य या शिर्षाखली नोंद घेण्यासाठी सुधारित जमा हस्तांतरण पत्र/ एटीसी पत्र क्र.२७३३ दि.२१ ऑक्टोबर, २००२ अन्वये पाठविली. सदर सुधारित जमा हस्तांतरण पत्र/एटीसी आधारे सन

२००१-०२ च्या वार्षिक लेख्यामध्ये रु.३,०४,५२५/- इतक्या रकमेची समायोजन नोंद घेण्यात आली. सदर समायोजनाबाबतचे कागदपत्र मंडळाच्या दफ्तरी उपलब्ध आहेत.

- एकूण रक्कम रु.४९३१.७९ लाखांपैकी रु.१६१.९१ लाख इतकी ही पुणे मंडळाशी संबंधित असून त्याबाबतचा सविस्तर तपशील खालीलप्रमाणे आहे.

**अ.** रु.२३.८६ लाख :- ही रक्कम साहित्य खरेदीशी संबंधित असून या रकमेचे समायोजन सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यामध्ये केलेले आहे.

**ब.** रु.१३१.५४ लाख :- किरकोळ सार्वजनिक बांधकाम अग्रिमाच्या नोंदवह्याचे ताळमेळाचे काम सुरु आहे.

**क.** रु.६.५१ लाख :- ही रक्कम सक्षम प्राधिकारी कार्यालयाकडून वसुल करावयाच्या भाड्यापोटीची आहे. यापैकी ४,६४,४९४/- वसुल झाले असून अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध आहे.

४) रु.४.०६ लाख :- एम.एस.ई.बी.कडून एकूण रु.१२.७० लाख इतकी रक्कम वसूल करावयाची होती, त्यापैकी रु.८.६४ लाख इतकी रक्कम सन १९९७-९८ मध्ये वसूल करण्यात आली व उर्वरित रक्कम रु.४.०६ लाख इतकी एम.एस.ई.बी., एसपीए-१, सोलापूर यांच्याकडून वसूल करावयाची आहे. अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध आहेत.

५) एकूण रक्कम रु.६०,०९६.६५ लाखांपैकी रु.११०.१२ लाख व रु.१०,६९९.२५ लाख ह्या रक्कमा पुणे मंडळाशी संबंधित आहेत.

१] रु.११०.१२ लाख :- ही रक्कम कार्यालयीन इमारत आगरकरनगर, पुणे व कार्यालयीन इमारत, सोलापूर येथील बांधकाम खर्चाची एकत्रित रक्कम आहे. वार्षिक लेख्यातील स्थायी मालमत्तांच्या परिशिष्ठ/२२-ए नुसारची सदर रक्कम हा खर्च प्रमाणके व रोकडवही माध्यमातून आतापर्यंत झालेला एकत्रित खर्च आहे व तपासणीस उपलब्ध आहे.

२] रु.१०,६९९.२५ लाख :- हा खर्च अनेक कामांवर झालेला खर्च असून सन २००१-०२ च्या वार्षिक लेख्यामध्ये गाळ्यांच्या विक्रीपोटी ह्या खर्चाचे समायोजन करुन हा खर्च निर्लेखित करण्यात आला आहे. हा खर्चसुद्धा प्रमाणके व रोकडवही माध्यमातून आतापर्यंत झालेला एकत्रित खर्च आहे व तपासणीस उपलब्ध आहे.

**३५. भरणा :-**

मंडळाने नोंद केलेल्या सदराखाली भरणा रक्कमा व वित्त नियंत्रक यांच्या नोंदवहीतील रक्कमा यांच्यातील फरकाची पडताळणी न केल्यामुळे चालू मालमत्ता रु.७९.६५ लाखांनी कमी झाली.

ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की जरुर ते समायोजन सन २००५-२००६ च्या वार्षिक लेख्यामध्ये करण्यात येईल.

**३५.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :-**

प्राधिकरणाकडे पाठविण्यात येणाऱ्या वित्त प्रेषणाची तफावत रक्कम रु.७९,६५,४३६/- एवढी आहे. याबाबतचे सर्व तपशिलवार अभिलेख तपासणीस उपलब्ध आहेत.

प्राथमिक दस्तऐवज उपलब्ध न होऊ शकल्यामुळे किंवा अपुरे ठेवल्यामुळे दुरुस्ती मंडळ व पुणे मंडळ यांची रु.९.६७ कोटीची "निव्वळ भरणा" ही रक्कम पडताळणीसाठी सहजपणे उपलब्ध होऊ शकली नाही.

प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की आकड्यांचा निपटारा करण्यासाठी पुणे मंडळाने मार्गदर्शन मागितले आहे.

**३५.२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु.९६७.४२ लाखांपैकी रु.९५२.३४ लाख इतकी रक्कम ही पुणे मंडळाशी संबंधित आह. ज्याची सविस्तर तपशील खालीलप्रमाणे :-

| अ.क्र. | तपशील | रक्कम रुपये |
|---|---|---|
| १) | पुणे मंडळाकडून मुंबई मंडळाला पाठविण्यात आलेली वित्तप्रेषणे. | रु.१०,८३,५४८/- |
| २) | पुणे मंडळाकडून औरंगाबाद मंडळाला पाठविण्यात आलेली वित्तप्रेषणे. | रु.९,५१,९३८/- |
| ३) | पुणे मंडळाकडून नाशिक मंडळाला पाठविण्यात आलेली | रु.५,६६,४४,२७४/- |

| | | |
|---|---|---|
| | वित्तप्रेषणे. | |
| ४) | मंडळांतर्गत | रु.३,६५,५४,०२७/- |
| | **एकूण रक्कम** | **रु.९,५२,३३,७८७/-** |

ह्या रक्कमा दि.०५.१२.१९७७ पासून मंडळाचे स्थापनेपासूनच्या आणि वित्तप्रेषणाद्वारे मत्ता व दायित्वाचे हस्तांतरण केल्यापोटीच्या आहेत. ह्या रक्कमा मंडळाच्या ताळेबंदामध्ये सन १९७७ पासून असून त्याबाबतचे मुलभूत अभिलेख उपलब्ध होत नाहीत.

**३६. सर्वसाधारण**

**३६.१ मूळ दस्तऐवज न ठेवणे/अपुरा ठेवणे :-**

मंडळे व त्यांच्या अतंर्गत कार्यालयातील मूळ दस्तऐवज, दुय्यम दस्तऐवज ठेवलेले नाहीत. त्यामध्ये वेगवेगळी नोंदी घेतलेल्या नाहीत जसे की ठेव नोंदवह्या भाडे किर्द अग्रीम नोंदवह्या, स्थावर मालमत्ता नोंदवह्या इत्यादी मूळ दस्तऐवज न ठेवल्यामुळे / अपूर्ण ठेवल्यामुळे ताळेबंदामधील विविध बाबींच्या शिल्लकीचा अचूकपणा तपासता येऊ शकला नाही. या उणिवा जरी गेल्यावर्षी दाखवून देण्यात आल्या होत्या व असमाधानकारक स्थितीमध्ये सुधारणा करण्याविषयी विशेषत: शासनाच्या देखील निदर्शनास आणण्यात आले होते. तरी देखील चालू वर्षाच्या लेख्यामध्ये प्रत्यक्ष सुधारणा दिसून आली नाही. पुढे सन १९९८-९९ मध्ये राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाल्यानंतर प्रकल्पाचा लेखा, वित्त नियंत्रक प्राधिकरण, मुंबई मंडळ, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या लेख्यात लेखापरिक्षणात नमूद केलेल्या विसंगती दूर न करताच समाविष्ठ करण्यात आला. या विसंगती तसेच मूळ दस्तऐवज उपलब्ध नसणे आणि अचूक कार्यवाही न करणे यामुळे लेखा अविश्वसनीय आणि अपुरा आहे. प्राधिकरणाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की पुणे मंडळाने संगणकीकरण केले असून नोंदवह्या सन २००३-२००४ पासून अद्ययावत केल्या आहेत. शिवाय नाशिक, औरंगाबाद, अमरावती व नागपूर मंडळाने अभिलेखे आता अद्ययावत केले आहेत.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

रोडमॅपमध्ये आश्वासित केल्यानुसार सर्व प्रकारच्या नोंदवह्या मंडळस्तरावर ठेवण्यात आलेल्या आहेत. सर्व नोंदवह्यामधील अखेरच्या शिल्लक रकमांचे संबंधित वार्षिक लेख्यातील रकमेशी ताळमेळ घेण्याचे काम सुरु आहे. याबाबतीतील सर्व आवश्यक ती कार्यवाही पूर्ण

करुन त्यानुसार आवश्यक दुरुस्तीच्या नोंदी सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात घेण्यात येतील.

**३६.२ बँक ताळमेळातील वाढ तसेच विसंगती घालविण्याकरिता कार्यवाही न करणे :-**

मुंबई मंडळाचे माहे जुलै १९९७ ते मार्च २००३ या कालावधीमधील ११ बँकेच्या बँक ताळमेळाचे काम प्रलंबित आहे. राजीव गांधी प्रकल्प बंद होऊन दुसऱ्या मंडळात विलीन झाल्यानंतर त्यांच्या बँक खात्याच्या ताळमेळाचे काम मे १९९२ पासून प्रलंबित असलेल्या कामाची सद्य:स्थिती माहिती नाही. ज्या प्रकरणात बँक ताळमेळाचे काम झालेले आहे त्याबाबतची विसंगती पूर्ण करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनियमितता, अफरातफर तसेच तपास न लागण्याची शक्यता नाकारता येत नाही. बँकांच्या खात्यांची मंडळ निहायस्थितीमध्ये दिली आहे. मंडळाने ऑक्टोबर २००६ मध्ये असे सांगितले की पुणे, औरंगाबाद, नागपूर, अमरावती व दुरुस्ती मंडळाच्या बाबतीत बँक ताळमेळाचे काम अद्ययावत झाले आहे. येथे पुढे असेही सांगण्यात आले की नागपूर मंडळाच्या रोकड वहीत समायोजन नोंदी माहे मार्च २००३ ते मार्च २००४ या कालावधीसाठी घेण्यात आल्या आहेत. तसेच औरंगाबाद मंडळाकडून जरुरी त्या नोंदी रोकड वहीत घेण्यात येत आहेत.

पुणे मंडळाच्या बाबतीत जरी असे सांगितले गेले होते की नोंदी प्रलंबित नाहीत. उत्तराची तपासणी करता असे दिसून आले की मिळकत व्यवस्थापनाशी संबंधित कित्येक जुन्या नोंदी अद्याप प्रलंबित होत्या.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

यापूर्वी प्रलंबित असलेले बँक ताळमेळाचे काम सर्व मंडळांचे बाबतीत अद्ययावत करण्यात आलेले आहे. या ताळमेळामध्ये निदर्शनास आलेल्या तफावती दूर करण्याबाबत सर्वच मंडळांना सूचित केले असून त्यानुसारची कार्यवाही प्रगतीत आहे.

**३६.३ अंतर्गत नियंत्रण :-**

लेखा आणि प्राथमिक दुय्यम दस्तऐवज ठेवण्याच्या बाबतीत प्राधिकरणाने परिणामकारक आणि परिपूर्ण अंतर्गत नियंत्रण कार्यक्रम विकसित केलेला नाही. अहवालात नमूद करण्यात आलेल्या विसंगती/प्राधिकरणातील अनियमितता मंडळातील प्रचलित अंतर्गत नियंत्रण/लेखा कार्यतंत्र यातील कमतरता विसंगती दाखवून देते.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

अंतर्गत लेखापरीक्षणासाठी आवश्यक असणारे लेखापरीक्षण पथक निर्माण करण्यासाठीचा आवश्यक प्रस्ताव दि.२३.०७.२००९ रोजी शासनास सादर करण्यात आला आहे.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन २००३-०४ या वर्षाच्या वार्षिक लेखांवरील लेखापरीक्षण अहवालावर भारताचे नियंत्रक व महालेखापरीक्षक यांनी खालीलप्रमाणे अभिप्राय व्यक्त केले आहेत.**

**भांडवली निधी रुपये ३०८.७४ (अनुसूची-१)**

झोपडपट्टी सुधार योजनेखाली गाळ्यांची विक्री केल्यामुळे तसेच शासनाकडून व स्थानिक संस्थांकडून मिळालेल्या अनुदानाचे समायोजन न केल्यामुळे भांडवली निधीमध्ये रु.५३.६७ लाखांची वाढ झाली.

**३६.४ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**पुणे मंडळ :-**

रु.५३.६७ लक्ष रक्कमेचे सविस्तर विवरण खालीलप्रमाणे :-

शासनाकडून झोपडपट्टी निर्मूलनासाठी : रु.४३,४७,८८२/- प्राप्त अनुदान.

स्थानिक स्वराज्य संस्थेकडून : रु.१०,१८,७५०/- प्राप्त अनुदान.

एकूण : रु.५३,६६,६३२/- समजा रु.५३.६७ लक्ष

झोपडपट्टी निर्मूलनाअंतर्गतच्या वसाहती ह्यापूर्वीच मालकी हक्कामध्ये रुपांतरीत झालेल्या आहेत. त्यांच्या बांधकामासाठी झालेला खर्च रु.९८.४२ लक्ष हा मिळालेले अनुदान रु.५३.६७ लाखांपेक्षा जास्त आहे. त्यामुळे सन २००६-२००७ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजन नोंद क्र.२९ अन्वये भांडवली निधीला खर्ची घालून व महसूली जमा दर्शवून आवश्यक समायोजन केले आहे.

सन २००२-०३ च्या लेखापरिक्षण अहवालामध्ये भाष्य करुन सुद्धा मुलभूत दस्तऐवज अपुरे असणे अथवा उपलब्ध नसणे यामुळे रकमा पडताळून पाहता न आल्यामुळे खाली दर्शविल्याप्रमाणे दि. ३१.०३.२००३ रोजीपासून असलेली रु.९१.८३ कोटीची रक्कम दि.३१.०३.२००४ रोजी रु.१३५.४१ कोटीएवढी वाढली.

| | | | (रुपये कोटीमध्ये) |
|---|---|---|---|
| | | ३१/३/२००३ रोजी | ३१/३/२००४ रोजी |
| १) | दायित्वापेक्षा मालमत्ता जास्त | ७.३८ | ७.३८ |
| २) | भांडवली निधी | ८४.०३ | १२७.४४ |
| ३) | राखीव निधी | --- | ०.५९ |
| ४) | भांडवली अनुदान | ०.४२ | --- |
| | **एकूण** | **९१.८३** | **१३५.४१** |

**३६.५ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

रु.९५.८४ कोटीबाबत खालीलप्रमाणे भाष्य करण्यात येत आहे.

१) राजीव गांधी निवारा प्रकल्पासाठी प्राप्त निधी रुपये ४६.६८ कोटी

२) प्रादेशिक वहन रेल्वे, राजीव गांधी निवारा प्रकल्प प्राप्त निधी रुपये २.१७ कोटी

३) सार्वजनिक बांधकाम विभाग अंधेरी विभाग प्राप्त निधी रुपये २.७४ कोटी

४) आंतरदेशीय वाहनतळ रुपये ०.३६ कोटी

५) बुडीत ठेवी रुपये ०.२४

६) मालमत्ता विक्रीवरील निव्वळ नफा रुपये ०.१८ कोटी

७) न बांधण्यात आलेल्या प्रशासकीय इमारती रुपये ०.०३ कोटी

८) झोपडपट्टी निर्मूलन योजना रुपये १०.२८ कोटी

९) शासनाकडून अंशदानित एसआरडी योजना रुपये १७.७६ कोटी

१०) शासनाकडून अंशदान रुपये ५.३१ कोटी

११) आयआयसी रुपये १०.०९ कोटी

वरील अनुक्रमांक १ ते ४ चा भांडवली निधी हा राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाला असल्याने वळती झालेला आहे. राजीव गांधी निवारा प्रकल्पाचा एकूण खर्च रक्कम रु.७५.२३

कोटी दिसून येतो. भांडवली निधीमधून रु.५१.९५ कोटी इतका प्रत्यक्ष खर्चापोटी राजीव गांधी निवारा प्रकल्प योजने अंतर्गत समायोजन नोंद क्रमांक २ नुसार सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजित करण्यात येत आहे.

अखर्चित अनुदान व निधी सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये प्रत्यक्षात खर्ची घातल्याचे समायोजन करुन त्याचा तपशील दर्शविण्यात येईल.

तसेच अनुक्रमांक ५ ते ७ मध्ये दिसणारी जमा रक्कम ही भांडवली जमा स्वरुपाची नसताना तशी दर्शविण्यात आली आहे. वास्तविक ही रक्कम जमा खर्च खात्यात दाखविणे आवश्यक होते. सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजन नोंद क्रमांक ३ नुसार आता रेषेच्या खाली दर्शविण्यात येत आहे.

इमारत, उभारणी व वाहने यांच्यावरील घसारा कमी आकारणी/आकरणी न केल्यामुळे घसारा राखीव रु.४.०२ लाखांनी कमी झाला.

**३६.६ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मु.झो.सु.मंडळ :-**

रु.३.८४ लक्ष एवढ्या कमी घसारा निधीचे आकारणी बाबतीत लेखापरीक्षकांनी आक्षेप घेतला असून या बाबतीत सादर करण्यात येते की चालू वर्षात आकारणी केलेला घसारा हा ज्या वस्तुवर घसारा आकारणी ही त्यांच्या किमतीपर्यंत झालेली आहे. अशा वस्तुवर घसारा आकारणी केली नसल्याने हा फरक दिसतो. लेखापरिक्षकांनी उपस्थित केलेल्या मुद्दयाप्रमाणे आता आवश्यक दुरुस्त्या करण्यात आल्या आहेत.

**३६.७ पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु.४.०२ लाखांपैकी रु.०.१८ लाख इतकी रक्कम ही पुणे मंडळाशी संबंधित आहे. सन २००६-०७ मध्ये समायोजन नोंद क्र.२३ अन्वये आवश्यक समायोजन केलेले आहे.

लेख्यामधील रकमा व दुय्यम नोंदवहीमधील रकमा यांचा ताळमेळ न घातल्यामुळे कंत्राटदारांकडून घेतलेली संरक्षक ठेव रु.२२.५४ लाखांनी वाढली. आमदार/विधान परिषद सदस्य यांच्या निधीतल्या ठेवी रु.१२.१७ कोटींने वाढल्या व कंत्राटदारांकडून आलेल्या ठेवी

रु.०.८६ लाखांनी वाढल्या संकीर्ण ठेव रु.१.५४ कोटींनी वाढली व लोक आवास योजनेखाली आलेली रक्कम, उत्पन्न या खाती जमा करण्याऐवजी अग्रीम या खाती खर्ची टाकल्यामुळे रु.९.७५ लाखांनी वाढली.

**३६.८ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**वित्त नियंत्रक/प्रा. :-**

**रु.१५१.०३ लाख**

वित्त नियंत्रक/प्राधिकरणाचे लेख्यामध्ये असलेली रक्कम रु.१.५१ कोटी रक्कम संकीर्ण ठेव म्हणून जमा होती त्याचे सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजन नोंद क्र.६८ अन्वये समायोजित करण्यात आली आहे.

**रु.२.३७ लाख**

या रकमेचे शोध घेण्यात येत असून त्याबाबतचे आवश्यक ते समायोजन सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात करण्यात येत आहे.

**२.१.४.५ :-**

उपयोगात न आणलेल्या रु.५५.२६ कोटी अनुदान-मदत या रकमेचा चालू दायित्वामध्ये समावेश न करता ठेव या खाली समावेश केल्यामुळे ठेव वाढली.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**वित्त नियंत्रक/प्रा. :-**

**रु.५५२५.६७ लाख**

शासनाकडून प्राप्त झालेले सहाय्यक जे अखर्चित आहेत असे सहाय्य चालू असलेल्या योजनांवर वापरण्यात येते. सदर निधी खर्च न झाल्यामुळे ठेव सदराखाली ठेवण्यात आलेला आहे. तथापि लेखा परिक्षकांच्या आक्षेपानुसार सदर चालू मत्ता व दायित्वाचे प्रपत्रात सन २०१०-११ मध्ये समाविष्ट करण्यात येत आहे. त्यामुळे तक्त्यात रकमा फुगून दिसणार नाहीत.

भाडे खरेदी योजनेखाली विकल्या गेलेल्या गाळ्यांचा हप्त्याच्या वसुलीचा कालावधी संपून गेलेला असून देखील विक्रीची जमा, तसेच गाळ्यांची इसारा ठेवीची रक्कम, गाळे वितरीत केल्यानंतर सुध्दा समायोजित न केल्यामुळे अशी एकूण रु.२.९९ कोटी ही रक्कम ठेव या शिर्षाखाली दाखविल्यामुळे दायित्व त्या प्रमाणात वाढले.

**३६.९ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**अमरावती मंडळ :- रु.५८.१२ लाख आणि रु.२४१.१४ लाख**

१. रक्कम रु.५८,११,८०८/- ही गाळेधारकाकडून सुरक्षा अनामत म्हणून प्राप्त झालेली आहे. लाभधारकांचा परतफेडीचा कालावधी संपल्यानंतर व मंडळाची सर्व देणी प्राप्त झाल्यानंतर संबंधित लाभधारकास ही रक्कम परत केली आहे. त्याचा वर्षनिहाय तपशील खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|
| २००४-०५ | ८२,१६६/- |
| २००५-०६ | २५,९००/- |
| २००६-०७ | १,१५,३४२/- |
| २००७-०८ | ३,५६,१३६/- |
| २००८-०९ | ३,६१,२१६/- |
| २००९-१० | १,७५,२६५/- |
| **एकूण** | **५८,११,८०८/-** |

२. इसारा अनामत रक्कम रु.२,४१,१३,६७९/- ही अर्जासोबत स्विकारलेली रक्कम असून अर्जदाराचा अर्ज सोडतीत अयशस्वी झालेल्या अर्जदाराच्या मागणीनुसार परत करण्यात येते अशा परत केलेल्या रकमेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | रक्कम रुपये |
|---|---|
| २००४-०५ | १६,४९,७१६/- |
| २००५-०६ | १२,६६,५२५/- |
| २००६-०७ | २२,४०,३३५/- |
| २००७-०८ | ७,४२,६५५/- |
| २००८-०९ | २९,१०,३१०/- |
| २००९-१० | ४४,४८,६४०/- |
| **एकूण** | **२,४१,१३,६७९/-** |

भाडे खरेदी विक्री योजनेखाली आलेली प्रारंभिक ठे व मासिक हप्त्याच्या जमेचे चुकीचे वर्गीकरण व चुकीचे संविभाजन झाल्यामुळे या रकमा रु.१.५४ कोटीने कमी झाल्या.

**३६.१० विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

**रु.१.३२ कोटी**

सदरहू रक्कम २००५-०६ पूर्वीची लाभधारकांकडून मागणी नसलेली शिल्लक संकीर्ण ठेव रक्कम असून रोडमॅपमध्ये दिलेल्या सूचनेप्रमाणे रक्कम जप्त करण्यात येवून प्राधिकरणाच्या महसूलात प्रमाणक क्रमांक १९ ते २२ अन्वये सन २००८-०९ च्या लेख्यात समायोजन केलेले आहे.

सन २००२-२००३ च्या वार्षिक लेखापरीक्षण अहवालामध्ये भाष्य करुनसुद्धा मुलभूत दस्तऐवज उपलब्ध नसणे अथवा अपुरा असणे, यामुळे ज्या रक्कमांची तपासणी करता आली नाही त्या रक्कमा दिनांक ३१.०३.२००३ अखेर रु.३९८.७३ कोटी वरुन दिनांक ३१.०३.२००४ रोजी रु.४३१.१६ कोटी पर्यंत वाढल्या. त्यांचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| | | | **रुपये कोटीमध्ये** |
|---|---|---|---|
| **अ.क्र.** | **ठेवी** | **३१.०३.२००३ अखेर** | **३१.०३.२००४ अखेर** |
| १) | जागेच्या वितरणासंबंधी पैसे | --- | ०.८३ |
| २) | गाळेधारकांकडून ठेवी | ६४.९२ | ३५.६० |
| ३) | कंत्राटदारांकडून ठेवी | ६.६१ | ७.५८ |
| ४) | भाडे खरेदी योजनेखाली आयडीपी/ एमआय | १६२.६२ | १९१.८९ |
| ५) | गाळेधारकांकडून/भावी खरीददार यांच्याकडून ठेवी | २०.९८ | ५७.२४ |
| ६) | इएमआय/एलआयएसपी खाली ठेव | ०.९६ | २.८१ |
| ७) | संकीर्ण ठेवी | ११३.२३ | ३०.७० |
| ८) | इतर ठेवी | --- | ०.१२ |
| ९) | राजीव गांधी निवारा प्रकल्प/दुरुस्ती | ०.२६ | १९.२५ |

| | | | |
|---|---|---|---|
| | मंडळ यांच्याकडील ठेवी | | |
| १०) | आगाऊ अंशदान योजना | --- | ०.१२ |
| ११) | खासदार/आमदार ठेवी | २२.१३ | ८४.९९ |
| १२) | कंत्राटदारांकडून आलेली इसारा रक्कम | --- | ०.०२ |
| १३) | कंत्राटदारांकडून आलेल्या ठेवी | २.४२ | --- |
| १४) | करावयाचे काम | ४.६० | --- |
| | **एकूण** | **३९८.७३** | **४३१.१६** |

**३६.११ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**औरंगाबाद मंडळ :-**

याबाबत सादर करण्यात येते की, प्राधिकरणाच्या एकूण ठेव रक्कम रु.४३१.१६ कोटीपैकी मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ यांच्या कार्यालय संबंधित फक्त रु.२६.८० कोटी होती. आता मिळकत व्यवस्थापक/औरंगाबाद मंडळ यांच्या कार्यालयातर्फे सर्व प्रकारच्या ठेव नोंदवह्या अद्यावत केल्या असून ३१ मार्च २०१० अखेर खालीलप्रमाणे शिल्लक आहे.

| अ.क्र. | नोंदवहीचे विवरण | शिल्लक ठेव रक्कम रु. |
|---|---|---|
| १) | अर्जदाराची ठेव नोंदवही | ५,५९,९०,०२०/- |
| २) | गाळेधारकाकडून प्रारंभीची रक्कम ठेव नोंदवही (IDP) | ५९,११,३५,६०३/- |
| ३) | कायम अनामत ठेव नोंदवही | ०० |
| ४) | किरकोळ ठेव नोंदवही | ५३,०४,०१३/- |
| | **एकूण** | **१२,०४,२९,६३६/-** |

वरीलप्रमाणे ठेव नोंदवह्या अद्यावत असून लेखा परिक्षण पथकास पुढील लेखापरिक्षणाच्या वेळी दाखविण्यात येतील.

**३६.१२ मु.झो.सु.मंडळ :-**

रक्कम रु.३.२८ कोटी ही सुरक्षा अनामत रक्कम ही झोपडपट्टी सुधार मंडळाशी संबंधित असून या रकमेचा ताळमेळ करण्यात आला असून मागणी न केलेली रक्कम तीन वर्षापूर्वीची असल्यामुळे सदरहू रक्कम रु.१,४०,९५,८६२/- जप्त करुन सन २००८-०९ च्या

लेख्यात प्रमाणक क्रमांक ८०, ८२, ९०, ९१ अन्वये महसूलात वळती करण्यात आली आहे तसेच रक्कम रु.१६,८१,४६७/- ही रक्कम सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यात प्रमाणक क्रमांक २६, २७ आणि ३० अन्वये महसूलात वळती करण्यात आली आहे. सध्या वर्षनिहाय सुरक्षा अनामत रकमेच्या नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या असून या नोंदवह्या सन २००८-०९ च्या लेखा परिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आल्या आहेत.

रक्कम रु.२.६५ कोटी ही संकीर्ण अनामत असून मागणी नसलेली रक्कम रु.१,४२,५६,१२७/- ही जप्त करुन प्राधिकरणाच्या महसूलात प्रमाणक क्रमांक ६९, ८७, ८९, ९० आणि ९१ अन्वये सन २००८-०९ च्या लेख्यात तसेच रक्कम रु.४७,४९,०९२/- व रु.९५,०७,०३५/- ही सन २००९-१० च्या लेख्यात प्रमाणक क्रमांक २४, २५, २७, ३४, ४२ आणि ४४ अन्वये समायोजित करण्यात आली असून आता ठेव नोंदवही लेख्याशी जुळत आहे.

रक्कम रु.८४.९१ कोटी ही आमदार विधान परिषद सदस्य यांच्या प्राप्त निधीची असून रु.४४.६० कोटी खासदार निधीची आहे. रु.३७.९० आणि २.४१ कोटी या रकमेच्या नोंदवह्याच्या ताळमेळाचे काम प्रगतीपथावर असून सन २०१०-११ पर्यंत नोंदवह्या अद्यावत करुन लेखा परिक्षकास दाखविण्यात येत आहेत.

**मुंबई मंडळ :-**

**रु.०.८३ कोटी भाडेकरुंची अनामत रक्कम**

**रु.६.८२ कोटी अर्जदारांची अनामत रक्कम**

**रु.२.४५ कोटी भाडेकरुंचे भाग भांडवल**

**रु.५७.२४ कोटी गाळेधारकांची अनामत रक्कम**

**रु.०.०२ कोटी आमदार निधी**

याबाबत रोडमॅपमध्ये सुचविल्यानुसार ठेकेदार व लाभधारक यांच्याकडून सन २००५-०६ पूर्वीच्या मागणी न केलेल्या रकमा जप्त करुन प्रमाणक क्रमांक १९ ते २२ अन्वये मंडळाच्या महसूलात वळती करण्यात आलेल्या आहेत.

**वित्त नियंत्रक प्राधिकरण रु.३२५.४५ लाख :-**

सन १९९८-९९ मध्ये राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाल्यामुळे सदर प्रकल्पांतर्गत संकीर्ण अनामत रु.३२५.४५ लाख प्रकल्पाने वर्ग केले होते. त्यासाठी कोणाकडूनही मागणी न

आल्यामुळे दि.३१.०३.२०१० रोजी शिल्लक असलेली रक्कम प्रमाणक क्रमांक ६४ दि.३१.१०.२०१० अन्वये म्हाडाचे महसूलात वर्ग केली आहे.

**वित्त नियंत्रक प्राधिकरण रु.१.६९ लाख :-**

लेखा विषयक राडमॅपमध्ये घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे सन २००६-०७ या आर्थिक वर्षापासून प्रारंभिक अनामत रक्कम नोंदवही तयार करण्यात आलेली आहे व ती अद्यावत आहे. मूळ दस्तऐवज आता लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

**कोकण मंडळ :-**

१) सन १९९५-९६ च्या लेख्यात संकीर्ण ठेवमध्ये रु.११.५२ ची विसंगती दिसून येत आहे. (वार्षिक लेख्याप्रमाणे रु.६५,९६,०५८/- व रजिस्टरप्रमाणे रु.५४,४४,०५८/-) ठेव नोंदवही तयार करण्यात आली आहे व मासिक लेख्याशी जुळत आहे. दप्तर तपासणीकरिता उपलब्ध आहे.

२) सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६० अंतर्गत मार्च २००४ पर्यंतची गाळेधारकाकडून घेतलेली ठेव रक्कम रु.२,०२,७७,०७३/- ही भाडे खरेदी रक्कमे अंतर्गत समायोजित करण्यात आली आहे.

३) मार्च २००४ च्या अखेरपर्यंत लेख्यामध्ये रु.३,४५,८७,७७५/- इतकी गाळेधारकांची अनामत रक्कम दर्शविली आहे. वि.नि./प्रा. यांचे क्र. १२९८, दि.२९.०५.२००९ च्या पत्रानुसार दि.३१.०३.२००६ पर्यंतची थकबाकी जोडपत्र 'बी'मध्ये सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात दाखविण्यात आली आहे व सदर थकबाकी प्रमाणक क्रमांक १३ दि.३१.१०.२०१० अन्वये व्यपगत करुन समायोजित केली आहे.

४) माहे मार्च २००४ अखेरपर्यंत सुरक्षा ठेव रक्कम रु.११,७३,५३०/- ही कमी थकबाकी दाखविण्यात आली होती. वि.नि./प्रा. यांचे पत्र क्र. १२९८, दि.२९.०५.२००९ नुसार दि.३१.०३.२००९ पर्यंतची थकबाकी जोडपत्र 'बी'मध्ये सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात दर्शविण्यात आली आहे व सदर रक्कम व्यपगत करुन प्रमाणक क्रमांक २१ दि.३१.१०.२०१० अन्वये समायोजित करण्यात आली आहे.

५) एक रक्कमी योजनेअंतर्गतची रक्कम रु.१,११,११,०७३/- ही जे.व्ही.क्र.३५ अंतर्गत वार्षिक लेखा २००३-०४ मध्ये विक्री खात्यात वळती करण्यात आली आहे. तपासणीकरिता उपलब्ध आहे.

६) विविध लेखा शिर्षाखालील अनामत रकमेतून रु.१,४१,५७,७९३/- भाडे खरेदी हप्ता रक्कम रु.८,३०,०००/-, एस सी एस योजना रु.१३,४०,०००/-, प्रारंभिक अनामत रक्कम रु.२,४०,७२०/- हे विक्री किंमतीमध्ये प्रमाणक क्रमांक ३४, ३५ आणि ३६ अन्वये सन २००३-०४ च्या लेख्यात वर्ग केले आहेत. त्याचा तपशील लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहे. रु.२,८१,३०,९८२/- ही रक्कम इ आय एम हप्त्याची शिल्लक दर्शविते. घर सुधारणा कर्जाची दि.३१.०३.२००४ च्या परताव्याची रक्कम विजया बँक ठाणे येथे भरणा केली. ही रक्कम लेखा शिर्ष ७७५ एल आय एस पी येथे जमा दाखविली. बँकेत जमा होणारी रक्कम बँकेकडून मुख्य लेखा अधिकारी कोकण मंडळ यांचेकडे नियमित तपशीलासह जमा केली जाते व सदर तपशील तपासणीसाठी उपलब्ध आहे.

७) जे.व्ही.क्र.३४ अंतर्गत सन २००३-०४ ची आगाऊ अंशदान योजने अंतर्गतची रक्कम रु.१३,४०,०००/- जमा खात्यातून विक्री खात्यात (अनुसूची-२०) वळती करण्यात आली आहे. तपासणीकरिता दप्तर उपलब्ध आहे.

८) मार्च २००४ अखेरपर्यंत रु.२,८९,८४,९३३/- एवढी रक्कम संकीर्ण जमामध्ये दिसून येत असलेली वि.नि./प्रा. यांचे पत्र क्र. १२९८, दि.२९.०५.२००९ नुसार दि.३१.०३.२००६ पर्यंतची थकबाकी पुढील वार्षिक लेखा समायोजन / रद्द करण्यात येईल.

विक्री, नगरपालिका कर, जलआकर, टेकू लावण्याचा आकार, जमिनीची किंमत, परवाना आकार, असे गेल्या वर्षीचे दायित्व बुडीत म्हणून घोषित न केल्यान चालू दायित्व रु.५.३७ कोटींनी वाढले.

**३६.१३ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-** रु. ३४१ कोटी/रु.१.१४ कोटी/रु.०.११ कोटी व /रु०.६० कोटी.

रुपये ३.४१ कोटी ही रक्कम प्रमाणक क्रमांक ९ अन्वये खरेदीपोटी समायोजीत केली असून सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजीत होईल.

मालमत्ता :- मालमत्ता रुपये ३०.५१ कोटीनी कमी दाखविण्यात आली (रुपये १२.२१ कोटीनी जादा व रुपये ४२.७२ कोटीनी कमी) अपुरा दस्तऐवज व पुराव्या बरोबरच्या सूचीमधील विसंगती यामुळे स्थावर मालमत्ता व चालू मालमत्ता यांची अंतर्गत शिल्लक पडताळून पाहता येत नाही. स्थावर मालमत्ता व चालू मालमत्ता यांच्या नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या नाहीत. त्याचप्रमाणे वार्षिक प्रत्यक्ष तपासणी करण्यात आलेली नाही. विविध कारणांसाठी पुरवठादार, ठेकेदार, कर्मचारी यांनी दिलेली कर्जे, अग्रम यांची वसुली/समायोजन झालेली नाही. सविस्तर तपशिल उपलब्ध नसल्यामुळे किरकोळ ऋृणको अंतर्गत किंवा अनेक बाबींची शिल्लक पडताळून पाहता येत नाही. देय रक्कमेचे वर्गीकरण चांगले, शंकास्पद किंवा बुडीत ऋृणको अशा प्रकारे करण्याची पध्दत नाही. लेख्यामध्ये एकंदर रुपये ३४.८३ कोटी रकमेचे चुकीचे वर्गीकरण/विसंगती आहे. पाठविलेल्या पैशाखाली व्यवहार दाखवून अंतिम जमा/उणे रक्कमा अंतिम लेखाशिर्षाखाली दाखविण्यात येऊन मुक्त करावयास पाहिजे होत्या. प्राधिकरण व प्राधिाआकरणंतर्गत मंडळे यांना पाठविलेल्यापैशाचे लेखाशिर्ष मुक्त करणे जमलेले नाही. त्याचप्रमाणे पाठविलेल्या पैशाखालील व्यवहार विव्वळ रक्कमा म्हणून दाखविण्यात आल्या आहेत. त्यामुळे दायित्व व मालमत्ता यांचे चित्रण दिशाभुल करणारे झाले आहे. पाठविलेल्या पैशाखाली लेख्यामध्ये उणे शिल्लक रुपये ८९.८५ कोटी नोंदिवलेली आहे. यामुळे एकुण जमा रक्कम शिल्लक रुपये ४१०६.९५ कोटी व उणे शिल्लक रुपये ४०१७.१० कोटी दिसते, त्याचा तपशिल सहपत्र दोन मध्ये दिला आहे. अग्रीमाची नोंदवही, ऋृणकोची सुची, तसेच बांधकामाची परिशिष्टे इत्यादी मुलभूत बाबींचे दस्तऐवज उपलब्ध नसल्याने रुपये ६३६.८२ कोटींचा खर्च तपासता आला नाही.

**३६.१४ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

लोक लेखा समितीच्या निर्देशास अनुसरुन घालून दिलेल्या रोड मॅप मधील बंधनाप्रमाणे मालमत्तेचे मुल्यांकन तसेच अतिरिक्त घरासा आकारणीचे समायोजन करण्याचे काम म्हाडाचे सनदी लेखापाल मे संघवी आणि कंपनी यांचेकडे सोपविले होते. त्यानुसार मालमत्तेचे प्रत्यक्ष मुल्यांकन त्यांनी केले आणि अतिरिक्त मुल्यांकन सन २००८-०९ चे वार्षिक लेख्यातुन काढून टाकले जेणे करुन दिनांक ३१/३/२००९ रोजी प्रत्यक्ष मालमत्तेची शिल्लक लेखा पुस्तकात

राखून ठेवणे रोडमॅप मधील मुद्दाक्रमांक ३ प्रमाणे आवश्यकत्या वेळी संबंधीत विभागाला विहित नमुन्यात स्थाई मालमत्तेची नोंदवही ठेवण्याच्या सुचना दिलेल्या आहेत.

लेख्यामध्ये दाखविलेल्या बँकेमधील अल्प मुदतीच्या ठेवी व गुंतवणूक नोंदवही यामधील रकमांमध्ये रु.७.६८ कोटीचा फरक आहे.

**३६.१५ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**वित्त नियंत्रक/प्रा. :-**

**रुपये ७६७.९८ लाख**

वार्षिक लेख्यामध्ये दिसणारी रक्कम रुपये ७६७.९८ लाख ही अल्प मुदतठेवीची रक्कम असून त्याची पडताळणी करण्या आली असून आता या रकमा गुंतवणूक नोंद वहीच्या रकमांशी जुळत आहे व त्याप्रमाणे कोणताही फरक दिसून येत नाही.

उत्पन्न

विक्री (गृहनिर्माण) रुपये २६५.४१ कोटी (अनुसूची-२०)

जमिनीच्या तुकड्यांची विक्री केल्यामुळे जमा झालेले रु.४५.६७ कोटी रकमेचे उत्पन्न प्राथमिक एस्तऐवज मध्ये तपासणीसाठी सहजपणे उपलब्ध झाले नाही.

**३६.१६ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :-**

मुंबई मंडळाशी संबंधीत रक्कम रुपये ३२.७४ कोटी एवढी असून ही रक्कम लाभधारकाकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम असून लेख्यात मासिक लेख्याद्वारे आलेली आहे. ही रक्कम

वार्षिक लेख्यातील प्रपत्र २० मध्ये समाविष्ट असून त्याचा सविस्तर तपशील पडताळणीसाठी उपलब्ध आहे.

**३६.१७ पुणे मंडळ :-**

एकूण रक्कम रु.४५६६.६४ लाखांपैकी रु.१२९२.७२ लाख इतकी रक्कम पुणे मंडळाशी संबंधित आहे. ही रक्क्म सन २००३-०४ मध्ये गाळे विक्रीचे ठेवीमधून विक्रीमध्ये समायोजन केल्याबाबतची आहे. रु.१२९२.७२ लाख इतक्या रक्कमेच्या समायोजनाबाबतचे सर्व सविस्तर विवरण असणारे तक्ते पडताळणीसाठी उपलब्ध आहेत.

बृहन्मुंबईतील मोडकळीस आलेल्या इमारतीच्या दुरुस्तीखाली मिळालेल्या निधीचे दुरुस्त मंडळाकडे हस्तांतरण रु.६०.७१ कोटी

अजुन पर्यंत न मिळालेल्या मालमत्तेच्या विक्रीबाबत नोंदी घेतल्यामुळे दु.व पु.मंडळाचा महसूल रु.३०.४२ कोटींनी वाढला.

**३६.१८ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**दु.व पु.मंडळ :-**

रुपये ३०,४२,००,०००/- ही वांद्रे पूर्व येथील प्रकल्पा अंतर्गत खाजगी विकासकाकडून विक्री उत्पन्नाची घेणे रक्कम म्हणून दर्शविली होती. तथापी याचा तपशिल तपासला असता ही रक्कम चुकीने समायोजीत झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजन नोंद क्रमांक ७ अन्वये महसूली अधिक्यात खर्ची टाकून यणे रकमेत समायोजीत करण्यात आली आहे.

प्रशासकीय खर्चाच्या रु.७०.१० लाखा वरील जादा भांडवली खर्चामुळे जमा त्या प्रमाणात वाढली.

**३६.१९ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**दु.व पु.मंडळ :-**

आस्थापना खर्चाच्या जातीच्या भांडवलीकरणाची रक्कम रु.७०,०९,७७५/- वित्त नियंत्रक/प्राधिकरण यांच्या निर्देशानुसार बांधकामावर प्रत्यक्षा झालेल्या खर्चाच्या १० टक्के आस्थापना आकाराची रक्कम असून वार्षिक लेख्यात दर्शविलेली रक्कम बरोबर आहे.

## ३७. सर्वसाधारण

### ३७.१ मूळ दस्तऐवज न ठेवणे/अपुरा ठेवणे

मंडळे व त्यांच्या अंतर्गत कार्यालयातील मूळ दस्तऐवज ठेवलेले नाहीत अथवा अद्ययावत ठेवलेले नाहीत. जसे की ठेव नोंद वह्या भाडेकिर्द, अग्रीम नोंदवह्या, स्थावर मालमत्ता नोंदवह्या इत्यादी मूळ दस्तऐवज न ठेवल्यामुळे/अपूर्ण असल्यामुळे ताळेबंदामधील विविध बाबीच्या शिल्लकीचा अचूकपणा तपासता येऊ शकला नाही. या उणीवा जरी गेल्यावर्षी दाखवून देण्यात आल्या होत्या व असमाधानकारक स्थितीमध्ये सुधारणा करण्याविषयी विशेषत: शासनाच्या देखील निदर्शनास आणण्यात आले होते. तरी देखील चालू वर्षाच्या लेख्यामध्ये प्रत्यक्ष सुधारणा दिसून आली नाही. पुढे सन १९९८-९९ मध्ये राजीव गांधी निवारा प्रकल्प बंद झाल्यानंतर प्रकल्पाचा लेखा, वित्त नियंत्रक/प्राधिकारण, मुंबई मंडळ, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या लेख्यात, लेखापरिक्षणात नमूद केलेल्या विसंगती दूर न करताच समाविष्ट करण्यात आला. या विसंगती तसेच मूळ दस्तऐवज उपलब्ध नसणे आणि अचूक कार्यवाही न करणे यामुळे लेखा अविश्वसनीय आणि अपुरा आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**वित्त नियंत्रक/प्रा :-**

रोड मॅप मध्ये दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सर्व पुरक नोंदवह्या मंडळातर्फे ठेवण्यातयेत आहेत व नोंदवह्यातील तफावतीचा मेळ घालण्याचे काम प्रगतीपथावर आहे. सदर काम लवकरात लवकर पूर्ण करुन आवश्यकत्या समायोजन नोंदी २०१०-११ च्या लेख्यात घेण्यात येत आहेत.

### ३७.२ स्थावर मालमत्तेची प्रत्यक्ष पडताळणी :-

स्थावर मालमत्तेच्या नोंदवह्या/दस्तऐवज पडताळणीसाठी उपलब्ध नसल्याने मालमत्तेचा अचूकपणा पडताळून पहाता आला नाही. विभागाने देखील प्रत्यक्ष पडताळणीचे कोणतेही प्रमाणपत्र सादर केलेले नाही.

प्राधिकरणाने असे सांगितले की (एप्रिल २००६) औरंगाबाद मंडळ आणि अमरावती मंडळाच्या बाबतीत प्रत्यक्ष पडताळणी करण्यात आलेली आहे. इतर मंडळाच्या बाबतीत उत्तराची प्रतिक्षा करण्यांत येत आहे.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**वित्त नियंत्रक/प्रा :-**

आता मालमत्ता नोंदवह्या अद्यावत करण्यात आल्या असून मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी करुन तसे तपासणी प्रमाणपत्र २००८-०९ च्या वार्षिक लेख्या सोबत जोडण्यात आले आहे.

**३७.३ बँक ताळमेळातील वाढ तसेच विसंगती घालविण्याकरीता कार्यवाही न करणे :-** मुंबई मंडळाचे माहे एप्रिल २००३ ते मार्च २००४ या कालावधीमधील ४१ बँकेच्या बँक ताळमेळाचे काम प्रलंबित आहे. ज्या प्रकरणात बँक ताळमेळाचे काम झालेले आहे त्याबाबतची विसंगती दूर करण्याबाबत कार्यवाही करण्यात आलेली नाही. त्यामुळे अनियमितता, अफरातफर तसेच तपास न लागण्याची शक्यता नाकारता येत नाही.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**वित्त नियंत्रक/प्रा :-**

सर्व मंडळाचे बँक ताळमेळाचे काम आता अद्यावत आहे. ताळमेळात निदर्शनास आलेल्या फरकाचे बँकेबरोबर पाठपुरावा करुन निराकरण त्वरीत करण्याच्या सुचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

**३७.४ अंतर्गत नियंत्रण :-** लेखा आणि प्राथमिक दुय्यम दस्तऐवजच्या बाबतीत प्राधिकरणाने परिणामकारक/पुरेसे अंतर्गत नियंत्रण विकसीत केलेले नाही. अहवालात अंतर्गत नियंत्रणाबद्दल व लेखापरिक्षण खर्चाबद्दल नमुद केलेला कमकुवतपणा/अनियमितपणा प्राधिकरणात/ मंडळात चालूच आहे.

**अंतर्गत लेखा परिक्षण पथक निर्माण करण्यास परवानगी घेण्यासाठी आवश्यकतो प्रस्ताव सचिव प्राधिकरण यांनी दिनांक २३/७/२००९ च्या पत्रा अन्वये शासनास मंजूरीस्त सादर केला असून त्यास मंजूरी प्राप्त होताच अशा पथकाची निर्मिती करुन त्यांच्याकडून अंतर्गत लेखा परिक्षण करुन घेण्यात येईल.**

**३८. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण सन २००४-२००५ च्या लेख्यावरील लेखापरिक्षण अहवाल**

सन २००३-२००४ च्या लेखा परिक्षण अहवालात नमुद करुनही गृहनिर्माण व दुरुस्ती अंतर्गत संरचनात्मक दुरुस्ती पोटी कमाल मर्यादेपेक्षा झालेल्या अधिकच्या खर्चापोटी गाळेधारकांकडून घेण्यात आलेली भाग भांडवला पोटीची रक्कम रुपये २.४६ कोटी नी अधिक दाखविली आहे. सदर रक्कम समायोजित करण्यांत आलेली नाही.

**३८.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :- रुपये २.४५ कोटी**

को.ऑ.हौसिंग सोसायटी आणि म्हाडा यांचे मधील सामंजस्य करारा नुसार गाळ्यांचे दुरुस्ती ही संबंधीतांना कर्ज देवून व पर्यवेक्षिय खर्च वसूल करुन करावे असे अपेक्षित होते. संबंधीत गाळे धारकांकडून वसूल झालेली कर्जाची वसूली ही दुरुस्ती मवरील प्रत्यक्ष खर्चामध्ये समायोजित करण्या ऐवजी चूकीने ठेव खात्यामध्ये दर्शविण्यात आलेली होती.

त्यामुळे परिच्छेद दर्शविल्या नुसार परिशिष्ठ २२ मध्ये दर्शविलेली रुपये २.४५ कोटीची रक्कम ही समायोजन नोंद क्रमांक ८ नुसार विशेष दुरुस्ती वरील खर्च मध्ये समायोजित करण्यात आलेली आहे.

**२.१.३.७ :-** मूळ अभिलेख्यात दाखविण्यात आलेली कंत्राटदारांकडून जमा अनामत रक्कम व लेख्यात दर्शविलेली अनामत रक्कम यात रुपये ४४.५३ लाख रुपयांची तफावत आहे. त्यामुळे तेवढ्या रक्कमेने कंत्राटदारांकडून अनामत रक्कमा या सदराखालील रक्कम रुपये ४४.५३ लाखांनी लेख्यात कमी दिसते.

**३८.२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :- रुपये ४४.५३ लक्ष**

वित्त नियंत्रक/प्रा. यांचे पत्र क्रमांक १२९८ दि.०५/०९ नुसार दि.३१.३.२००६ रोजी पर्यंत ठेकेदारांकडून प्राप्त झालेली सूरक्षा अनामत रक्कम, इतर ठेवी या समायोजन नोंद क्रमांक २० व २१ दि.३१.१०.२०१० नुसार समायोजित करण्यात आल्या असून त्या व्यपगत करण्यात आलेल्या आहेत. व संबंधीत नोंद वह्या या लेखा परिक्षणासाठी उपलब्ध आहे.

**२.१.३.८ :-** सन २००३-०४ च्या लेखा परिक्षणात निदर्शनास आणूनही रुपये १७५.५६ कोटी रुपयांचा तपशील तपासणीस प्राप्त झाला नाही.

तपशिल खालील प्रमाणे

| **रुपये कोटीमध्ये** | | | |
|---|---|---|---|
| अ.क्र. | ठेवी | ३१/३/२००४ रोजी | ३१/३/२००५ रोजी |
| १ | भावी खरेदीदाराकडून अनामत रक्कम | ५७.२४ | ८२.९२ |
| २ | भाडे खरेदी योजने अंतर्गत प्रारंभिक जमा | -- | २१.२३ |
| ३ | लाभधारकांकडून प्रारंभिक वसुली योग्य हप्ता | १९१.८९ | ०.१५ |
| ४ | भाडे खरेदी योजने अंतर्गत मासिक हप्ता | -- | १५.९७ |
| ५ | आगाऊ अंशदान योजना | ०.१३ | १०.२४ |
| ६ | किरकोळ | -- | ९.४९ |
| ७ | मासिक हप्ते एल.आय.एस.पी. | २.८१ | -- |
| ८ | गाळेधारकांकडून टेनन्सी डिपॉझिट | ०.८३ | ५.१३ |
| ९ | गाळेधारकांकडून इसारा अनामत | ३५.६० | ५.७९ |
| १० | कंत्राटदाराकडून अनामत | ७.५८ | -- |
| ११ | कंत्राटदाराकडून इसारा अनामत | ०.०२ | १.९९ |
| १२ | कंत्राटदारांकडून सुरक्षा अनामत | -- | ३.६५ |
| १३ | कंत्राटदारांकडून इतर अनामत | -- | ०.२० |
| १४ | कामे करण्यासाठी अनामत रक्कम | -- | १.०५ |
| १५ | किरकोळ अनामत | ३०.७० | १३.३४ |
| १६ | संरचनात्मक दुरुस्ती पोटी कमाल मर्यादेपेक्षा अधिकच्या खर्चापोटी गाळेधारकांकडून घेण्यात आलेले भाग भांडवल | -- | ४.४१ |
| १७ | इतर अनामत रक्कमा | ०.१२ | -- |
| १८ | राजीव गांधी निवारा प्रकल्पा अंतगत अनामत रक्कम | १९.२५ | -- |

| | | | |
|---|---|---|---|
| १९ | खासदार/आमदार निधी | ८४.९९ | -- |
| | **एकूण** | **४३१.१६** | **१७५.५६** |

**३८.३ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**औरंगाबाद मंडळ :- रुपये ८३०.६९ लक्ष, रु.११४४.०४ लक्ष, रु.१२५.८८ लक्ष, रुपये ३०६.९६ लक्ष, रु. १६१.८७ लक्ष, रुपये ३१९.९७ लक्ष**

वसुल झालेली प्रारंभीची रक्कम रु.८३०.६९ लाख ठेवी या लेखा शिर्षाखाली दर्शविण्यात आली आहे. ज्या गाळ्याचा भाडे खरेदी हप्ता संपलेला आहे किंवा ज्याची पुर्ण किंमत वसूल झाली आहे अश्या रकमेचे या कार्यालयातर्फे नियमित समायोजन करण्यात येते.

सन २००४-०५, २००५-०६, २००६-०७ या वार्षिक लेखे मध्ये समायोजित करण्यात आलेल्या रकमेचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

| वर्ष | जे.व्ही.क्रमांक | विवरण | खर्च रकमा | विविरण | जमा रकमा |
|---|---|---|---|---|---|
| २००४-२००५ | ३२ | प्रारंभीची रक्कम | १०३५६८३२ | गाळ्यांची विक्री | १०३५६८३२ |
| | ६१ | प्रारंभीची रक्कम | १०१७७३३ | गाळ्यांची विक्री | १०१७७३३ |
| २००५-२००६ | ३८ | प्रारंभीची रक्कम | १०४००३२८ | गाळ्यांची विक्री | १०४००३२८ |
| | | प्रारंभीची रक्कम | १९८०३ | गाळ्यांची विक्री | १९८०३ |
| २००६-२००७ | ४१ | प्रारंभीची रक्कम | ३६०७००८२ | गाळ्यांची विक्री | ३६०७००८२ |

भाडे खरेदी हप्त्यातील भांडवली भागाची रक्कम रु.११४४.०९ लाख डिपॉजीट मध्ये ठेवण्यात आली होती. ज्या गाळ्यांचा भाडेखरेदी हप्ता संपलेला आहे किंवा ज्या गाळ्यांची संपूर्ण किंमत प्राप्त झालेली आहे अशा गाळ्यांच्या रक्कमेचे नियमीतपणे समायोजन या कार्यालयातर्फे करण्यात येते. आवश्यकती नोंद वही मिळकत व्यवस्थापक यांच्या कार्यालयात ठेवण्यात आलेली आहे.

सन २००४-०५, २००५-०६, २००६-०७ या वर्षाच्या वार्षीक लेखे मध्ये समायोजीत करण्यात आलेला रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे असून आता दि.३१/३/२००७ अखेर

शिल्लक असलेली रक्कम रु.१२३८.६८ लाख एवढी आहे.सन २००४-०५ आणि सन २००५-०६ मध्ये भाडेखरेदी योजने अंतर्गत मोठ्या प्रमाणात गाळ्यांचे वितरण झाल्यामुळे वाढ दिसत आहे.

| वर्ष | जे.व्ही.क्रमांक | विवरण | खर्च रकमा | विविरण | जमा रकमा |
|---|---|---|---|---|---|
| २००४-०५ | ३२ | भाडेखरेदी हप्ता | ४१३८७०३ | गाळ्यांची विक्री | ४१३८७०३ |
| | ६१ | भाडेखरेदी हप्ता | ९२२५८६७ | गाळ्यांची विक्री | ९२२५८६७ |
| २००५-०६ | ३८ | भाडेखरेदी हप्ता | ४२९७१६२ | गाळ्यांची विक्री | ४२९७१६२ |
| २००६-०७ | ४१ | भाडेखरेदी हप्ता | ३७६३३९८३ | गाळ्यांची विक्री | ३७६३३९८३ |

आगावू अंशदान योजने अंतर्गत प्राप्त झालेली रक्कम रु.१२५.८८ लाख गाळ्यांचे/भूखंडाचे संपूर्ण किंमत प्राप्त होई पर्यंत डिपॉझीट मध्ये ठेवण्यात येते. अंतीम वितरण झाल्यानंतर अश्या रक्कमांचे समायोजन या कार्यालयातर्फे नियमती पणे करण्यात येते.

सन २००४-०५, २००५-०६, २००६-०७ या वर्षाच्या वार्षीक लेखे मध्ये समायोजीत करण्यात आलेली रक्कमेचा तपशील खालीलप्रमाणे असून आता दि.३१/३/२००७ अखेर शिल्लक असलेली रक्कम रु.१६.४६ लाख एवढी आहे.

| वर्ष | जे.व्ही.क्रमांक | विवरण | खर्च रकमा | विविरण | जमा रकमा |
|---|---|---|---|---|---|
| २००४-०५ | ३३ | अग्रीम अंशदान | २७६५०००० | गाळ्यांची विक्री | २७६५०००० |
| | ५८ | अग्रीम अंशदान | ५४८७५६ | भूखंडाची विक्री | ५४८७५६ |
| | ५९ | अग्रीम अंशदान | २९९६७०० | गाळ्यांची उर्वरीत किंमत | २९९६७०० |
| | ६० | अग्रीम अंशदान | ७३५८०६७ | | ७३५८०६७ |
| २००५-०६ | ३१ | अग्रीम अंशदान | ४९८०६० | गाळ्यांची उर्वरीत किंमत | ४९३५६० |
| | | | | | ४५०० |
| २००६-०७ | ४२ | अग्रीम अंशदान | २७७९९५७ | गाळ्यांची विक्री | २७७९९५७ |
| | ४८ | अग्रीम | २६७९२०७ | गाळ्यांची | २६७९२०७ |

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | अंशदान | | विक्री | |

र्जदाराकडून अर्जा सोबत प्राप्त झालेली डिपॉझीट ची रक्कम रु.३०६.९६ लाख गाळ्यांचे/भूखंडाचे संपूर्ण किंमत प्राप्त होई पर्यंत डिपॉझीट मध्ये ठेवण्यात येते. अंतीम वितरण झाल्यानंतर अश्या रक्कमांचे समायोजन या कार्यालयातर्फे नियमती पणे करण्यात येते.

सन २००४-०५, २००५-०६, २००६-०७ या वर्षाच्या लेखे मध्ये समायोजीत करण्यात आलेली रक्कमेचा तपशील खालील प्रमाणे असून आता दि. ३१/३/२००७ अखेर शिल्लक असलेली रक्कम रु. ३०३.६४ लाख एवढी आहे. भाडे खरेदी योजनेंतर्गत मोठ्या प्रमाणात गाळ्याचे वितरण झाल्याने सन २००४-०५ व २००५-०६ मध्ये वाढ दिसून येते.

| वर्ष | जे.व्ही.क्रमांक | विवरण | खर्च रकमा | विविरण | जमा रकमा |
|---|---|---|---|---|---|
| २००४-०५ | ३२ | अर्जदाराची ठेव | २३२५९६६ | गाळ्यांची विक्री | २३२५९६६ |
| | ३३ | अर्जदाराची ठेव | २९९६७०० | गाळ्यांची विक्री | २९९६७०० |
| २००५-०६ | ३८ | अर्जदाराची ठेव | ३३५९२५० | गाळ्यांची विक्री | ३३५९२५० |
| | ३९ | अर्जदाराची ठेव | ६०५६६३ | गाळ्यांची विक्री | ६०५६६३ |
| | ४० | अर्जदाराची ठेव | १२७४५६८ | गाळ्यांची विक्री | १२७४५६८ |

गाळे वितरण करताना लाभार्थ्याकडून कायम अनामत रक्कमेपोटी रक्कम रु.१६१.८७ लाख प्राप्त झाली आणि सदर रक्कम संपूर्ण भाडे खरेदी हप्ते प्राप्त झाल्यानंतर किंवा गाळे धारकांनी उर्वरित गाळ्याची किंमत भरल्यानंतर परत करण्यात येते. योग्यती ठेव नोंद वही ठेवण्यात आली असून आता ३१/३/०७ अखेर शिल्लक १८७.४४ लक्ष एवढी आहे. भाडे खरेदी योजनेंतर्गत गाळ्यांचे मोठ्या प्रमाणात झालेल्या वितरणामुळे या लेखे मध्ये वाढ दिसून येते. गाळ्याची अंतीम किंमत लाभार्थ्यांकडून प्राप्त होताच ही रक्कम संबंधीत लाभार्थ्यांला परत करण्यात येते.

प्राधिकरणाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शनानुसार वॅम्बे योजनेच्या चालू लेखा देयकातून लेखा परिक्षकांनी निदेर्शीत केलली रक्कम रु.३१९.९७ ाख ही राष्ट्रीय

झोपडपट्टी विकास कार्यक्रम I योजनेतील देयकातून १० टक्के आणि ३ टक्के रोखून धरण्यात आलेली रक्कम आहे. सदर रक्कम काम पूर्णत्वाचे प्रमाणपत्र, तपासणी झालेली अंतीम देयकाच्या पतीसह नगरपालिका/महानगरपालिका कडून प्राप्त झाल्यानंतर परत करण्यात येते. तथापि, योग्य तो प्रतीसाद त्यांच्याकडून मिळत नाही. नगरपालिका/महानगरपालिकांशी हे कार्यालय सतत पाठपूरावा करीत आहे. काही नगरपालिका/महानगरपालिकांनी वरील बाबींची पूर्तता केल्यामुळे त्यांना रक्कम परत करण्यात आली आहे. परंतू पुरेसे सहकार्य मिळाले नाही. देयके ज्यावेळी होईल त्याच वेळी प्राप्त रक्कम परत करण्यात येईल. बॅम्बे कामाच्या कंत्राटदाराच्या देयकातून ३ टक्के रक्कम रोखून ठेवण्यात आलेली आहे. ही रक्कम प्राधिकरणाकडून मार्गदर्शन प्राप्त झाल्यानंतर, १.५ टक्के अंतीम देयकासोबत व उर्वरित १.५ टक्के काम पूर्ण झाल्यापासून ६ महिन्यानंतर परत करण्यात येईल. संबंधीत विभागातर्फे आवश्यकती ठेव नोंदवही ठेवण्यात आली असून लेखा परिक्षणाच्या वेळेस लेखा परिक्षकांच्या निदर्शनास आणली आहे.

## ३८.४ मुं.झो.सु.मंडळ :- रुपये ३.२४ कोटी

रुपये ३.२४ कोटी ही रक्कम संकीर्ण अनामत म्हणून मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाशी संबंधित आहे. या प्रकरणी सादर करणेत येते की संकीर्ण अनामत नोंदवहीचे ताळमेळाचे काम झालेले आहे. ३ वर्षापेक्षा जास्त कालावधीत मागणी न आलेली रक्कम रुपये १,४२,५६,१२७/- सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात प्रमाणक क्रं. २४,२५,२७,३४,४२ आणि ४४ अन्वये रुपये ९५,०७,०३५/- जप्त करुन म्हडाचे महसुलात जमा केलेल्या आहेत. आणि आता अनामत नोंदवही सन २००८-०९ व सन २००९-१० चे वार्षिक लेख्यातील रक्कमशी जुळती आहे.

## मुंबई मंडळ :-

| |
|---|
| रुपये ०.८३ कोटी गाळेधारकांकडील ठेवी. |
| रुपये ६.८२ कोटी अर्जदारांकडील ठेवी. |
| रुपये २.४५ कोटी गाळेधारकांचा हिस्सा. |
| रुपये ८२.९२ कोटी यशस्वी गाळेधारकांकडील ठेवी. |
| रुपये ०.०२ कोटी आमदार निधी |
| रुपये ५.५२ कोटी अर्नेस्ट मनी डिपोजिट आणि सूरक्षा ठेव. |

| |
|---|
| रुपये ९.४८ कोटीइतर ठेवी. |
| रुपये ०.९६ कोटी गाळेधारकांकडील ठेवी. |
| रुपये १.९९ कोटी अर्नेस्ट मनी डिपोजिट. |
| रुपये ३.६५ कोटी सूरक्षा ठेव. |

रोड मॅप धील निर्देशानुसार ठेकेदारानि अर्जदार यांचकडून प्राप्त झालेल्या ठेवी सन २००५-०६ च्या पर्यंतच्या ठेवी ज्या संबंधीतांनी मागणी न केल्यामुळे प्रलंबित आहे अशा सर्व ठेवी ह्या समायोजन नोंद क्रमांक १९,२०,२१,२२ नुसार व्यपगत करुन सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यांमध्ये जमा दर्शविण्यात आल्या आहेत.

शासनाकडून प्राप्त २.५५ कोटी रुपये झोपडपट्टी पुनर्वसनाच्या सार्वजनिक कामासाठी प्राप्त रक्कम करावयाच्या कामांकरिता अनामत म्हणून दाखविण्याऐवजी वाल्मिकी आंबेडकर योजना आणि झोपडपट्टी विकासाची कामे या शिर्षाखाली दाखविली गेली.

**३८.५ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :- रुपये २५५.०० लक्ष**

सन २००४-०५ मध्ये झोपडपट्टी पुनर्वसनाचे सार्वजनिक कामासाठी प्राप्त झालेले रु.२,५५,००,०००/- वाल्मिकी आंबेडकर योजना आणि झोपडपट्टी विकास कामे या शिर्षाखाली चुकीने दर्शविण्यात आली. चुकीचे वर्गीकरण दुरुस्त करुन वार्षिक लेखा सन २००६-०७ मध्ये समायोजन नोंद क्रमांक ३७ दि.३१.३.२००७ द्वारे पुर्वी दर्शविण्यात आलेल्या चुकीच्या लेखा शिर्षातून सदर रकमा काढून झोपडपट्टी पुनर्वसन सार्वजनिक कामे या लेखाशिर्षाखाली वेगळे दर्शविण्यात आले आहे.

लोक आवास योजनेअंतर्गत ५.९६ कोटी रुपये आणि झोपडपट्टी सुधार योजनेच्या कामांसाठी १.७३ कोटीची तरतुद असमर्थनीय आहे. परिणामत: रुपये ७.६९ कोटी रुपयांचे दायित्व फुगवून दिसते.

**३८.६ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नाशिक मंडळ :- रुपये ७.६९ कोटी**

चालू दायीत्वाच्या अंतर्गत न वापरात आलेली रक्कम ही नबंधीत कार्यक्रमासाठी सन २००२-०३ ते २००५-०६ साठी वापरण्यात आलेली आहे. शिवाय हे दायीत्व समायोजन नोंद क्रमांक २ नुसार खालील प्रमाणे समोयाजित केलेला आहे.

सन २००२-०३ रुपये (-) १४९,०७,३३२,००/-

सन २००३-०४ रुपये (-) ५०,९९५.००/-

सन २००४-०५ रुपये (+) ३३५,४१,०८/-

सन २००५-०६ रुपये (-) ७७८,६२,७०५.००/-

अंशदायी भविष्य निर्वाह निधीची कर्मचाऱ्यांची वर्गणी प्रत्यक्षात केलेल्या वसूली पेक्षा ६.६२ लाख रुपयांनी अधिक भरली गेली. याबाबतीत सन २००३-०४ च्या लेखा परिक्षण अहवालात भाष्य करुनही दुरुस्ती करण्यात आली नाही. त्यामुळे दायित्व रुपये ६.६२ लाखांनी कमी दाखविले गेले.

**३८.७ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :- रुपये ६.६२ लक्ष**

अंशदायी भविष्य निर्वाह निधीची रकमेमधील जमा आणि नावे मधील फरकाच्या रकमेची पउताळणी करुन आवश्यक त्याचा तपशिल कोषागार अधिकारी, नागपूर यांना निश्चितीकरीता सादर करण्यात आला. संपूर्ण रकमांची तपासणी करण्यात आली.

मुळ दस्तऐवज अथवा अपूर्ण कागदपत्र किंवा लेखा तपासणीसाठी नोंदवळ्या प्राप्त न झाल्यामुळे १२.९१ कोटी रुपयाच्या स्थावर मत्ता संबंधी तपशील तपासता आला नाही.

**३८.८ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :- रुपये ४४.४४ लक्ष**

दर्शविण्यात आलेली ही रुपये ४४.४४ लक्ष स्तावर मालमत्तेचे असून ती सन २००४-०५ च्या वार्षिक लेख्यांमध्ये दर्शविण्यात आलेली आहे. शिवाय सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यांमध्ये समायोजन नोंद क्रमांक ७१,७२, व ७३ नुसार आवश्यक असणारे समायोजन

करण्यात आलेले असून दि.३१.३.२००९ रोजीचे असलेले स्तावर मालमत्ता विषयक अभिलेखे हे लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेले आहे.

**३८.९ मुंबई मंडळ :- रुपये ११.०० कोटी**

समायोजन नोंद क्रमांक ४६ नुसार सन २००८-०९ मध्ये वार्षिक लेख्यांमध्ये मालमत्ता निहाय रक्कमा या ताळेबंदामध्ये दर्शविण्यात आल्याअसून मालमत्तांची जास्तीची दर्शविण्या आलेली रक्कम ही कमी करण्यात आलेली आहे. समायोजन नोंद क्रमांक ४७ नुसार मालमत्तांची कमी दर्शविण्यात आलेली रक्कम ही दुरुस्त करण्यात आलेली आहे व समायोजन नोंद क्रमांक ४८ नुसार जास्तीचा दर्शविण्यात आलेली रु.२.०२ कोटीची घसारा रक्कम ही दुरुस्त करण्यात आलेली आहे शिवाय मालमत्ता निहाय आवश्यक असणाऱ्या नोंद वह्या या ठेवण्यात आलेल्या असून त्या लेखा परिक्षणासाठी आवश्यक त्या वेळी उपलब्ध करुन देण्यत येतील.

**३८.१० नागपूर मंडळ :- रुपये १४६.४५ लक्ष**

स्थावर मालमत्तेची नोंदवही तयार करण्यात आली असून संपूर्ण स्थावर मालमत्ता लेख्यामध्ये दर्शविल्याप्रमाणे स्थावर मालमत्ता नोंदवीत दर्शविण्यात आली आहे. स्थावर मालमत्तेची भौतिक तपासणी करण्यात आली आहे.

सन २००३-२००४ च्या लेखा तपासणी अहवालात भाष्य करुनही १८३.०६ कोटी रुपयांचा तपशिल अद्याप अतासनीय स्थितीत आहे. खाली तपशील दिला आहे.

| क्र. | तपशिल | रक्कम (कोटीमध्ये) | |
|---|---|---|---|
| | | ३१/३/२००४ रोजीची स्थिती | ३१/३/२००५ ची स्थिती |
| १ | किरकोळ ऋणको (i) भाडे आणि सेवा आकार (ii) भाडे खरेदी योजना हप्ते महसुली जमा (iii) भाडेखरेदी या योजना हप्ते (भांडवली) (iv) भुई भाडे व इतर आकार | ३८.४७ | ८.७४ |
| २ | बँकेतील अल्पमुदत ठेवी | ४२८.२७ | १४७.९९ |
| ३ | इमारत बांधकामाच्या सामानाकरिता दिलेला अग्रीम | ०.४७ | १.०७ |
| ४ | इतर अग्रीम<br>गृहनिर्माण :- झोपडपट्टीधारकांन कर्ज, किरकोळ अग्रीम, म्हाडा ॲस अेम.महाराष्ट्र जीवन प्राधिकरण आणि | १०९.९७ | २५.२६ |

| | | | |
|---|---|---|---|
| | दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाला तात्पुरते कर्ज. | | |
| ५ | रोख व बँक शिल्लक व वित्त नियंत्रक/प्राधिकरण व जागतीक बँक पकल्प | १२.०९ | --- |
| ६ | निलंबन लेखा | १.१५ | --- |
| ७ | म.रा.वि.मंडळ | ०.०४ | --- |
| ८ | बांधकाम खर्च | १७.६८ | --- |
| ९ | अनुदान | २.०७ | --- |
| | **एकूण** | **६१०.२१** | **१८३.०६** |

**३८.११ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**औरंगाबाद मंडळ :- रुपये ६३.१६ लक्ष, रु.४७६.५२ लक्ष, रु.२८५.७५ लक्ष, रु.४८.९० लक्ष**

एकूण अपेक्षित रक्कम रु.१८३.०६ कोटीपैकी रु.७.६७ कोटी रुपये फक्त औरंगाबाद मंडळाशी संबंधीत आहे. खुलासा पुढीलप्रमाणे आहे.

(१) लेखा परिक्षकांनी निर्देशीत केलेली रक्कम रु.६३.१६ लाख ही भाडे व सेवा आकार बाबत किरकोळ ऋणको खात्याची रक्कम आहे. मिळकत व्यवस्थापन शाखेतील भाडेवसुलकारानी ठेवण्यात आलेल्या क्षेत्रीय नोंद वहीत या रक्कमेचे तपशील ओ. वसाहत निहाय तपशील तयार करण्यात आला असून वार्षिक लेखे सोबत वेगळा तक्ता जोडण्यात आला असून लेखा परिक्षकांना लेखा परिक्षणाच्या वेळी दाखविण्यात आला आहे.

(२) लेखा परिक्षकांनी निर्देशित केलेली रक्कम रु.४७६.५२ लाख ही भाडे खरेदी हप्त्याची महसुली भागातील किरकोळ ऋणको खात्याची रक्कम आहे. मिळकत व्यवस्थापन विभागातील भाडेवसुलीकाराकडे असलेल्या क्षेत्रिय नोंद वही मध्ये शिल्लक रकमेचा तपशिल ठेवण्यात आला आहे. वसाहत निहाय तपशीलही तयार करण्यता आला असून वार्षिक लेखेच्या नस्तीमध्ये स्वतंत्र तक्ता जोडण्यात आला आहे आणि सदर नस्ती लेखा परिक्षणाच्या वेळेस लेखा परिकांच्या निदर्शनास आणली आहे.

येथे असेही सादर करण्यात येते की, महसुली भागाची शिल्लक रक्कम रु.४७६.५२ लाख व भांडवली भागाची रक्कम रु.२८५.७५ लाख बाबत स्पष्ट करण्यात येते की, पूर्वी ६० टक्के आणि ४० टक्के प्रमाणे वर्गीकरण न करता भाडे खरेदी हप्त्यातील भांडवली व महसुली

भागाची प्रत्यक्ष वसुली प्रमाणे रक्कम परीगणीत करण्यात आली होती. सुरुवातीच्या वर्षाला अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट गाळ्यांच्या वितरणातील महसुली भाग हा भांडवली भागापेक्षा जास्त होता आणि म्हून लेखा परिक्षकांनी हा फरक निदर्शनास आणला,या कारणामुळे लेखे मध्ये ६० टक्के व ४० टक्के या प्रमाणात शिल्लक दिसुन येत नाही. परिच्छेदामध्ये उल्लेख केल्या प्रमाणे फरक लेखेत नसल्याबाबत खात्री करण्यात आली आहे. आता प्रत्यक्ष वर्गीकरणाप्रमाणे भांडवली व महसुलीभागाची वर्गीकरणाची पध्दत बंद करण्यात आली असून आता ६० टक्के व ४० टक्के प्रमाणे वर्गीकरण करण्यात येत आहे.

(३) लेखा परिक्षकांनी निर्देशित केलेली रक्कम रु.२७८.७५ लाख ही भाडे खरेदी हप्त्याची भांडवली भागातील रक्कम असून मिळकत व्यवस्थापन विभागातील भाडेवसुलीकाराकडे असलेल्या क्षेत्रिय नोंद वही मध्ये शिल्लक रकमेचा तपशिल ठेवण्यात आला आहे. वसाहत निहाय तपशीलही तयार करण्यात आला असून वार्षिक लेखेच्या नस्तीमध्ये स्वतंत्र तक्ता जोडण्यात आला आहे आणि सदर नस्ती लेखा परिक्षणाच्या वेळेस लेखा परिक्षकांच्या निदर्शनास आणली आहे.

येथे असेही सादर करण्यात येते की, महसुली भागाची शिल्लक रक्कम रु.४७६.५२ लाख व भांडवली भागाची रक्कम रु.२८५.७५ लाख बाबत स्पष्ट करण्यात येते की, पूर्वी ६० टक्के आणि ४० टक्के प्रमाणे वर्गीकरण न करता भाडे खरेदी हप्त्यातील भांडवली व महसुली भागाची प्रत्यक्ष वसुली प्रमाणे रक्कम परीगणीत करण्यात आली होती. सुरुवातीच्या वर्षाला अत्यल्प उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गट गाळ्यांच्या वितरणातील महसुली भाग हा भांडवली भागापेक्षा जास्त होता आणि म्हणून लेखा परिक्षकांनी हा फरक निदर्शनास आणला, या कारणामुळे लेखे मध्ये ६० टक्के व ४० टक्के या प्रमाणात शिल्लक दिसुन येत नाही. परिच्छेदामध्ये उल्लेख केल्या प्रमाणे फरक लेखेत नसल्याबाबत खात्री करण्यात आली आहे. आता प्रत्यक्ष वर्गीकरणाप्रमाणे भांडवली व महसुलीभागाची वर्गीकरणाची पध्दत बंद करण्यात आली असून आता ६० टक्के व ४० टक्के प्रमाणे वर्गीकरण करण्यात येत आहे.

(४) अकृषी आकार व भूईभाडे या सदरात असलेली व लेखा परिक्षकांनी निर्देशीत केलेली रक्कम रु.४८.९० लाख असलेल्या शिलकीचा तपशील मिळकत व्यस्थापकाच्या कार्यालयात उपलब्ध आहे.

**३८.१२ कोकण मंडळ :- रुपये ५६.९० लक्ष**

रुपये ५६.९० लक्ष हे इतर अग्रीमे या अंतर्गत दि. ३१.३.२००४ रोजी दिसून येत आहेत. या संबंधितचे अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध आहेत.

**३.२.३.१ :-** मालमत्तेच्या किमती पेक्षा अधिक रक्कमेवर आणि अस्तित्वात नसलेल्या मालमत्तेवर घसारा आकारला गेल्यामुळे घसारा ६.११ लाख रुपयांनी अधिक दिसतो.

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**कोकण मंडळ :- (रुपये ५.८१ लक्ष)**

सन २००४-०५ मध्ये रु.५.८१ लक्ष हे अतिरिक्त घसारा म्हणून दर्शविण्यात आले होते. जास्तीचा दर्शविण्यात आलेला घसारा हा समायोजन नोंद क्रमांक ७१,७२ व ७३ नुसार सन २००८-०९ समायोजित करण्यात आलेला असून संबंधित सर्व अभिलेखे हे पडताळणी साठी उपलब्ध आहेत.

**३८.१३ <u>मुळ अभिलेखे न ठेवणे/अपूर्ण अभिलेखे ठेवणे :-</u>** मंडळे आणि त्यांचे घटकांनी मूळ अभिलेखे ठेवले नाहीत/किंवा पूर्णत्वास नेले नाहीत. तसेच दुय्यम अभिलेखे जसे अनामत रक्कमा नोंद वही, भाडे वसूली आणि थकबाकी, अग्रीम नोंद वही, मालमत्ता नोंद वही इत्यादीचे अभिलेखे योग्य प्रकारे ठेवले नाहीत. मूळे अभिलेखे न ठेवल्याने / अपूर्ण स्थितीत ठेवल्याने ताळेबंदात वेगवेगळ्या लेखा शिर्षाखाली दाखविण्यात आलेल्या शिल्लक रक्कमांचा अचूकपणा तपासता अला नाही. मागील अनेक लेख्यांचे वेळी या त्रुटी निदर्शनास आणून देऊन ही असमानधारक स्थिती विशेषत: शासनाचे निदर्शनास आणून दिल्यानंतर आता या चालु वर्षाच्या लेख्यात काही प्रमाणात सुधारणा होत आहे. स्थिती चांगल्या प्रकारे सुधारण्यासाठी अधिक प्रयत्नांची आवश्यकता आहे. या व्यतिरिक्त सन १९९८-९९ मध्ये राजीव गांधी प्रकल्प बंद होऊन त्यांचे लेखे वित्त नियंत्रक/प्राधिकरण, मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ आणि मुंबई इमारत दुरुस्ती मंडळात लेख्यांचा ताळमेळ न लावता त्यातील त्रुटींचा शोध न घेताच अंतर्भूत करण्यात आले. लेखा परिक्षणात हे नजरेस आणून देण्यात आले आहे. या त्रुटी त्वरीत सुधारणे आवश्यक आहे.

**३८.१४ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

रोडमॅप मध्ये आश्वासित केल्यानुसार सर्व प्रकारच्या नोंद वह्या ठेवण्यात आलेल्या आहेत. सर्व नोंद वह्यांमधील अखेरच्या शिल्लक रक्कमा या संबंधित वार्षिक लेख्यातील रक्कमेशी ताळमेळाचे काम सुरु आहे. या बाबतील आवश्यक कार्यवाही पूर्ण करुन त्यानुसार आवश्यक दुरुस्तीच्या नोंदी सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यामध्ये घेण्यात येतील.

**३९. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण सन २००५-२००६ च्या लेख्यावरील लेखापरिक्षण अहवाल**

वार्षिक लेख्यामधील आकडे आणि दुय्यम नोंदवहीमध्ये दाखविलेले आकडे यांच्यामध्ये फरक असल्याकारणाने गाळ्यांच्या ठेवी रुपये ४.१३ लक्ष एवढ्याने कमी दाखविले गेले आहेत.

**३९.१ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**औरंगाबाद मंडळ :- रुपये ४.१३ लक्ष**

लेखा परिक्षणात दर्शविण्या आलेली रक्कम रुपये १०७६४०/- ही मासीक लेख्यात भाडे खरेदी हप्त्यामधून परत केलेली रक्कम असून ही रक्कम नजरचुकीने एक रकमी गाळे विक्री योजनेत दाखविण्यात आल्याचे निदर्शनास आल्यामुळे समायोजन नोंद क्रमांक ४९ अन्वये भाडे खरेदी हप्त्यामध्ये खर्ची टाकुन एक रकमी गाळे विक्री योजनेत जमा दाखवून त्याची नोंद घेवून वार्षिक लेख्यात समायोजीत करण्यात आली आहे. तथापी लेखा परिक्षकांनी निदर्शनास आणलेल्या चुकीची नोंद घेण्यात आली असून अशा चूका भविष्यात होणार नाहीत याची खबरदारी घेण्यात येत आहे. तसेच येथे असेही नमूद करण्यात येते की, या समायोजन नोंदीमुळे वार्षिक लेख्यातील किरकोळ ऋणको या शिर्षावर त्याचा विरीत परिणाम होत नाही.

सन २००४-२००५ च्या लेखा परिक्षण अहवालामध्ये भाष्य केले असून देखील एकूण ठेवीच्या रक्कमा मुळ अभिलेखे (दप्तर) उपलब्ध करण्यात न आल्याने किंवा अभिलेखे अपूर्ण असल्यामुळे तपासता आल्या नाहीत. ज्या दिनांक ३१/३/२००५ रोजी रुपये १७५.५६ कोटी हात्या त्या दिनांक ३१/३/२००६ रोजी रुपये ३२४.०६ कोटी एवढी वाढ झाली आहे. त्या खाली दाखविल्याप्रमाणे आहेत.

| अ.क्र. | ठेवी | ३१/३/२००५ रोजी | ३१/३/२००६ राजी |
|---|---|---|---|
| १ | लाभार्थीकडून / भावी खरेदीदाराकडून ठेवी | ८२.९२ | ५५३६४ |
| २ | भाडे खरेदी योजनेखालील सुरुवातीचे हप्ते | २१.२३ | ४२.९० |
| ३ | सुरुवातीला देय असलेल्या वसुली करावयाच्या रक्कमा | ०.१५ | ०.१५ |
| ४ | भाडे खरेदी योजने खालील मासिक हप्ते | १५.९७ | ४३.९९ |
| ५ | एक रक्कमी विक्री | --- | ७.६६ |
| ६ | आगाऊ अंशदान योजना | १०.२४ | ११.१४ |
| ७ | किरकोळ | ९.४९ | ११६.४९ |
| ८ | भाडेकरुंकडून वाहिवाट ठेवी | ५.१३ | ५.४७ |
| ९ | गाळे वितरणाची अनामत रक्कम (भाडेकरु कडून) | ५.७९ | ४.८८ |
| १० | ठेकेदारांकडून अनामत (रक्कम) ठेव | १.९९ | ०.४० |
| ११ | ठेकेदारांकडून सुरक्षा (रक्कम) ठेव | ३.६५ | १४.७१ |
| १२ | ठेकेदारांकडून इतर ठेवी | ०.२० | ०.३४ |
| १३ | खासदार/आमदार कामाकरीता ठेवी | -- | २०.२९ |
| १४ | करावयाच्या कामांकरीता ठेवी | १.०५ | --- |
| १५ | किरकोळ ठेवी | १३.३४ | --- |
| १६ | संरचनात्मक दुरुस्तीकरीता ठरविण्यात आलेल्या खर्चाच्या मर्यादेपेक्षा जास्त खर्च भागविण्याकरीता भाडेकरुकडून भाग रक्कम | ४.४१ | --- |
| | **एकूण** | **१७५.५६** | **३२४.०६** |

**३९.२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**नागपूर मंडळ :- रुपये ८७६.९२ लक्ष, रु.१४.५४ लक्ष, रु.५३३.१५ लक्ष, रु.१०४७.४० लक्ष, रु. ७८.९२ लक्ष, रु. १२२.७१ लक्ष, रु.३००.१३ लक्ष, रु.१.२२ लक्ष,**

या सर्व रक्कमा या ठेवी असून रोड मॅप मधील निर्देशानुसार सन २००३-०४ ते सन २००९-१० पर्यंतच्या सर्व ठेव नोंद वह्या तयार केलेल्या असून त्या लेखापरिक्षाणासाठी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आहेत.

**३९.३ औरंगाबाद मंडळ :-**

१) रुपये ८४८.२० लाख ही रक्कम गाळे धारकांकडून अर्जासोबत प्राप्त झालेल्या रक्कमा आहेत. हे कार्यालय प्रत्येक वर्षी ज्या गाळ्यांचा भाडे खरेदी हप्ता कालावधी संपला आहे अथवा ज्या गाळेधारकांनी गाळ्याची पूर्ण रक्कम भरणा केली आहे अशांच्या गाळ्यापोटी प्राप्त झालेल्या रकमाचे समायोजन करुन त्या रकमा ठेवी मधून काढून घेवून त्याचे गाळे विक्री योजनेत समायोजन नियमतीतपणे करण्यात येते. अशा प्रकारे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात रुपये ७७.७० लाख रुपये मंडळास प्राप्त झाले असून त्यापैकी रुपये ७.३९ लाखचा परतावा करण्यात आला असून रुपये ३६०.७० लाखाचे गाळे विक्री झाल्यामुळे समायोजन करण्यात आले आहे तसेच २००७-०८ या वर्षात रु.८४.६३ लाख प्राप्त झाले असून रु.६.१६ लाखाचा परतावा करण्यात आला असून रु.७५.४७ लाखाचे गाळे विक्री झाल्याने समायोजन करण्यात आले असून आता मार्च २००८ अखेर या लेखाशिर्षाखाली रुपये ५६०.८१ लाख शिल्लक आहेत. संबंधीत मिळकत व्यवस्थापक यांनी आवश्यकत्या नोंदवह्या ठेवलेल्या आहेत तथापी त्यावर गोषवारा न लिहिल्यामुळ नोदवहीप्रमाणे रकमा व लेख्याप्रमाणेच्या रकमा बरोबर असल्याचे प्रमाणीत करण्यास लेखा परिक्षकांना अडचण येत आहे. या बाबतीत मिळकत व्यवस्थापक यांना नोंदवह्या अद्यावत करण्याबाबत सुचित करण्यात आले आहे.

२) रुपये १३१२.३२ लाख ही रक्कम गाळे धारकांकडून भाडे खरेदी हप्त्यापोटी मुद्दल म्हणून प्राप्त झालेल्या रकमा आहेत. हे कार्यालय प्रत्यक वर्षी ज्या गाळ्यांच्या भाडे खरेदी हप्ता कालावधी संपला आहे अथवा ज्या गाळेधारकांनी गाळ्याची पूर्ण रक्कम भरणा केली आहे अशा गाळ्यांपोटी प्राप्त झालेल्या रकमाचे समायोजन करुन त्या रकमा ठेवी मधून काढून घेवून त्याचे गाळे विक्री योजनेत समायोजन नियमितपणे करण्यात येते. अशा प्रकारे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात रुपये ३०२.७० लाख रुपये मंडळास प्राप्त झाले असून त्यापैकी रुपये ३७६.३४ लाखाचे समायोजन करण्यात आले आहे तसेच २००७-०८ या वर्षात २५२.६६ लाख प्राप्त झाले असून त्यामधून रु.१२१.४१ लाख येवढ्यारकमेचे गाळे विक्री योजनेत समायोजन करण्यात आले असून आता मार्च २००८ अखेर या लेखाशिर्षाखाली रुपये १३६९.९३ लाख शिल्लक आहेत. संबंधीत मिळकत व्यवस्थापक यांनी आवश्यकत्या नोंदवह्या ठेवलेल्या आहेत तथापी त्यावर गोषवारा न लिहल्यामुळे नोंदवहीप्रमाणे रकमा व लेख्याप्रमाणेच्या रकमाबरोबर असल्याचे प्रमाणीत करण्यास लेखा परिक्षकांना अडचण येत आहे. या बाबतीत मिळकत व्यवस्थापक यांना नोदवह्या अद्यावत करण्याबबात सुचित करण्यात आलेले आहे.

३) रुपये २६.१७ लाख ही रक्कम अगावू अंशदान योजनेकरिता प्राप्त झालेल्या रकमा आहेत. हे कार्यालय प्रत्येक वर्षी यारकमाचे समायाजन करुन त्या रकमा ठेवी मधून काढून घेवून त्याचे गाळे विक्री योजनेत समायोजन नियमीतपणे करण्यात येते. अशा प्रकारे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात रुपये ४७.०४ लाख रुपये मंडळास प्राप्त झाले असून त्यापैकी रुपये २.१६ लाखाचा परतावा करण्यात आला असून रुपये ५४.५९ लाखाचे समायोजन करण्यात आले आहे तसेच २००७-०८ या वर्षात ६६.८० लाख प्राप्त झाले असून १.६५ लाखाचा परतावा करण्यात आला आहे व ८१.६१ लाखाचे गाळे विक्री योजनेत समायोजन करण्यात आले असून आत मार्च २००८ अखेर या लेखाशिर्षाखाली निरंक रक्कम शिल्लक आहे. संबंधीत मिळकत व्यवस्थापक यांनी आवश्यकत्या नोंदवह्या ठेवलेल्या आहेततथापी त्यावर गोषवारा न लिहील्यामुळे नोंदवहिप्रमाणे रकमा व लेख्याप्रमाणेच्या रकमा बरोबर असल्याचे प्रमाणीत करण्यास लेखा परिक्षकांना अडचण येत आहे. या बाबतीत मिळकत व्यवस्थापक यांना नोंदवह्या अद्यावत करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

४) रुपये ३६२.५८ लाख या रकमा प्रामुख्याने राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजनेच्या संबंधीत नगर पालिका महानगर पालिका यांच्या देयकातून प्राधिकरणाच्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे कपात कफ न ठेवलेल्या १० टक्के रकमा व बॅम्बे योजनेच्या कंत्राटदाराच्या देयकातून ३ टक्के कपात करुन ठेवलेली संकिर्ण ठेव रक्कम आहे. राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजनेच्या देयकातून कपात करुन ठेवलेली १० टक्के रक्कम ही संबंधित नगर परिषद/महानगर पलिका यांनी केलेल्या कामाचे अंतीम देयकाचे लेखा परिक्षण करुन घेवून त्याप्रमाणीत प्रतीसह प्रस्ताव सादर केल्यास या रकमा संबंधीतास परत करण्यातयेतात. तथापी संबंधीत नगर पालिका/ महानगर पालिकाकडून या कार्यालयास पुरेसा प्रतीसाद मिळत नाही. या कार्यालयामार्फत सतत पाठपुरावा सुरु आहे. जेव्हा संबंधीतांकडून वरील बाबींची पूर्तता होईल तेव्हा सदरहू रक्कम परत करण्याची कार्यवाही करण्यात येईल. वरील रकमांच्या नोंदी असलेले राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजनेचे व बॅम्बे योजनेच्या नोंदी असलेल्या ठेव नोंदवह्या अद्यावत असून सन २००६-०७ या आर्थिक वर्षात ७१.९६ लाख वसुल केलेली रक्कम असुन या मधून रु.७१.८९ लाखाचा परतावा करण्यात आला आहे तसेच २००७-०८ या वर्षात २२४.०७ लाख प्राप्त झाले असून त्यापैकी ११३.०२ लाख परत करण्यत आले असून आता मार्च २००८ अखेर संकिर्ण ठेव या शिर्षाखाली ४७३.७० लाख ऐवढी रक्कम शिल्लक आहे.

५) रुपये ३१७.३६ लाख ही रक्कम गाळे धारकांकडून अर्जासोबत प्राप्त झालेल्या किरकोळ रिक्त कज्युअल व्हॅकसी ठेव रकमा आहेत. हे कार्यालय प्रत्येक वर्षी ज्या गाळ्यांचा भाडे खरेदी हप्ता कालावधी संपला आहे अथवा ज्या गाळेधारकांनी गाळ्याची पूर्ण रक्कम भरणा केली आहे आांच्या गाळ्यापोटी प्राप्त झालेल्या रकमाचे समायोजन करुन त्या रकमा ठेवी मधून काढून घेवून त्याचे गाळे विक्री योजनेत समायोजन नियमीतपणे करण्यात येते. अशा प्रकारे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात रुपये ४२.०७ लाख रुपये मंडळास प्रापत झाले असून रुपये ५५.८० लाखाचे समायोजन करण्यात आले आहे तसेच २००७-०८ या वर्षात रु.२३४.७२ लाख प्राप्त झाले असून रु.५४.०४ लाखाचा परतावा करण्यात आला असून आता मार्च २००८ अखेर या लेखाशिर्षाखाली रुपये ४८४०३१ लाख शिल्लक आहेत. संबंधीत मिळकत व्यवस्थापक यांनी आवश्यक त्या नोंदवह्या ठेवलेल्या आहेत तथापी त्यावर गोषवारा न लिहील्यामुळे नोंदवहीप्रमाणे रकमा व लेख्याप्रमाणे रकमा बरोबर असल्याचे प्रमाणीत करण्यास लेखा परिक्षकांना अडचण येत आहे. या बाबतीत मिळकत व्यवस्थापक याना नोंदवह्या अद्यावत करण्याबाबत सुचित करण्यात आलेले आहे.

६) रुपये १८७.३५ लाख ही रक्कम गळे धारकांकडून गाळे वाटप करताना घेतलेल्या तीन महिन्याच्या हप्त्याएवढी कायम अनामत ठेव म्हणून प्राप्त झालेल्या रकमा आहेत. हे कार्यालय प्रत्येक वर्षी ज्या गाळ्यांचा भाडे खरेदी हप्ता कालावधी संपला आहे अथवा ज्या गाळेधारकांनी गाळ्याची पूर्ण रक्कम भरणा केली आहे अशांच्या गाळ्यापोटी प्राप्त झालेल्या रकमाचे समायोजन करुन त्या रकमा ठेवी मधून काढून घेवून त्याचे गाळे विक्री योजनेत समायोजन नियमीतपणे करण्यात येते. अशा प्रकारे सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात रुपये ८.७० लाख रुपये मंडळास प्राप्त झाले असून रुपये ८.६१ लाखाचे समायोजन करण्या आले आहे. तसेच २००७-०८ या वर्षात ११.४३ लाख प्राप्त झाले असून रु.५.५२ लाखाचा परतावा करण्यात आला आहे. आता मार्च २००८ अखेर या लेखाशिर्षाखाली रुपये १९३.३५ लाख शिल्लक आहेत.

आवश्यक ते अभिलेखे ठेवण्यात आलेले असून कायम स्वरुपी ठेवी अंतर्गत असलेल्या रक्कमा या भाडे खरेदीच्या रक्कमा (Hire purchase installment) अंतर्गत समायोजन नोंद क्रमांक २६ दि. ३१.०३.२०१० अन्वये सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यामध्ये समायोजित करण्यात आलेल्या आहेत.

**३९.४ मुंबई मंडळ :- रुपये ५५.६४ कोटी**

रु.५५६३.७९ सुरक्षा अनामत रक्कम व इसारा अनामत रक्कम व इतर अनामत रक्कमा ज्या ३ वर्षापुर्वीच्या असून त्या रक्कमेच्या परताव्याची कोणीही मागणी केलेली नसल्यामुळे अशा रक्कमा २००८-२००९ च्या वार्षिक लेख्यात समायोजित केलेल्या आहेत (LAPSED DEPOSIT) समायोजन नोंद क्र. १९,२०,२१,२२ वर्ष २००८-०९

**३९.५ नाशिक मंडळ :- (रु.८२४.३७ लक्ष, रु.२५७.५९ लक्ष, रु.७६६.१५ लक्ष, रु.४०.८७ लक्ष, रु.२४२.५९ लक्ष, रु.०.२५ लक्ष, रु.२७.०० लक्ष)**

मंडळाने गाळेधारकांचे सुरुवातीच्या भरावयाच्या रकम रु.८२४.३६ लक्ष याची वसाहतनिहाय स्वतंत्र नोंदवही तयार करण्यात आली आहे. रुपये २५.७९ लक्ष मासिक भाडेखरेदी हप्त्याची योजनानिहाय, वसाहतनिहाय फिल्ड रजिस्टर तयार करण्यात येतात व सदर फिल्ड रजिस्टरची आकडेवारी वार्षिक लेखा व मासिक लेख्याशी जुळणी केलेली आहे. सदर रजिस्टर लेखा परिक्षणात तपासणी करीतासादर करण्यात आले होते. एक रकमी विक्री किंमतीचे गाळे/भूखंड रक्कम रु. ७६६.१५ लक्ष चे योजनानिहाय व साहतनिहाय रजिस्टर तयार करण्यात आले आहे. अग्रिम अंशदान पध्दतीचे गाळे/भूखंड रक्कम रु.४०.८६ लक्ष चे योजनानिहाय ववसाहनिहाय रजिस्टर तयार करण्यात आले आहे. रुपये २४२.३६ लक्ष चे संकिर्ण ठेव रजिस्टर स्वतंत्ररित्या तयार करण्यात आले आहे. रुपये ०.२५ लक्ष चे इसारा ठेव रक्कम रजिस्टर स्वतंत्ररित्या तयार करण्यात आले आहे. रुपये २७.०० लक्ष चे सुरक्षा ठेव रक्कम रजिस्टर स्वतंत्ररित्या तयार करण्यात आले आहे.

| **तपशिल** | **रक्कमा (लक्ष)** |
|---|---|
| भाडे खरेदी योजने (भाडवल)अंतर्गत मासिक हप्ते | २५७.५९/- |
| भाडे खरेदी योजनेअंतर्गत | ८२४.३७/- |
| गाळ्यांच्या विक्रीद्वारे | ७६६.१५/८- |
| इतर ठेवी | २४२.५९/- |
| आगाऊ अंशदान योजना | ४०.८७ |
| सुरक्षा ठेव | २७.००/- |
| ठेकेदारांकडून प्राप्त इशारा रक्कम | ०.२५/- |
| एकूण | २१५२.९१/- |

सर्व संबंधित अभिलेखे हे रोड मॅप मधील सूचनानुसार ठेवण्यात आले असून वार्षिक लेख्यांमध्ये त्याचा ताळेळ घालण्यात आलेला आहे.

**३९.६ पुणे मंडळ :- रुपयें १७४०.६२ लक्ष, रु.२२९६.१३ लक्ष**

लेखापरिक्षणात दर्शविण्यात आलेल्या वैगुण्याची नोंद घेण्यात आली आणि मिळकत व्यवस्थापक यांना योग्य नोंदवह्या अद्यावत ठेवण्यासाठी परिपत्रक क्र. १९२८ दि.३१/०८/२००५ व पत्र क्र. १७२४ दि. ३०/०८/२००७ अन्वये निर्देश देण्यात आलेले आहेत. तसेच नुकतच लोकलेखा समितीकडे दिलेल्या आश्वासनानुसार सुक्ष्म नियोजन करुन रोड मॅप तयार करण्यातआलेला आहे व त्यानुसार विविध नोंदवह्या तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे.

**३९.७ मुंबई झो.सु.मंडळ :- रुपये ३.८७ कोटी**

रुपये ३.८७ कोटी सुरक्षा ठेव म्हणून ठेवण्यात आलेली ही रक्कम मुं.झो.सु. मंडळाची असून रुपये १४०९५८६२/- हे ३ वर्षा पेक्षा जास्त कालावधी साठी मागणी न केलेली रक्कम ही वार्षिक लेखे सन २००८-०९ मध्ये म्हाडाची जमा म्हणून दर्शविण्यात आलेली आहे. (समायोजन नोंद क्रमांक ८०,८२,९०) व समायोजन नोंद क्रमांक ९१ नुसार रु.१६८१४६७/- व वार्षिक लेखे सन २००९-१० मध्ये समायोजन नोंद क्रमांक २६,२७,३० नुसार रु.१२४१४३९५/- ही रक्कम म्हाडाच्या जमा महसूलामध्ये दर्शविण्यात आलेली आहे. सद्यस्थितीमध्ये सुरक्षा ठेव नोंद वह्या ठेवण्यात आल्या असून त्या वर्ष २००८-०९ च्या वार्षिक लेख्यांचे लेखापरिक्षणा दरम्यान दर्शविण्यात आलेले आहेत.

**३९.८ मुंबई झो.सु.मंडळ :- रुपये २०.२७ कोटी**

उल्लेख्लिले वापरात न आलेला निधी पैकी आमदार निधी रुपये १९.६९ कोटी, सुशोभीकरणांतर्गत रु. १० लक्ष व एम एम आर डी ए चे रु.४८.९० लक्ष यांचा समावेश होतो. आवश्यक असणाऱ्या नोंद वह्या या अद्ययावत ठेवण्या आलेल्या असून संबंधित अभिलेख्यांचे ताळमेळ हे सन २०१०-११ मध्ये पूर्ण करण्यात येतील.

**३९.९ मुं.दु.पु.मंडळ :- रुपये ३९.९२ लक्ष, रुपये ६३१.५५ लक्ष, रुपये ३४.१५ लक्ष**

ठेकेदारांकडून प्राप्त झालेली सुरक्षा अनामत रक्कम रुपये ३९९२३०/- बाबत आवश्यक त्या नोंद वह्या या सहाय्यक लेखाधिकारी (उत्तर व दक्षिण) यांचे कार्यालयात स्वतंत्रपणे ठेवण्यात आलेल्या आहेत. तसेच ठेकेदारांकडून प्राप्त झालेली सुरक्षा रक्कम रु.६३१५५४९२/- या बाबत सुध्दा संबंधित सहाय्यक लेखाधिकारी (उत्तर व दक्षिण) कार्यालयात सर्व आवश्यक ते अभिलेखे ठेवण्यात आलेले आहेत. मात्र काही कार्यालयांची सन २००६ पुर्वीची रक्कम ही वार्षिक लेखे २००८-०९ मध्ये स्वतंत्रपणे दर्शविण्यात आलेली आहे.

**४०. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण सन २००६-२००७ च्या लेख्यावरील लेखापरिक्षण अहवाल**

**४०.१** भुई भाड्याचा समावेश न केल्यामुळे चालू मालमत्ता रुपये ०.२९ कोटीने कमी दाखविण्यात आली. (अमरावती मं.)

**विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**अमरावती मंडळ :-**

भुईभाड्याची वास्तविक रक्कम ही वार्षिक लेख्यात दाखविण्यात आलेली आहे. भुईभाडेचे संदर्भात मुल्यांकन करण्याची प्रक्रिया सुरु असून वसली योग्य रक्कम ही शेड्यूल क्र. ८ मध्य सन २०१०-११ चे वार्षिक लेख्यात दर्शविण्यात येईल.

२.१.५ :- "संस्था देय कर्जे खाली उणे शिल्लक असल्यामुळे परिणामी चालू मालमत्ता रुपये ५.४५ कोटीने कमी दाखविण्यात आली (मुं.मं.)

**४०.२ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :- ५.४५ कोटी**

सदरची रक्कम ही जा.बॅ.प्र. ची असून त्याचे चुकीचेवर्गीकरण झाले असून त्याची दुरुस्ती २०१०-०११ च्या वार्षिक लेख्यात करण्यात येईल.

<u>२.२.३ :-</u> वर्षभरात विकल्या गेलेल्या १६ गाळ्यांसाठी झालेल्या बांधकाम खर्चाचे निर्लेखन न झाल्यामुळे चालू मालमत्ता रुपये ०.९८ कोटीने वाढलेली आहे (मुं.मं.)

**४०.३ विभागाने समितीस सादर केलेल्या लेखी ज्ञापनात पुढीलप्रमाणे खुलासा करण्यात आला आहे.**

**मुंबई मंडळ :- ०.९८ कोटी :-**

१६ गाळ्यांच्या विक्रीबाबत माहिती प्राप्त होताच सदर रक्कमेचे समायोजन करण्यात येईल.

**साक्ष :-**

**४१.** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९५-१९९६ ते २००५-२००६ या वर्षाचे वार्षिक लेख्यावरील लेखापरीक्षण अहवालाच्या संदर्भात समितीने सचिव, गृहनिर्माण विभाग व महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे अधिकारी यांची दिनांक २४ फेब्रुवारी २००९, साक्ष घेतली.

**४१.१** महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या सन १९९५-९६ ते २०००-२००१ च्या वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवालामध्ये महालेखापालांनी अकाऊन्टीग सिस्टीम (लेखे पद्धती), रिकन्सिलीएशन (खर्चाचा मेळ) तसेच इतर त्रुटी दूर करण्याच्या संदर्भात गंभीर स्वरुपाचे आक्षेप नोंदविलेले आहेत. महालेखाकारांनी ज्या काही त्रृटी निदर्शनास आणून दिल्या होत्या त्याचे निराकरण पाच पाच वर्षे करण्यात आले नाही. जे काही आक्षेप काढण्यात आले आहेत ते दूर करण्यास इतका विलंब लागावयास नको होता. एखादा मुद्दा त्यांनी अधोरेखित केल्यानंतर पाच पाच वर्षे जर त्या बाबतीत कम्प्लायन्स (पूर्तता) केला जात नसेल तर ती बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे. त्यामुळे महालेखाकारांनी काढलेले तेच ते मुद्दे पुन्हा पुन्हा समितीसमोर येत असतात.

**४१.२** यासंदर्भात महालेखाकारांकडून समितीला असे सांगण्यात आले की, लेखे ठेवण्याची पद्धत कशी असावी या मुद्दांच्या बाबतीत महालेखाकारांनी म्हाडाला कळविले होते परंतु म्हाडाकडून काहीही खुलासा करण्यात आला नाही. महालेखाकारांकडून म्हाडाला कळविण्यात आल्यानंतर त्याबाबतीत म्हाडाने काहीही पूर्तता/अनुपालन केलेले नाही. त्याचप्रमाणे समितीलासुध्दा काहीही कळविण्यात आलेले नाही. सदरहू बाब विभागाच्या दृष्टीने चांगली नाही व समिती देखील त्या बाबतीत समाधानी नाही तसेच महालेखाकारांनी वेळोवेळी म्हाडाला कळवूनसुध्दा म्हाडाकडून खुलासा होत नसल्याची खंत महालेखापालांनी व्यक्त केली.

**४१.३** सन १९९५-९६ चा म्हाडाचा अहवाल विधानसभेला २००१ साली सादर करण्यात आला होता व सदर अहवालावर चर्चा समितीमध्ये २००९ साली करण्यात आली. परंतु त्याबाबतीत समितीला पूरक अशी माहिती आणि स्पष्टीकरणात्मक ज्ञापने वेळेवर प्राप्त झाली नाहीत. महालेखाकारांकडून सात आठ वर्षापूर्वी आक्षेप काढण्यात आले होते असे असतांना आजच्या बैठकीत समितीला ही माहिती मिळणे आवश्यक होते. अजूनही समितीला ही माहिती दिली जात नाही ही बाब गंभीर आहे. त्यामुळे समितीचा वेळ वाया जातो. विभागास वेळोवेळी

स्मरणपत्रे पाठवूनसुध्दा माहिती वेळेवर प्राप्त होत नाही. याचाच अर्थ असा की, समितीला विभाग गंभीरपणे घेत नाही असे मत समितीने खेदाने व्यक्त केले.

**४१.४** महाराष्ट्र गृह निर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाची व्याप्ती दिवसेंदिवस वाढत चालली आहे. सुरुवातीला एकच बोर्ड होते आता मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, अमरावती, औरंगाबाद अशा अनेक बोर्डाची स्थापना करण्यात आली आहे. त्याचप्रमाणे दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची स्थापना करण्यात आलेली आहे. म्हाडाकडे जवळजवळ ९ ते १० मंडळे आहेत तेव्हा समितीला अपेक्षित असेली माहिती मिळण्याकरता म्हाडाकडून योग्य ते सहकार्य मिळाले पाहिजे.

**१९९५-९६**

**४१.५** सन १९९५-९६ च्या अहवालाच्या संदर्भात परिच्छेद क्रमांक ४ ,ज्ञापन क्रमांक २ संबंधी महालेखाकारांकडून अनेक त्रुटी दाखविण्यात आलेल्या आहेत. अकाऊन्टीगची सिस्टिम (लेखे ठेवण्याची पद्धत) योग्य पध्दतीने नव्हती. त्याचप्रमाणे प्राप्य आणि अप्राप्य तसेच बुडीत कर्जाच्या वर्गीकरणाची पध्दत अवलंबविण्यात आली नव्हती असे महालेखाकारांनी आक्षेप काढले होते परंतु त्या बाबतीत विभागाकडून कोणताही खुलासा देण्यात आला नाही. तेव्हा या बाबतची सद्यःस्थिती काय आहे यासंबंधी खुलासा करण्यास समितीने सांगितले असता म्हाडामध्ये स्वीकारण्यात आलेल्या पध्दतीबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की उच्च उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गटासाठी म्हाडातर्फे घरे बांधून दिली जातात त्यामध्ये कोणत्याही स्वरुपाचे कर्ज देण्यात येत नाही. ज्या व्यक्तीला घर घ्यावयाचे असते त्याच्याकडून ॲडव्हान्स कॉन्ट्रीब्युशन (अग्रिम अंशदान) घेण्यात येत असते त्यातून जमा होणा-या निधीतून घरे बांधून देण्याची योजना तयार केली जाते. अल्प उत्पन्न गटसाठी घरे बांधून देण्याची योजना देखील म्हाडामार्फत राबविण्यात येते त्यांच्याकडून सुरुवातीला डाऊन पेमेन्ट घेण्यात येते आणि उर्वरित रक्कम त्यांनी दहा ते पंधरा वर्षात समान मासिक हप्त्यात फेडावयाची असते. यासाठी मंडळाकडून संबंधितांना थेट कर्ज दिले जात नाही. संबंधित व्यक्तींना घरे बांधून दिल्यानंतर त्यांच्याकडून मासिक हप्त्याद्वारे वसूल करण्यात येत असते. त्यामध्ये दोन तीन रकमांचा समावेश करण्यात येत असतो. खरेदीचा मासिक हप्ता, भुई भाडे आणि सेवा शुल्क अशा या तीन बाबी आहेत. अशा प्रकारे या तीनही रक्कमा एकत्रित करुन संबंधितांकडून दरमहा वसूल करण्यात येतात . जोपर्यंत घराची रक्कम वसूल होत नाही

तोपर्यत अभिहस्तांतरण (Coveyance) केले जात नाही. तसेच कोणालाही प्रत्यक्षात कर्ज दिले जात नाही त्यांना घरे बांधून देण्यात येतात.

**४१.६** उच्च उत्पन्न गट आणि मध्यम उत्पन्न गटासाठी कर्ज देत नाही परंतु अल्प उत्पन्न गटासाठी हप्त्याने पैसे भरण्याची योजना आहे तेव्हा त्यामध्ये किती लोकांकडे किती रक्कम थकीत आहे तसेच ही रक्कम कोणत्या वर्षापासून थकीत आहे याबाबतची माहिती देतांना विभागीय सचिवांनी सांगितले की, अनेक मंडळाच्या मार्फत अशा प्रकाराची योजना राबविण्यात येत असल्यामुळे मंडळ निहाय ही रक्कम काढावी लागेल, परंतु लेख्यामध्ये त्याचा उल्लेख असल्यामुळे ही रक्कम काढण्यास विलंब लागता कामा नये. ही माहिती विभागाकडे असली पाहिजे. जर त्या प्रश्नाचे उत्तर मिळत असेल तर महालेखाकारांकडून जे आक्षेप काढण्यात आलेले आहेत ते काढण्याची वेळ आलीच नसती असे मत समितीने व्यक्त केले असता विभागाकडून कर्ज दिले गेले नाही असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**४१.७** म्हाडाकडून ज्यांना घरे देण्यात येतात व त्या घराचे हप्ते त्यांच्याकडून वसूल केले जातात तेव्हा त्यांच्याकडून किती पैसे यावयाचे होते, त्यापैकी किती पैसे आलेले आहेत, किती रक्कम थकीत आहे, ज्यांच्याकडे थकबाकी आहे त्यांच्याविरुध्द कोणती कारवाई केली याबद्दल सविस्तर माहिती समितीला देणे आवश्यक आहे. ही सर्व माहिती मिळविण्यासाठी व थकबाकी वसूल करण्यासाठी नेमकी पद्धत काय आहे ? त्याचे काही नियम ठरविण्यात आलेले आहेत काय ? एखाद्या व्यक्तीने बॅकेचे कर्ज घेतले असेल आणि ते जर त्यांनी वेळेवर दिलेले नसेल तर संबंधिताविरुध्द काय कारवाई केली जाते ? ही कारवाई करण्याची कोणती पध्दत आहे ? तसेच एखाद्या व्यक्तीने टोकन मनी (प्रतिक मुद्रा )दिल्यानंतर उर्वरित रक्कम भरण्याविषयीची हमी कोणाकडून घेण्यात येत असते. टोकन मनी दिल्यानंतर बाकीचे हप्ते तो भरु शकतो किंवा नाही हे कोण पहाते ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, हमी घेतली जात नाही. संबंधित व्यक्तीच्या उत्पन्नाच्या आधारे घरे दिली जातात ती रक्कम त्यांच्याकडून वसूल केली जाते. त्यांना कर्ज देण्यात येत नाही त्यामुळे हमी घेण्यात येत नाही. त्यांना कर्ज न देता म्हाडा मार्फत घरे दिली जातात. तसेच अल्प उत्पन्न गटाच्या व्यक्तीकडून मासिक हप्त्याची वसुली म्हाडाच्या अधिका-यांकडून केली जाते. वसुली पूर्ण झाल्यानंतर अभिहस्तांतरण केले जाते. त्या संदर्भात प्रत्येक विभागातील सद्यःस्थितीबाबतची माहिती समितीला देताना मुख्य लेखा अधिकारी, औरंगाबाद मंडळ यांनी सांगितले की, कमी

उत्पन्न असलेल्या व्यक्तीकडून दहा वीस टक्के रक्कम घेतल्यानंतर उर्वरित रकमेचे मासिक हप्ते निश्चित केले जातात आणि तो हप्ता त्यांच्याकडून वसूल केला जातो मात्र थकबाकी राहिल्यास सेक्शन ६६ नुसार संबंधिताविरुध्द कारवाई केली जाते.

**४१.८** गेल्या पाच वर्षापासून थकबाकी असलेल्या व्यक्तींची संख्या किती आहे त्यांच्याकडून किती रक्कम येणे आहे, जे थकबाकीदार आहेत त्यांच्याविरुध्द मंडळाने कोणती कारवाई केली आहे ? अशी मंडळ निहाय माहिती देण्यात यावी तसेच जो पर्यंत घराची पूर्ण रक्कम वसूल होत नाही तोपर्यंत अभिहस्तांतरण केले जात नाही असे विभागाने मघाशी सांगितले होते तेव्हा किती जणांकडून येणे आहे, किती जणांनी पैसे पूर्ण भरल्यामुळे अभिहस्तांतरण करण्यात आले होते, किती जणांचे करावयाचे बाकी आहे ? किती ठिकाणी मालमत्तेचे हस्तांतरणाचे काम पूर्ण झालेले आहे यासंबंधी एक तक्ता विभागाने लेखापरिक्षणासाठी तयार करावा व ही माहिती महालेखाकारांकडून आक्षेप काढण्यात आलेले असल्यामुळे त्यांना तसेच समितीला देखील ही माहिती मिळाली पाहिजे. या संदर्भात ही माहिती संकलीत करुन लवकरात लवकर समितीस सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

**४१.९** म्हाडाकडे अंतर्गत हिशोब ठेवण्याची पध्दत आहे काय ? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या पध्दतीने लेखे ठेवावयास पाहिजे होते त्या पध्दतीने ठेवले जात नाहीत असे काही मुद्दे महालेखापालांनी अधोरेखित केलेले आहेत. सदोष लेखा पध्दतीमुळे वेगवेगळया रकमासंबंधीची अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन देणे अवघड होत आहे. त्यामुळे लेखापद्धतीमध्ये सुधारणा करणे आवश्यक आहे त्या शिवाय ही माहिती मिळू शकणार नाही.

**४१.१०** उपरोक्त खुलासा करताना " सदोष लेखा पध्दती " असे शब्द वापरले आहेत म्हणजेच लेखा पध्दत सदोष आहे हे विभागाला मान्य आहे ना ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय सचिवांनी त्यास संमती दर्शविली.

**४१.११** अंतर्गत हिशोब पध्दतीमध्ये कोणती सुधारणा करता येईल ? तसेच सन २००१ साली अहवाल सादर केल्यानंतर सन २००२ मध्ये विभागाकडून काय सुधारणा केल्या होत्या. महालेखापालांनी अनेक बाबी विभागाच्या निदर्शनास आणून दिल्या आहेत त्यामध्ये गेल्या पाच सात वर्षात काय दुरुस्त्या केल्या. तसेच ज्या अधिका-यांकडे विभागाचा कार्यभार होता त्यांनी

सात आठ वर्षामध्ये या पध्दतीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने कोणते प्रयत्न केले होते? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की महालेखाकारांनी वेगवेगळे मुद्दे काढलेले आहेत. त्याच्यामध्ये सगळयात महत्वाचा मुद्दा असा की, येणे रक्कम डिपॉझिट (ठेवी) मध्ये ठेवली जाते. विक्री किंवा हायर पर्चेसमध्ये मासिक हप्त्याने घेतलेली रक्कम खतावणीत येत नाही. मासिक हप्त्याने घेतलेली रक्कम कंम्पोझिट रक्कम असते. हायर पर्चेस, सर्व्हिस चार्ज याची वेगवेगळी खतावणी होत नाही. त्यामुळे नेमक्या आलेल्या रकमेची खतावणी कशात केली, कुठल्या यंत्रणेकडे बाकी राहिली याची विगतवारी निष्पन्न होऊ शकत नाही, असा आक्षेप महालेखाकारांनी घेतलेला आहे. त्या आक्षेपाच्या दृष्टीने म्हाडाच्या लेख्यांमध्ये अद्यापपर्यंत सुधारणा झालेली नाही, ही वस्तुस्थिती आहे. या वर्षी डिपॉझिट घेतलेले पैसे या वर्षीच्या ठेवीमध्ये खतावणी केले आहेत. तीन वर्षापूर्वी १० जणांकडून रक्कम वसूल झाली असेल त्या १० जणांकडून वसूल झालेले पैसे त्या वर्षाच्या रजिस्टरमध्ये खतावणी केले आहेत. ते पुढील वर्षीच्या रजिस्टरमध्ये पुढे नेता येत नसल्यामुळे त्या लेख्यांचा शोध धेता येत नाही. जुने लेखे शोधल्याशिवाय ताळमेळ बसत नाही, ही गंभीर परिस्थिती आहे. या बाबतच्या पद्धतीमध्ये सुधारणा झाल्याशिवाय यामधून मार्ग निघणे अवघड दिसत आहे. आता या लेख्याचे संगणकीकरण करण्याच्या दृष्टीने टाटा कन्सल्टंन्सी सर्व्हीसेसची एक वर्षापूर्वी नेमणूक केली आहे.

**४१.१२** टाटा कन्सल्टंन्सची सर्व्हिसेसची नेमणूक झाल्यानंतर महालेखाकारांना अहवाल दिला आहे काय? या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, संगणकीकरण झाल्याशिवाय अपेक्षित अशी माहिती जनरेट करणे अवघड बाब आहे.

**४१.१३** वेगवेगळया खतावणी ठेवण्याची पध्दत नाही, पुढे नेण्याची रक्कम पुढे आणता येत नाही म्हणून यामध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने या संपूर्ण पद्धतीचे संगणीकरण करण्यासाठी टाटा कन्सल्टंन्सी नियुक्त केलेली आहे परंतु १९९६-९७ पासून आतापर्यंत म्हाडा सारख्या मोठया अर्थव्यवस्थेच्या संदर्भात लेखे ठेवण्याची पध्दत परिपूर्ण नाही ही वस्तुस्थिती महालेखाकारांनी निदर्शनास आणून दिली आहे, हे विभागाला भूषणावह नाही. याचे कारण असे की, म्हाडा करोडो रुपयाची उलाढाल करते. सध्या म्हाडाच्या संदर्भात वेगवेगळया कारणाने वर्तमानपत्रात रकाने भरुन येत आहेत. याला प्रतिबंध करण्यास काय कार्यवाही केली आहे? असे समितीने विचारले असता म्हाडाचा कारभार खूप मोठा आहे. घरासाठी १४०० कोटी रुपये

डिपॉझिटची रक्कम जमा झालेली आहे. ४ लाख ३५ हजार अर्ज आलेले आहेत. त्यापैकी काहींना घरे मिळतील तर काहींना पैसे परत करावे लागतील असे विभागीय सचिवांनी सांगितले. म्हाडाचा कारभार हा राज्याच्या कारभारापेक्षा मोठा नाही असे मत समितीने व्यक्त केले असता म्हाडातर्फे केंद्र शासनाच्या योजना मोठया प्रमाणात राबविण्यात येतात. त्यासाठी परिपूर्ण लेखा पद्धती असणे अत्यंत आवश्यक आहे. जोपर्यंत लेखा पद्धतीमध्ये, ठेवी ठेवण्याच्या पध्दतीमध्ये शासनाच्या नियमाप्रमाणे सुधारणा होत नाही तोपर्यंत यासंबंधिची माहिती उत्पन्न करणे अवघड असणार आहे व ही परिस्थिती अनेक वर्षापासून चालू आहे. त्याकडे काही प्रमाणात दुर्लक्ष झाल्यामुळे आज ही परिस्थिती निर्माण झालेली आहे. जोपर्यंत लेख्यामधील मलूभूत स्वरुपाचे जे दोष आहेत ते व्यवस्थित होत नाहीत तोपर्यंत लेखा पद्धतीमधून माहिती मिळेल किंवा त्यावर अंकुश ठेवण्याच्या दृष्टीने ठोस पावले उचलता येतील असे वाटत नाही. लेखा पद्धतीमध्ये मूलभूत सुधारणा होणे आवश्यक करण्याच्या दृष्टीने रोडमॅप तयार करुन त्याप्रमाणे या पद्धतीमध्ये सुधारणा घडवून आणणे आवश्यक आहे. वित्त विभागाने दिलेल्या गाईडलाईन्सबरोबर नवीन तंत्रज्ञानाची सांगड घालून परीपूर्ण लेख्याची व्यवस्था म्हाडामध्ये प्रस्तापित करणे काळाची गरज आहे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.१४** म्हाडाचे अन्तर्गत लेखारीक्षण होते काय? असे समितीने विचारले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, आतापर्यंत अन्तर्गत लेखापरीक्षण होत नव्हते पण आता एक वर्षापासून सुरु केले आहे.

लहान लहान व्यापाऱ्यांना देखील सनदी लेखापालांकडून लेखापरिक्षण करुन घ्यावे लागते. म्हाडाचा करोडो रुपयाचा व्यवहार असतो असे असताना म्हाडाचे अंतर्गत लेखापरीक्षण होत नाही, याचे कारण काय? तसेच सन १९९८-९९ पासून म्हणजे १० वर्षापासून आपल्या महालेखाकार यांच्याकडून म्हाडाच्या लेखा पद्धतीच्या बाबतीत नकारार्थी शेरे देत असताना त्यामध्ये सुधारणा करावी असे विभागाला वाटले नाही काय? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, लेखा पद्धतीमध्ये सुधारणा करण्याच्या दृष्टीने बऱ्याचशा गोष्टी केल्या जात आहेत. आतापर्यंत लेख्यांचे वर्गीकरण व्यवस्थित केले जात नव्हते असे निदर्शनास आल्यानंतर सन २००१ नंतर लेख्यांचे वर्गीकरण व्यवस्थित सुरु केले आहे. त्यासंबधीचे आदेश काढले आहेत व तशी कार्यवाही सुरु केली आहे. कर्मचारी वर्ग प्रशिक्षित नव्हता तो प्रशिक्षित करण्यासाठी वेळोवेळी प्रशिक्षणवर्ग आयोजित केले आहेत. सनदी

लेखापालांची नेमणूक करुन त्यांच्याकडून सगळया लेख्यांचे लेखा परीखण करुन घेण्यात येत आहे. त्यामुळे लेख्यांमध्ये बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे.

**४१.१५** लेख्यांमध्ये बऱ्यापैकी सुधारणा झाली आहे पण त्याबाबतचा अनुपालन अहवाल महालेखाकारांना अद्यापपर्यंत दिलेला नाही.

**४१.१६** महालेखाकारांना अनुपालन अहवाल कां दिला नाही? म्हाडा सारख्या एवढयामोठया विभागाकडून लेखे व्यवस्थित ठेवले जात नाहीत तसेच कर्मचारी वर्ग कमी आहे, शासनाच्या नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे लेखे ठेवावेत अशा स्वरुपाचे मार्गदर्शक तत्वे व गाईडलाईन्स दिल्या होत्या काय? याबाबतीत वित्त विभागाचे मत विचारले असता वित्त सचिवांनी सांगितले की, वित्त व लेखा विभागाने लेखे ठेवण्याची पध्दत विहित केलेली आहे. त्या पध्दतीने लेखे ठेवणे गरजेचे होते. महालेखाकारांनी अधोरेखित केल्याप्रमाणे मंडळामार्फत ठेवण्यात येणारे लेखे विहित नमुन्याप्रमाणे ठेवण्यात आलेले दिसत नाहीत. तसेच राजकोष नियमाप्रमाणे लेखे कसे ठेवावेत याचा विहित नमूना ठेवण्यात आलेला आहे. त्यानुसार म्हाडाकडून आणि म्हाडाच्या अधिपत्याखालील विविध मंडळाकडून लेखे ठेवण्यात कसूर झालेली आहे.

**४१.१७** लेखे ठेवण्यात कसूर झालेली असली तरी त्यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे. म्हाडाने लेख्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसची नियुक्ती केलेली आहे व त्यादृष्टीने वर्षभर काम सुरु आहे. तेव्हा त्यांना नेमका वेळ देऊन, त्यावेळेत समितीला हवी ती माहिती त्यांच्याकडून मागवून घेण्यात यावी, अशी सूचना समितीने केली. तसेच

**४१.१८** दहा वर्षापासून म्हाडाच्या लेख्यामध्ये नकारार्थी शेरे दिलेले असताना वित्त विभागाने वारंवार म्हाडाला मदत केलेली आहे. लेख्यामध्ये नकारार्थी शेरे दिलेले असताना म्हाडाला मदत करण्याऐवजी शासनाला मदत करावी असे वित्त विभागाला कां वाटले नाही? वित्त विभाग लेख्याच्या नोंदी बघत नाही काय? याबाबत खुलासा करताना वित्त सचिवांनी सांगितले की, वित्त विभागाकडे लेखे येत नाहीत व लेखे कसे ठेवावेत याबाबतीत वित्त विभागाने विशिष्ट पध्दत घालून दिलेली आहे.

**४१.१९** वित्त विभाग अर्थसंकल्प तयार करताना वेगवेगळया विभागांचे उत्पन्न स्थान बघूनच निधी मुक्त करतात. शासनाच्या वतीने महामंडळाला अंशदान द्यावे लागणार आहे त्यावेळी महालेखाकारांनी त्यांचे लेखे का पाहिले नाहीत? तसेच महालेखाकार दहा वर्षापासून

नकारार्थी शेरे देत असतांना वित्त विभागाने म्हाडाला दहा वर्षापासून मदत केलेली आहे ती चुकीची आहे याबाबत वित्त विभागाची काहीच जबाबदारी नाही काय? वित्त विभागाने म्हाडाला ज्या योजनांसाठी पैसे दिले आहेत ते पैसे त्याच कामासाठी वापरले आहेत काय हे बघितले आहे काय? या संदर्भात वित्त सचिवांनी सांगितले की, याबाबत लक्ष दिले गेले नाही. यामध्ये वित्त विभागाची चूक आहे. यासंबंधीची चौकशी करुन सगळे व्यवस्थित करण्याचा प्रयत्न करु.

**४१.२०** पैसे देताना या गोष्टी बघितल्या गेल्या नाहीत काय? म्हाडामध्ये कोणतीही लेखा पद्धती व्यवस्थित ठेवली जात नाही म्हणून कोणत्या रकमा कुठे ठेवल्या आहेत याच्या नोंदी सापडत नसतील तर याबाबतीत फौजदारी गुन्हा दाखल करता येईल काय? असे समितीने विचारले असता वित्त सचिवांनी सांगितले की, अभिलेख्यावरुन तरी पैसे दिले आहेत हे बघितले आहे असे वाटत नाही व म्हाडामध्ये लेख्यांमध्ये नोंदणी सापडत नसल्याबाबत फौजदारी गुन्हा दाखल करण्यात आला आहे काय? या संदर्भात वित्त विभागास काही सांगता येणार नाही असे वित्त सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.२१** म्हाडाच्या लेखा पद्धतीला वाणिज्यिक लेखापद्धत लागू होते. म्हाडाने शासनाच्या नियमाप्रमाणे नोंदी ठेवल्या नाहीत असा महालेखाकारांचा अहवाल आहे. त्यामुळे कायदेशीररीत्या दुर्विनियोग/अफरातफर झालेली आहे. शासनाने जे पैसे दिलेले आहेत त्या रकमा कुठे खर्च झाल्या आहेत याचा पत्ता लागत नाही अशा प्रकारची अनियमितता झाली असेल तर त्याबाबतीत फौजदारी गुन्हा दाखल करता येईल काय? असे समितीने विचारले असता वित्त सचिवांनी समितीस सांगितले की, यामध्ये दुर्विनियोग/अफरातफर दिसत नाही व विभागीय सचिवांनी सांगितले की, नोंदी व्यवस्थित नाहीत म्हणून अपहार झालेला आहे असा निष्कर्ष काढावा अशी परिस्थिती नाही. नोंदी ज्या पध्दतीने व्हावयास पाहिजे होत्या त्या पध्दतीने न झाल्यामुळे उदा. ३ वर्षापूर्वीचे ठेव (Deposit) त्या व्यक्तीला परत केली असली तरी चालू वर्षाच्या खात्यावर नुसती रक्कम परत केल्याचे दिसते, परंतु त्याची नोंद तीन वर्षा पूर्वीच्या नोंदणी वहीमध्ये केलेली दिसत नाही.

**४१.२२** म्हाडाचे काम वाणिज्यिक आहे. म्हाडा जी घरे बांधतात आणि विकतात हे काम कमर्शिएल आहे. त्यामुळे वाणिज्यिक स्वरुपाप्रमाणे आपले (Commercial Pattern) लेखे ठेवले पाहिजेत. नियमाप्रमाणे त्याचे लेखापरिक्षण झाले पाहिजे. पण म्हाडाने अंतर्गत लेखापरिक्षणसुध्दा केलेले नाही. तसेच लेख्याच्या नोंदी व्यवस्थित ठेवण्यात आलेल्या नाहीत.

सन २००१-२००२ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचा सन १९९४-१९९५ च्या लेखे अहवालाच्यासंदर्भात लोकलेखा समितीच्या सातव्या अहवालामधील निष्कर्षामध्ये पृ.क्र. ७४ वर या सर्व परिच्छेदांचे विश्लेषण करुन घेतांना असे सांगितले आहे की, "म्हाडामध्ये लेखापरीक्षण अधिकारी नेमून त्यांच्या हाताखाली वित्तीय बाबींबाबत सखोल माहिती असणारा पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा व सक्षम अशी अंतर्गत लेखा परीक्षण व्यवस्था म्हाडामध्ये निर्माण करण्यात यावी तसेच, म्हाडामध्ये सर्व कर्मचा-यांना लेखा व्यवस्था ठेवण्याबाबत प्रशिक्षण देण्यात यावे " अशी समितीची शिफारस आहे. ही शिफारस लोकलेखा समितीने सन २००१-२००२ मध्ये विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहास सादर केलेल्या सातव्या अहवालातील असून आज सन २००९ साल उजाडले असताना तरी देखील या संदर्भात ठोस कार्यवाही केलेली नाही. त्या शिफारशीसंदर्भात आपल्या विभागामध्ये सन २००१ पासून सन २००९ पर्यंत कोणकोणत्या प्रकारची हालचाल झालेली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, सन २००१-२००२ च्या समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र गृहनिर्माण विकास मंडळामध्ये लेखापरीक्षण पथक स्थापन करावे, असे म्हटले असून त्यानुसार विभागाने एक महिन्यापूर्वी अंतर्गत लेखापरीक्षण पथक स्थापन केलेले आहे.

**४१.२३** सन २००१ -२००२ मध्ये केलेल्या शिफारशींच्या दृष्टीने सन २००९ मध्ये अंमलबजावणी करण्यात आली. या करिता एवढा विलंब का लागला ? व या संदर्भात समितीने सहा स्मरणपत्रे पाठवल्यानंतर विभागाने या बाबीची नोंद घेतलेली आहे. याबाबत खुलासा करताना वित्तीय नियंत्रक म्हाडा यांनी सांगितले की, म्हाडामध्ये वित्तीय नियंत्रक म्हणून त्यांनी गेल्यावर्षी चार्ज घेतल्यानंतर ही शिफारस पाहिली त्यावेळी हे पथक स्थापन करण्याच्या दृष्टीकोनातून प्रयत्न सुरु केले.

**४१.२४** म्हाडाच्या लेखे ठेवण्याच्या पध्दतीमध्ये लोकलेखा समितीच्या अहवालात केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करण्यास व त्याबाबतची माहिती पाठविणे दुर्लक्ष आणि विलंब झालेला आहे. यासाठी विभागाने एक "रोड मॅप " तयार करुन त्यामध्ये येत्या एक वर्षात महालेखाकारांनी दाखविलेल्या अहवालामध्ये ज्या उणीवा राहिलेल्या आहेत त्या दृष्टीकोनातून हा "रोड मॅप " म्हाडाला एक प्रकारे वळण घालून देईल. वर्षभर या मॅपनुसार अंमलबजावणी केल्यानंतर सन २०१० च्या शेवटपर्यंत ही व्यवस्था व्यवस्थित झाल्याचे निदर्शनास येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी दिली.

**४१.२५** विभाग जो रोडमॅप बनवणार आहे त्या संबंधीचा एक बृहत आराखडा समितीच्या अहवालात सादर करावयाचा असल्याने त्या दृष्टीने विभाग काय करणार आहे? याबाबतची माहिती समितीस देण्यात यावी असे निदेश समितीने विभागास दिले असता या समितीची लेखा परिक्षण पध्दत व्यवस्थित करण्याच्या दृष्टीकोनातून एक कालबध्द कार्यक्रम समितीपुढे लवकरात लवकर सादर करण्यात येईल असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**४१.२६** विभागीय सचिवांनी म्हटल्याप्रमाणे या हिशोबाच्या संदर्भात ते एक रोड मॅप लवकरात लवकर तयार करुन देणार आहेत. तो रोड मॅप अंमलात आणण्यासाठी साधारणत: एक वर्षाचा कालावधी जाईल, असे सांगितले परंतु त्या मॅपचा एक बृहत आराखडा एका महिन्याच्या आत समितीला सादर करण्यात यावा. यासंदर्भात म्हाडा, वित्त विभागाचा एक अधिकारी, लोकलेखा समितीचा एक अधिकारी अशा प्रकारे सर्वांनी मिळून हे काम केले तर यासंदर्भात अहवाल सादर करणे सोपे जाईल, असे समितीने विभागास सांगितले असता लेखे नीट ठेवण्यात आलेले नसल्यामुळे माहिती मिळविण्यामध्ये अडचणी निर्माण झालेल्या आहेत. तेव्हा सध्याच्या व्यवस्थेमध्ये सुधारणा केल्याशिवाय परिणाम मिळणार नाहीत. मी मघाशी कबूल केल्याप्रमाणे रोड मॅप तयार करण्यात येईल. त्यासाठी गृह निर्माण विभागाची मदत घेण्यात येईल. जो मॅप तयार करण्यात येईल तो महालेखाकार यांना आणि वित्त विभागाला दाखविण्यात येईल त्यानंतर तो समितीला सादर करण्यात येईल, असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

**४१.२७** म्हाडाची लेखापरीक्षण पध्दती किंवा लेखे पध्दती सदोष असल्याचे विभागीय सचिवांनी मान्य केलेले आहे. सन २००१-२००२ च्या लोकलेखा समितीच्या शिफारशींवर अंमलबजावणी होण्याकरिता सात वर्षाचा विलंब लागला हेही मान्य केलेले आहे. परंतु लोकलेखा समितीच्या शिफारशींवर कोणतीही कार्यवाही न होण्यास नेमके कोण जबाबदार आहे ? तसेच अशा जबाबदार व्यक्तीविरुध्द कोणती कारवाई करणार आहे ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, ज्या स्तरावर या सर्व गोष्टी घडल्या त्याची माहिती घेऊन संबंधित अधिका-यास निश्चितपणे जाब विचारण्यात येईल. सदरहू जबाबदार व्यक्तिस लोकलेखा समितीच्या शिफारशींवर कोणत्याही प्रकारची कारवाई इतकी वर्ष का करण्यात आली नाही? यासंदर्भात विभागातर्फे खुलासा विचारण्यात येईल.

**४१.२८** सन २००१-२००२ च्या लोकलेखा समितीच्या सातव्या अहवालातील शिफारशीसंदर्भातील फार मोठी जबाबदारी समितीने विभागावर सोपविली आहे. ताळेबंद भरण्यामध्ये लेखा परिक्षणाच्या पध्दतीमधील बाबीसंदर्भात या अहवालामधील शिफारशींच्या अंमलबजावणीसंदर्भातील माहिती का घेतलेली नाही? याची नोंद विभागाने घ्यावी. यासंदर्भातील वस्तुस्थिती आपल्या नजरेस आणून द्यायला हवी म्हणून त्यामध्ये असे म्हटले होते की, मुंबईतील म्हाडा कार्यालयात ९० टक्के संगणकीकरण झालेले आहे. त्यामुळे सर्व लेख्यांचे एकत्रिकरण झालेले असेल. मुंबईव्यतिरिक्त असलेल्या इतर ठिकाणी ६० टक्के संगणकीकरण झालेले आहे. सन २००१-२००२ चे लेखे संगणकावर येतील यादृष्टीने मंडळाचा प्रयत्न आहे. हे संगणकीकरण आणि नवीन लेखापरीक्षण पथक नेमून एक वर्षाचा कालावधी लोटलेला आहे. हे कंत्राट टी.सी.एस.ला दिलेले आहे. यासंदर्भात माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, मुंबई म्हाडाअंतर्गत जी कार्यालये आहेत तसेच मुंबई व्यतिरिक्त जी कार्यालये आहेत, त्यामध्ये एकूण ६० टक्के संगणकीकरण झालेले आहे. मुंबई वगळून उर्वरित म्हाडा कार्यालयामध्ये लेखे ठेवण्याची पध्दत सदोष असून लेखापरीक्षण करणारा जो कर्मचारी वर्ग आहे तो सुध्दा कमी आहे.

**४१.२९** म्हाडा लेख्यांचा हिशोब ठेवण्याकरिता सर्व म्हाडांच्या कार्यालयांमध्ये ई.आर.पी. ही पध्दत अवलंबित आहेत. परंतु ही पध्दत अद्ययावत करण्याचे कंत्राट म्हाडाने कोणाकडे दिलेले आहे? याबाबत माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, ही पद्धत अद्ययावत करण्याचे कंत्राट म्हाडाने टी.सी.एस.ला एक वर्षापासून दिलेले आहे. यासंदर्भातील प्रोग्रॅमिंग चालू असून त्याकरिता अजून सहा महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

ई.आर.पी पद्धत करण्याकरिता टी.सी.एस.ला एक वर्षाचा कालावधी म्हाडाने देऊनसुध्दा त्यांच्याकडून प्रोग्रामिंग कामाकरिता अजून सहा महिन्यांचा कालावधी लागेल, असे विभागाने सांगितले असता एक वर्षाच्या कालावधीमध्ये मुंबईच्या म्हाडा कार्यालयामध्ये हिशोब ई.आर.पी करुन होत नाही. एका वर्षामध्ये संपूर्ण राज्याचा हिशोब ई.आर.पी.मध्ये बसवून होतो, असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले. या सर्व गोष्टींचे नियंत्रण संगणक विभाग करीत असते असे विभागीय प्रतिनिधींने सांगितले. परंतु संविधानिक समितीसमोर उत्तर देण्याची ही विभागाची पध्दत योग्य नाही. समितीसमोर साक्षीला येतांना विभागाने संबंधित बाबींची सविस्तर माहिती घेऊन येणे अभिप्रेत आहे अशी सूचना समितीने विभागास केली.

**४१.३०** लेख्यांच्या हिशोबासंदर्भात पुण्याची काय परिस्थिती आहे ? असे समितीने विचारले असता जिल्हाधिकारी, पुणे यांनी ई.आर.पी.सिस्टिम पुणे येथे लागू करण्याचे काम पूर्ण झालेले नाही, असे सांगितले.

**४१.३१** लेखापरीक्षणाच्या संदर्भात महालेखाकारांनी जे मुद्दे काढलेले आहेत त्यात म्हाडामध्ये अंतर्गत लेखापरीक्षण पध्दती नाही, मूळ अभिलेखे उपलब्ध नाहीत, यासंदर्भातील जे काही अभिलेखे उपलब्ध होते ते परिपूर्ण नसल्यामुळे महालेखाकार यांना ते पडताळणी करणे शक्य झाले नाही. सन २००१-२००२ च्या शिफारशींमध्ये असेही म्हटलेले आहे की, अशा स्वरुपाची शिफारस समितीने सन १९९६-१९९७ मध्येही केलेली होती. त्यांच्या दायित्वाचा अभिलेख ठेवलेला नाही. यासंदर्भाने म्हाडाने कधीही ही बाब तपासून पाहिली नाही. आज म्हाडाकडे किती मालमत्ता आहे, म्हाडाकडे एकूण किती रक्कम येणे बाकी आहे तर हेही म्हाडाला सविस्तरपणे लेख्यांच्या आधाराने सांगता येणार नाही. म्हाडाच्या एवढया मालमत्ता, इमारतींच्या संदर्भातील येणे व देणे यासंदर्भातील हिशोब म्हाडाला पूर्णपणे व सविस्तर करण्याकरिता लेखापरीक्षण पध्दत सदोष असणे आवश्यक आहे. ही सदोष लेखापरीक्षण पध्दती निर्दोष करण्यासाठी परिश्रम केले पाहिजे. म्हाडाकडे सर्व अभिलेख्यांचे जे वर्गीकरण केलेले आहे तेही चुकीच्या पध्दतीने करण्यात आलेले आहे, असे महालेखाकार यांचे म्हणणे आहे. या अभिलेख्यांचे वर्गीकरण योग्य रितीने झालेले नाही, असे मत समितीने व्यक्त केले.

**४१.३२** सन १९९५ पासून लोकलेखा समितीचे सर्वच सदस्य या समितीमध्ये कार्यरत आहेत. परंतु समितीने आतापर्यंत असे कधीही पाहिले नाही की, म्हाडाची हिशोबाची पध्दत सदोष आहे व मालमत्तेसंदर्भातील व इतर अभिलेखे उपलब्ध नाहीत. अभिलेख्यांचे वर्गीकरण योग्य रितीने न होणे ही बाब आक्षेपार्ह असून त्यासंदर्भात सखोल चौकशी होऊन त्यानुसार उपाययोजना निश्चित करणे अत्यंत आवश्यक आहे. अंतर्गत लेखापरिक्षण पद्धत कमजोर नसून पूर्ण विंगच कार्यान्वित नसल्याची तक्रार महालेखाकार यांनी या ठिकाणी केलेली आहे. मूळ अभिलेखे ठेवले जात नाही. महालेखाकार यांना मालमत्ता व इतर अभिलेख्यासंदर्भात जी अनियमितता आढळून आली त्यासंबंधी त्यांनी यामध्ये काही शेरे दिलेले आहेत आणि अनेक म्हाडाच्या मालमत्तेच्या दायित्वाच्या संदर्भाने यथायोग्य नोंद ठेवण्यात आलेली नाही. मालमत्ता नोंदवहीमध्ये म्हाडाकडे मालमत्तेच्या नोंदी आहेत की नाही ? उदा. मालमत्ता नोंदवहीमध्ये नोंद असल्यास म्हाडाच्या एखाद्या मालमत्तेवर अतिक्रमण झालेले आहे की, कोणी ताब्यात घेतली

होती की घेतलेली नाही, हे लक्षात येईल. महाराष्ट्र गृहनिर्माण विभागाकडे मुलभूत अभिलेखे नाही, मालमत्तेच्या नोंदी नाहीत, हिशेबाची पध्दत सदोष आहे. हा विभाग सर्वसामान्य नागरिकांना मदत करणारा महत्वाचा विभाग असल्यामुळे म्हाडाची काम करण्याची पद्धत भुषणावह नाही, असेही मत समितीने नाराजीने व्यक्त केले.

**४१.३३** शासनाच्या सगळयाच विभागात लेखे ठेवण्याची पद्धत एक सारखी असते. त्या पध्दतीने लेखे ठेवले जातात परंतु गृहनिर्माण विभागात तसे झालेले दिसून येत नाही. एखाद्या खाजगी कंपनीमध्ये सुध्दा जो व्यवस्थापक असतो तो सगळे अभिलेखे ठेवत असतो. परंतु आपल्याकडे तसे काहीही केल्याचे दिसून येत नाही. परंतु आतापर्यत ज्या काही त्रृटी राहिल्या आहेत त्या त्रृटीस कोण जबाबदार आहे हे शोधून काढून त्याच्याविरुध्द कारवाई करावयास पाहिजे. कोणालाही त्रास द्यावा असा समितीचा हेतू नाही. परंतु शासनाने जी काही पध्दत ठरवून दिलेली आहे त्यानुसार काम होते किंवा नाही हे पाहणे महत्वाचे आहे आतापर्यत अभिलेखे का ठेवला नाही याची शहानिशा करुन विभागाअंतर्गत अनुपालन अहवाल तयार केला पाहिजे. तो अहवाल समितीला सादर केला नाही तरी चालेल. ही जुनी बाब असल्यामुळे यातील काही कर्मचारी, अधिकारी सेवा निवृत्त झालेले असतील वा काही जणांचा मृत्यू देखील झाला असेल तेव्हा गेल्या पाच वर्षाच्या संदर्भात अनुपालन अहवाल तयार करणे आवश्यक आहे.

**४१.३४** या कामासाठी विभागाने एखाद्या वरिष्ठ अधिका-याची नेमणूक करावी. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्र विकास प्राधिकरणाच्या सन १९९५-९६ ते २०००-२००१ सालापर्यतच्या अहवालासबंधी आजच्या बैठकीत प्रत्येक परिच्छेदावर समितीने चर्चा केलेली नाही. महालेखाकारांकडून सारख्याच स्वरुपाचे जे आक्षेप काढण्यात आले होते त्याबाबतीत फक्त समितीने चर्चा केली होती. आता विभाग रोड मॅप तयार करणार आहे. विभागातील कारभाराला चांगल्या प्रकारचे वळण लागेल या दृष्टीने आपण नवीन यंत्रणा आखावी . आपल्या सगळया मंडळातील अधिकारी, महालेखाकार कार्यालयातील अधिकारी, यांनी एकत्र बसून काय सुधारणा करता येतील हे ठरवावे. दहा मंडळातील अधिका-यापैकी कोणी तरी या चुकीस जबाबदार असले पाहिजे तेव्हा त्यास कोण जबाबदार आहे हे सुध्दा पहावे. आपण जो अहवाल दिलेला आहे त्यात दुरुस्ती करुन एक महिन्यात अहवाल देण्यात यावा जेणे करुन याबाबतीत काही प्रश्न राहणार नाहीत तसेच मालमत्तेचे अभिलेख देखील ठेवण्यात आलेले नाही.

मंडळाला किती देणे आहे वा किती घेणे आहे याचा देखील कोठे उल्लेख करण्यात आलेला नाही तेव्हा त्याही बाबतीत योग्य ती दखल घेण्यात यावी अशी सूचना समितीने केली.

**४१.३५** समितीच्या दिनांक २४ फेब्रुवारी, २००९ च्या बैठकीत विभागाकडून समाधानकारक उत्तरे न मिळाल्यामुळे दिनांक १२ ऑक्टोबर, २०१० रोजी सचिव गृहनिर्माण विकास व विभागीय प्रतिनिधींशी पुन्हा साक्ष घेण्यात आली. सदर साक्षीच्या वेळी, महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांचे सन १९९५-१९९६ ते सन २००५-२००६ या वर्षाच्या अहवालाच्या संदर्भात ज्ञापने पाठविण्यात विलंब का झाला? असे समितीने विचारले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, लोकलेखा समितीची बैठक दि.२४ फेब्रुवारी, २००९ रोजी झ ाली होती. सदर बैठकीमध्ये सन १९९५-१९९६ ते सन २००१ पर्यंतच्या पाच वर्षांच्या लेखा परिच्छेदामध्ये फार गंभीर प्रकारच्या त्रुटी व उणिवा निदर्शनास आणून देण्यात आल्या होत्या. त्यामुळे यामध्ये वर्षानुवर्षे ज्या त्रुटी महालेखाकारांच्या निदर्शनास येतात त्यामध्ये दुरुस्त्या करण्याच्या दृष्टिकोनातून एक रोड-मॅप तयार करुन कार्यवाही करण्यात यावी, अशा प्रकारचे निर्देश समितीने दिले होते. त्याप्रमाणे रोड-मॅप तयार करुन कार्यवाही करण्यात येत आहे.

**४१.३६** महालेखाकारांबरोबर लेख्यांचे मेळ झाले आहे काय? व ज्या कालावधीतील हे लेखा परिच्छेद आहेत त्या कालावधीतील अधिकारी आता आहेत काय? याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, पहिल्या पाच वर्षाचे खर्चाचे मेळ झालेले आहे. दुसऱ्या पाच वर्षाचे खर्चाचे मेळ प्रलंबित आहेत. दहा वर्षापासून अत्यंत महत्वाचे मुद्दे होते. त्यासंदर्भात रोड-मॅप तयार करण्यात आला आहे.

**४१.३७** स्पष्टीकरणात्मक ज्ञापने समितीस पाठविण्याबाबत गृहनिर्माण विभाग मागे राहिला आहे. बाकीच्या विभागाचे हे काम सन २००७-२००८ पर्यंत पूर्ण होत आलेले आहे. कमीतकमी वेळेत महालेखाकारांबरोबर खर्चाचे मेळ करुन घेण्यात यावे, अशी सूचना समितीने केली असता स्पष्टीकरणात्मक ज्ञापनांची माहिती समितीस पाठविण्याबाबत व महालेखाकारांबरोबर रिकन्सिलेशनचे काम पूर्ण करण्यास विभागास तीन महिन्याचा कालावधी देण्यात यावा, अशी विनंती विभागीय सचिवांनी समितीस केली.

**४१.३८** तीन महिन्याच्या कालावधीची विनंती समितीने मान्य केली. पण तीन महिन्यानंतर कोणतेही कारण देऊन चालणार नाही. तीन महिन्यानंतर जेव्हा समितीसमोर साक्षीसाठी बोलावण्यात येईल तेव्हा पूर्ण तयारीनिशी यावे. तसेच संबंधित कालावधीतील

जबबादार अधिकाऱ्यांना समितीसमोर साक्षीसाठी बोलावण्यात यावे, जेणेकरुन समितीला समाधानकारक उत्तरे मिळतील असे निदेश समितीने विभागीय सचिवांनी दिले.

**४१.३९** म्हाडामध्ये जी चुकीची पध्दत होती त्याबाबतीत एकूण दहा मुद्दे काढण्यात आले आहेत. एखाद्या योजनेच्या कामावर खर्च करण्यात येतो. त्यामध्ये गाळे बांधण्यासाठी खर्च करण्यात आलेली किंमत आणि गाळयांची विक्री केल्यानंतर आलेल्या पैशाची नीट व्यवस्था करण्यात येत नव्हती. १०० रुपये खर्च केले तर ६ रुपये मिळाले आणि ९४ रुपये डिपॉझिटमध्ये दाखविण्यात येत होते. आता या बाबतीत बऱ्याच प्रकारचे अभिलेख ठेवण्यात करण्यात येत आहेत. जसे की ठेव नोंदवही, किरकोळ नोंद वही (Miscellaneous Register) ठेवण्यात येत आहे. तसेच संगणकीकरणाचा महत्वाचा मुद्दा होता. त्याबाबतीत म्हाडाने ठराव करुन तो शासनाच्या मान्यतेसाठी पाठविला आहे. संगणकीकरणाच्या बाबतीत मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली उच्चधिकार समिती नियुक्त करण्यात आली आहे. नियोजन विभागाचे सचिव व माहिती व तंत्रज्ञान विभागाच्या सचिवांनी काही मुद्दे काढले होते. सदर ठराव आता माननीय मुख्यमंत्र्यांच्या स्तरावर आहे. त्यांची लवकरात लवकर मान्यता घेऊन कामाला सुरुवात करण्यात येईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**४१.४०** The Department should give us reply at least 3 days prior to the meeting. It should not happen that the meeting is tomorrow and the reply is given a day before the meeting. I think before the meeting of the Public Accounts Committee, the officials from our office and your office should meet together and discuss the issues involved असे मत महालेखाकारानी व्यक्त केले असता We will ensure that the reply is sent to you in a 2 & ½ months time. We will have a discussion before the meeting of the Public Accounts Committee असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

**४१.४२** प्रधान महालेखाकार, मुंबई यांनी म्हाडाच्या कार्यपद्धती संदर्भात पुढील मुद्दे समितीच्या निदर्शनास आणून दिले.

**४१.४३** There are major and persistent irregularities noticed during the audit of MHADA, some of which I would like to point out here. The first issue is that the Deposits amounting to Rs.445.14 crores pertaining to various Boards could not be verified for want of records. The second issue is in respect of Mumbai Board.

The balance as per Cash Book was Rs.1299 lakhs but balance as per Bank Deposit was Rs.569 lakhs. The third issue is that the Accounts depicted a credit balance of Rs.8012 crore and debit balance Rs.7949 under remittances pertaining to the previous years awaiting clearance. The next issue is that about Bank Reconcilliation. Bank Reconciliation was in arrears in many cases. In cases where reconciliation has been done, no efforts were taken to settle the discrepancies. Similarly, transactions amount be sorted out.

**४१.४४** महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्दयांबाबत विभागाने महालेखाकारांबरोबर एक बैठक घेऊन महालेखाकारांनी जे मुद्दे दिलेले आहेत ते दूर (Clear) करण्यात यावेत, असे निदेश समितीने विभागास दिले.

**४१.४५** म्हाडाला डिपॉझिटचे ४०० कोटी रुपये मिळत नाहीत. याचे कारण म्हाडाच्या मूळ विभागाने त्यांना पाहिजे त्या बँकेत हे पैसे डिपॉझिट ठेवलेले आहेत. पैसे कोणत्या बँकेत डिपॉझिट ठेवावयाचे हे एका अधिकाऱ्याच्या निर्णयावर अवलंबून ठेवले आहे. त्याऐवजी निविदा काढून पैसे डिपॉझिट करण्यास परवानगी देण्यात यावी अशी सूचना समितीने केली असता एका अधिकाऱ्याच्या निर्णयानुसार पैसे डिपॉझिट ठेवले जात नाहीत. या संदर्भात म्हाडाने ठराव करुन तरतूद केलेली आहे त्याप्रमाणे तीन-चार अधिकाऱ्यांची एक समिती नियुक्त केलेली आहे. ही समिती बँकाकडून सीलबंद पत्राद्वारे दर मागविते आणि ते सीलबंद पत्रके सर्व बँकासमोर उघडण्यात येतात अशी माहिती विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिली.

**४१.४६** ही पध्दत केव्हा पासून सुरु करण्यात आली आहे? असे समितीने विचारले असता ही पद्धत चार वर्षापूर्वीची सुरु केली आहे. म्हाडा सीलबंद पत्राद्वारे दर मागवित असल्यामुळे या सगळया कामात पारदर्शकता आहे. तसेच एका बँकेकडे एक कोटी रुपयाच्यावर पैसे डिपॉझिट ठेवले जात नाहीत. सगळे पैसे एकाच बँकेकडे डिपॉझिट ठेवून धोका पत्करण्यात येऊ नये असे सांगण्यात आले आहे. तसेच यासंदर्भात सगळया प्रकारच्या टिप्पण्या होऊन माहिती अवगत केली जाते. आणि प्राधिकरणाच्या बैठकीत त्रैमासिक अहवाल सादर करण्यात येतो. गेल्या दोन वर्षापासून लॉटरी पध्दतीच्या संदर्भात टेंडर बोलावण्यात येत आहे व मागच्या वेळी सारस्वत बँकेचा सव्वा सहा रुपये दर आला होता त्यामुळे त्यांना हे काम देण्यात आले होते असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**४१.४७** याबाबत माहिती देताना विभागीय सचिवांनी सांगितले की, डिपॉझिटची रक्कम ९० दिवस असते. त्यामुळे तेवढया कालावधीसाठी सर्वात जास्त दर कोण देणार याबाबतीत टेंडर मागविले जाते. अर्ज केल्यापासून लॉटरी काढण्याच्या दिनांकापर्यत असे ९० दिवसाचे टेंडर काढण्यात येते. टेंडरमध्ये ज्यांचा जास्तीत जास्त दर येईल त्याप्रमाणे त्यांच्याकडे डिपॉझिटचे पैसे ठेवण्यात येतात.

**४१.४८** मुंबईमध्ये विस्थापितांना तात्पुरते घर देण्यासाठी संक्रमण शिबिर बांधण्यात आलेली आहेत. मुंबईमध्ये विकास नियंत्रक नियमावलीतील नियम वापरुन गृहनिर्माण खात्याने वेगवेगळया योजना तयार केल्या आहेत. परंतु या संक्रमण शिबिरामध्ये लोक घुसखोरी करतात त्यामुळे ही संक्रमण शिबिरे देण्यात येऊ नयेत, अशा प्रकारचा निर्णय लोकलेखा समितीने घेतला होता, तो मागे घेणे गरजेचे आहे. विस्थापितांसाठी ही संक्रमण शिबिरे देणे आवश्यक आहे असे समितीने सुचविले असता एस.आर.ए. योजना पुढे जात नव्हती. त्यामुळे एस.आर.ए. योजनेला चालना देण्यासाठी म्हाडाकडे असलेली संक्रमण शिबिरे उपलब्ध करुन देण्याचा निर्णय घेण्यात आला होता. पण एस.आर.ए.च्या काही योजना रखडल्यामुळे एस.आर.ए. योजनेसाठी देण्यात आलेले संक्रमण शिबिरे म्हाडाकडे परत आले नाहीत. त्यामुळे म्हाडाची अकरा कोटी रुपयांची थकबाकी राहिली होती. त्यामुळे संक्रमण शिबिरे देण्यात येऊ नयेत, असा निर्णय लोकलेखा समितीच्या मागील बैठकीत घेण्यात आला होता असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.४९** लोकांना तात्पुरते राहण्यासाठी संक्रमण शिबिरे दिले तर ते परत घेतले पाहिजेत. पण नंतर लोक कोर्टात जातात त्यामुळे संक्रमण शिबिरेबांधण्याचा हेतू साध्य होत नाही. तसेच संक्रमण शिबिरेमध्ये घूसखोरी होत असल्यामुळे लोकलेखा समितीने संक्रमण शिबिरेदेण्यात येऊ नये असा निर्णय घेतला होता. परंतु यासंबंधी विभागाने एक धोरण तयार केलेले आहे. (परिशिष्ट १)

**४१.५०** तसेच विभागीय प्रतिनिधींनी याबाबत अधिक माहिती देताना समितीस सांगितले की, सन १९९५ ते सन २००२ या कालावधीत जवळपास ५६ विकासकांना ५५०० गाळे दिले होते. त्यापैकी १६०० गाळे द्यावयाचे राहिले आहे. पण सन २००२ नंतर हे बंद केले आणि दर महा त्याचा पाठपुरावा घेण्यात येतो. पुनर्वसनाचे काम सुरु झाल्यानंतर विभागाला सक्ती करता येणार नाही म्हणून पुनर्वसनाचे काम अगोदर पुर्ण करुन नंतर उर्वरित गाळ्यांचे वाटप

करण्यात येणार आहे. त्यामुळे परिस्थिती नियंत्रणात आलेली आहे. मिलच्या जागेवर जवळपास ३००० गाळे शासनाकडे असून पुढील २ वर्षात आणखी ३०० गाळे येणार आहेत. हे गाळे असेच पडून राहिले तर त्यात घूसखोर येण्याची शक्यता आहे. म्हणून डी.सी.रुल ३३ (६), ३३ (७), ३३ (८), ३३ (९), ३३ (१०) नुसार ज्या योजना शासन रावबविते त्या योजनांना चालना देण्याच्या अनुषंगाने कशा पद्धतीने मर्यादित /सिमित गाळे उपलब्ध करुन देता येतील यासाठी प्राधिकरणाची मान्यता घेऊन हे करता येईल.

**४१.५१** घूसखोर घुसण्यापेक्षा अशी घरे भाड्याने दिली तर आर्थिक फायदासुद्धा आहे. तसेच गाळे सुरक्षित राहू शकतात अशी सुचना समितीने केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, एकूण उपलब्ध असलेल्या संक्रमण गाळ्यांपैकी रिक्वायरमेंटसाठी किती गाळयांची गरज आहे तेवढे देऊ आणि बाकीचे संग्रही (stock) ठेवू. याबाबतीत नियम ३३ (५), ३३(६), ३३(७) आणि ३३(९) नूसार ज्या योजनांनूसार विकासक काम करतात त्यांनी मागणी केल्यानंतर त्यांना गाळे प्रोव्हाईड करावे लागतात.

**४१.५२** घुसखोरांच्या अनुंषगांने विचार केला तर जवळपास ५० टक्के घुसखोर आहेत. सन २००७-०८ मध्ये ही बाब निदर्शनास आली आहे. वर्षानुवर्षे हे लोक असेच तेथे राहत आहेत. म्हाडाच्या सर्व सेवा वापरतात आणि कोणत्याही प्रकारचा आकार देता येत नाही. म्हणून प्राधिकरणानेच निर्णय घेऊन या अनुंषगांने एप्रिल, २०१० पासून संक्रमण शिबिरातील गाळे दरमहा ३००० रुपये भाडयाने देण्याचा निर्णय घेतला असून त्यांची जवळपास मागणी आता त्याची ३५ कोटी पर्यंत वाढली आहे. कारण अगोदर ते लोक मोफत राहत होते आणि शासनाचा खर्च मोठया प्रमाणात होत असल्याने प्राधिकरणांने हा निर्णय घेतला.

**४१.५३** संक्रमण शिबिरातील गाळे ३ हजार रुपये भाडयाने दिले तर भविष्यात असे ही होऊ शकते की, भाडेकरु भाडे भरतो म्हणून त्यांना बाहेर काढू नये. त्यासाठी ते न्यायालयात जाऊन स्थगिती आणतील असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिंधीनी सांगितले की, वर्षानुवर्षे संक्रमण शिबिरात राहाणाऱ्या जानेवारी, २०१० या कालावधीत प्रपत्र (form) भरुन मास्टर लिस्टवर घेण्यात येईल. त्यांना म्हाडाचे गाळे वितरीत करण्यात येतील आणि ज्यावेळी मूळ मालमत्ता विकसित होईल त्यावेळी या मालमत्तेचे हक्क म्हाडाला दयावेत. अशा प्रकारे २५ वर्षापासून संक्रमण शिबीरात राहतात त्यांना कायम तत्वावर वर घरे देण्याचा धोरण म्हाडाने तयार केलेले आहे. यासाठी जवळपास १०,००० प्रपत्र आले त्यासंबंधी आतापर्यंत चार

वेळा सुनावणी झाली व त्यातून पात्र व अपात्र उमेदवार निश्चित होईल व अशा लोकांना म्हाडाचे घरे देण्याचे धोरण निश्चित केले आहे या माध्यमातून पुढील वर्षात पात्र व अपात्र उमेदवार निश्चित केले जातील.

**४१.५४** समितीला दिनांक २४ फेब्रुवारी, २००९ व दिनांक १२ ऑक्टोबर, २०१० रोजीच्या बैठकीत समाधानकारक उत्तरे न मिळाल्याने दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजी समितीने महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण यांच्या सन १९९५-१९९६ ते २००५-२००६ या वार्षिक लेखापरिक्षण अहवालासंदर्भात विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली.

**४१.५५** सदर साक्षीच्या बैठकीच्या वेळी समितीने बैठकीकरिता तयार केलेल्या प्रश्नावलीच्या अनुषंगाने समाधानकारक उत्तरे समितीला कमीत कमी वेळेत देण्याबाबतची सूचना विभागीय सचिवांना केली. समितीसमोर सन १९९५ पासूनचे लेखे तपासण्याचे कामकाज बाकी आहे हे योग्य नाही. मागील दोन बैठकामध्ये गृहनिर्माण विभागाकडून स्पष्टीकरणात्मक ज्ञापने विहीत वेळेत समितीस प्राप्त होत नाही तसेच समितीने विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहास सादर केलेल्या अहवालातील शिफारशीवरील माहिती सुध्दा विभागाकडून प्राप्त होत नाही. तसेच याबाबत विभागास वेळोवेळी स्मरणपत्र पाठवून सुध्दा विभाग याबाबत गंभीरपणे दखल घेत नसल्यामुळे समितीने नाराजी व्यक्त केली होती. तसेच महालेखाकारांनी म्हाडाला कळविण्यात आल्यानंतर त्याबाबतचा काहीही कम्प्लयान्स केलेला नाही याबाबतसुध्दा समितीने नाराजी व्यक्त केली होती.

**४१.५६** यासंदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, एका ठराविक वेळेमध्ये लेखे तयार करुन ते महालेखाकार यांच्याकडे मान्यतेसाठी सादर करणे आवश्यक असते. त्याप्रमाणे गृहनिर्माण विभागाकडून लेखे वेळेत सादर करण्यात आलेले नाहीत. सन २००६-०७ व सन २००७-०८ चे लेखे छपाईला गेले आहेत. ते लवकरात लवकर सादर केले जातील. सन २००८-०९ चे लेखे आता तयार होत आहेत. सन २००९-१० च्या लेख्यांच्या संदर्भात उपाध्यक्ष, म्हाडा यांना सूचना दिलेली आहे. येत्या ३ महिन्याच्या आत संबंधित प्राधिकरणाकडे मान्यतेसाठी सादर केले जातील व पुढील कार्यवाहीसाठी महालेखाकारांकडे सादर केले जातील. खरे तर प्रत्येक वर्ष संपल्यानंतर त्या वर्षीचे लेखे सादर करणे आवश्यक होते. मात्र तसे झालेले नाही.

**४१.५७** माहे फेब्रुवारी २००९ मध्ये समितीने ज्या वेळी साक्ष घेतली होती, त्या वेळी सन १९९५-९६ ते २००१ पर्यंतच्या लेख्यांचा विचार करण्यात आला होता. त्यावेळी असे लक्षात आले होते की, साधारणपणे ५ ते ६ वर्षाचे लेखे अपूर्ण आहेत तसेच पूर्वी ज्या चुका होत होत्या, त्याच चुका पुन्हा होत आहेत. त्यावेळी रोड मॅप तयार करण्याकरिता सूचना करण्यात आली होती. त्याप्रमाणे आता रोड मॅप तयार केलेला आहे. या रोड मॅप प्रमाणे १ ते १.५ वर्षे कार्यवाही केलेली आहे. सध्या विभागाकडे जी पध्दत आहे, त्यामध्ये काही सुधारणा करण्याची आवश्यकता आहे. चुकीच्या वर्गीकरणाच्या संदर्भात विचार करण्याची आवश्यकता आहे. मागील वेळी झालेल्या बैठकीमध्ये अशी सूचना करण्यात आली होती की, रोड मॅप प्रमाणे कार्यवाही करावी व कामाच्या संदर्भात महालेखाकार कार्यालयाशी संपर्क ठेवावा. तसेच प्रधान महालेखाकार यांनी काढलेल्या १० मुद्यांवर लक्ष देण्याची आवश्यकता आहे, असे समितीने विभागास सांगितले असता निश्चित मत्तेच्या (Fixed Assets) बाबतीत पडताळणी होत नाही, असे त्यामध्ये सांगण्यात आले होते. निश्चित मत्ते करिता खर्च केल्याचे दाखविले जाते.मात्र त्या रकमेचे निश्चित मत्ते आहे की,नाही याचे पडताळणी होत नाही. त्यामुळे रक्कम खर्च होऊनही मत्ता अस्तित्वात आहे की नाही हे कळू शकत नाही. तसेच कर्ज अग्रिमाची देखील पडताळणी झालेली नाही. बरेच आरक्षण (Reserve) तयार केलेले आहे. मात्र त्यावर कार्यवाही झालेली नाही. यामुळे हे आरक्षण अनावश्यक झालेले आहेत. या आरक्षणाची आवश्यकता नसेल तर ते बंद करण्याची कार्यवाही करणे आवश्यक आहे. सध्या कोटयवधी रुपयांच्या डिपॉझिटसची रक्कम पडून आहे. त्याची पडताळणी झालेली नाही. पडताळणी करण्यासाठी कोणती कागदपत्रे उपलब्ध आहेत हे प्रादेशिक अधिकारी यांनी पहावे व रोडमॅपप्रमाणे कागदपत्रांचा मेळ घालावा. या प्रमाणे दुरुस्ती करुन व सिस्टीममध्ये सुधारणा केलेली आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**४१.५८** महालेखाकारांनी दिलेल्या १० मुद्यावर विभागाने केलेल्या खुलाशाबाबत महालेखाकारांचे समाधान झाले आहे काय अशी विचारणा समितीने महालेखाकरांना केली असता महालेखाकारांनी सांगितले की,

**४१.५९** I would like to say that we had a meeting on 25th November, 2010 about the plan of action with the officials of the MHADA. We had discussed this point with them at length, as to how to come out with the audit mess. After that,

MHADA has taken certain steps to sort out this problem and how they have started the process. Sir, I am must complement MHADA for taking these steps. However, the fact is that it is not so simple to get out from this mess. Certain effective steps and things will have to be done in this direction. Now, they have started maintaining the Fixed Assets and Deposits Registers. But, so far, we have not seen the complete register. It is still not completed by them. नोंदवही कधीपर्यंत पूर्ण होईल याबाबत महालेखाकार यांच्याकडून विभागास विचारणा केली होती काय? असे समितीने विचारले असता महालेखाकारांनी सांगितले की, We have already asked about it to them. The reply was that within four months it will be completed.

**४१.६०** म्हाडाने नोंदवहीचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे असे निदेश समितीने विभागास दिले असता महालेखाकारांनी समितीस सांगितले की, After the completion of this work then only the Office of the Accountant General will be able to verify whether the work done by the MHADA is up to the mark or not.

**४१.६१** The Committee would like to know that who is looking after this work. The Committee would also like to know that whatever mistakes committed or done by the concerned officials have you taken any action against them. This issue will not be solved only by writing letters to them. In our view, some kind of punishment should be there, so that, such mistakes will not occur in future. And next time such mistakes will not be done by them. To check all these things, the Department or MHADA must evolve an Internal Audit System. Is there any system of Internal Audit and if so, अंतर्गत लेखापरीक्षणाचे कंत्राट कोणत्या कंपनीला देण्यात आले होते ? याबाबत खुलासा करताना विभागीय सचिवांनी सांगितले की, अंतर्गत लेखापरिक्षणाकरिता वेगळे विवरणपत्र देण्यास सांगितले आहे.संघवी कंपनीला अंतर्गत लेखापरीक्षणाचे कंत्राट देण्यात आले होते. त्यांच्या डयुटीमध्ये इंटरनल ऑडीटचा समावेश केलेला आहे.

**४१.६२** आता अंतर्गत लेखापरीक्षणाचे काम कोण पाहते ? याबाबत माहिती देताना म्हाडाचे वित्तीय सल्लागार यांनी सांगितले की, सन २००३-०४ या कालावधीमध्ये अंतर्गत लेखापरिक्षणाचे काम संघवी कंपनीकडे दिले होते. ही ऑडीटींग फर्म व्हीजीट देते व त्यांनी तयार केलेले मुद्दे विभागाकडे पाठविले जातात. त्यानुसार म्हाडाकडून पाठपुरावा केला जातो.

सन २०१० -११ या वित्तीय वर्षामध्ये ज्या त्रुटी उपस्थित केल्या होत्या त्यांची दुरुस्ती झाली असून आता लेखे तयार केले जातील. दुरुस्ती झाल्यामुळे, त्या बाबत आक्षेप येणार नाहीत. तसेच या पुढील काळात मिसक्लॅरीफिकेशन होऊ नये, याकरिता दुरुस्ती केली जाईल. त्या दृष्टीने अंतर्गत लेखापरीक्षणाच्या मार्फत योग्य ती कार्यवाही करण्याच्या संदर्भात सूचना देण्यात आलेल्या आहेत असेही विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.६३** म्हाडाच्या बँक ठेवींबद्दल महालेखाकारांनी मुद्दा उपस्थित केला व त्याबाबत त्यांनी समितीस सांगितले की, There are still some serious points to be cleared by MHADA. One point is about the Bank deposit. They have deposited an amount of Rs.43 crores in the Bank. However, either the entry of this deposit is not appearing in their passbook or the balance is not appearing in the Bank accounts. The Department may please explain about it to the Committee.

**४१.६४** यासंदर्भात समितीने विचारणा केली की, What is the position? Where that amount is deposited or to whom it is paid? As far as the point about Bank deposit is concerned, it should be deposited in the Bank and no one can keep it in his or her hand. If it is a petty cash then the Committee can understand. However, an amount of Rs.43 crores is not a minor amount. Why the entry of this deposit is not appearing in the passbook or the balance is not there in the Bank accounts? Who has deposited it in the Bank? Who is responsible for it? It is a very serious point.

**४१.६५** महालेखाकारांनी उपस्थित केलेल्या मुद्याच्या अनुषंगाने वित्तीय सल्लागार म्हाडा यांनी सांगितले की, बँक रिकन्सीलिएशनचा अनुशेष आहे. बँकेचे पास बूक व कॅश बूक ज्यावेळी मॅच होत नाही त्यावेळी प्रामुख्याने रिकन्सीलिएशन केले जाते. पास बुक व कॅश बुक मधील एन्ट्री तपासण्याची आवश्यकता असते. परंतु बँकेने स्टेटमेंट तपासले आहेत. नियमानुसार, विभागाला सर्व रक्कम बँकेत जमा करणे आवश्यक आहे असे समितीने सांगितले असता मुंबई मंडळाचे मुख्य अधिकारी यांनी बँक रिकन्सिलिएशनचे काम जुलै पर्यंत पूर्ण करण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत ६९ महिन्यांचे काम अपूर्ण आहे. एकूण २२ बँकांच्या स्टेटमेंटसचे रिकन्सीलिएशन करावे लागते. त्यामुळे हे काम अपूर्ण राहिले आहे असे सांगितले.

**४१.६७** बँक खर्च मेळाचे काम वेळेत पूर्ण होणे आवश्यक होते. म्हाडाची लेखा पध्दती योग्य नाही, असे समितीला वाटत आहे. काम वेळेत पूर्ण न होण्यामध्ये जे अधिकारी जबाबदार

आहेत, त्यांच्यावर कोणती कार्यवाही केली व आतापर्यंत कारवाई केली नसेल तर समिती त्यांच्यावर कारवाई करण्याबाबत शिफारस करेल असे समितीने विभागास सांगितले असता विभागीय सचिवांनी सांगितले की, आता विभागामध्ये संगणकीकरण केल्यामुळे काम लवकरात लवकर होण्यास मदत होणार आहे.

**४१.६७** महालेखाकारांनी बँक डिपॉझिटच्या एका प्रकरणाबाबत समितीस सांगितले की, an amount of Rs.17 crores was debited by the Bank. However, no entry was taken into the accounts or in cashbook. याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधीनी सांगितले की, निरनिराळया २२ बँकांचे अकाऊंटच्या रिकन्सिलिएशन करावे लागते. ही शिल्लक राहिलेली रक्कम मागील ३ महिन्यातील आहे. सप्टेंबर, ऑक्टोबर व नोव्हेंबर या महिन्यामधील ही रक्कम आहे.

**४१.६८** यासंदर्भात विभागीय सचिवांनी माहिती देतांना सांगितले की, २५ नोव्हेंबर रोजी झालेल्या बैठकीच्या वेळी देखील ४४ कोटी रुपयांच्या संदर्भात मुद्दा उपस्थित करण्यात आला होता. म्हाडाकडून रिकन्सीलिएशन केले असल्याचे सांगण्यात आले. यासंदर्भात विभागीय प्रतिनिधींनी १.९९ कोटी रुपयांचे रिकन्सिलिएशन राहिले असल्याची माहिती दिली.

**४१.६९** म्हाडाच्या अकाऊंटींग सिस्टीममध्ये सुधारणा करण्याच्या संदर्भात विभागीय सचिवांनी सांगितले की, अकाऊंटींग सिस्टीममध्ये वारंवार त्याच प्रकारच्या चुका होत असल्याचे निदर्शनास आले आहे. मुंबई महानगरपालिकेमध्ये अकाऊंटींग सिस्टम राबविण्यात आली तशा प्रकारची कार्यपद्धती म्हाडामध्ये राबविता येईल. पूर्वी कॅश सिस्टीम नुसार अकाऊंटींग एन्ट्री केली जात होती. त्यामध्ये बदल करुन ॲक्रुअल बेसीसवर अकाऊंटींग सिस्टीम तयार करण्यात आलेली आहे. उदा. भाडयाची किती रक्कम प्राप्त झाली आहे, ते दाखविले जाते, मात्र किती रक्कम यावयास हवी ते दाखविले जात नाही. व्याजाची रककम देखील किती प्राप्त झाली हे दाखविले जाते, मात्र किती रक्कम यावयास पाहिजे, हे दाखविले जात नाही. ॲक्रुअल बेस्ड सिस्टीममध्ये ही रक्कम देखील दाखविले जाते. या ठिकाणी विभागीय सचिवांनी दोन सूचना केल्या. मुंबई महानगरपालिकेप्रमाणे म्हाडाने देखील १०० वर्षापूर्वीची अकाऊंटींग सिस्टीम न वापरता ॲक्रुअल बेस्ड अकाऊंटींग सिस्टीम वापरावी. डबल एन्ट्री सिस्टीममुळे अकाऊंटसमध्ये ॲक्युरन्सी वाढते. यामुळे एका ठिकाणी चूक झाल्यास दुसऱ्या अकाऊंटमध्ये

एन्ट्री करताना लक्षात येऊ शकते. तसेच संपूर्ण अकाऊंटींग सिस्टीमचे संगणकीकरण करणे आवश्यक आहे. इंटीग्रेटेड सिस्टीममुळे एकूणच कार्य पध्दतीमध्ये सुधारणा होऊ शकते.

**४१.७०** म्हाडाच्या व्यवहारांचे गेल्या १५ वर्षापासून अकाऊंट व्यवस्थित करण्यात आले नाही. आता महालेखाकार यांनी ज्या तीन बाबी सांगितल्या आहेत त्यासंदर्भातील शिफारस समितीने यापूर्वीच केलेली आहे. म्हाडा अंतर्गत जी गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळे आहेत त्यांचे संगणकीकरण करण्यासाठी म्हाडाकडे आवश्यक तो निधी आहे काय ? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, म्हाडाची आर्थिक परिस्थिती चांगली आहे. म्हाडाच्या अंतर्गत असणाऱ्या गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळांचे संगणकीकरण करण्याबाबत पूर्वी एक बैठक आयोजित करण्यात आली होती. त्या बैठकीत सर्वंकष चर्चा करण्यात आली होती. म्हाडाकडे ऑडिट मॅन्युअल नाही. कोणत्या हेडची आवश्यकता आहे, त्यासाठी कोणती यंत्रणा पाहिजे, यासंदर्भातील कोणतेही मॅन्युअल म्हाडाकडे नाही. अशा प्रकारच्या चार-पाच सूचनांचा विचार विभागास करावा लागणार आहे. Department must implement the following three points to improve the system. The first point is that we should move from cash based system to accrual based system. The second thing is that we should adopt double entry system and there must be 100 per cent computerization of all the transactions. This system will be more realistic and it will reduce number of mistakes, and all these mistakes will come to the notice of the Department.

**४१.७१** यासंदर्भात All these suggestions are still to be adopted and implemented. However, the point still remains that why the reconciliation is not being carried out by the Department असा मुद्दा महालेखाकारांनी उपस्थित केला.

**४१.७२** म्हाडाकडे किती भाडे येणार आहे याची माहिती नाही. किती भाडे आले याची नोंद आहे परंतु किती भाडे यावे याची नोंद नाही ही बाब कोणालाही पटण्यासारखी नाही. एखादा पगारदार माणूस आपणाला महिन्याचा किती किराणा लागतो, किंवा महिन्याला कोणत्या बाबींवर किती खर्च येणार आहे याचे नियोजन करीत असतो. म्हाडा मंडळ असून त्यांच्याकडे या बाबींचे नियोजन नाही हे कोणालाही पटण्यासारखे नाही असेही मत समितीने व्यक्त केले.

**४१.७३** म्हाडा मंडळात काही लोकांनी चुका केल्या आहेत, त्यांच्यावर चॅप्टर केसेस होऊ शकतात. ज्या चुका झाल्या आहेत त्या बोनाफाईड आहेत का मोलाफाईड आहेत. याची माहिती घेणे आवश्यक आहे. १५ वर्षापूर्वी लोकलेखा समितीने आदेश दिले आहेत, त्या

आदेशांकडे दुर्लक्ष केले आहे. कामात दिरंगाई करण्यात आलेली आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. गेल्या १५ वर्षात प्रशासनाकडून कोणत्याही बाबतीत सुधारणा करण्यात आलेली नाही. वर्षानुवर्षे तेच रिमार्क नोंदविण्यात आले असून त्यामध्ये कोणतीच सुधारणा करण्यात आलेली नाही असे समितीने नाराजीने व्यक्त केले.

**४१.७४** गेल्या १० वर्षात ऑडिटमध्ये सुधारणा करण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत. सन २००९ मध्ये रोडमॅप तयार करण्यात आलेला आहे. तसेच संगणकीकरण करताना त्यामध्ये अकाऊंटशी संबंधीत असलेले टॅली सॉफ्टवेअरचा विभाग वापर करीत आहे असे विभागीय सचिवांनी सांगितले. विभागाने आता कोणत्या नवीन पध्दतीचा अवलंब केलेला आहे. त्याची माहिती देण्याबाबत समितीने सूचित केले असता विभागीय प्रतिनिधिंनी खुलासा केला की, रोडमॅप तयार केला आहे. त्या रोडमॅपची प्रभावीपणे अंमलबजावणी विभाग करीत आहे. लोकलेखा समितीच्या साक्षीच्या अनुषंगाने दोन दिवसापूर्वी विभागाने आढावा बैठक घेतली त्यावेळी असे निदर्शनास आले आहे की, अनेक प्रकारच्या प्रणाली अंमलात आणल्या तरी संगणकावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांकडून काही मानवी चुका होतात. त्यामुळे काही निर्णय होत नाहीत. आजपर्यंत जी दिरंगाई झाली त्यामध्ये प्रत्यक्षात असे दिसून आले आहे की अशा ठिकाणी मानवी चुका झाल्या आहेत. त्यासाठी संबंधित कर्मचारी/अधिकारी जबाबदार आहेत. यासाठी तेथील कर्मचाऱ्यांना प्रशिक्षित करण्याची आवश्यकता आहे. बऱ्याच यंत्रणांची माहिती अद्ययावत नाही. मुंबई महानगरपालिकेत SAP/EIP हे सॉफ्टवेअर घेतले आहे. सर्व व्यवहार त्यावर अवलंबून आहेत. मुंबई महानगरपालिकेत सॉफ्टवेअर घेऊन तीन वर्षे झाली तरी त्याचा वापर सर्वतोपरी करण्यात येत नाही. त्यामुळे कोणते सॉफ्टवेअर घ्यावे याबाबत संभ्रम आहे. अकाऊंटमधील टॅली हे सॉफ्टवेअर म्हाडा मंडळाने घेतले असून त्यादृष्टीकोनातून प्रयत्न करण्यात येत आहेत. संगणकीकरण करुनही मानवी चुका होतात. ग्राऊंड लेव्हलपासून जो पैसा भरण्यात येत आहे त्याच्या सर्व एन्ट्रीज संगणकावर करण्यात याव्यात अशा सूचना सर्व अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

**४१.७५** संपूर्ण महाराष्ट्रात म्हाडा मंडळात एकूण किती कर्मचारी वृंद आहे. त्यामध्ये लेखापरिक्षणाची कामे पाहणारे किती कर्मचारी आहेत. याबाबत माहिती देताना वित्तीय सल्लागार म्हाडा यांनी सांगितले की, म्हाडाच्या प्रत्येक कार्यालयात एक मुख्य लेखा अधिकारी, एक सहाय्यक लेखा अधिकारी व एक अकाऊंटंट अशी तीन पदे आहेत. यामध्ये दोष असा

आहे की, म्हाडा मंडळातील अनेक पदे रिक्त आहेत. अकाऊंट केडर नसल्यामुळे अकाऊंटंटची बरीच पदे रिक्त आहेत. माझी नियुक्ती जुलै, २००९ मध्ये झालेली आहे. अजूनही तेथील लेखाधिकारी हे पद रिक्त आहे. तत्कालीन उपाध्यक्ष आता महसूल विभागात प्रधान सचिव म्हणून कार्यरत आहेत त्यांच्याकडे विनंती करुन गृह निर्माण विभागाच्या प्रधान सचिवांना पदे भरण्यासंदर्भात विनंती पत्र पाठविण्यात आले आहे. वर्ग-एक मधील कनिष्ठ पद आहे. आता वित्त विभागातून काही पदे भरण्यात आली आहेत.

**४१.७६** There is no dedicated accounts staff in MHADA. MHADA should set up a training centre for their accounting staff, so that, the accounts system will improve अशी सूचना महालेखापालांनी केली असता विभागीय सचिवांनी सांगितले की, याबाबत बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. विभागाकडे जी सिस्टीम आहे त्यांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १५०० कर्मचारी कार्यरत आहेत. परंतु संपूर्ण महाराष्ट्रात १५०० कर्मचारी असून लेखापरिक्षणामधील पाच एक्सपर्ट कर्मचारी विभागाकडे नाहीत ही बाब योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले असता याबाबत आता या दृष्टीकोनातून विभाग प्रयत्न करीत आहे, असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

**४१.७७** दहाव्या महाराष्ट्र विधानसभेत सादर करण्यात आलेला लोकलेखा समितीचा सातवा अहवालात पान क्रमांक ७४ वर असे नमूद करण्यात आले आहे की, "महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकारणामध्ये अंतर्गत लेखापरीक्षणाची काय व्यवस्था आहे. अशी विचारणा समितीने साक्षीच्या वेळी केली असता समितीला मिळालेल्या माहितीवरुन असे दिसून आले आहे की, सध्या म्हाडामध्ये अंतर्गत लेखापरीक्षणाची कोणतीही व्यवस्था नाही." त्यावेळी समितीने सरकारला पुढीलप्रमाणे शिफारस केली होती की, "म्हाडामध्ये लेखा परीक्षण अधिकारी नेमून त्यांच्या हाताखाली वित्तीय बाबींची सखोल माहिती असणारा पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा व सक्षम अशी अंतर्गत लेखापरीक्षण व्यवस्था म्हाडामध्ये निर्माण करण्यात यावी, तसेच म्हाडातील सर्व कर्मचाऱ्यांना लेखे व्यवस्थितरीत्या ठेवण्याबाबत पुरेसे प्रशिक्षण देण्यात यावे." सन १९९४-९५ मध्ये म्हणजे गेल्या दहा वर्षापूर्वी समितीने शासनाकडे अशी शिफारस केलेली आहे. समितीने केलेल्या शिफारशीकडे शासनाने व म्हाडाने दुर्लक्ष केलेले आहे. आता सुध्दा समिती तशाच प्रकारची शिफारस करु शकते. समितीला शिफारस करण्याचे

अधिकार आहेत. समितीने केलेल्या शिफारशीची अंमलबजावणी शासनाने करणे आवश्यक आहे. याबाबत म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी कोणतीच कार्यवाही केलेली नाही. अशा प्रकारची कार्यवाही करण्यासाठी दहा वर्षे लागतात काय ? म्हाडाकडून आर्थिक व्यवहारांचे परीक्षण होत नाही. म्हाडाकडून घरे देण्यात येतात. घर हा लोकांच्या जीवन मरणाचा प्रश्न आहे. आपणाकडे १५०० कर्मचारी असून त्यामध्ये पाच लेखापाल नाहीत. म्हाडाकडे फक्त अधिकारी बदलत असतात परंतु कामे होत नाहीत. प्रश्न आहे तसेच राहतात. कोणतेही प्रश्न आजपर्यंत सुटू शकले नाहीत. गेल्या १५ वर्षात म्हाडा मंडळात अनेक अधिकारी बदलून गेले आहेत. कोणालाही काही देणेघेणे नाही. त्यामुळे प्रश्न आहे तसेच राहत आहेत असे मत समितीने नाराजीने व्यक्त केले. याबाबत आता म्हाडाकडून कार्यवाही करण्यात येत आहे असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

**४१.७८** म्हाडा मंडळात जी सर्व उर्वरित कामे आहेत ती युध्द पातळीवर करण्यात यावीत. विभागाने केलेल्या लेखापरिक्षणाच्या पध्दतीसंदर्भातील सविस्तर माहिती समिती घेणार आहे. समिती जेव्हा म्हाडा कार्यालयास भेट देईल त्यावेळी महालेखाकार यांनी सुध्दा म्हाडाच्या कार्यालयात उपस्थित राहावे. यातून काय फलश्रुती (Output) निघाला ते समितीला पहावयाचे आहे. तसेच समितीने जी प्रश्नावली दिलेली आहे त्याची लेखी माहिती समितीला सादर करण्यात यावी. समितीला सदर माहिती अहवालात सादर करावयाची आहे. त्यानुसार समितीस विभागाकडून प्रश्नावली संदर्भातील माहिती प्राप्त झाली असून ती सदरहू अहवालात समाविष्ट करण्यात आलेली आहे.

**४१.७९** यासंदर्भात अधिक माहिती देताना विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले की, टॅली सॉफ्टवेअरमध्ये डाटाएंट्री करण्यात येत असून. जे रजिस्ट्रेशन झाले आहेत त्यांच्या नोंदी करण्यात आलेल्या आहेत. प्रत्येक व्यवहाराचे शासनाच्या नियमानुसार रजिस्ट्रेशन करण्यात येते. यासंदर्भातील कार्यवाही एक महिन्यात पूर्ण होईल. सन २०१०-२०११ ची डाटाएंट्री मार्चपर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे सन २००९-२०१० ची सुध्दा डाटाएंट्री करण्यात येत आहे. पुढील वर्षाचे लेखे नियमित करण्यात येणार आहेत. काही बाबींची आवश्यकता भासल्यास आऊटसोर्सिंग करुन अकाऊंट तयार करण्यात येत आहे.

**४१.८०** गेल्या दहा ते पंधरा वर्षात ज्या घटना घडल्या त्यावरुन म्हाडा मंडळ या विषयाबाबत दक्ष नाही अशी खंत समितीने व्यक्त केली असता यासंदर्भातील प्रक्रिया सुरु

करण्यात आलेली आहे. सर्व प्रक्रिया सुरुळीत करण्यासाठी दोन-तीन वर्षे निश्चित लागतील असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**४१.८१** म्हाडा मंडळाकडील ९५-९६ पासूनचे जवळपास १२ अहवाल सादर करावयाचे राहिले आहेत. हे अहवाल फायनल करण्यासाठी दोन महिन्यातून एक बैठक घेण्यात यावी. महालेखाकार यांच्याकडून काही मुद्यांची माहिती घेऊन त्यावर चर्चा करुन त्यांनी काढलेल्या काही आक्षेपांचा तेथेच निपटारा करावा अशी सूचना समितीने विभागास केली. तसेच विभागाने समितीची गंभीरपणे दखल घेणे आवश्यक आहे. समितीच्या बैठकीमध्ये चर्चा करुन काही होत नाही असे विभागाने समजू नये. देशपातळीवर सार्वजनिक उपक्रम लोकलेखा समितीमध्ये काय चालू आहे याची विभागास कल्पना आहे. समिती आता कडक धोरण आखणार आहे. समिती काही करु शकत नाही असे विभागाने गृहित धरुन नये असे कठोरपणे समितीने विभागाला सांगितले.

**४१.८२** लहान-लहान संस्थांमध्ये प्रमुख स्वरुपाच्या ज्या गोष्टी होतात त्या सुध्दा म्हाडासारख्या मोठया संस्थेमध्ये होत नाहीत. "क" वर्गाच्या नगरपालिकेमध्ये १,००,०००/- रुपयाचे देयक असले किंवा ५०,०००/- रुपयाचे देयक असले तरी इंटरनल ऑडिटचा ड्राफ्ट आल्याशिवाय त्याला मंजुरी देण्यात येत नाही. म्हाडामध्ये करोडो रुपयाचा व्यवहार होतो. जर त्याचे ऑडिट होत नसेल तर म्हाडाच्या अधिकाऱ्यांवर दया करण्याचे कारण नाही. महालेखाकारांनी काढलेल्या प्रत्येक मुद्यावर चर्चा करुन ते अभिलेख्यावर आले पाहिजे. त्यावेळचे अधिकारी बदलले म्हणून १०-१५ वर्षाची माहिती कोणी सांगू शकत नाही. अंतर्गत लेखापरिक्षण होत नसेल, लेखासंहिता नसेल तर म्हाडाची अवस्था "आंधळे दळते आणि कुत्रे पिठ खाते " अशी झालेली आहे. तसेच समितीसमोर ज्या गोष्टी उघड होतील त्या अहवालात आल्याच पाहिजेत असे मत समितीने व्यक्त केले.

**४१.८३** गेली १० ते १५ वर्षांचा लेख्यांचा अनुशेष आहे. १९९५ ते १९९९ या काळातील शासनाने जेवढा रिपेअर सेस मंडळाकडे जमा होईल तेवढे अनुरुप अनुदान (Matching Grant) शासनाने देण्याचे ठरले होते त्याप्रमाणे ती देण्यात येत होती पण मागील पाच-सहा वर्षापासून त्यामध्ये अंतर पडले आहे. शासनाकडून किती अनुरुप अनुदान देण्यात आले याचा हिशेब केलेला नाही. हे पैशाच्या लेखापरिक्षणाच्या संदर्भातील झाले पण म्हाडाकडे असलेल्या प्लॉटचा हिशेब म्हाडा महालेखाकार कार्यालयास कसा देते हे माहीत नाही. १५० प्लॉट असे होते की,

त्या ठिकाणी जुन्या इमारती होत्या. ज्या ठिकाणी पुर्नविकास होऊ शकत नाही त्या ठिकाणी बगिचा आणि गृहनिर्माण विकास करण्याचा निर्णय झाला होता त्याबाबतीत पुढे काय झाले? वेगवेगळे पुर्नविकास होतात त्यातून दुरुस्ती मंडळाकडे घरे जमा होतात त्यामुळे संक्रमण शिबिरामधील लोकांना घरे मिळावयास पाहिजे होती ती मिळत नाहीत. मुंबईत म्हाडाचे बांधकाम मोठया प्रमाणात वाढले आहे. संक्रमण शिबिरामध्ये असणाऱ्या लोकांची संख्या कमी आहे. पण ही संक्रमण शिबिर आता कायमस्वरुपी झाली आहेत. ज्यांची घरे ताब्यात घेण्यात येतात तेथे पुर्नविकास झाल्यानंतर भलतेच लोक घुसतात याचा हिशोब कोण विचारणार? म्हाडाकडे असलेल्या जमिनीचा, प्लॉटचा तसेच फ्लॅटचा हिशेब म्हाडाने दिला पाहिजे. गेल्या दहा वर्षात म्हाडाकडे अमुक इतक्या सदनिका उपलब्ध झाल्या त्यापैकी संक्रमण शिबिरामध्ये राहणाऱ्या अमुक इतक्या लोकांना घरे दिली त्यामुळे संक्रमण शिबिरामध्ये मध्ये राहणाऱ्या लोकांची यादी कमी झालेली आहे हे बरोबर व्हावयास पाहिजे ते होत नाही. त्यासंबंधीचा अहवाल लोकलेखा समितीला दिला पाहिजे. म्हाडाकडे असलेल्या प्लॉटची आणि सदनिकांची विक्री शासनाने ठरवून दिलेल्या धोरणाप्रमाणे झाली तर काही हरकत नाही पण ही विक्री शासनाच्या धोरणाप्रमाणे होत नाही. त्यामुळे पुन्हा अनुशेष जसाच्या तसा दिसतो. याचा हिशोब लोकलेखा समितीसमोर आला पाहिजे असेही मत समितीने व्यक्त केले.

**४१.८४** या क्षणी म्हाडाकडे एकूण किती प्लॉट आणि सदनिका आहेत त्यापैक्री किती सदनिकांची व प्लॉटची विक्री झालेली आहे आणि किती सदनिकांची विक्री बाकी आहे याची माहिती उपलब्ध आहे काय? अशी विचारणा समितीने केले असता विभागीय सचिवांनी ही माहिती समितीस देण्यात येईल असे आश्वासन दिले. सदरहू माहिती समितीस प्राप्त झाला आहे. **(परिशिष्ट-२)**

**४१.८५** कांदिवली येथे म्हाडाने एका जमीनीचा विकास करण्यासाठी विकासकाला दिली आहे त्याऐवजी म्हाडाला त्या जमिनीचा विकास करता आला नसता काय? याबाबत विभागीय सचिवांनी सांगितले की, म्हाडाच्या मुंबई विकास नियंत्रण नियमावली ३३/५ खाली रहिवाशांच्या को-ऑपरेटिव्ह सोसायटीतील ७० टक्के लोकांनी ठराव केल्यानंतर त्यांनी म्हाडाकडून एन.ओ.सी. घेऊन रिडेव्हलपमेंट करण्याचे धोरण आहे. ती जमीन म्हाडाची आहे पण म्हाडाने ती जमीन को-ऑपरेटिव्ह सोसायटीला लॉंगटर्म बेसिसवर लिजवर दिलेली आहे. त्यामुळे सोसायटीला ती रिडेव्हलप करण्याचा अधिकार आहे. परंतु काही ठिकाणी म्हाडा स्वत:

डेव्हलपमेंट करु शकते. पण त्या ठिकाणी डेव्हलपमेंट का होत नाही? असे समितीने विचारले असता म्हाडाने अशा प्लॉटवर गेल्या तीन वर्षामध्ये ३५०० ते ४००० घरे बांधून त्यांची विक्री मागे काढण्यात आलेल्या दोन लॉटऱ्यांच्या माध्यमातून केलेली आहे त्याला अभूतपूर्व प्रतिसाद मिळाला आहे. या सदनिकांचे वितरण अतिशय पारदर्शकपणे झालेले आहे. जे प्लॉट शिल्लक आहेत त्यावर चार हजार घरांचे बांधकाम चालू आहे. पुढच्या लॉटरीच्या वेळी या घरांचे वितरण केले जाईल अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**४१.८६** सन १९९८-९९ च्या वार्षिक लेख्यांवरील लेखापरीक्षण अहवालात महालेखाकारांनी पंजाब नॅशनल बँकेत ठेवण्यात आलेल्या पैशाच्या बाबतीत आक्षेप घेतलेला आहे. त्यासंदर्भात विभागाने स्पष्टीकरणात्मक ज्ञापनामध्ये असे म्हटले आहे की, "दिल्ली येथे पंजाब नॅशनल बँकेत खाते उघडण्यात आलेले नाही. तथापि ती रक्कम रोकड वहीत माहे एप्रिल १९९२ पासून जमा दाखविण्यात आली आहे. त्या रक्कमेचा शोध घेण्यात येत आहे. शोध लागताच कळविण्यात येईल." मग ती रक्कम कुठे गेली? अशी विचारणा समितीने केली असता पंजाब नॅशनल बँक, दिल्ली येथे म्हाडाचे खाते नव्हते. १९९८-९९ मध्ये विभागीय मंडळाकडे भाडयाची वसूल झालेली रक्कम बँकेकडून म्हाडाला ट्रान्स्फर होत होती. ते अकाऊंट पैसे ट्रान्स्फर होण्यासाठी होते असे विभागीय सचिवांनी सांगितले.

**४१.८७** जर पंजाब नॅशनल बँक दिल्ली येथे म्हाडाचे खाते नव्हते तर महालेखाकारांनी त्यांच्या अहवालातील परिच्छेदात पंजाब नॅशनल बँकेचे नाव कसे आले? व महालेखाकारांनी तसा आक्षेप का काढली? याबाबत विभागाकडून काहीच खुलासा करण्यात आला नाही.

**४१.८८** जे भाडे म्हाडाकडे येत होते ते एफ.डी.ची ठेव म्हणून बँकेत ठेवण्यात आले होते काय? अशी विचारणा समितीने केली असता रु.१,९७,५९९.१४ इतके पैसे एप्रिल,१९९२ पासून दिसत होते. जुने रेकॉर्ड असल्यामुळे ते सापडत नव्हते. महालेखाकारांनी आक्षेप काढल्यानंतर या इन्व्हेस्टमेंटच्या रक्कमेची २०१० च्या वार्षिक लेख्यामध्ये ॲडजस्टमेंट केली आहे असे विभागाने सांगितले.

**४१.८९** वार्षिक लेख्यामध्ये समायोजन झाल्याचे महालेखाकारांच्या निदर्शनास आले आहे काय? अशी विचारणा समितीने महालेखाकारांना केली असता महालेखाकारांनी खुलासा केला की, we have to see the Inspection Report only. However, the basic statement is that an amount of Rs.1,97,599.14, is appearing as deposit in the branch of Punjab

National Bank, New Delhi. Now, Department says that there is no account in that Bank. But, there is a cashbook entry showing that the above amount is available with that Bank. Now, the question remains that if there is no account how that entry is there in their cashbook and no action is taken in this matter

**४१.९०** महालेखाकारांनी दाखविलेल्या रु.१,९७,५९९.१४ या रकमेबाबत विभागीय प्रतिनिधींनी जुन्या ट्रँझेक्शन कॅशबुकमध्ये चुकीची नोंद होण्याची शक्यता असल्याचे सांगितले.

**४१.९१** सन १९८०-९० मध्ये म्हाडा हुडकोकडून लोन घेतले होते. या ठिकाणी बँक ऑफ महाराष्ट्र आणि पंजाब नॅशनल बँक या दोन बँकांची नोंद आहे. परंतु त्यावेळेस हुडकोकडून लोन घेऊन ते परतफेड करीत होतो. आता ऑक्टोबर, २०१० मध्ये या रक्कमेचा ताळमेळ बसविला आहे त्यामुळे सब्जेक्ट टू व्हेरिफिकेशन मान्य करावे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.९२** यासंदर्भात महालेखाकारांनी सूचित केले की, Dedicated account cadre should be there. Proper training should be provided to MHADA staff. The second point is that Internal Audit System should be set up and the report made by the Internal Audit should be submitted to the Chief of MHADA. They may also appoint an Outsourcing Agency for this work. Sir, these are the future plan and the above suggestions should be implemented as soon as possible. These are the plans and then only MHADA can automatically generate entry from the accounts to register. Then only the accounts will be reconciled

**४१.९३** यासंदर्भात गृहनिर्माण विभाग म्हाडाच्या स्टाफला ट्रेनिंग देईल आणि अंतर्गत लेखापरिक्षणपध्दती भक्कम करु असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले.

**४१.९४** म्हाडाची लेखापरिक्षण पध्दती सदोष असल्यामुळे समितीने लोकलेखा समितीची उपसमिती तयार करुन सदर समिती म्हाडाला भेट देईल असा निर्णय समितीने घेतला. तसेच महालेखाकार यांनी ज्या बाबी सांगितल्या आहेत त्याची पाहणी समिती करील. यासंदर्भात समितीने असे सूचित केले की, त्या अगोदर म्हाडाच्या अधिकाऱ्यांनी महालेखाकार यांच्यासोबत बैठक घेऊन सर्व सिस्टिम व्यवस्थित करुन घ्यावी. एक महिन्यानंतर म्हणजे मार्च अधिवेशनाच्या अगोदर सब कमिटी भेट देईल त्यावेळी आता पासून आपण काय प्रगती केली आहे याची माहिती समिती घेईल. तसेच म्हाडामधील पेन्शनचा जो निधी प्रलंबित आहे

त्याबाबतची माहिती म्हाडाकडून मिळाली पाहिजे. जेणेकरुन आवश्यकता वाटल्यास समितीला त्यावर शिफारशी सुचविता येतील. यासंदर्भातील अनुपालन अहवाल (Action Taken Report) विभागाने तयार करावयास पाहिजे.

**४१.९५** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणातील कामकाजाबाबत म्हाडा कार्यालयाला भेट देऊन व तेथील सिस्टिम तपासण्यासाठी लोकलेखा समितीने उप समितीची स्थापना केली. सदर उप समितीत सदस्य पुढील प्रमाणे राहतील.

१) श्री. गिरीष बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

२) श्री. नवाब मलिक, वि.स.स.

३) श्री.संजय सावकारे, वि.स.स.

४) श्री. बाळा नांदगावकर, वि.स.स.

५) श्री. भाई जगताप, वि.प.स.

६) श्री. विनोद तावडे, वि.प.स.

७) डॉ. दीपक सावंत, वि.प.स.

**४१.९६** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाने १९९५-९६ पासूनचे वार्षिक लेखा आणि लेखा विवरणपत्र सभागृहाला कधी सादर झालेले आहेत याची माहिती विभागीय सचिवांच्या निदर्शनास आणून दिली.

| | | |
|---|---|---|
| १९९५-९६ | - | दि.१२-३-२००१ |
| १९९६-९७ | - | दि.१३-३-२००१ |
| १९९७-९८ | - | दि.१६-१२-२००३ |
| १९९८-९९ | - | दि.१६-१२-२००३ |
| १९९९-२००० | - | दि. २८-३-२००७ |
| २०००-२००१ | - | दि. २८-३-२००७ |
| २००१-२००२ | - | दि. १६-६-२००९ |
| २००२-२००३ | - | दि. १६-६-२००९ |
| २००३-२००४ | - | दि. १६-६-२००९ |
| २००४-२००५ | - | दि. १६-६-२००९ |
| २००५-२००६ | - | दि. १६-६-२००९ |

२००६-२००७ - दि. २६-७-२०१०

**४१.९७** त्यानंतर २००७-२००८, २००८-२००९ चे लेखा विवरणपत्र अद्याप सभागृहाला सादर व्हावयाचे आहेत. अधिवेशन संपल्यानंतर पाच ते सात महिन्यात लेखा विवरणपत्रे सभागृहास सादर व्हावयास पाहिजे. पण ते पाच ते सात वर्षानी उशिरा देण्याची विभागाची प्रॅक्टीस आहे. (विवरणपत्रे सादर करताना सभागृहात याकडे कोणाचे लक्ष नसते. त्यामुळे आता यासंदर्भात समिती तयार करण्यात आलेली आहे. कोणतीही कागदपत्रे सभागृहाला सादर करण्यापूर्वी त्याची चौकशी होते. पार्लमेंटमध्ये अशा प्रकारची समिती होती. मी त्यासंदर्भात पाठपुरावा केल्यामुळे तशा प्रकारची समिती महाराष्ट्रात स्थापन करण्यात आली आहे त्यामुळे आता खूप फरक पडेल असे मत समितीने व्यक्त केले.

**४१.९८** लोकलेखा समितीच्या बैठकीमध्ये वित्त विभागाचा केवळ नावापुरता प्रेझेन्स नको तर, कंट्रोल पाहिजे. वित्त विभागाकडून याबाबतीत संबंधितांना पत्र पाठविले गेले पाहिजे व त्यांच्याकडून आलेला अहवाल समितीला सादर केला गेला पाहिजे अशी सूचना समितीने वित्त सचिवांना केली.

**४१.९९** अहवाल ५-६ वर्षानंतर सादर केले जातात याबाबतीत संबंधितांना जर असे वाटत असेल की, त्यांना कोणीही जाब विचारणारे नाही तर ते बरोबर होणार नाही. आता कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे समिती गठीत झालेली असल्याने संबंधितांना या समितीला अहवाल सादर करण्यास होणाऱ्या उशीराबाबतची कारणे द्यावी लागतील असे समितीने विभागीय सचिवांना सांगितले असता सन २००७-२००८ व सन २००८-२००९ या वित्तीय वर्षांचा अहवाल देण्याबाबत दिरंगाई झालेली आहे आणि त्याबाबतीत विभागाने दिलगिरी व्यक्त केली. परंतु, आता हा उशीर भरुन काढण्याचा प्रयत्न केला जात आहे असे आश्वासन विभागीय सचिवांनी समितीस दिले. तसेच सन २००९-२०१० च्या लेख्यांबाबत म्हाडाला तीन महिन्यांच्या कालावधीत माहिती देण्याबाबत सूचना दिलेल्या आहेत असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.१००** वित्त विभागाच्या अधिकाऱ्यांनी यावर कंट्रोल ठेवण्याबाबत काय कार्यवाही केली आहे अशी विचारणा समितीने वित्त सचिवांना केली असता वित्त सचिवांनी समितीस सांगितले की, याबाबतीत विभागाकडून रिव्हू घेतला जात आहे. We have taken up this matter with

the Financial Advisors of various Corporations. They are deputing the experts and they have already started to review this matter.

**४१.१०१** Accounts relating to the financial year 2009-2010 should also be expedited. Can the Department push it up a little ahead? अशी विचारणा महालेखाकारांनी केली असता विभागीय सचिवांनी खुलासा केला की, we have asked the concerned authorities to complete it in three months. we are going for Tallying Accounting System. We have also got instructions from the Office of the Comptroller and Auditor General to submit the accounts before 30th June of every financial year. We will adhere to that date.

**४१.१०२** लेखे ठेवण्याच्या पद्धतीबाबत माहिती देताना समितीने सांगितले की, "प्राधिकरणांतर्गत प्रत्येक मंडळ/घटक आपापले जमा व खर्चाचे लेखे आणि ताळेबंद स्वतंत्ररित्या तयार करतात आणि नंतर त्याचे एकत्रीकरण करुन प्राधिकरणाकडून लेखा अहवाल तयार करण्यात येतो. बांधकाम विषयाचे लेखे सार्वजनिक बांधकाम विभागाच्या लेख्याच्या आकृतीबंधानुरुप ठेवण्यात येतात. प्राधिकरणाच्या दिनांक २५ ऑक्टोबर, १९९६ रोजी संपन्न झालेल्या १४३ व्या सभेमध्ये १९९४-१९९५ चे लेखे प्राधिकरणाकडून स्वीकारण्यात आले". त्या धर्तीवर पुढच्या सन १९९५-१९९६ ते सन २००६-२००७ या वर्षाचे लेखे तयार केले पाहिजेत. अशाप्रकारे लेखे ठेवण्याची एक कार्यपद्धती आहे. तिचे पालन केले गेले पाहिजे.

**४१.१०३** म्हाडाकडे ॲसेट्स आहेत, प्लॉट्स आहेत. परंतु, वर्षानुवर्षे ते कोणतेही बांधकाम न करता तसेच राहिलेले आहेत. त्यांच्यावर अतिक्रमण झालेले आहे. काही बाबतीत मूळ मालक पुन्हा जमिनीची मागणी करतात असेही प्रकार होतात. विभागाच्या अधिकाऱ्यांनी समितीला संपूर्ण राज्यात म्हाडाच्या असलेल्या प्लॉट्सबाबतची जिल्हानिहाय माहिती द्यावी असे निदेश समितीने विभागास दिले. सदरहू माहिती विभागाकडून प्राप्त झाली आहे. **(परिशिष्ट-३)**

**४१.१०४** यासंदर्भात The process is slow. They must keep the record and produce it to the Auditors at the time of inspection अशी सूचना महालेखाकारांनी केली.

**४१.१०५** म्हाडाला प्लॉट्सबाबत, त्यावरील अतिक्रमणाबाबत एरियावाईज माहिती संकलित करुन सादर करण्याच्या सूचना दिलेल्या आहेत. येथे मुंबई, औरंगाबाद, जळगाव, नगर, नाशिक विभागांचे मंडल अधिकारी उपस्थित आहेत. ते त्या त्या परिक्षेत्रातील माहिती

समितीच्या सन्माननीय सदस्यांना देऊ शकतील याबाबत समितीच्या सदस्यांनी त्यांच्या जवळच्या परिक्षेत्रातील मंडल अधिकाऱ्यांकडून संबंधित माहिती घेण्याचा निर्णय समितीने घेताना या माहिती वरुन समितीच्या सन्माननीय सदस्यांना या गोष्टीची माहिती मिळू शकेल की, म्हाडाने कोणाकोणाचे प्लॉट्स कधीपासून घेऊन ठेवलेले आहेत. तसेच, या प्लॉट्सवर काम का सुरु केले जात नाही. खरे तर लोकांना घरे हवी आहेत, ही सरकारी घरे आहेत व त्यासाठी लोक पैसे द्यायला तयार आहेत. असे असताना हे बांधकाम का होत नाही ? सिस्टममध्ये काय दोष आहेत ? हे समितीला कळेल व त्यावर काय उपाययोजना करता येईल याची शिफारसही समितीला करता येईल. याबाबतची माहिती संकलित केलेली असल्याचे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.१०६** फिक्स ॲसेट्सबाबतची संकलित केलेली माहिती समितीला उपलब्ध करुन दिली जाईल असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता महालेखाकारांनी समितीच्या निदर्शनास आणून दिले की, The important point is about production of records. Our Officials go to MHADA for inspection of audit but they are not getting any help from the Officials of MHADA. Normal level of co-operation is needed याबाबत कन्सर्न पर्सन आयडेंटिफाय करण्यात आला असून पुन्हा अशाप्रकारे आक्षेप घेण्याची वेळ विभागाकडून येणार नाही असे आश्वासन विभागीय सचिवांनी दिले.

**४१.१०७** Our officials are going for audit. At that time, the main problem is that records are not produced. Incomplete maintenance of Registers is made available to our people. Every year, if there is a proper check up or audit then automatically there will be an improvement. I would like to suggest that both our officers should sit together and discuss the issues from time to time अशी सूचना महालेखाकारांनी केली असता Some times, when the question is raised, it escalates. We have taken a serious note of it and as I said earlier, such things will not occur in future असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले.

**४१.१०८** गेल्या १०-१५ वर्षाच्या कालावधीत लिपिक, शिपाई, अधिकारी अशा कुठल्याही पदावरील कर्मचाऱ्यांवर शिस्तभंगाची कारवाई घेतली गेल्याची काही उदाहरणे सांगता येतील का ? विभागाने चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांच्या सहाय्याने सिस्टममध्ये इम्प्रुव्हमेंट करण्याचे प्रयत्न केले पाहिजेत. याबाबतीत समिती विभागाला लागेल ती मदत करण्यास तयार

आहे. याबाबत समिती शासनाला शिफारसही करु शकेल. विभागाच्या अधिकाऱ्यांनी हा विषय गंभीरपणे घेण्याची आवश्यकता आहे. एखाद्या आक्षेपाबाबत समितीला त्याबाबतची पूर्णपणे माहिती जाणून घ्यावयाची असते. त्यात काही त्रुटी असतील तर त्या दूर करण्याबाबत शिफारशी करावयाच्या असतात. विभागाच्या काही अडचणी, समस्या असतील तर समितीला त्याही कळल्या पाहिजेत. जेणेकरुन त्यावर आधारित शिफारशी समिती करु शकेल. समिती केवळ शिफारसी करुन थांबत नाही तर समितीने केलेल्या शिफारसींवर आधारित अनुपालन कार्यपूर्तता अहवालाचा पाठपुरावाही समितीकडून केला जातो. Committee have already suggested that the Action Taken Report should also be taken into account seriously and implementation of it should also be there. It will also be helpful to your organization. Hence, the Committee feels that that the department should be very much serious about all these matters.

**४१.१०९** प्रॉपर्टी टॅक्सचे संकलन नियमाप्रमाणे होते. परंतु, शासनाकडून येणारे अनुरुप अनुदान वर्षानुवर्षे वेळेवर मिळत नाही. या कामासाठी ४० कोटी रुपयांचे अनुरुप अनुदान का मिळाले तरी, इमारत दुरुस्ती वगैरे कामांसाठी १०० कोटी रुपयांचा निधीही अपुरा ठरतो अशी परिस्थिती आहे. त्यामुळे हे अनुरुप अनुदान वेळेवर मिळाला पाहिजे असे विभागीय सचिवांनी समितीस सांगितले असता अनुरुप अनुदान कधी पासून सुरू करण्यात आले व त्या अंतर्गत आतापर्यंत किती निधी केव्हा देण्यात आला याबाबतची माहिती समितीला देण्यात यावी. समिती त्यावर आवश्यकता वाटल्यास शिफारस करेल अशी सूचना समितीने विभागीय सचिवांना केली.

**४१.११०** लोकलेखा समितीच्या दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजीच्या बैठकीत उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय झाल्यानुसार लोकलेखा समितीच्या उप समितीने दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) यांच्या कामकाज व कार्यपद्धतीबाबत पाहणी करण्यासाठी मुंबई येथील म्हाडा कार्यालयास भेट दिली. सदर भेटीच्या वेळी समितीने अंतर्गत लेखा तपासणीबाबत माहिती देण्यास सांगितले असता उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, म्हाडा यांनी समितीस सांगितले की, मागील बैठकीत म्हाडाच्या अकाऊण्ट ऑडिटबाबत महालेखापालांनी आक्षेप घेतला होता. त्या संदर्भात म्हाडातील ऑडिटसंबंधी मोठया प्रमाणावर पावले उचलली होती. लोकलेखा समितीने म्हाडातील अकाऊण्टबाबत सुधारणा करण्याचे काम केलेले आहे. म्हाडाचा सन २००६-०७ चा

अहवाल सभागृहांना सादर केलेला आहे. सन २००७-०८, २००८-०९ चे अहवाल हिवाळी अधिवेशनामध्ये सभागृहांना सादर करण्याचे प्रस्तावित केलेले आहे. तसेच सन २००९-१० या आर्थिक वर्षाचे लेखे पूर्ण केले असून ते महालेखापालांकडे पाठविलेले आहेत. (सन २००७-२००८ चा अहवाल २० एप्रिल, २०११ रोजी, सन २००८-२००९ चा अहवाल २० डिसेंबर, २०११ रोजी व सन २००९-२०१० चा अहवाल १६ एप्रिल, २०१२ रोजी विधीमंडळ सभागृहास सादर झाले आहेत.) लेख्यांच्या संदर्भात महालेखाकार कार्यालयाबरोबर एक परिषद आयोजित करण्यात आली होती. परंतु काही कारणामुळे ती पुढे ढकलण्यात आली असून नंतर घेण्यात येणार आहे. लोकलेखा समितीने म्हाडाकडून लेखे अद्ययावत ठेवण्याच्या संदर्भात अपेक्षा बाळगली होती. ती म्हाडाने पूर्ण केलेली आहे. म्हाडाने आर्थिक वर्ष संपल्यानंतर तातडीने महालेखापालांना लेखे सादर करावेत, लेख्यांच्या संदर्भात सुसूत्रीकरण केले पाहिजे अशी सूचना समितीने केली होती. यादृष्टीने म्हाडाकडून अनेक पावले उचलली आहेत. दोन वर्षापूर्वी म्हाडामध्ये सॅप आणण्याचा प्रयत्न केला होता. त्याचा प्रस्ताव शासनाकडे पाठविला होता. परंतु त्याच्यावर अद्याप निर्णय झालेला नाही. त्याबाबतची सर्व प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी वेळ लागत आहे. सॅप हे सॉफ्टवेअर आहे. त्यांना मुंबई मंडळ व मुंबई इमारत व दुरुस्ती मंडळाचे मॉडयूल तयार करण्यासाठी प्राधिकृत केलेले आहे. त्याबाबतचे सादरीकरण मॅस्टेकने तयार केलेले आहे. टॅली सॉफ्टवेअरच्या मदतीने अकाऊण्टमध्ये सुसूत्रता आणण्याचा प्रयत्न सुरु आहे. टॅली हे एक प्रॉडक्टीव्ह सॉफ्टवेअर आहे. ते बाजारात उपलब्ध आहे. त्याचा वापर आज अनेक खाजगी कंपन्यांमध्ये केला जातो. ते कस्टमाईज करण्याच्या दृष्टीने म्हाडाने प्रक्रिया सुरु केलेली आहे. हा एक पायलट प्रोजेक्ट आहे. त्यामध्ये डेटा एन्ट्री करण्याचे काम सुरु करण्यात आलेले आहे. नाशिक मंडळ वगळता बाकीच्या सर्व मंडळांमध्ये ही प्रक्रिया सुरु केलेली आहे. या सॉफ्टवेअरच्या माध्यमातून अकाऊण्टमध्ये जास्तीत जास्त सुधारणा करता येतील. यात संपूर्ण डेटा एन्ट्री केल्यानंतर संपूर्ण यंत्रणा कस्टमाईज करुन या संदर्भातील अंमलबजावणी केली जाणार आहे. सध्याच्या पध्दतीनुसार एखाद्या व्यक्तीने म्हाडात अर्ज केल्यावर त्याच्या अर्जाचा प्रवास मॅन्युअली होत होता. मंत्रालयात फाईलिंगचे कॉम्पिटरायझेशन झालेले आहे. त्याच धर्तीवर म्हाडात आलेल्या अर्जावर संगणकाच्या माध्यमातून प्रोसेस होणार आहे. ऑक्टोबर, २०११ पासून ही पध्दत म्हाडामध्ये सुरु होणार आहे. समितीने

म्हाडाच्या प्रशासनामध्ये व अकाऊण्टसंबंधी सुधारणा होण्यासाठी ज्या ज्या सूचना केल्या होत्या त्याला अनुसरुन म्हाडाने प्रयत्न सुरु केलेले आहेत.

**४१.१११** म्हाडामध्ये संगणकीकरण झालेले आहे असे विभागाकडून सांगण्यात आले होते. परंतु आता विभाग सांगत असलेल्या माहितीवरुन संगणकीकरण होणार आहे असे दिसून येते. याबाबत विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, संक्रमण शिबिरामध्ये जे टेनण्ट राहतात, त्यांचा सर्व्हे करण्यासाठी या प्रणालीचा वापर केला जाणार आहे. यामध्ये फिल्ड बुक अपडेशन केले जाणार आहे. यासाठी प्रत्येक टेनण्टच्या रहिवासाच्या ठिकाणी प्रत्यक्षात म्हाडाच्या अधिका-यांनी भेट दिली पाहिजे. म्हाडामध्ये संगणकीकरण झालेले आहे. फक्त सर्व डेटाला सॉफ्टवेअर बेस द्यावयाचा आहे.

**४१.११२** मॅस्टेकने तयार केलेले सादरीकरण समितीने पहावे अशी विनंती विभागाने केली. परंतु सादरीकरणातून सर्व माहिती समितीला मिळेलच असे नाही. तसेच एका तासात सर्व प्रश्नांचा उलगडा होईल असेही नाही. तसेच सादरीकरण दाखविल्यानंतर विभागाची सुटका होईल असेही विभागीय अधिकाऱ्यांनी समजू नये. कारण लेखी माहितीच्या आधारावर अनेक बाबींसंबंधी समितीला सविस्तरपणे चर्चा करावयाची आहे असे समितीने सुचविले असता समितीने दिलेल्या सूचनांचे पालन विभागाकडून करण्याचा प्रयत्न केला जाईल, असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले. तसेच म्हाडात अंतर्गत लेखा परीक्षण नीट होत नाही अशी समितीने खंत व्यक्त केली होती. त्यामध्ये सुसूत्रता आणण्याचे काम केले असल्याचे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले..

**४१.११३**मॅस्टेकच्या प्रतिनिधींनी सादरीकरणाच्या माध्यमातून म्हाडाच्या सर्व मंडळातील डेटा एन्ट्री करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याबाबतची माहिती समितीस सादर केली. विभागाने जे सादरीकरण केलेले आहे त्याची हार्ड कॉपी समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता विभागाने त्यास संमती दर्शविली. परंतु अद्यापपर्यंत सादरीकरणाची हार्ड कॉपी समितीस प्राप्त झाली नाही.

**४१.११४** एकाच पत्त्यावरील ३२७ सदनिका धारकाना सदनिका वितरित झालेल्या आहेत असे वर्तमानपत्रात आले आहे. संगणकाच्या माध्यमातून सदनिकाची लॉटरी काढली जाते ती लॉटरी सुध्दा याच सॉफट्वेअरच्या माध्यमातून काढली जाते काय ? असे समितीने विचारले असता सदनिकाच्या लॉटरीचा पार्ट वेगळा आहे असे विभागाकडून सांगण्यात आले. परंतु ३२७

लोकांचा पत्ता एकच कसा काय असू शकतो ? असा मुद्दा समितीने उपस्थित केला असता ३२७ लोकांचा फोन नंबर एकच आलेला आहे. परंतु या व्यक्ती जेव्हा कागदपत्रे सादर करण्यासाठी म्हाडाकडे येतील तेव्हा सर्वांचे कागदपत्र डोळयात तेल घालून पहावे असे निर्देश संबंधितांना देण्यात आलेले आहेत. एकाच पत्त्यावर अधिक व्यक्तींनी फॉर्म भरु नये असे कायद्यामध्ये बंधन नाही. तरी सुध्दा विभागाने याबाबतीत अधिक माहिती घेतलेली आहे. यामध्ये बोगस लाभधारक असतील तर ते ओरिजनल कागदपत्रावरुन विभागाच्या लक्षात येईल. या ३२७ लोकांना अगोदरच डिसक्वालीफाय केले तर ते योग्य होणार नाही असे विभागीय प्रतिनिधींनी समितीस सांगितले.

**४१.११५** एकाच वेळेस ३ व्यक्तींचे पत्ते एकच आले तर ते शक्य आहे. परंतु ३२७ लोकांचे पत्ते एकच असणे कसे शक्य आहे ? पाच व्यक्तींचे पत्ते एकच आले तर ते व्हेरीफाय झाले पाहिजे असे समितीने सुचविले असता पुढील लॉटरीच्या वेळेस याची दक्षता घेतली जाईल असे आश्वासन विभागाने समितीस दिले.

**४१.११६** म्हाडाने बैठकीच्या वेळी कामकाजाच्या संदर्भात इंग्रजीमध्ये आज्ञावलीची माहिती दिलेली आहे. परंतु म्हाडा कार्यालयात मराठीतून कामकाज चालते काय ? यावर विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, कामकाजाच्या संदर्भात जे सॉफ्टवेअर तयार करण्यात आलेले आहे ते इंग्रजीमधून आहे. मराठीतून या सॉफ्टवेअरचा वापर होऊ शकत नसल्यामुळे इंग्रजी शिवाय पर्याय नाही.

**४१.११७** जेव्हा कोणतीही नवीन पध्दत स्विकृत करतो त्यावेळेस ती अद्ययावत असली पाहिजे. लॉटरीची सिस्टीम सुध्दा अद्ययावत असली पाहिजे. परंतु म्हाडामध्ये पूर्वीच्या पध्दतीप्रमाणेच काम सुरु आहे. अंतर्गत लेखापरीक्षण होत नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रगत महाराष्ट्रातील गृहनिर्माण मंडळाचे अंतर्गत लेखापरीक्षण होत नाही ही बाब महाराष्ट्र राज्याला भुषणावह नाही. जमिनीच्या व्यवहाराच्या फाईल्स, निरनिराळया योजना, डेव्हलप झालेल्या स्किम्स,विकासकाकडून येणा-या सरप्लस टेनामेंटस्च्या पध्दती, इतर योजनांची माहिती तसेच आपल्या ९ प्रादेशिक मंडळाची सर्व माहिती समितीला उपलब्ध करुन दिली तरच समितीला त्यांसदर्भात अभ्यास करुन प्रश्न उपस्थित करता येतील. केवळ जुजबी माहितीवरुन समितीला काहीही अर्थबोध होत नाही. त्यामुळे म्हाडाच्या संदर्भात सविस्तर माहिती समितीला उपलब्ध करुन देण्याची आवश्यकता असल्याची सूचना समितीने विभागास दिली.

**४१.११८** म्हाडाच्या अधिका-यांनी महालेखाकारांबरोबर बैठक घेऊन लेखापध्दती व्यवस्थित करण्याबाबत कोणती कार्यवाही केलेली आहे ? याबाबत माहिती देताना वित्तीय सल्लागार म्हाडा यांनी सांगितले की, १८ जानेवारी,२०११ रोजी विधानमंडळात झालेल्या बैठकीत समितीच्या निर्देशानुसार विभागाने महालेखाकारांबरोबर दोन बैठकाही केलेल्या आहेत. म्हाडा येथे लेखांकन पध्दती करिता टॅली सॉप्टवेअर खरेदी करण्यात आले आहे. सदर टॅली सॉप्टवेअर मुंबई स्थित मंडळासह बाहेरील मंडळात सुध्दा देण्यात आले असून त्यावर काम करण्याची प्रक्रिया सुरु आहे. लोकलेखा समितीपुढे साक्ष झाल्यानंतर महालेखाकार यांचे सोबत सिस्टीम व्यवस्थित करण्याबाबत कोणीही बैठक झाली नाही. तथापि १२ ऑक्टोबर, २०१० रोजी झालेल्या लोकलेखा समितीच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे दि. २५.१०.२०१० रोजी महालेखाकार यांचे सोबत बैठक घेण्यात आली होती. त्यामध्ये लेख्यांच्या संगणीकरणाबाबत चर्चा होऊन प्राधिकरणाचे पुढच्या वर्षीचे लेखे हे टॅली आज्ञावलीचा वापर करुन सादर करण्यात येतील असे आश्वासीत करण्यात आले होते व त्यानुसार टॅली आज्ञावलीचा वापर करुन लेखे ठेवण्यांचे सुरु आहे. म्हाडात लेखा विभागात काम करणा-या कर्मचा-यांना प्रशिक्षण देण्याबाबत महालेखाकार यांच्या ट्रेनिंग विभागाशी संपर्क साधण्यात आला होता त्यानुसार म्हाडातील वर्ग ३ चे कर्मचा-यांचे प्रशिक्षण वर्ग दिनांक १९.०९.२०११ ते २१.०९.२०११ पर्यंत महालेखाकार यांचे बांद्रा-कुर्ला संकुल येथील ट्रेनिंग सेन्टर येथे आयोजित करण्यात आले होते. परंतु लोक लेखा समितीची बैठक ठरल्यामुळे ते पुढे ढकलण्यात आले आहे. वर्ग ३ चे कर्मचा-यांचे प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर वर्ग १ व २ चे कर्मचा-यांचे प्रशिक्षण वर्ग सुरु करण्यात येतील.

**४१.११९** दिनांक १८ जानेवारी २०११ रोजी लोकलेखा समिती समवेत विभागाची बैठक झाली असतांना अजून पर्यंत म्हाडाकडून कामाला का सुरुवात केली नाही ? प्रशिक्षण सुरु करण्यासाठी विभागाला ९ महिने लागले आहेत. याबाबत विभागाने सांगितले की, कामास प्रारंभ झाला आहे. प्रशिक्षण सुरु करण्यास विलंब झाला ही वस्तुस्थिती आहे. इतर कामे सुध्दा द्रुत गतीने करण्याचा प्रयत्न केलेला आहे. लेख्यांमध्ये आणि सुसूत्रीकरणामध्ये समितीला विभागाची प्रगती दिसून येईल. सन १९९५-९६ ते सन २००६-०७ पर्यंतचे वार्षिक लेखे शासनास सादर करण्यात आलेले आहेत. शासनामार्फत ते महालेखाकारांकडे जात असते. सन २००७-०८ चे वार्षिक लेखे दिनांक २०.४.२०११ रोजी विधान मंडळास सादर करण्यात आले आहेत.

विधानमंडळात लेखा सादर केल्यानंतर ३ महिन्यांच्या आत त्यावरील ज्ञापने महालेखापाल यांचेकडून संमत करुन लोकलेखा समितीस सादर करणे आवश्यक असल्याने दि. १६.७.२०११ रोजी शासनाकडून सदर ज्ञापनाबाबत चर्चा करण्याकरिता बैठक घेण्यात आली असून बैठकीत सन २००७-०८ च्या वार्षिक लेख्यावरील लेखापरीक्षण अहवालातील परिच्छेदांची संपूर्ण माहिती व संबंधीत कागदपत्रे शासनास सादर करणेबाबत सांगितले आहे. याबाबत क्र. १८३४ दि. १६.०७.२०११ च्या पत्रान्वये सर्व विभागीय मंडळांना सूचित केल्यानुसार मुंबई दु.वपु.मंडळाशिवाय सर्व विभागीय मंडळाकडून कागदपत्रे प्राप्त झाली आहेत. सदर बाबतीत दिनांक २२.०९.२०११ रोजी दु.३.३० वा. म्हाडा कार्यालयातील बैठकीबाबत शासनाकडून दिनांक २०.०९.२०११ रोजी कळविण्यात आले आहे. T0tal Paras 0f DAR on the Annual Account for the Year 2008-09 was 90, Answers given for Draft AUDIT Paras FOR 2008-09 was 74, Accepted Answers-53, Non Accepted Answers-21, Total Paras Reported in SAR-37.

**४१.१२०** तसेच सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यावरील लेखापरीक्षण अहवाल दि. १३.५.२०११ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्याने सदर लेखा लेखापरीक्षण अहवाल दि. १३.०५.२०११ रोजीच्या पत्रान्वये प्राप्त झाल्याने सदर लेखा लेखापरीक्षण अहवालासह प्राधिकरणाच्या बैठकीत स्वीकृत करण्यात आला आहे. तसेच लेख्याचे मराठीकरण करण्याची कार्यवाही सुरु आहे. मराठीकरण झाल्यानंतर सन २००८-०९ च्या लेख्याची मराठी व इंग्रजी प्रती छपाई करुन विधी मंडळ अधिवेशनात सादर करण्यात येत आहेत. सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यास प्राधिकरणाची सर्क्युलेशन पध्दतीने मंजूरी प्राप्त झाल्याने सदर लेखा निवासी लेखारीक्षा अधिकारी यांचेकडे लेखापरीक्षणासाठी पाठविण्यात आलेला होता. लेखापरीक्षण पूर्ण झाले असून तो दि. २९.०६.२०११ अन्वये प्राप्त झाला आहे. सदर अहवालातील परिच्छेदांची उत्तरे दि. ५.०९.२०११ अन्वये उपमहालेखापाल, मुंबई यांना सादर करण्यात आली आहेत. महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचा सन २०१०-११ चा एकत्रित वार्षिक लेख्यास सर्क्युलेखन पध्दतीने प्राधिकरणाची मान्यता घेऊन तो लेखापरीक्षा अधिकारी यांना लेखापरीक्षणासाठी पाठविण्यात आला आहे अशी माहिती विभागीय सचिवांनी समितीस दिली.

**४१.१२१** म्हाडाची निर्मिती १९७७ मध्ये झाली असतांना म्हाडामध्ये सुधारणा होण्यास २०११ साल ऊजाडले हे याबद्दल समितीला अभिमान वाटत नाही. लोकलेखा समितीने सुधारणा

करण्याच्या संदर्भात म्हाडा मंडळास ज्या सूचना केल्या होत्या त्या प्रमाणे म्हाडाने सुधारणा केल्या नाहीत असे समितीचे म्हणणे नाही. परंतु सर्व यंत्रणेने म्हाडास सूचना देण्याची वेळ म्हाडावर येऊ नये असे मत समितीने व्यक्त केले.

**४१.१२२** प्रत्येक व्यवहाराचे शासनाचे नियमानुसार नोंदणी करण्योच काम पूर्ण झाले आहे काय व त्यासाठी कोणते सॉफ्टवेअर वापरण्यात आलेले आहे ? असे समितीने विचारले असता म्हाडात शासनाचे नियमानुसार व्यवहाराची नोंदी करण्यात येत होती. पूर्वी सदर कामाकरिता एन.आय.सी.ने तयार केलेल्या आज्ञावलीनुसार कार्य करण्यात येत होते. आता त्या पध्दतीने सुध्दा कार्यवाही सुरु असून लोकलेखा समितीला दिलेल्या आश्वासनानुसार म्हाडाने टॅली सॉफ्टवेअर खरेदी केले असून त्याचा पुरवठा मुंबई स्थित मंडळासह बाहेरील मंडळाला करण्यात आला असून त्यावर कार्य करण्याची कार्यवाही सुरु आहे. टॅली सॉफ्टवेअर पध्दतीने सन २०११-१२ चे वार्षिक लेखे पूर्ण करण्याचा मानस आहे असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले.

**४१.१२३** याचाच अर्थ असा की, म्हाडाची लेखापध्दती अद्ययावत नाही असे मत समितीने व्यक्त केले असता विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, टॅली सॉफ्टवेअरमुळे फायदा होणार आहे. यापूर्वी ताळमेळाच्या बाबतीत फरक पडला होता. वसुली लेख्यानुसार झाली पाहिजे होती. बँकेत वसुली झाल्याचे दिसत होते. परंतु त्यामध्ये वेगवेगळी प्रपत्रे तयार होत होती. आता टॅली हे सॉफ्टवेअर वापरण्यात येत आहे. समितीने बँकेतील लेख्यांचा ताळमेळ बसत नसल्याचा मुद्दा उपस्थित केला होता. परंतु वस्तुस्थिती अशी आहे की, ते आजही शक्य होत नाही. बँकेचे आणि म्हाडाचे अकाऊण्ट इंटरफेस झाले की, यामध्ये सिस्टिमेटिक चेंजेस होतील. यानंतर सदरची रक्कम आपल्या अकाऊण्टमध्ये रिफ्लेक्ट होईल. या सिस्टिमची रेंट कलेक्टरपासून सुरुवात केली पाहिजे. But, if we start with that level it will take two years down to line.

**४१.१२४** Are you satisfied with effectiveness of Tally software ? याबाबत खुलासा करताना विभागाने सांगितले की, मॅस्टेकने सादरीकरण केले आहे त्याचे विस्तारीकरण करणे आवश्यक आहे. ज्याप्रमाणे यापूर्वी अकाऊण्टसाठी लेजर मेंटेन केले जात होते ते काम आता टॅलीच्या माध्यमातून होणार आहे. इस्टेट मॅनेजमेंटसाठी याचा उपयोग होईल.

**४१.१२५** सॅप ऐवजी आता टॅलीचा वापर केला जाणार आहे. या प्रणालीवर तुम्ही किती टक्के अवलंबून राहणार आहात, सॅपची प्रक्रिया बरोबर आहे का ? याबाबत तांत्रिकदृष्टया तपासणी करण्यात आली आहे काय ? असे समितीने विचारले असता शासन स्तरावर ही प्रणाली मान्य झालेली आहे. त्यांच्याकडून प्रत्येक प्रोसेसला आपल्या अधिका-यांची मान्यता घेतली जाते. इस्टेट मॅनेजरला रजिस्टर मेंटेन करावयाचे असेल तर ते प्रत्येक डीडची नोंद करुन ठेवतात. ते डेटा एन्ट्री करुन घेतात. या प्रणालीचा खर्च बऱ्याच पटीने कमी आहे असे विभागाने सांगितले असता काही वर्षांनी विभागाकडे सॅप नसल्यामुळे हे काम बरोबर झाले नाही असे म्हणण्याची वेळ म्हाडावर येऊ नये अशी अपेक्षा समितीची आहे असे मत व्यक्त केले.

**४१.१२६** याबाबत सचिवांनी सूचित केले की, युनिकोड हे अनेक भाषांचे सॉफ्टवेअर आहे. त्यामुळे मराठी भाषेतून डेटा एन्ट्री करण्यासाठी म्हाडाला कोणतीही अडचण येऊ नये. तसेच सॉफ्टवेअरची भाषा देखील मराठी असावयास पाहिजे. परंतु त्यासाठी बराच वेळ लागेल. But, it can happen in future. It will happen, but it will take lot of time. Now, the I.T. sector have started this process

**४१.१२७** सद्य:स्थितीत म्हाडाकडे एकूण किती प्लॉट आणि सदनिका उपलब्ध आहेत, त्यापैकी किती सदनिकांची व प्लॉटची विक्री झाली आहे आणि किती सदनिकांची विक्री होणे बाकी आहे? याबाबत विभागाने सांगितले की, विक्री होण्यासाठी बाकी असलेले ३७ प्लॉट आहेत. याबाबतची माहिती **परिशिष्ट-४** मध्ये समाविष्ट आहे.

**४१.१२८** म्हाडाकडे ३०-३० वर्षापूर्वीचे रिक्त गाळे शिल्लक आहेत हे खरे आहे काय ? एखाद्या गाळ्याला ३० वर्षे झाली तरी रिक्त रहात असेल तर त्याची माहिती समितीला देणे आवश्यक आहे. असे किती गाळे रिक्त राहिलेले आहेत ? तसेच २००६ पूर्वीचे गाळे रिक्त आहेत काय ? याबाबत खुलासा करताना विभागाने सांगितले की, २००६ मधील ८४ गाळे शिल्लक असून २००६ सालापासून राज्यात ६,१६६ गाळे रिक्त राहिलेले आहेत. समितीने सन २००६ च्या अगोदरच्या रिक्त गाळ्यांच्या संदर्भातील माहिती समितीस उपलब्ध करुन देण्याची सूचना विभागीय प्रतिनिधींना केली.

**४१.१२९** रिक्त गाळ्याची माहिती विभागापेक्षा समितीकडे जास्त आहे. १९८०-९० सालापासूनची माहिती समिती देण्यास तयार आहे असे समितीने सांगितले असता समितीला

त्यावेळची अतिरिक्त माहिती सादर करण्यात येईल असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले.

**४१.१३०** किती प्लॉटची विक्री झालेली आहे व किती बाकी आहेत याबाबतचा अद्ययावत तक्ता समितीस देण्यात यावा, असे निदेश समितीने विभागाला दिले असता याबाबतची अतिरिक्त अद्ययावत माहिती समितीस देण्यात येईल असे आश्वासन विभागाने समितीस दिले.

**४१.१३१** ३०-३० वर्षापूर्वी बांधलेल्या गाळयांची विक्री का होत नाही ? असे समितीने विचारले गेल्या दोन महिन्यांपासून रिक्त गाळ्यांचे प्राधान्याने वाटप करण्याची कार्यवाही सुरु केलेली आहे. कारण रिक्त गाळ्यांवर झालेला खर्च वायफळ ठरु शकतो असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. (यासंदर्भातील माहीती **परिशिष्ट ५** मध्ये समाविष्ट आहे.)

**४१.१३२** म्हाडाच्या मुख्य कार्यालयाच्या अभिलेख्यावर गाळे रिक्त असतील, परंतु प्रत्यक्षात त्या गाळ्यांचा कोणी तरी ताबा घेतलेला असेल. रिक्त गाळ्यांची माहिती तक्त्याच्या स्वरुपात देण्यात यावी. असे समितीने सूचित केले असता याबाबत २००६ पूर्वीची अतिरिक्त माहिती समितीस देण्यात येईल, असे आश्वासन विभागाने समितीस दिले.

**४१.१३३** किती गाळ्यांचे वाटप झाले, किती रिक्त राहिले आहेत याची योजनानिहाय माहिती द्यावी असे समितीने विभागास निदेश दिले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, राखीव कोट्यातील लाभार्थी न मिळणे हे एक कारण आहे. तसेच मुख्यमंत्री कोट्यातून २ टक्क्यातील गाळ्यांचे वाटप करता येत नसल्यामुळे ते गाळे रिक्त राहिलेले आहेत. १.मुंबई मंडळाने सद्यस्थितीत किती गाळ्यांचे वाटप केलेले आहे याबाबतची माहिती **परिशिष्ट ६** मध्ये समाविष्ट केलेली आहे. २. म्हाडा कडील राखीव कोट्यातील गाळ्यांची मंडळनिहाय माहिती **परिशिष्ट ७** मध्ये समाविष्ट आहे. ३. मुख्यमंत्री कोट्यातील २ टक्के गाळ्यांचे सन २००४ पासूनची लाभार्थ्यांची यादी व मुख्यमंत्री २ टक्के कोट्यातील गाळे रिक्त राहण्याची कारणे याबाबतची माहिती **परिशिष्ट ८** मध्ये समाविष्ट आहे.)

**४१.१३४** नागपूरच्या म्हाडामध्ये जनरलच्या लाभार्थ्यांनी चुकीची कागदपत्रे दिल्याचे आढळल्याने त्या ठिकाणी व्हीजीलन्सची चौकशी लावण्यात आली. त्यामुळे त्या ठिकाणी जवळ जवळ १००-१२५ गाळे रिक्त आहेत म्हाडाचे व्यवस्थापन लक्ष देत नसल्यामुळे उपरोक्त प्रकार घडत आहेत व हे प्रकार नागपूरलाच नाही तर सर्वत्र आढळून येतात. योग्य लाभार्थ्याला सदनिका मिळाली पाहिजे असे मत समितीने व्यक्त केले.

**४१.१३५** सायन- प्रतिक्षा नगर तसेच मुंबईमध्ये वाणिज्यिक गाळे किती रिक्त आहेत याची संपूर्ण माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी. तसेच मुंबईतील म्हाडाच्या किती सदनिकांचा ताबा अद्याप पर्यंत देण्यात आलेला नाही याची सुध्दा माहिती समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी. ही सर्व माहिती समितीस प्राप्त करुन देण्यात येईल असे आश्वासन विभागीय प्रतिनिधींनी समितीस दिले. (सदरहू माहिती विभागाकडून प्राप्त झाली असून सदर माहिती **परिशिष्ट ९ व १०** मध्ये समाविष्ट आहे.)

**४१.१३६** सन २००६ च्या अगोदरच्या लेख्यांची माहिती १९९० पासूनची आपल्या ९ मंडळाची डिटेल माहिती या माहितीमध्ये आपली एकूण मत्ते किती आहेत, किती जागांवर अतिक्रमण झालेले आहे म्हाडाने ॲक्वायर केलेली जागा, खरेदी केलेली जागा व त्यावर किती जमिनीवर किती बांधकामे, वितरीत केलेले प्लॉट, वितरीत न केलेले प्लॉट तसेच अद्ययावत केलेले स्टॉक रजिस्टर या सर्व बाबींची माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने विभागीय प्रतिनिधींनी दिले. (सदरहू माहिती विभागाकडून प्राप्त झाली असून सदर माहिती **परिशिष्ट ११** मध्ये समाविष्ट आहे.)

**४१.१३७** म्हाडाकडे पैसे कशा पध्दतीने आले, कशा पध्दतीने खर्च झाले, म्हाडाची एकूण ॲसेट्स किती आहे, ट्रान्झीट कॅम्पची काय स्थिती आहे, वेटींग लिस्टची काय स्थिती आहे या सर्वांची माहिती समितीला जाणून घ्यावयाची आहे. याबाबतची माहिती विभागाकडून प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे आहे.

**४१.१३८** "माहे सप्टेंबर २०१२ नुसार एकूण २०६६१ संक्रमण शिबीराचे गाळे आहेत त्यापैकी ११६५ संक्रमण गाळे रिक्त आहेत. सदर गाळे हे मुंबई व मुंबई उपनगर येथे विखुरलेले असून असे एकूा ३१ ठिकाणी संक्रमण गाळे मुंबई इमारत दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाच्या अखत्यारीत आहेत

**४१.१३९** संक्रमण गाळे वितरण कार्यपध्दती ही मुख्यत्व आपातकालीन, दुरुस्ती अथवा पुर्नरचना अंतर्गत येत असलेल्या उपकर प्राप्त इमारतीमधील पात्र भाडेकरु/रहिवासीकरीता प्राधान्याने करता येते उपकर प्राप्त इमारतींच्या ज्या भाडेकरु/रहिवाशी यांचे संक्रमण गाळ्यात स्थलांतर करणे आवश्यक आहे अशा सर्व भाडेकरु/रहिवाशी यांना संक्रमण गाळ्यांचे वितरण करण्यात आलेले आहे मंडळाकडे सप्टेंबर २०१२ अखेरीस ११६५ एवढे संक्रमण गाळे रिक्त

असल्यामुळे उपकर प्राप्त इमारतींच्या भाडेकरु/रहिवाशी यांना प्रतिक्षा यादीवर असल्याचा प्रश्न उद्‌भवत नाही."

**४१.१४०** खरे म्हणजे एकंदर मत्ता किती आहे याचीच विभागाला माहिती नाही. याबाबत खुलासा करताना विभागीय प्रतिनिधींनी सांगितले की, लँड रेकॉर्डस बाबतीत कलेक्टर ऑफिसमधील टाऊन प्लॅन्स वेगळेच आहेत. तसेच ॲसेट्सच्या संदर्भात फिक्सड् ॲसेट्स आणि मुव्हेबल ॲसेट्सच्या माहिती संदर्भात उणिवा आहेत ही वस्तुस्थिती आहे. म्हाडाच्या जमिनी किती आहेत याची विभागाकडे पूर्ण माहिती नाही. काही लाभार्थी म्हाडाकडे येतात व सांगतात की, ही ही जमीन तुमची आहे ती जमीन आपण आम्हाला देऊ शकता काय? आता म्हाडाचे रेकॉर्ड व जिल्हाधिकारी कार्यालयाचे रेकॉर्ड विभाग क्रॉस व्हेरीफाय करुन काम करीत आहोत. जमिनीच्या संदर्भात विभागाकडून कार्यवाही सुरु आहे. युएलसी अंतर्गत किती जमिनी म्हाडाकडे अधीग्रहीत आहेत यासंदर्भात सर्व माहिती गोळा करुन त्याचा हिशोब लावण्याचे काम सुरु आहे. म्हाडाला शासनाकडून सुध्दा जमिनी मिळालेल्या असून त्या बाबतीतील माहिती सुध्दा म्हाडा संकलित करीत आहे. म्हाडाला मिलची २०१० हेक्टर जमीन मिळालेली आहे. या अगोदर म्हाडाकडे केवळ १७८० हेक्टर जमिनीचीच माहिती होती. त्यामधील ३०० हेक्टरचे मोजमाप करावयाचे आहे. म्हाडाचे ५६ ले आऊट असून त्याच्या एरियाचे मोजमाप करुन फिगर काढलेली आहे. ज्या जमिनीचे ले आऊट झालेले नाही त्याची माहिती म्हाडाने अजून घेतलेली नाही. सर्व सोसायटींच्या एरियाचे म्हाडा आता रिव्हाईज्ड् ले आऊट्स तयार करीत आहे. यामध्ये सदरहू जमिनीचा टोटल एरिया, रोड इत्यादींचा हिशोब लावण्याचा प्रयत्न म्हाडा करीत आहे. ज्या जमिनीचा ले आऊट झालेला आहे त्याचे सर्व्हे करण्याचे काम सुरु तसेच लँड ऑडीटच्या कामास सुरुवात झालेली आहे.

**४१.१४१** भूमी लेखापरिक्षणासाठी एकंदर किती कालावधी लागेल ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाने सांगितले की, सहा महिन्यांमध्ये भूमी लेखापरिक्षण होईल. जागेच्या संदर्भात म्हाडाचा अभिलेख व जिल्हाधिकारी कार्यालयाच्या अभिलेख्यावरुन माहिती घेऊन मोजमाप केले जाणार आहे. या बाबतीत प्रायोरिटीवर काम करण्यात येईल. यामध्ये एकूण २०१० हेक्टर जमिनीपैकी जवळपास १७०० हेक्टरच्या ले आऊटचे मोजमाप झालेले नाही. त्याच्या मोजमापाचे काम आता करण्यात येत आहे. या जमिनी पीसेस मध्ये आहेत. त्यामुळे याबाबतीत जिल्हाधिकारी कार्यालय तसेच सीटी सर्व्हे कार्यालय, एसएलआर,

टीआयएलआर यांच्याकडून माहिती घेऊन ही कामे करण्यात येणार आहे. त्यामुळे यासाठी अधिक कालावधी लागण्याची शक्यता आहे. जमिनीची मोजणी करण्यासाठी खाजगी टेंडर सुध्दा काढण्यात आलेले आहे. त्यामुळे आऊट ले जमीन किती आहे ते समजेल व त्यावरुन आपल्याला किती जमिनीचा विकास करावयाचा आहे ते सुध्दा समजेल. आपल्याकडे नेमकी किती जमीन आहे याची माहिती सांगणे अवघड आहे. त्यामुळे जमिनीच्या मोजमापाची प्रक्रिया पूर्ण होत नाही तोपर्यंत म्हाडाकडे एकूण किती जमीन आहे हे सांगणे अवघड आहे.

**४१.१४२** समितीला यासाठी एकूण मालमत्तेचा आढावा घ्यावा लागणार आहे असे समितीने सांगितले असता बिल्टअप एरियाचा अभिलेखा जिल्हाधिकारी आणि नगर भूमापन कार्यालयामधून उपलब्ध होऊ शकेल. म्हाडाकडे ७० टक्के प्लॉटची माहिती आहे. म्हाडामध्ये डेव्हलपमेंडचे, लाभधारकांचे, घुसखोरांचे सुध्दा मोठया प्रमाणात प्रश्न आहेत. त्याबाबतची सर्व माहिती अद्ययावत करुन समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी. याबाबतची माहिती प्राप्त झाली असून ती खालीलप्रमाणे आहे.

**४१.१४३** "मंडळाने माहे ऑगस्ट २०१२ अखेरीस एकूण ८८२४ अपात्र तथा घुसखोर रहिवाशी असल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते त्यापैकी ४१५३ रहिवाशांना म्हाडा अधिनियम ९५ अ (३) अन्वये नोटीस बजावली असून १३०५ रहिवाशींवर प्रत्यक्ष निष्कासन आदेश बजावण्यात आले आहेत व त्यापैकी ३४२ रहिवाशींना निष्कासन कारवाई करण्यात आली आहे." **(परिशिष्ट १२)**

**४१.१४४** मुंबई बोर्डाची बैठक किती दिवसांनी होत असते असते तसेच या बैठकींमध्ये किती फाईल क्लिअर झालेल्या आहेत ? याबाबत माहिती देण्याविषयी विभागास सांगितले असता मुंबई बोर्डाची बैठक दर महिन्याला होत असते तसेच बैठकीचे इतिवृत्त समितीला सादर केले जाईल असे विभागीय प्रतिनिधींनी सांगितले. तथापि सदर बैठकीचे इतिवृत्त समितीस अद्यापपर्यंत प्राप्त झाले नाही. म्हाडाच्या ९ बोर्डामधील उच्च उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट, व अल्प उत्पन्न गटातील सदनिका संदर्भातील सविस्तर माहिती समितीला नागपूर अधिवेशनापूर्वी उपलब्ध करुन देण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता विभागीय प्रतिनिधींनी खुलासा केला की, मुंबई वगळता बाकीच्या मंडळांची माहिती तातडीने सादर करण्यात येईल. तथापि मुंबई मंडळाकडे जास्त प्लॉट असल्यामुळे त्याची माहिती तयार करण्यासाठी जास्त वेळ लागणार आहे.

**४१.१४५** सन १९९५-९६ च्या वार्षिक लेखे व लेखापरिक्षण अहवालासंदर्भात समितीने विभागाकडे पुढीलप्रमाणे विचारणा केली. म्हाडाच्या कोणत्याही मंडळाकडे कर्ज नव्हती अथवा बुडीत कर्ज नाहीत असे मंडळाचे म्हणणे आहे, तसेच कर्जाचे वर्गीकरण करण्यात येते की नाही याबाबत खुलासा करावा. याबाबत विभागाने पुढील स्पष्टीकरण केले:-

**४१.१४६** प्राधिकरणांच्या निर्मितीपूर्वी विदर्भ गृहनिर्माण मंडळ व महाराष्ट्र गृहनिर्माण मंडळ यांनी शासनाकडून घेतलेले गृहनिर्माण सहकारी संस्थांकरीता कर्जाची रक्कम वितरीत करण्यात ओली आहे. सदर रक्कम कर्ज स्वरूपात गृहनिर्माण सहकारी संस्थांना वाटप करण्यात आली असून त्याची बहुतांश वसुली झालेली आहे. सदर कर्ज रकमेपैकी किती बुडीत कर्ज आहे याबाबत याची खातरजमा करून योग्य तो निर्णय घेण्यात येईल. प्राधिकरणाने गृहनिर्माणाकरीता हुडको व इतर वित्तीय संस्थांकडून प्राधिकरणाच्या योजनांकरीता कर्जे उभारली होती. सध्या या सर्व कर्जांची परतफेड पूर्ण झालेली आहे.

**४१.१४७** "प्राप्त/अप्राप्त बुडीत कर्जासाठी वर्गीकरण पध्दत अवलंबलेली नाही व त्याची जरुरी भासली नाही," याबाबत अधिक स्पष्टीकरण द्यावे असे समितीने विभागास सांगितले असता प्राधिकरणाकडून लाभार्थ्यांना वाटप होणारी घरे/ भूखंड याची संपूर्ण रक्कम वसूल होत नाही तोपर्यंत घरे / भूखंड लाभार्थ्यांच्या नांवे अभिहस्तांतरण केली जात नाही. त्यामुळे बुडीत कर्जाच्या वर्गीकरणाची पध्दत ठेवण्याचा प्रश्न उद्ववला नाही. परंतु सहकारी गृहनिर्माण संस्थांना दिलेल्या कर्जाबाबत भविष्यात असा प्रश्न निर्माण झाल्यास प्राधिकरण स्तरावर निर्णय घेऊन बुडीत कर्जाच्या वर्गीकरणाची पध्दत / निर्लेखनाची कार्यवाही अवलंबली जाईल. असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.१४८** शासनाची किती रक्कम व कधीपासून जमा केली नाही, ती शिल्लक रक्कम जमा न करण्यास कोण जबाबदार आहे? अशी विचारणा समितीने केली असता म्हाडा वसाहतीतील सुविधांची पातळीवाढ (IIC) यांसाठी प्राप्त झालेली रक्कम ह्या बाबतील शासनाच्या मार्गदर्शक तत्वातील अटी नुसार काम होऊ शाकत नसल्याने त्याबाबत शासनाला अटी शिथिल करण्याबाबतचा विनंती करण्यात आली होती त्यामुळे सदर रु३.४४ लक्ष खर्च होऊ शकली नाही. सदर रक्कम प्राधिकरणाकडे जमा आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१४९** सन १९७७-७८ ते १९९२-९३ या कालावधीतील प्रत्येक आस्थापना खर्चापेक्षा अधिक असलेल्या रु. ७७.७६ लक्ष खर्चाबाबतचे राखीव व अधिक्य मुंबई मंडळाकडून हस्तांतरीत का करण्यात आले नाही, याबाबत प्राधिकरण स्तरावर कोणती कार्यवाही करण्यात आली? अशी विचारणा समितीने केली असता मुंबई मंडळाची रु ३७७.४६ लक्ष महसूली अधिक्य दु व पू मंडळ व मु.इ

गो.सू.म. मंडळाच्या विभाजणापूर्वीचे असल्याने प्राधिकरणाने सदर महसूली आधिक्याची विभागणी करण्यांची गरज भासली नाही व त्यामुळे नवनिर्मित मंडळाला हस्तातरीत केले नाही असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.१५०** सन १९९४ पासून निवृत्ती वेतनाची प्रकरणे निकाली काढली नाहीत, याबाबतची कारणे काय आहेत व या प्रकरणी सद्यःस्थिती काय आहे? याबाबत माहिती देण्यात विभागास सांगितले यावर विभागाने सन १९९४ पासून प्राधिकरणाच्या अंतर्गत असलेल्या निवृत्ती वेतन धारकांची निवृत्ती वेतन अंशदानाची वर्गणी शासनाकडे पत्र क्र. संकीर्ण - ३८०४/प्र.क्र.१०९/प्र.शा - ३, दिनांक २०/१०/२००५ अन्वये कर्मचाऱ्यांच्या सेवानिवृत्तीच्या वेळेस भरणा करावी असे कळविण्यात आले व त्यानुसार जमा झालेली वर्गणी शासनाकडे भरणा करण्यात आली व जसेजसे कर्मचारी निवृत्त होत आहेत. तशी वर्गणी शासन निर्देशाप्रमाणे भरणा करण्यात येत आहे. सद्यःस्थितीत निवृत्त वेतन प्रलंबित नाही असा खुलासा केला.

**४१.१५१** मालमत्तेची मूळ भांडवली किंमत रु. ४३.९१ लक्ष एवढी होती तर घसारा निधी त्यापेक्षाही जास्त हस्तांतरीत केला आहे, आणि त्याचा परिणाम घसारा निधी तेवढया प्रमाणात फुगविला गेला या महालेखापालांच्या आक्षेपावर दिलेले उत्तर समर्थनीय कसे आहे हे स्पष्ट करावे असे निदेश समितीने दिले असता मुंबई मंडळाकडून सन १९९३-९४ मध्ये हस्तांतरीत करण्यात आलेली रु ४३.९१ लक्ष मंडळाच्या विभाजनाच्या वेळी सदर रक्कम मंडळाच्या दायित्वापेक्षा मालमत्ता जास्त म्हणजे महसुली अधिक्य ऐवजी घसारा निधी म्हणून हस्तांतरीत केल्याचे प्राधिकरणाने ऑक्टोबर, १९९८ मध्ये कळविले, त्यामुळे पुर्वी लख्यात घसारा निधी म्हणून दर्शविलेली रक्कम महसुली अधिक्य, म्हणून सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यात दुरुस्त करुन दर्शविण्यात आले असल्याचे विभागाने स्पष्ट केले.

**४१.१५२** महालेखापालांना योग्य कागदपत्रांच्या अभावी भाडेकऱ्यांकडून जमा होणाऱ्या ठेवी शिल्लकीचे खरेपणाबाबत खातरजमा करणे शक्य झाले नाही. त्याची कारणे काय आहेत व याबाबतचे लेखा परिक्षण झाले आहे काय? अशी विचारणा केली असता भाडेकरुकडून प्राप्त होणाऱ्या रकमा लगेचच वित्त नियंत्रक/प्राधिकरण कार्यालयाकडे पाठविण्यात येतात. त्यामुळे रक्कम शिल्लक राहण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही. भाडेकरुकडून प्राप्त होणाऱ्या रकमेची नोंदी ठेवण्याची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१५३** संरचनात्मक दुरुस्तीवर झालेला जास्तीचा खर्च जमा झालेल्या ठेवीच्या रक्कमेतून केला नाही अथवा समायोजन केले नाही या महालेखाकाराच्या आक्षेपावर मंडळाने निश्चित काय

कार्यवाही केली याबाबत माहिती देण्यास समितीने सांगितले असता संरचनात्मक दुरुस्ती व कमाल खर्चापेक्षा जास्त झालेला खर्च भाडेकरुने भाग म्हणून आगाऊ जमा केलेल्या रकमेतून मिटववायचा असतो, परंतु देयक अदायगीच्या वेळी सदर खर्च भाडेकरुचे भाग या लेखाशिर्षाला वर्ग न होता दुरुस्ती खर्चाला वर्ग झाल्याने समायोजन झालेले नाही, यासंबंधाने कृति आराखड्यानुसार २००६-०७ पासून सदर लेखा शिर्षाची ठेव नोंदवही अद्यावत ठेवण्यात आली आहे. त्यापुर्वीचे अधिक्य सन २०१०-११ च्यावार्षिक लेख्यात समायोजन करण्यीच कार्यवाही करण्यात येत आहे असा खुलासा समितीने विभागासमोर केला.

**४१.१५४** "गृहनिर्माण" या शिर्षाखाली किरकोळ देणी रु. ६४६.११ लक्ष बाबत विभागाने दिलेल्या माहितीपैकी अनेक रक्कमांचे समायोजन का झाले नाही? अशी विचारणा केली असता रु६४६.११ लक्ष पैकी रु ११४.८४ लक्ष या रकमेचे समायोजन करण्यात आलेले आहे. उर्वरीत रक्कमेबाबत माहिती उपलब्ध करुन घेऊन समायोजन करण्याची कार्यवाही अनुसरण्यात येत असल्याची माहिती विभागाने दिली.

**४१.१५५** आस्थापना खर्चाच्या रक्कमेचे प्रत्यक्ष खर्चापेक्षा जास्त भांडवलीकरण झाले, ते कोणत्या धोरणानुसार करण्यात आले व हे धोरण ठरविताना कोणते निकष लावण्यात आले ? अशी विचारणा समितीने केली असता आस्थापना खर्चात वेतन भत्ते व सर्व कार्यालयीन खर्च अंतर्भूत असल्याने प्राधिकरणाने १०% सरसकट आस्थापना खर्च योजनेवर आकारण्याचे प्राधिकरणाचे किंमत निश्चितीच्या धारणाप्रमाणे आहे. निकषाबाबतची माहिती प्राधिकरण स्थावर उपलब्ध आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१५६** विटा निर्मिती योजने अंतर्गत ठेकेदाराला दिलेली रक्कम वसूल झाली आहे काय व याबाबतीतील न्यायालयीन प्रकरणाची सद्यःस्थिती काय आहे ? या समितीच्या प्रश्नावर सदर प्रकरणी ठाणे न्यायालयाने दिनांक ०६.०२.९८ रोजी म्हाडाच्या बाजुने निकाल दिला असून ठेकेदार मे.आर.के.माने यांनी या निकाला विरुध्द अपील दाखल केली असून सदर अपील मा.मुंबई उच्च न्यायालयात प्रलंबित आहे. दिनांक ०६.०२.९८ रोजी दिलेल्या निकालावर स्थगीती दिलेली नसल्याने ठेकेदाराकडून वसुली करता येईल असे कळविले कार्यकारी अभियंता घाटकोपर विभाग यांचेकडून ठेकेदाराविरुध्द वसुलीची कायदेशीर कारवाई करण्यात येत आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१५७ सन १९९६-९७ च्या वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवालासंदर्भात** समितीने विभागास अशी विचारणा केली की, झोपडपट्टीवासियांकडून वसुल करण्यात आलेली महानगरपालिकेची देणी निदर्शनास आणूनही त्यासंबंधात विनियोगाबाबतचा निर्णय न होण्याची कारणे काय आहेत व या गोष्टीला जबाबदार कोण आहेत, तसेच अशा जबाबदार अधिकाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली यासंदर्भात विभागाने असे सांगितले की, सोलापूर व कोल्हापूर महानगरपालिकेतर्फे झोपडपट्टी धारकांना एकूण रु ४२.२३ लक्ष कर्ज देणेत आले होते. त्यापैकी ५.५० लक्ष वसूल झाले असून त्याचे समायोजन केले आहे. कर्जाची वसूली ही संबंधित महानगरपालिकेने वसूल करावयाची आहे.

**४१.१५८** सन १९९६-९७ च्या वार्षिक लेखे व लेखा परिक्षण अहवालासंदर्भात समितीने मुंबई गृहनिर्माण मंडळाच्या ठेवीच्या रक्कमेतून केलेल्या कामासाठी चुकीचे खर्चाचे वर्गीकरण करणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली? अशी विचारणा केली असता रु.१०४.१६ लाख सदर रकमा अजूनही लेख्यात सन १९७९-८० पासून दिसत आहेत. याबाबत जुना तपशील उपलब्ध करुन घेण्याची कार्यवाही चालू आहे. त्यामुळे सदर रकमा अजूनही प्रलंबित आहेत. या रकमांचे सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजन करण्यात येईल.

**४१.१५९** लाभधारकांनी जमा केलेल्या भागभांडवलाच्या रक्कमेतील फरक व त्यापोटी झालेल्या खर्चाचे समायोजन सहाय्यक लेखाधिकारी (द) कार्यालयाने केले नाही, याप्रकरणी जबाबदार असणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे ? अशी विचारणा समितीने केली असता सहाय्यक लेखाधिकारी (द) या कार्यालयाने लाभधारकाकडून जमा झालेल्या भाग भांडवलाच्या ठेव नोंद वह्या ठेवण्यात आल्या नसल्याने त्यापोटी झालेल्या खर्चाचे समायोजन झालेले नाही. या कार्यालयात त्यावेळेसचा अधिकारी/कर्मचारी वर्ग सद्या सेवानिवृत्त झालेला आहे, सध्या एप्रिल २००६ पासून सदर नोंदवही अद्यावत ठेवण्यात आलेली आहे व त्यापुर्वीची रक्कम सन २०१०-११ समायोजित करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.१६०** रोजकिर्द व बँकेतीच्या चालू खात्यातील रक्कम यातील फरकाच्या रक्कमेची तपासणी पूर्ण झाली आहे काय? याबाबत विचारणा केली त्यावर माहिती देवून विभागाने असे सांगितले की, बॅंक ताळमेळ अद्ययाबाबत करण्यात आलेले असून जुन्या रकमांचे समायोजन करण्यात आलेले आहेत. मंडळाने एकूण रक्कम रु ८५,८७,७८८/- ची नोंद अनुसूची क्र. ५ मध्ये घेतलेली होती. त्यामध्ये एक अनुसूची एक योजना २४ गाळे उच्च उत्पन्न गट, टोपे नगर, अमरावती ची नोंद

घेण्याचे राहिलेले होते. वार्षिक लेख्यामध्ये फरकाची रक्कम रु १,८६,०००/- ची नोंद घेण्यात आलेली आहे.

**४१.१६१** महालेखापालांनी दाखविलेल्या रु. १.७७ लक्ष एवढया जास्तीच्या रक्कमेचे समायोजन झाले आहे काय? यावर तपासणी केली असता तात्पुरत्या अग्रीमाची रक्कम रुपये १.७७ लक्ष ताळेबंदकपत्रानुसार / मासिक लेख्यानुसार बरोबर असल्याने समायोजन करण्याची आवश्यकता नाही. असा खुलासा विभागाने केला.

**४१.१६२** अहवालात अनेक ठिकाणी "फार जुनी बाब आहे" असा उल्लेख करुन त्या बाबीबाबत कोणतीही कार्यवाही केलेली आढळत नाही, याबाबत स्पष्टीकरण करावे. असे समितीने निदेश दिले. यावर संबंधीत अभिलेख्याचा शोध घेऊन मुंबई मंडळाशी संबंधित आगाऊ खर्चाचे समायोजन वार्षिक लेख्यात करण्यात आलेले आहे. सदर लेख्याशीर्षाखाली शिल्लक निरंक आहे. या बाबत सादर करण्यात येते की, एकुण आक्षेपीत रकमेपैकी औरंगाबाद मंडळा संबंधीत रक्कम रु १.१३ लाख असून ०.८७ हजार रकमेचे समायोजन तहसीलदार तुळजापुर संबंधित अकृषीक कर सदराखाली समायोजीत करण्यात आले असून उर्वरीत रक्कम २५८३५/- मार्च २०१० च्या लेख्यानुसार शिल्लक असुन सदर रक्कम तहसीलदार तुळजापुर यांच्या पुढील देणे रकमेत समायोजीत करण्यात येईल. अशी माहिती विभागाने समितीस दिली.

**४१.१६३** सहकारी गृहनिर्माण संस्थाकडून वसुल करावयाच्या रु. २७,०५,६४२/- इतक्या बाकी रक्कमेची वसुली झाली आहे काय? याबाबत समितीने विचारणा केली असता मंडळाने रु ९.०९ लक्ष वसुली मार्च, २०१० अखेरपर्यंत केलेली असून उर्वरित वसूली रुपये १८.७८ लक्ष करावयाची आहे. वसूलीचे काम प्रगतीपथावर आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१६४ १९९८-९९ च्या वार्षीक लेखे व लेखा परिक्षण अहवालासंदर्भात** समितीने बँक ताळमेळ अहवाल तयार झाला आहे काय? अशी विचारणा केली त्यावर प्राधिकरणाचे कार्यालयातील बँक ताळमेळाचे काम माहे नोव्हे. २०१० पर्यंत पूर्ण झालेले आहे. मुंबई मंडळाचे बँक ताळमेळ ऑक्टोबर, २०१० पर्यंत अद्यावत झालेले आहे. या मंडळाकडील सर्व चार बँक खात्यांचे ताळमेळाचे काम माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत असून जमा खर्चाच्या नोंदी रोख वहीत घेण्यात आलेल्या आहेत. बँक ताळमेळातील माहे ११/२०१० पर्यंतच्या प्रलंबित रकमा निकाली काढण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. या मंडळाअंतर्गत असलेल्या सर्व बँक खात्याचे ताळमेळ माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत करण्यात आलेले आहे. मंडळाचे दोन बँक खाते असून त्यापैकी माहे डिसेंबर २०१० व ऑक्टोबर २०१० पर्यंत ताळमेहाचे काम पूर्ण झालेले आहे. ऑक्टोबर, २०१० पर्यंत दोन लेख्यांचे ताळमेळाचे

पूर्ण झालेले आहे. प्रलंबित रकमा निकाली काढण्याचे कार्यवाही प्रगतीपथावर आहे. मंडळातील ८ बँक खात्याचे बँक ताळमेळाचे काम मार्च २०१० पर्यंत पूर्ण झालेले आहे. नाशिक मंडळाचे बँक ताळमेळाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे. १) मुख्य लेखाधिकारी यांच्याकडील बँक खात्याच्या बाबतीत माहे डिसेंबर २०१० अखेर मिळकत व्यवस्थापक यांच्या खात्याच्या बाबतीत सप्टेंबर २०१० अखेर बँक ताळमेळ पूर्ण केले आहे अशी माहिती विभागाने समितीस दिली. २) दिल्ली येथील पंजाब नॅशनल बँकेत खाते उघडण्याची आवश्यकता काय होती, त्या बँकेत ठेवलेल्या रक्कमेचा शोध लागला आहे काय? अशी समितीने विचारणा केली असता म्हाडा हे हुडको या संस्थेकडून गृहनिर्माणाकरीता कर्ज घेत हाते त्यामुळे दिल्ली येथे बँक ऑफ महाराष्ट्र येथे खाते उघडण्यात आले होते. सदर खात्यात अद्यापही रु ३००/- शिल्लक दिसून येत आहे. दिल्ली येथे पंजाब नॅशनल बँक येथे कोणतेही खाते उघडण्यात आले नाही. पंजाब नॅशनल बँक चे मुंबई येथे खाते असून सदर खाते हे बाहेरील मंडळाकडे वसूल झालेल्या रक्कमा पाठविण्यासाठी उघडण्यात आलेले होते. असे स्पष्टीकरण विभागाने कले.

**४१.१६५** नियोजित कामासाठी प्राप्त झालेली अग्रीम स्वरुपातील रक्कम लेख्यामध्ये सन १९७९-८० पासून दाखविण्यांत येत असून हे वर्गीकरण चुकीचे झाले, त्या प्रकरणाची सद्य:स्थिती काय आहे? याबाबत माहिती देताना विभागाने सांगितले की, सदर रक्कमांमध्ये मुख्यत: खालील बाबीचा समावेश आहे.

महाराष्ट्र शासन रु ०.३२ कोटी

स्वायत्ता संस्था रु ०.२५ कोटी

सहकारी संस्था रु ०.३३ कोटी

इतर रु ०.१४ कोटी

**४१.१६६** ह्या रक्कमा १९७९-८० पासुन लेख्यामध्ये देणी (liabilities) या सदराखाली दिसत आहे सदर रक्कमेचे समायोजन सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात करण्यात येत आहे.

**४१.१६७** अचलपूर नगरपरिषदेकडून रक्कम वसूल करण्यात आली आहे काय? या समितीच्या प्रश्नावर अचलपूर नगरपरिषद यांना देय असलेल्या रकमेतून मंडळाने रुपये ५२४४७/- ची वसूली जे.व्ही.क्र.२३५, दि.३१/०३/२००५ अन्वये केलेली आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१६८** ठेवी नोंद वहया अद्ययावत करण्यात आल्या आहेत काय? व या सर्व रक्कमांचा ताळमेळ घालाण्यात आला आहे काय? अशी विचारणा समितीने केली असता रोड मॅपनुसार सन २००६-०७ पासून ठेव नोंद वह्या ठेवण्यात आल्या आहेत. वार्षिक लेख्यांशी ताळमेळ करण्यात आला

आहे. मुंबई मंडळातील विविध ठेवी नोंद वह्या मार्च २०१० पर्यंत अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. व त्या रकमांचे मासिक लेख्यांशी ताळमेळ घालण्यात आलेला आहे. ठेव नोंद वह्या ठेवण्यात आलेल्या आहेत. सन २००७ पासून ताळमेळ घालण्याची कार्यवाही सुरु असून मार्च २०१० पर्यंत अद्ययावत करण्यात आल्या आहेत. या कार्यालयात सर्व प्रकारच्या नोंद वह्या अद्यावत ठेवण्यात आल्या असून, त्यातील रकमेचा लेखेशी ताळमेळ घालण्यात आलेला आहे. ठेवी नोंदवह्या सन २००२-०३ ते डिसेंबर, २०१० पर्यंत अद्ययावत करण्यात आल्या असून त्या वार्षिक लेख्याशी ताळमेळ घालण्याचे काम सुरु आहे. ठेवी नोंदवह्या सन २००२-०३ ते डिसेंबर, २०१० पर्यंत अद्ययावर करण्यात आल्या असून त्या वार्षिक लेख्याशी ताळमेळ जुळविण्यात आली आहे. कंत्राटदाराकडील अनामत/सुरक्षा ठेव नोंदवह्या कृति आराखड्यानुसार एप्रिल २००६ पासून अद्यावत ठेवण्यात आलेल्या आहेत व रकमांचा ताळमेळ घालण्यात आला आहे. असा खुलासा विभागाने समितीसमोर केला.

**४१.१६९** अहवालामध्ये "समायोजन करण्यात येईल, तसेच उचित कार्यवाही करण्यात येईल" असे स्पष्टीकरणात नमूद केलेले आहे, त्याप्रमाणे तपासणी करून काय कार्यवाही करण्यात आली? यासंदर्भात माहिती देण्याबाबत समितीने सांगितले असता मुंबई मंडळातील फर्निचर, वाहने, संयत्रे व अवजारे या मालमत्तेचे मुल्याकन केलेले असुन सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात मालमत्तेच्या किंमतीपेक्षा अधिक घसारा निधी लेख्यातुन समायोजित केलेला आहे. जमिनी व इमारती या मालमत्तेचे नोंद वह्या अद्यावत करण्याचे काम चालु आहे. त्या अनुषंगाने सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजन करण्यात येईल. आक्षेपनुसार रु .५९.२५ लक्ष महसुली अधिक्य म्हणून सन २००३-०४ च्या वार्षिक लेख्यात अनुसूची- २ मध्ये समायोजित केली आहे अशी माहिती विभागाने दिली.

**४१.१७०** आर.जी. एन. पी. कार्यालयाकडून आलेल्या नस्ती सापडल्या आहेत काय? नसल्यास त्यावर काय कार्यवाही करण्यात आली आहे? या समितीने विचारलेल्या प्रश्नावर आर.जी.एन.पी. कार्यालयाकडून प्राप्त झालेल्या नस्त्या सापडल्या असून सदर नस्त्या लेखा परिक्षणासाठी सादर करण्यात येतील अशी माहिती विभागाने समितीस दिली.

**४१.१७१** सन २०००-२००१ च्या वार्षीक लेखे व लेखा परिक्षण अहवालासंदर्भात समितीने कपात केलेल्या रक्कमेतील रूपये ३.४७ कोटीची तफावत शोधण्यात आली आहे काय? अशी विचारणा केली त्यावर सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात वेतनदेयकातून व कंत्राटदारांच्या देयकातून कपात केलेल्या रकमांची तपासणी करुन प्रत्यक्ष देय असलेल्या रकमा वार्षिक लेख्यातून समायोजित करण्यात आलेल्या आहेत असा खुलासा विभागाने केला.

**४१.१७२** मुंबई गृहनिर्माण मंडळाकडून वर्ग करण्यात आलेली रक्कम अद्याप न देण्याची कारणे कोणती? या प्रश्नावर विभागाने या प्रकरणासंबंधातील कागदपत्रे मुंबई मंडळाकडून उपलब्ध न झाल्यामुळे कार्यवाही प्रलंबित आहे. मार्च, २०११ पुर्वी सदर प्रकरणी कार्यवाही पूर्ण करण्यात येईल. अशी माहिती दिली.

**४१.१७३ सन २०००-२००१ च्या वार्षीक लेखे व लेखा परिक्षण अहवालासंदर्भात** समितीने म्हाडाने एप्रिल २००६ मध्ये मुंबई, नागपूर, अमरावती व औरंगाबाद मंडळाकडून आलेली उत्तरे पाठविली असे सांगितले की घसारा राखीव गुंतवणूकीचा निर्णय प्राधिकरणाच्या अधिकारात आहे त्याबाबतीत पुढे काहीही स्पष्टीकरण दिलले नाही त्यामुळे याबाबत समितीला माहिती देण्यात यावी महालेखाकारांना दिलेली उत्तरे समर्पक नसून परिच्छेदामध्ये घेतलेल्या आक्षेपांना धरुन नाहीत तसेच दुरुस्ती व पुर्नरचना मंडळाच्या बाबतीत समायोजन सन २००२-०३ च्या वार्षिक लेख्यामध्ये केले असून नाशिक मंडळाच्या बाबतीत प्रकरण तपासले जात आहे काय याबाबत स्पष्टीकरण देण्यात यावे असे विभागास सूचित केले यावर घसारा राखिव निधी हा केवळ समायोजनाद्वारे निर्माण झालेला असून तो मंडळाच्या लेख्यात त्यांच्या स्थायी संपत्तीच्या अनुषंगाने दर्शविण्यात येतो. व त्याचे प्राधिकरणाचा लेखा एकत्र करताना एकत्रीत केला जाऊन अशा रक्कमाची गुंतवणूक वेगळी न करता प्राधिकरण स्तरावर एकत्रीत शिल्लक निधी गुंतवणूक करण्यात येते. मंडळाचे बाबतीत रु. ५९.२५ लक्ष रक्कम जी घसारा निधी म्हणून दर्शविण्यात आली होती ती घसारा निधीची नसून महसूली आधिक्य ची असल्याचे निदर्शनास आल्यामुळे त्यांचे समायोजन सन २००५-०६ चे वार्षिक लेख्यात जेव्ही क्र. ७ द्वारे करण्यात आले आहे. नाशिक मंडळाचे बाबतीत तपासणी करण्यात आली असून असे निदर्शनास आले आहे की, सदर घसारा राखी निधीचेच आहे व ते बरोबर आहे असे विभागाने समितीसमोर स्पष्ट केले.

**४१.१७४** सन २०००-२००१ च्या वार्षीक लेखे व लेखा परिक्षण अहवालासंदर्भात समितीने नागपूर मंडळाने समायोजन उशीराने करण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा केली असता समितीने करावयाच्या समायोजनाच्या कागदपत्रे जुन्या कालावधीची असल्याने तिचा शोध घेण्यास व पडताळणी करुन रक्कम निश्चित करण्यासाठी विलंब झाला त्यामुळे समायोजन उशिराने करण्यात आले आहे. ते क्षमापीत करण्यात यावे असे विभागाने समितीला सांगितले.

**४१.१७५** मुंबई, कोकण, नाशिक व औरंगाबाद या मंडळाच्या बाबतीत समायोजन प्रलंबित रहाण्याची कारणे काय? या मंडळाचे समायोजन निश्चित कोणत्या महिन्यात व वर्षात करण्यात आले आहे ? असे समितीने विचारले असता करावयाच्या समायोजनाच्या कागदपत्रे जुन्या कालावधी असल्याने तिचा शोध घेण्यास व पडताळणी करुन रक्कम निश्चित करण्यासाठी विलंब झाला त्यामुळे

समायोजन उशिराने करण्यात आले आहे ते क्षमापीत करण्यात यावे. समायोजन केल्याच्या मंडळनिहाय वर्ष खालील प्रमाणे आहे. सन २०१०-११ मध्ये करण्यात आले आहे. सन २०१०-११ मध्ये करण्यात आले आहे. सन २००५-०६ चे वार्षिक लेख्यात समायोजन करण्यात आले आहे. सन २००५-०६ चे वार्षिक लेख्यात समायोजन करण्यात आले आहे असा खुलासा विभागाकडे केला.

**४१.१७६** महानगरपालिकेला तसेच महापालिकेला कोणती व किती रक्कम देय होती सदर रक्कम अदा न करण्याची कारणे काय आहेत ? याबाबत समितीने विचारणा केली असता महानगरपालिकेला व महापालिकेला रु. ४.६८ कोटी रक्कम देय होती. परंतु महानगरपालीकेने त्यांच्या देयकांच्या लेखापरिक्षण झालेल्या देयकांच्या प्रमाणीत प्रती प्रतिपूर्ती सादर करणे आवश्यक होते. सर्व मंडळाकडून वारंवार पत्रव्यवहार करुनही महानगरपालीकेनी/ महापालिकेनी दखल घेतली नाही अशा महानगरपालीकेची / नगरपालीकेच्या शिल्लक रक्कमा ह्या म्हाडाने लॅप्स डिफाजित खाली महसूलात जमा केलेल्या आहेत असे विभागाने सांगितले.

**४१.१७८** माहे एप्रिल २००६ मध्ये असे सांगितले की कोकण, नाशिक, अमरावती व मुंबई झोपडट्टी सुधार मंडळ व वित्त नियंत्रक यांच्या बाबतीत रु.२२५.७० कोटी पैकी काही रक्कमेचा तपशील आता उपलब्ध होता उर्वरित बाकी मंडळाच्या बाबतीत असे सांगितले गेले की दस्तऐवज अद्यायावत करण्याचे काम पूर्ण झाले आहे काय त्याची सद्य:स्थिती काय आहे ? समितीच्या या प्रश्नावर विभागाने खालील स्पष्टीकरण केले. रोड मॅपच्या अनुषंगाने दिलेल्या सूचना नुसार सन २००६-०७ पासून नोंदवह्या अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत. वार्षिक लेख्याशी ताळमेळ करण्यात आला आहे.

**४१.१७९** मुंबई मंडळांतर्गत विविध ठेव नोंदवह्या अद्ययावत करण्यात येऊन रकमांचे मासिक लेख्याशी ताळमेळ केलेले आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाशी संबंधीत खालील ठेव नोंद वह्या अद्यावत करण्यात आले असून त्या वार्षिक लेख्यांतील रक्कमांशी जुळत आहेत व सन २००८-०९ च्या लेखा परिक्षणावेळी दाखविण्यात आली आहे.

१. कंत्राटदाराची अनामत ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

२. कंत्राटदाराची सुरक्षा ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्ययावत आहे.

इतर संकीर्ण ठेव नोंद वही माहे डिसेंबर, २०१० पर्यंत अद्यावत आहे. कोकण मंडळ :- सन २००७-०८ पासून नोंदी अद्यावत असून त्याचा ताळमेळ वार्षिक लेख्याशी घालण्यात आला आहे. नागपूर मंडळाने सन २००२-०३ ते २००८-०९ पर्यंत नोंदवह्या तयार केल्या असून त्याचा ताळमेळ वार्षिक लेख्यांशी करण्यात येत आहे. नोंदवह्या अद्यावत करण्यात आलेल्या आहेत. कृति आराखड्यानुसार २००६-०७ पासून ठेव नोंदवह्या अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत, त्यापुर्वीचे संबंधित ठेवींचे अधिक्य

सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्याशी ताळमेळ करुन समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे.

**४१.१८०** खरेदी, महानगरपालिका कर, जलशुल्क प्रॉपिंग आकार जमिनीची किंमत परवाना शुल्क इत्यादी अदा करण्याची तरतूद गेल्या वर्षी करुन देखील समायोजन न करण्याचे व अदा न करण्याची कारणे काय आहेत याबाबत समितीने विचारणा केली त्यावर सदरहू खर्चाच्या अदा करावयाच्या परंतु प्रत्यक्ष अदा न केलेल्या रक्कमाच्या तरतूदी वार्षिक लेख्यात करण्यात आल्या हात्या. अशा रक्कमाचे समायोजन पुढील वर्षात करण्यात येते. परंतु शासनाकडून येणे असणाऱ्या रक्कमाबाबात चे समायोजन हे शासनाला देय असणाऱ्या रक्कमेतून करण्याचे प्रस्तावीत असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येत आहे.

**४१.१८१** पुणे मंडळाने रु. ४.०४ लक्ष रक्कमेची जमीनीचे देणे म्हणून देयत्ता दर्शविली होती. सदर जमीनीची बारामती नगरपरिषदेला द्यावयाचे जागेची किंमत म्हणून देयत्ता दर्शविली होती परंतू नगरपरिषदेने जागेची किंमत अद्यापही निश्चित न केल्यामुळे सदर देयत्ता अद्यापही प्रलंबित आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१८२** झोपडपट्टी श्रेणीवाढ कार्यक्रम व जनतेचा निवारा कार्यक्रम याबाबत समितीला सविस्तर माहिती देण्यात यावी. असे निदेश समितीने दिले असता सदर कार्यक्रम हा राज्य शासनाचा होता यामध्ये झोपडपट्टी मध्ये राहणाऱ्या नागरीकांचे जिवनमान उंचावण्यासाठी झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या नागरीकांच्या / जनतेच्या सहभागातून झोपडपट्टया मध्ये सामायीक सुविधा पुरविण्यासाठी महानगरपालीकेस कर्ज उपलब्ध करुन देण्यात आले होते व त्यांची संबंधित महानगरपालीकेकडून नियमित संबंधित मंडळाकडे परतफेड करण्यात येत होती अशी माहिती विभागाने समितीसमोर दिली.

**४१.१८३** मुलभूत दस्तऐवज उपलब्ध नसणे किंवा अपुरे असणे यामुळे फर्निचर, साहित्य यंत्र व अवजारे, गाडया, कार्यालयीन सामुग्री, संक्रमण शिबीरे इत्यादी स्थावर मालमत्तेची किंमत रुपये ३२.०० कोटी व बांधकामाचा खर्च रुपये ८.५९ कोटी सहजपणे तपासता येत नाही मुलभूत दस्तऐवज उपलब्ध नसण्याची किंवा अपुरे असण्याची कारणे काय ? याबाबत समितीने विचारणा केली असता काही मंडळानी त्यांचे स्तरावर स्थावर मालमत्ता तसेच चालू मालमत्ता यांच्या नोंदवह्या न ठेवल्यामुळे सहजपणे तपासता आला नाही ही बाब सत्य आहे. आता शासनाने ठरवून दिलेल्या रोडमॅप नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात आली असून सर्व नोंदवह्या अद्यावत करण्यात आल्या असून त्या तपासण्याकरीता उपलब्ध आहे असे मंडळाद्वारे कळविण्यात आले आहे असे विभागाने सांगितले.

**४१.१८४** मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ व अमरावती मंडळाने अग्रिमाचे उशिराने समायोजन करण्याची कारणे काय आहेत अशी विचारणा समितीने केली असता विभागाने पुढील खुलासा केला.

रु. ८७९३/- या रक्कमेचे समायोजन करण्यात आले होते. परंतु सदर समायोजन चूकीचे झाल्यामुळे लेख्यात रक्कम दिसून येत होती. सदर रक्कम पुन्हा समायोजन सन २००६-०७ चे लेख्यात करुन चुकीची दुरुस्ती करण्यात आली. अम :- सदर दस्ताऐवज हे फार जून असल्याने समायोजनासाठी रेकॉर्ड शोधण्यास झालेल्या उशिरामुळे समायोजन करण्यास उशिर झालेला होता. सदर बबीचे समायोजन सन २००८-०९ चे लेख्यात करण्यात आलेले आहे.

**४१.१८५** प्रतिनियुक्तीवर असलेल्या अधिकाऱ्यांच्या रजा वेतनाची रक्कम वसूल न होण्याची कारणे काय ? त्याची सद्य:स्थिती काय आहे? या प्रश्नावर सदर रक्कमाबाबत शासनाशी पत्रव्यवहार करुनही रक्कमा प्राप्त न झाल्यामुळे सदर रक्कमा लेख्यात दिसून येत होत्या. परंतू बराच काळ होऊनही रक्कमा प्राप्त न झाल्यामुळे सदर रक्कमा ह्या महसूली खर्च म्हणून दर्शविण्यात आलेल्या आहेत असा खुलासा विभागाने केला.

**४१.१८६** संक्रमण शिबीरातील गाळे आणि पुनर्विकास इमारतीतील गाळे यांचे भाडे आणि सेवा शुल्क या पासून मिळालेले उत्पन्न रूपये १३.८३ कोटी मूळ दस्तऐवज उपलब्ध नसल्यामुळे पडताळणी करता आले नाही त्याची कारणे काय आहेत यासंदर्भात विभागाने पुढील खुलासा केला. सदर रक्कमाबाबत रजिस्टर ठेवण्यात आलेले नव्हते त्यामुळे सदर रक्कमाची पडताळणी करता आली नाही. आता सर्व क्षेत्रीय नोंदवह्या तयार असून त्या तपासणी करीता उपलब्ध आहे.

**४१.१८७** स्थायी मालमत्ता चुकीने महसुली खर्च म्हणून निर्लेखित करण्यांत आली, वार्षिक देयकात आलेले समायोजन बरोबर आहे.असे म्हाडाचे म्हणणे संयुक्तीक नाही.कारण कोणतीही विक्री झालेली नसताना स्थावर मालमत्ता महसूली खर्च म्हणून निर्लेखित केली असून त्याची कारणे काय आहेत? अशी विचारणा समितीने केली सदर समायोजन हे मे.के.एस.संधवी आणि कं. यांचे सल्यानुसार करण्यात आले असून सदर गाळे विक्रीची रक्कम ही प्राप्त झालेल्या बांधकाम खर्चाच्या प्रमाणात लेख्यातून निर्लेखित करुन प्राप्ती व खर्च यांतील फरक हा महसूली उत्पन्न म्हणून दर्शविण्यात आले आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१८८** बॅक ताळमेळातील विसंगती घालविण्याबाबत व ते अद्ययावत करण्याबाबतच्या सूचना सर्व मंडळांना केव्हा निर्गमित केल्या आहेत. याबाबत प्राधिकरण स्तरावरून किती वेळा पाठपुरावा करण्यात आला आहे.मुबई मंडळाच्या बैंक ताळमेळाचा तपशिल न देण्याची कारणे काय आहेत? त्याची सद्य:स्थिती काय आहे? अशी समितीने पृच्छा केली त्यावर बँक ताळमेळ चे कामाची तपासणी करण्याकरीता प्राधिकरणाने मे. के.एस.संघवी आणि कं. यांची नियुक्ती सन २००२ मध्ये केली असून या त्यांचे मार्फत सदर विषयाबाबत सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे त्यामुळे ताळमेळ अद्यावत करण्याचे कामास गती येवून आता मंडळनिहाय ताळमेळाची स्थिती खालील प्रमाणे आहे.

प्राधिकरणाचे कार्यालयातील बँक ताळमेळाचे काम माहे नोव्हे २०१० पर्यंत पूर्ण झालेले आहे. मुंबई मंडळाचे बँक ताळमेळ ऑक्टोबर, २०१० पर्यंत अद्यावत झालेले आहे. या मंडळाकडील सर्व चार बँक खात्यांचे ताळमेळाचे काम माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत असून जमा खर्चाच्या नोंदी रोख वहीत घेण्यात आलेल्या आहेत. बँक ताळमेळातील माहे ११/२०१० पर्यंतच्या प्रलंबित रकमा निकाली काढण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. या मंडळाअंतर्गत असलेल्या सर्व बँक खात्याचे ताळमेळ माहे डिसेंबर, २०१० पर्यंत अद्यावत करण्यात आलेले आहे. मंडळाचे दोन बँक खाते असून त्यापैकी माहे डिसेंबर २०१० व ऑक्टोबर २०१० पर्यंत ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे. ऑक्टोबर, २०१० पर्यंत दोन लेख्यांचे ताळमेळाचे पूर्ण झालेले आहे. प्रलंबित रकमा निकाली काढण्याचे कार्यवाही प्रगतीपथावर आहे. मंडळातील ८ बँक खात्याचे बँक ताळमेळाचे काम मार्च २०१० पर्यंत पूर्ण झालेले आहे. नाशिक मंडळाचे बँक ताळमेळाची सद्यस्थिती खालीलप्रमाणे आहे. २) मुख्य लेखाधिकारी यांच्याकडील बँक खात्याच्या बाबतीत माहे डिसेंबर २०१० अखेर मिळकत व्यवस्थापक यांच्या खात्याच्या बाबतीत सप्टेंबर २०१० अखेर बँक ताळमेळ पूर्ण केले आहे. असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.१८९** समायोजन कोणत्या आधारे करण्यात आले त्याची माहिती समितीला देण्यात यावी समायोजन करताना विविध अनियमितता/विसंगती लेखा अहवालात सातत्याने नमूद करून देखिल त्याची दखल घेण्यात आलेली नाही. मंडळ निहाय / श्रेणी निहाय समायोजनाचा तपशिलाची समितीला माहिती देण्यात यावी असे निदेश समितीने दिले. सदर समायोजन ह मे.के.एस.संघवी आणि कं. यांचे सल्यानुसार करण्यात आले असून सदर गाळे विक्रीची रक्कम ही प्राप्त झालेल्या बांधकाम खर्चाच्या प्रमाणात लेख्यातून निर्लेखित करुन प्राप्ती व खर्च यातील फरक हा महसूली उत्पन्न म्हणून दर्शविण्यात आले आहे असे सांगितले.

**४१.१९०** म्हाडाच्या विविध वसाहतीतील सामायिक सेवेसाठी रू. १०.८९ कोटी अनुदान केव्हा प्राप्त झाले व त्याचे समायोजन केव्हा करण्यात आले ? म्हाडाच्या विविध वसाहतीतील सामाजिक सेवेसाठी खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले.

| | |
|---|---|
| सन ८७-८८ | ९३,०८,०००/- |
| सन ८९-९० | १९,२२,४५२/- |
| सन ९१-९२ | ५९,००,०००/- |
| सन ९२-९३ | १,४४,००,०००/- |
| सन ९३-९४ | १,४९,९६,०००/- |
| सन ९४-९५ | ५०,००,०००/- |

सन ९६-९७ ४,९४,१५,०००/-

---

१०,०९,४१,४५२/-

उपरोक्त अनुदानापैकी मार्च २०१० अखेर रु. ६.६४ कोटी खर्च झालेला असून उर्वरित शिल्लक अनुदान रु. ३.४५ कोटी वित्त नियंत्रक/प्रा यांचेकडे जमा आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१९१** रू. ५३.६७ लक्ष रक्कमेचे समायोजन केव्हा व कशाप्रकारे करण्यात आले, ही रक्कम समायोजित करण्यात झालेल्या विलंबाची कारणे काय आहेत ? यासंदर्भात विभागाने पुढील माहिती दिली. रु. ५३.६७ लक्ष रकमेचे (झोपडपट्टी निर्मुलनासाठीचे प्राप्त अनुदान) समायोजन सन २००६-०७ च्या वार्षिक लेख्यात करण्यात आले आहे. हे समायोजन जे.व्ही.क्र. २९ अन्वये भांडवली निधीमध्ये खर्ची टाकून व महसूली जमा दाखवून करण्यात आले आहे. ही बाब लेखापरीक्षणाने निदर्शनास आणले नंतर लगेचच समायोजन करण्यात आले आहे.

**४१.१९२** राजीव गांधी निवारा प्रकल्पातंर्गत रू. ७५.२३ कोटी खर्चाच्या बदल्यात अनुदानाचे समायोजन करण्याच्या दृष्टीने काय कार्यवाही करण्यात आली व केव्हा ? या समितीच्या प्रश्नावर राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत प्राप्त अनुदानाचे रु. ७५.२३ कोटीचे समायोजन सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात करण्यात येत आहे असे उत्तर विभागाने दिले.

**४१.१९३** १) घसाऱ्याची योग्य आकारणी व चुकीचे समायोजन आकारणी याबाबत काय कार्यवाही करण्यात आली ? असे समितीने विचारले असता मालमत्तेच्या किंमतीपेक्षा जास्त असलेली घसारा राखीव रक्कम सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात जे.व्ही.क्र.६४ व ७२ द्वारे समायोजीत करण्यात आली आहे. आता अनुसूची २ मध्ये योग्य घसारा रक्कम निधी दर्शविण्यात आला आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१९४** प्राधिकरणाच्या कर्मचाऱ्यांना घरबांधणी अग्रीम देण्यासाठी वेगळा राखीव निधी कोणत्या नियमानुसार निर्माण करण्यात आला ? असे समितीने विचारले असता प्राधिकरणाचे ठराव क्र. ५८७९ दिनांक ९/०१/२००४ अन्वये घर बांधणी अग्रीम राखीव निधी रद्द करण्यात आला असून सन २००३-०४ चे वार्षिक लेखामध्ये प्रमाणक क्र. ७९ अन्वये महसूल आधिक्यामध्ये जमा करुन घेण्यात आले असे स्पष्टीकरण विभागाने दिले.

**४१.१९५** जास्तीचा घसारा आकारणी करण्यास कोण जबाबदार आहे ? याबाबत समितीने विचारणा केली असता सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात स्थायी मालमत्तेवरील (फर्निचर, वाहने, संयंत्रे व अवजारे इ.) आकारण्यात आलेल्या अधिक घसारा निधीचे समायोजन केलेले आहे. अधिक घसारा आकारणी ही समायोजन जे.व्ही.क्र. ६४ व ७२ द्वारे सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात

समायोजीत करण्यात आली आहे. अधिक घसारा आकारणी ही अनवधानाने झाली होती तरी त्याबाबत माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.१९६** अतिरिक्त भाडे अनुदानापोटीचे राखीव शिर्षाखालील उर्वरित रक्कम रू. १.७४ कोटी समायोजित करण्यात आली आहे काय ? या प्रश्नाला सदर रक्कम सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजीत करण्यात येत आहे असे उत्तर विभागाने दिले.

**४१.१९७** संरचनात्मक दुरूस्तीवरील अतिरिक्त खर्च भागविण्यासाठी गाळेधारकांची भाग रक्कम समायोजित करण्यात आली आहे काय ? या समितीने विचारलेल्या प्रश्नाला सदर रक्कम संकिर्ण ठेवीची होती. तथापि अनवधानाने वार्षिक लेख्यात ती गाळे धारकांचा भाग म्हणून दर्शविण्यात येत होती. संकिर्ण ठेवीचे रजिस्टर लेखापरिक्षणासाठी उपलब्ध आहे. संरचनात्मक दुरुस्ती व कमाल खर्चापेक्षा जास्त झालेला खर्च भाडेकरुने भाग म्हणून आगाऊ जमा केलेल्या रकमेतुन मिटववायाचा असतो, परंतु देयक अदायगीच्या वेळी सदर खर्च भाडेकरुचे भाग या लेखाशिर्षाला वर्ग न होता दुरुस्ती खर्चाला वर्ग झाल्याने समायोजन झालेले नाही,या संबंधाने कृति आराखड्यानुसार २००६-०७ पासून सदर लेखा शिर्षाची ठेव नोंदवही अद्यावत ठेवण्यात आली आहे. त्यापुर्वीचे अधिक्य सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.१९८** पुणे मंडळाच्या रू. १.७९ लाख व रू. १.०१ लाख एवढया रक्कमेचे समायोजन करण्यात आले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता विभागाने पुढील खुलासा केला. पुणे मंडळाकडील लेखापरीक्षणातील रक्कम रु. १.७९ लक्ष व १.०१ लक्ष पडताळणी केली असून या रकमेचे समायोजन सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात करण्यात येत आहे.

**४१.१९९** रूपये ५४.११ लाख या गाळेधारकाकडील ठेव रक्कमेबाबत तपासणी करून दुरूस्ती करण्यात आली आहे काय ? या समितीच्या प्रश्नाला गाळेधारकांकडील ठेव रकमेबाबत पडताळणी करण्यात आली असुन त्याबाबतच्या नोंदवह्या अद्ययावत केलेल्या आहेत व मासिक लेख्याशी ताळमेळ केलेला आहे असे उत्तर विभागाने दिले.

**४१.२००** सन २००२-०३ ते २००८-०९ पर्यंतच्या नोंदवहीतील नोंदी अद्ययावत करून वार्षिक लेख्याशी ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे काय ? याबाबत समितीने विचारले असता रोड मॅपच्या अनुषंगाने दिलेल्या सुचना नुसार सन २००६-०७ पासून नोंद वह्या अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत. वार्षिक लेख्याशी ताळमेळ करण्यात आला आहे. मुंबई मंडळांर्गत विविध ठेव नोंदवह्या अद्ययावत करण्यात येऊन रकमांचे मासिक लेख्याशी ताळमेळ केलेले आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाशी

संबंधित खालील नोंद वह्या अद्यावत करण्यात आले असून त्या वार्षिक लेख्यांतील रक्कमांशी जुळत आहेत वसन २००८-०९ च्या लेखा परिक्षणावेळी दाखविण्यात आली आहे.

३. कंत्राटदाराची अनामत ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

४. कंत्राटदाराची सुरक्षा ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्ययावत आहे.

**४१.२०१** इतर संकिर्ण ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे. सन २००७-०८ पासून नोंदी अद्यावत असून त्याचा ताळमेळ वार्षिक लेख्याशी घालण्यात आला आहे. मंडळाने सन २००२-०३ ते २००८-०९ पर्यंत नोंदवह्या तयार केल्या असून त्याचा ताळमेळ वार्षिक लेख्यांशी करण्यात येत आहे. नोंदवह्यातील नोंदी अद्यावत करुन वार्षिक लेख्याशी ताळमेळाचे काम पूर्ण झाले आहे. कृति आराखड्यानुसार २००६-०७ पासून नोंदवह्या अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत, त्यापुर्वीचे संबंधित ठेवींचे अधिक्य सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्याशी ताळमेळ करुन समायोजन करण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.२०२** उणे शिल्लकी संदर्भांत आवश्यक ते ताळमेळ घेऊन योग्य लेखांकन करण्यात आले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता. सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात वेतन देयकातून कपात करण्यात आलेल्या विविध रकमांचे समायोजन केलेले आहे. प्रत्यक्ष देय रकमा लेख्यात ठेवून उर्वरित रकमांचे समायोजन केलेले आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.२०३** आंतर मंडळ व्यवहाराचे रू. ११४.१२ लक्ष रक्कमेचे समायोजन करण्यात आले आहे काय ? याबाबत समितीने विचारले असता नाही. समायोजनबाबत वित्त नियंत्रक प्राधिकरण यांचेशी पत्र व्यवहार करुन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजित करण्यात येत आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.२०४** पुणे मंडळातील रू. ६६६.६८ लाख एवढया रक्कमेचा ताळमेळ घालण्यात आला आहे काय व त्या रक्क्मेचे समायोजन करण्यात आले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली त्यावर विभागाने पुढील माहिती दिली. पुणे मंडळाकडील वित्त प्रेषणाचे रकमेचा फरक कमी होऊन रुपये २७२.३२ लक्ष इतकाच राहिला आहे. संपूर्ण रकमेचा ताळमेळ घेण्याचा सर्वतोपरी प्रयत्न करणेत येत आहे. परंतु सदर नोंदी बऱ्याच जुन्या म्हणजे १९७७ पासूनच्या असल्याने दस्तऐवजांचा शोध घेणे अवघड जात आहे.

**४१.२०५** कार्यालयीन दुरूस्ती व सुशोभिकरण खर्चाची रक्क्म रू. १०,५७,००१/- वार्षिक लेख्यात स्थिर मत्ता - कार्यालयीन सामुग्रीमधून कमी करून दाखविण्यात आली आहे काय ? या समितीच्या प्रश्नावर रु. १०.५८ लक्ष ही रक्कम समायोजन नोंद क्र. ६ अन्वये कार्यालयीन दुरुस्ती सदराखाली वर्ष २०१०-११ मध्ये दर्शविण्यात येत आहे अशी माहिती विभागाने समितीला दिली.

**४१.२०६** गाळेधारकाना विक्री केलेली मालमत्ता २००१-०२ मध्ये निर्लेखित केल्याचा तपशिल लेखा परिक्षणाकरिता उपलब्ध करून देण्यात आला आहे काय ? या समितीने विचारलेल्या प्रश्नाला मुंबई मंडळातील फर्निचर, वाहने, संयत्रे व अवजारे या मालमत्तेचे मुल्याकन केलेले असून सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात मालमत्तेच्या किंमतीपेक्षा अधिक घसारा निधी लेख्यातुन समायोजित केलेला आहे. जमिनी व इमारती या मालमत्तेचे नोंद वह्या अद्यावत करण्याचे काम चालु आहे. त्या अनुषंगाने सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजन करण्यात येईल. सदरचे अभिलेखे लेखापरिक्षणासाठी उपलब्ध आहेत अशी माहिती विभागाने समितीस दिली.

**४१.२०७** रु. ३,७२,९८१/- या चुकीने वगीकृत केलेल्या रक्कमेचे समायोजन करण्यात आले आहे काय ? यासंदर्भात समितीने विचारणा केली असता रु ३.७३ एसी, झेरॉक्स मशीन इत्यादी वरील खर्च चुकीने संयत्र व अवजारे लेखाशिर्षाखाली चुकीने वर्ग केलेली रक्कम समायेजन नोंद क्रमांक ८ अन्वये कायाग्लयीन सामुग्री लेखाशिर्षाखाली वर्ग करुन सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात दर्शविण्यात येत आहे असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.२०८** दिनांक ३१ मार्च,२०१० अखेर कॅश बुकमधील शिल्लकेची तफावत रक्कमेची पडताळणी करून समायोजन करण्यात आले आहे काय ? याबाबत समितीने विचारले असता विभागाने असा खुलासा केला की, दिनांक ३१ मार्च २०१० अखेरील कॅशबुकमधील प्रत्यक्षा जमा रक्क्म ताळेबंदात ठेवून तफावंतीचे समायोजन करुन सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात अचूक शिल्लक दर्शविण्यात येईल.

**४१.२०९** म्हाडा मुंबई यांनी अर्धशासकिय पत्र क्र३४५० दिनांक १८ ऑगस्ट,२००८ द्वारे मुळ रुक्कम रु.२२,१३,०५४/- व त्यावरील रु.१५,९३,३९८/- व्याजाची मागणी सचिव, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्य विभाग,महाराष्ट्र शासन मंत्रालय, मुंबईला केली आहे. याबाबत खुलासा करण्यास विभागाला सांगितले असता विभागाने असा खुलासा केला की, प्रतिनियुक्तीवरील अधिकारी व कर्मचारी यांचे रजा वेतना पोटीचे येणे रक्कम रु ५३,५६५/- सन ९७-९८ पासूप प्रलंबित आहे. या बाबत शासनाकडे वारंवार पत्रव्यवहार करुन सुध्दा रक्कम प्राप्त झालेली नाही. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाशी संबंधित रक्कम रु ०.३४ लाख असून या बाबतच्या तपशीलाची तपासणी केली असता ही रक्कम महसूली खर्च दाखविण्याऐवजी येणे म्हणून दर्शिवली होती. त्यामुळे ही रक्कम सन २००९-१० च्या वार्षिक लेख्यात प्रणामक क्रमांक ४ अन्वये महसूली खर्च दाखवून समायोजित केली आहे.

**४१.२१०** प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचे रजा वेतनापोटीचे येणे केव्हापासूनचे आहे व ती रक्कम शासनाकडून मिळणेच्यादृष्टीने पाठपुरावा करण्यात आले आहे काय ? अशी विचारणा समितीने केली असता प्रतिनियुक्तीवरील अधिकारी/कर्मचारी यांचे रजा वेतनापोटीचे येणे अनेकदा पत्रव्यवहार करुन आत्तापर्यंत प्राप्त न झाल्याने ते शासनास देय असलेल्या रकमेतून म्हाडास्तरावर समायोजित करण्यात आले आहे. (जे.व्ही.क्र.६३ दि. ३०.१०.२०१०) अशी माहिती विभागाने दिली.

१) नागपूर मंडळाला शासनाकडून येणे असलेल्या ०.७९ लाखाचे वसुलीबाबतची सद्य:स्थिती काय आहे ?

२) संबंधित कंत्राटदारांना देय असलेल्या अंतिम देयकातून रक्कम वसूल करून समायोजन करण्यात आले आहे काय ? अशी समितीने पृच्छा केली त्यावर सदर रक्कम पावती क्र. डी १०४५/९५, दि. २४/०८/२००५ अन्वये मंडळाच्या खात्यामध्ये जमा करण्यात आली आहे.

**४१.२११** समायोजन नोंद क्र. ३१, दि. ३१/३/२००७ अन्वये नोंद घेण्यात आली आहे. अमरावती मंडळाने रु ६०२२६/- वसूल केले असून उर्वरित रक्कम रु १.२५ लक्ष ची वसूली जमा असलेल्या रकमेतून मार्च, २०११ च्या लेख्यात समायोजीत करण्यात येईल असे सांगितले.

**४१.२१२** लोक आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार लाभधारकांकडून वसूल करावयाची रक्कम संबंधित जिल्हाधिकाऱ्यांनी वसूल करून म्हाडाला वळती करून देणेबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? वसूलीसाठी म्हाडाने का प्रयत्न केले नाहीत ? अशी विचारणा समितीने केली असता लोक आवास योजनेच्या लाभार्थींना देण्यात आलेले कर्ज रु १३९.८५ लाख रकमेवर १० टक्के व्याज दरानुसार वसूल होणे अपेक्षित आहे. तथापि, लाभार्थी हा या रकमेचा हप्ता देण्यास तयार नाहीत. म्हणून शासनाकडून हा अकडलेला निधी मागविणे बाबत विचार व्हावा असा प्रस्ताव या कार्यालयाचे पत्र क्र. ४२४७ दि. २५/७/०८ अन्वये प्राधिकरणास सादर करण्यात आलेला आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.२१३** आगरकर नगर,पुणे येथील गाळेधारकाकडून वसूल व्हावयाच्या रु.१,४६,०००/- च्या वसुलीबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? या प्रश्नावर आगरकर नगर, पुणे येथील गाळेधारकांकडून वसूल व्हावयाची शिल्लक रककम रु १.४६ लक्ष पैकी रु १.३८ लक्ष वसूल झाली आहे. उवरित रक्कम रु ८०००/- मार्च, २०११ पर्यंत वसूल करण्यात येईल असा खुलासा केला.

**४१.२१४** पी.बी.ए.बी. पुणे यांचेकडून वसूल करावयाच्या रु. ३६.८७ लाख रक्कमेच्या वसुलीची स्थिती काय आहे ? याबाबत समितीने विचारले असता लेखापरिक्षकाने पुणे बिल्डर्स

असोसिएशन यंचेकडून वसूल करावयाच्या रकमेची परिगणना करताना एकूण कालावधी व त्यांना उपलब्ध करुन दिलेली जागा जास्तीची गृहित धरली आहे. ती अशी क्षेत्रफळ ३४५४ चौ. फुट कालावधी १९८४ ते १९९४ आणि क्षेत्रफळ ९९२ चौ. फुट कालावधी १९९४ते २०००. परंतु प्रत्यक्षात त्यांना फक्त ३०० चौ. फुट जागा ही तात्पुरत्या कालावधीसाठी गृहनिर्माण प्रदर्शनातील सहभगासाठी देण्यात आली होती. त्यामुळे त्यांचेकडून रुपये ३६.८७ लक्ष इतके प्रत्यक्षात येणे आहे अशी माहिती दिली.श्रीमती मनिषा सातकर यांचेकडून उपहारगृहापोटीची रक्कम रु. १७ लाख वसुल करणेबाबतची सद्य:स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता श्रीमती मनिषा सातकर यांचेकडून कॅनटीन भाडयापोटीचे येणे रु १७.०० लक्ष इतके नसून रु १७,०००/- इतके आहे. यापैकी रुपये ११०००/- इतक्या रकमेचे समायोजन अनामत ठेवीमधून करुन उर्वरित संपूर्ण रक्कम मार्च २०११ पर्यंत वसून करण्यात येत आहे अशी माहिती दिली.

**४१.२१५** समाजकल्याण विभाग महाराष्ट्र शासन याचंकडून येणे असलेल्या रु.४१.४० लक्ष रक्कमेच्या वसुलीबाबतची स्थिती काय आहे ? याबाबत विचारणा समितीने केली त्यावर लोक आवास योजनेअंतर्गात लाभार्थ्यांना दिलेल्या कर्जाची वूसली जिल्हा अधिकारी यांचे मार्फत अद्यापही झ ाली नाही. याबाबत शासनाकडे प्रस्ताव पाठविण्यात येत आहे असा खुलासा विभागाने केला.

लेजर व दुय्यम नोंदवहीतील तफावत शोधण्याचे काम पूर्ण झाले आहे काय व त्यानुसार समायोजन करण्यात आले आहे काय? अशी विचारणा समितीने केली यावर विभागाने खुलासा केला की, जे.वी.क्र.१८ दिनांक ३१.१०.२०१० व्दारे समायोजन करण्यात आले आहे.

**४१.२१६** रू. १८,७८,३०८/- या प्रलंबित रक्कमेच्या वसूलीची सद्यस्थिती काय आहे? तसेच रू. ४.०६ लाख एम.एस.इ.बी., एस.पी.ए-१, सोलापूर यांचेकडून वसूल करण्याबाबतची स्थिती काय आहे ? अशी विचारणा समितीने केली असता या मंडळा संबधी सदर आक्षेपीत मुद्या अंतर्गत फक्त २.९० लक्ष इतकी रक्कम होती. या कार्यालयाने आता संबंधीत नोंद व वह्या अद्यावयात केल्या असून सदर रकमेचे योग्य ते समायोजन केलेले आहे. वसूलीची कार्यवाही प्रगतीपथावर आहे. एम.एस.ई.बी. सोलापूर यांचेकडून एकूण रु १२.७० लक्ष इतकी रक्कम वसूल करावयाची होती. त्यापैकी रु ८.६४ लक्ष इतकी रक्कम वसूल झालेली आहे. उर्वरित रक्कम रु ४.०६ लक्ष अद्याप वसूल करावयाची आहे. अशी माहिती विभागाने समितीला दिली.

**४१.२१७** वित्त प्रेषणाची तफावत रक्क्म रू. ७९,६५,४३६/- चे अभिलेख तपासणीचे काम पूर्ण झाले आहे काय त्याबाबत पूढे काय कार्यवाही करण्यात आली ? या समितीच्या प्रश्नालर वित्त

प्रेषणातील रु ७९.६४ लक्ष बाबतचा तपशीलाची तपासणी करुन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समयोजन करण्यात येत आहे असे उत्तर विभागाने दिले.

**४१.२१८** रू.९,५२,३३,७८७/- ही रक्कम वित्त प्रेषणाद्वारे भत्ता व दायित्वाचे हस्तांतरण केल्यापेटीची असून या रक्कमा मंडळाच्या ताळेबंदात सन १९७७ पासून असून त्याबाबतचे मूलभूत अभिलेख उपलब्ध होत नाही याबाबत खुलासा करावा असे विभागाला निदेश दिले असता विभागाने पुढील खुलासा केला. पुणे मंडळाशी संबंधित वित्त प्रेषणाची रक्कम ९५२.३३ लक्ष ही ०५/१२/१९७७ पासून मंडळाच्या लेख्यांमध्ये नमूद आहे. सदरचे दस्तऐवज फार जुने असल्याने मूलभूत अभिलेख अनेक प्रयत्न करुनही उपलब्ध होत नाही.

**४१.२१९** नोंदवहयामधील अखेरच्या शिल्लक रक्कमाचे संबधित वार्षिक लेख्यातील रक्कमेशी ताळमेळ घालण्याचे काम पूर्ण झाले आहे काय व त्यानुसार आवश्यक दुरूस्तीच्या नोंदी वार्षिक लेख्यात घेण्यात आल्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली असता नोंदवही मधील अखेरच्या शिल्लक रकमांचे ताळमेळ करुन आवश्यक दुरुस्तीच्या नोंदी सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात दर्शविण्याची कार्यवाही करण्यात येत आहे असे विभागास सांगितले.

**४१.२२०** १) प्रलंबित बँक ताळमेळामध्ये निदर्शनास आलेल्या तफावती दूर करण्याबाबतच्या कार्यवाहीची सद्य:स्थिती काय ? याबाबत खुलासा करताना विभागाने सांगितले की, प्राधिकरणाचे कार्यालयातील बँक ताळमेळाचे काम माहे नोव्हे. २०१० पर्यंत पूर्ण झालेले आहे. मुंबई मंडळाचे बँक ताळमेळ ऑक्टोंबर, २०१० पर्यंत अद्यावत झालेले आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडील सर्व चार बँक खात्यों ताळमेळाचे काम माहे डिसेंबर, २०१० पर्यंत अद्यावत असून जमा खर्चाच्या नोंद रोख वहीत घेण्यात आलेल्या आहेत. बॅक ताळमेळातील महो ११/२०१० पर्यंतच्या प्रलंबित रक्कमा निकाली काढण्याबाबत कार्यवाही सुरु आहे. औरंगाबाद मंडळा अंतर्गत असलेल्या सर्व बँक खात्याचे ताळमेळ माहे डिसेंबर, २०१० पर्यंत अद्यावत करण्यात आलेले आहे. नागपूर मंडळाचे दोन बँक खाते असून त्यापैकी माहे डिसेंबर, २०१० व ऑक्टोबर, २०१० पर्यंत ताळमेळाचे काम पूर्ण झालेले आहे. अमरावती मंडळाचे ऑक्टोबर, २०१० पर्यंत दोन लेख्याचे ताळमेळाचे पूर्ण झालेले आहे. प्रलंबित रक्कम निकाली काढण्याचे कार्यवाही प्रगतीपथावर आहे. दु. व पु. मंडळातील ८ बँक खात्याचे बँक ताळमेळाचे काम मार्च, २०१० पर्यंत पूर्ण झालेले आहे. नशिक मंडळाचे बँक ताळमेळाची सद्य:स्थिती खालीलप्रमाणे आहे. मुख्य लेखाधिकारी यांच्याकडील बँक खात्याच्या बाबतीत माहे डिसेंबर, २०१० अखेर मिळकत व्यवस्थापक यांच्या खात्यांच्या बाबतीत सप्टेबर २०१० अखेर बँक ताळमेळ पूर्ण केले आहे.

**४१.२२१** अंतर्गत लेखापरिक्षण पथक निर्माण करण्याबाबतच्या प्रस्तांवावर काय निर्णय झाला ? याबाबत माहिती देताना सदर प्रस्ताव शासनाकडे विचाराधीन आहे असे विभागाने सांगितले.

**४१.२२२** बांधकामासाठी एकूण खर्च रू. ९८.४२ लक्ष झाला असून शासनाकडून मिळालेले अनुदान रू. ५३.६७ लक्ष होते त्यामुळे मिळालेल्या अनुदानापेक्षा जास्त खर्च कोणत्या निकषाअन्वये केला आहे ? तसेच खर्च सन २००३-२००४ मध्ये केला असून समायोजन २००६-२००७ मध्ये केले आहे त्यामुळे समायोजन ३ वर्षे विलंबाने करण्याची कारणे काय ? यापुढील मुद्यांमध्ये ही समायोजन उशिराने झाल्याचे निदर्शनास आले आहे त्यामध्ये समायोजन उशिरा झाले आहे त्यामुद्यांची सविस्तर माहिती समितीला द्यावी असे निदेश विभागाला दिले असता शासनाकडून झोपडपट्टी सुधार योजनेखाली गाळयांच्या बांधकामाकरिता एकूण खर्च रु ९८.४२ लख इतका झालेला आहे. त्यासाठी निकषानुसार प्राप्त झालेले अनुदान रु ५३.६७ लक्ष एकूण खर्चामध्ये समायोजित केले आहे तसेच सन २००३-०४ मध्ये झालेल्या खर्चाचे संदर्भात प्राप्त अनुदानाचे समायोजन हे लेखापरिक्षणाने निदर्शनास आणून दिल्यानंतर लगेचच हातामध्ये असणाऱ्या वार्षिक लेख्यामध्ये करण्यात आलेले आहे. त्याच विलंब झाला नाही असा खुलासा विभागाने समितीसमोर केला.

**४१.२२३** राजीव गांधी निवारा प्रकल्प केव्हा बंद करण्यात आला व त्याची कारणे काय आहेत ? प्रकल्प बंद झाल्यानंतर भांडवल निधी रू. ३०,७९,०८,५९३/- या बाबतचा तपशिल आणि जुना दस्तऐवज उपलब्ध न होण्याची कारणे काय आहे यास जबाबदार असणाऱ्यांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे ? अशी विचारणा समितीने केली त्यावर दिनांक १३.६.१९९८ रोजी रा.गा.नि. प्रकल्प शासनाच्या आदेशान्वये बंद करण्यात आला व भूतपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पातील भांडवल मुंबई मंडळ, दु.व पु. मंडळ, वित्त नियंत्रक /प्रा यांना हस्तांतरीत करण्यात आला. राजीव गांधी निवारा प्रकल्पातील दस्तऐवज उपलब्ध असून लेखा परिक्षणास सादर करण्यात येईल असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.२२४** इमारती, उभारणी व वाहने यांच्यावरील घसारा कमी आकारणी/आकारणी न करण्याची कारणे काय ? याबाबत नियमातील तरतूद स्पष्ट करावी असे निदेश समितीने दिले त्यावर घसारा आकारणी ही नियमानुसार मालमत्तेच्या किंमती पर्यंतच करणे आवश्यक आहे. त्याप्रमाणे मंडळाने पूर्ण आकारणी केलेल्या अतिरिक्त घसाऱ्याची रक्कम समायोजित केल्यामुळे घरासा आकारणी कमी दिसते त्यामुळे आता योग्य घसारा आकारणी केली आहे असे विभागाने समितीस सांगितले.

**४१.२२५** लेख्यांच्या चुकीच्या नोंदी चुकीचे वर्गीकरण यामुळे म्हाडाच्या लेख्यामध्ये अनियमितता झालेली आहे त्यामुळे याबाबत निश्चित धोरण ठरविण्यात आले. चुका पुन्हा पुन्हा करण्यात आल्यामुळे त्या जाणिवपूर्वक करण्याचे समितीच्या निदर्शनास आले आहे त्यामुळे याबाबत संबंधितावर जबाबदारी निश्चित करण्यात यावी असे निदेश समितीने दिले असता रुपये १५१.०३ लाख चूकीचे वर्गीकाणी दुरुस्ती प्रमाणक क्र. ६८ अन्वये सन २००३-०४ वार्षिक लेख्यामध्ये नोंद घेण्यात आली आहे. रुपये २.३७ लाखाचे दुरुस्ती सन २०१०-११ मध्ये करण्यात येत असल्याचे विभागाने समितीला सांगितले.

**४१.२२६** शासनाकडून प्राप्त झालेला निधी खर्च करण्याबाबत म्हाडाची कार्यपद्धती काय ? अखर्चित निधी बाबत कोणते धोरण निश्चित करण्यात आले आहे अशी विचारणा समितीने केली यावर शासनाकडून प्राप्त झालेला निधी मंडळाकडे असलेल्या तरतूदी नुसार खर्च करण्याकरिता वित्त प्रेषणाव्दारे मंडळाकडे वळता करण्यात येत आहे. सदर निधीचा प्रत्यक्ष खर्च हा मंडळ स्तरावर होत असतो. अखर्चित निधी हा बांधकाम पूर्ण झाल्यानंतर मंडळाचे व प्राधिकरणांचे लेखे पूर्ण झाल्यावर योजना पूर्णत्वानंतर शासनास परत करण्यात येतो असा खुलासा विभागाने केला.

**४१.२२७** रु.५८,११,८०८/- ही गाळेधारकाकडून सुरक्षा अनामत म्हणून प्राप्त झालेली रक्कम लाभधारकाचा परतफेडीचा कालावधी संपल्यानंतरसदर रक्कम किती कालावधीत परत करण्यात आली. लाभधारकांची वर्षेनिहाय परत केलेल्या रक्कमेसह नावे देण्यात यावी रक्कम विलंबाने परत करण्याची कारणे काय ? अशी पृच्छा समितीने केली यावर विभागाने मंडळाने लाभधारकांच्या नांवासह सुरक्षा ठेव नोंदवही व इसारा रक्कम नोंदवही डिसेंबर, २०१० पर्यंत पूर्ण केलेली आहे. तसेच सदर रक्कमा समायोजनाचे व परत फेडीचे कार्यवाही सुरु आहे असा खुलासा केला.

**४१.२२८** मुंबई मंडळाने रू. १.३२ कोटीची रक्कम सन २००५-०६ पूर्वीची लाभधारकाकडून मागणी नसलेली शिल्लक संकिर्ण ठेव आहे याबाबत समितीला माहिती देण्यात यावी संकिर्ण ठेव रक्कमेची लाभधारकांनी मागणी करणे आवश्यक आहे काय ? असे विचारले असता सदर रक्कम परताव्याची नसून गाळ्यांच्या किंमतीपोटी प्राप्त झालेली आहे. त्यांचे समायोजन सन २००४-०५ च्या वार्षिक लेख्यात केलेले आहे असे स्पष्टीकरण विभागाने समितीसमोर केले.

**४१.२२९** सन २००३-०३ च्या वार्षिक लेखापरिक्षण अहवालामध्ये भाष्य करूनसुद्धा मुलभूत दस्ताऐवज उपलब्ध नसणे अथवा अपुरा असणे, यामुळे ज्या रक्कमांची तपासणी करता आली नाही त्या रक्कमा दिनांक ३१/३/२००३ अखेर रू. ३९८.७३ कोटी वरून दिनांक ३१/३/२००४ रोजी रू.

४३१.१६ कोटी पर्यंत वाढल्या त्याबाबत कोणकोणत्या विभागीय मंडळामध्ये दस्ताऐवजाअभावी रक्कमाची तपासणी करता आली नाही त्याच्या सद्यःस्थितीबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे निदशे समितीने दिले असता किरकोळ जमा रक्कम परताव्यासाठी मागणी न प्राप्त झाल्याने प्र.क्र.६४ दिनांक ३१/१०/२०१० अन्वये म्हाडाचे महसूली अधिक्यामध्ये जमा दाखविण्यात आले आहे. रोड मॅपच्या अनुषंगाने दिलेल्या सूचना नुसार सन २००६-०७ पासून नोंद वह्या अद्यावत ठेवण्यात आल्या आहेत. वार्षिक लेख्याशी ताळमेळ करण्यात आला आहे. सदर रक्कमेचे सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात समायोजन केलेले आहे. (जे.व्हि.न.१९,२०,२१,२२) मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाशी संबंधित खालील ठेव नोंद वहया अद्यावत करण्यात आले असून त्या वार्षिक लेख्यांतील रक्कमांशी जुळत आहेत व सन २००८-०९ च्या लेखा परिक्षणावेळी दाखविण्यात आली आहे. १.कंत्राटदाराची अनामत ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे. २. कंत्राटदारांची सुरक्षा ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे. इतर संकिर्ण ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे. औरंगाबाद मंडळाबाबत सादर करण्यात येते की, एकुण आक्षेपीत रक्कम रुपये ४३१.१६ कोटी पैकी औरंगाबाद मंडळासंबंधीत २६.६८ कोटी होती. आता मिळकत व्यसस्थापक औरंगाबाद मंडळ यांनी सर्व प्रकारच्या ठेव नोंद वह्या अद्ययावत केल्या असून त्यातील शिल्लक रक्कम वार्षीक लेख्याशी जळवुन घेण्यात आली आहे. कोकण मंडळात सद्या ठेव नोंदवहया जसे कंत्राटदारांची अमानत, सुरक्षा अमानत अर्जदारांची अनामत, वसाहतीवरील खर्चाच्या नोंदवहया अद्ययावत ठेवण्यात आल्या असून तफावतीचे समायोजन करण्यात आलेले आहे असे विभागाने स्पष्टीकरण केले.

**४१.२३०** १) विक्री, नगरपालिका कर, जलआकार, टेकू लावण्याचा आकार, जमिनिची किंमत, परवाना आकार, असे दायित्व बुडित म्हणूंन घोषित का करण्यात येतात याबाबत समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने सूचित केले त्यावर सदर रक्कमेचे सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात समायोजन केलेले आहे असे विभागाने सांगितले.

**४१.२३१** २) लोकलेखा समितीच्या निर्देशास अनुसरून घालून दिलेल्या रोड मॅप मधील बंधनाप्रमाणे मालमत्तेचे प्रत्यक्ष मुल्यांकन त्यानी केले आणि अतिरिक्त मुल्यांकन सन २००८-०९ चे वार्षिक लेख्यातून काढून टाकले जेणे करून दिनांक ३१/३/२००९ रोजी मालमत्तेची शिल्लक लेखा पुस्तकातून राखून ठेवणे रोडमॅप मधील मुद्दाक्रमांक ३ प्रमाणे आवश्यकत्या वेळी संबंधित विभागाला विहित नमुन्यात स्थाई मालमत्तेची नोंदवही ठेवण्याच्या सुचना दिलेल्या आहेत त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे काय, असल्याय उदाहरणासह स्पष्टीकरण देण्यात यावे असे समितीने सूचित केले होते त्यावर विभागात पुढील स्पष्टीकरण केले. सदर रक्कमेचे सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात समायोजन केलेले आहे. स्थायी मालमत्तेच्या नोंदवहया ठेवण्यांत आलेल्या आहेत. मुंबई

झोपडपट्टी सुधार मंडळाने मालमत्तेची नोंदवही अद्यावत केली असून दिनांक ३१/३/२००९ अखेर दिसणारी मालमत्तेची रक्कम रुपये १९००५७८/- ही सन २००८-०९ च्या लेख्याप्रमाणे बरोबर आहे. औरंगाबाद मंडळात रोडमॅप नुसार ठरवुन देण्यात आलेल्या मार्गदर्शक तत्वानुसार कार्यवाही करण्यात आली असून रोडमॅप मधील मुद्दा क्र.३ प्रमाणे आवश्यकत्या वेळी संबंधीत विभागाला विहीत नमुन्यात स्थायी मालमत्तेची नोंदवही अद्ययावत ठेवण्याच्या सुचना देण्यात आल्या असून त्याप्रमाणे कार्यवाही करण्यात आली आहे. स्थिर मालमत्ते संबंधीचे विविरण प्रत्येक वार्षीक लेख्या सोबतही जोडण्यात येत आहे. नागपूर मंडळात रोडमॅपमधील बंधनाप्रमाणे मालमत्तेचे सन २००९-१० पर्यंत रजिस्टरची वार्षिक लेख्याशी जूळवणी करण्यात आली आहे. अमरावती मंडळात सन २००२-०३ ते डिसेंबर, २०१० पर्यंत रजिस्टरची वार्षिक लेख्यांशी जूळवणी करण्यात आलेली आहे.

**४१.२३२** लेख्यामध्ये दाखविलेल्या बँकेमधील अल्प मुदतीच्या ठेवी व गुंतवणूक नोंदवही यामधील रक्कमामध्ये रू. ७.६८ कोटीचा फरक आहे आता अल्प मुदतीच्या ठेवीच्या रक्कमा व गुंतवणूक नोंदवहीच्या रक्कमा जुळत आहे. ही बाब महालेखाकार यांच्या निदर्शनास आणली आहे काय व त्यांना हे मान्य आहे काय ? याबाबत समितीने विभागाकडे विचारणा केली. यावर गुंतवणूक नोंद वहीतील नोंदीचा वार्षिक लेख्याशी ताळमेळ केला असून निवासी लेखा परीक्षा अधिकारी यांना स्पष्टीकरण सादर करण्यात आले आहे असा खुलासा विभागाने यावेळी केला

**४१.२३३** मुंबई मंडळाशी संबधित रक्कम रू. ३२.७४ कोटी एवढी असून ही रक्कम लाभधारकाकडून प्रत्यक्ष प्राप्त झालेली रक्कम असून लेख्यात मासिक लेख्याद्वारे आलेली आहे. ही रक्कम वार्षिक लेख्यातील प्रपत्र २० मध्ये समाविष्ट असून त्याचा सविस्तर तपशिल पडताळणीसाठी महालेखाकार यांना ऑडिट करताना का उपलब्ध झाला नाही याबाबत खुलासा करण्यास सांगितले असता महालेखाकार यांना पडताळणीसाठी तपशिल उपलब्ध आहे असे विभागाने समितीस सांगितले.

**४१.२३४** पुणे मंडळाची एकूण रक्कम रू. ४५६६.६४ लाखापैकी रू. १२९२.७२ लाख इतकी रक्कम पुणे मंडळाशी संबंधित आहे. ही रक्कम सन २००३-०४ मध्ये गाळे विक्रीचे ठेवीमधून विक्रीमध्ये समायोजन केल्याबाबतची आहे. रू. १२९२.७२ लाख इतक्या रक्कमेच्या समायोजनाबाबतचे सर्व सविस्तर विवरण असणारे तक्ते पडताळणीसाठी महालेखाकाराना तपासणीच्या वेळी का उपलब्ध झाले नाही. याबाबत समितीने विचारणा केली असता पुणे मंडळाशी संबंधीत गाळे विक्रीचे ठेवीमधून विक्रीमध्ये समायोजन केल्याबाबतची रक्कम रु.१२९२.७२ लक्ष याचा सविस्तर विवरण मिळकत व्यवस्थापन विभाग/पुणे मंडळ येथे तपासणीसाठी उपलब्ध असल्याचे विभागाने स्पष्ट केले.

**४१.२३५** दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाने रू. ३०,४२,००,०००/- ही वांद्रे पूर्व येथील प्रकल्पा अंतर्गत खाजगी विकासकाकडून विक्री उत्पन्नाची घेणे रक्कम म्हणून दर्शविली होती. तथापि याचा तपशिल तपासला असता ही रक्कम चुकीने समायोजित झाल्याचे निदर्शनास आल्यामुळे सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात समायोजन नोंद क्रमांक ७ अन्वये महसुली अधिक्यात खर्ची टाकून येणे रक्कमेत समायोजित करण्यात आली आहे. ३०.४२ कोटी रक्कमाचे समायोजन ७ वर्ष विलंबाने करण्याची कारणे काय ? याबाबत समितीने विचारले असता विभागाने असा खुलासा केला की, **मे. एचडीआयएल डेव्हलपर्स** यांचे कडुन अनंत काणेकर मार्ग, वांद्रे पुर्व येथीलन संक्रमण शिबिराचा व सभोवतालच्या झोपडपट्टीसह पुर्नविकास योजने अंतर्गत ७१५८ चौ.मी. क्षेत्रफळाचे वाणिज्य स्वरूपाचे तीन विंग असलेले इमारत चे अंदाजित अधिमुल्याचे येणे असलेले रु.३०.४२ कोटी वार्षिक लेख्यात दर्शविलेले आहे. याबाबत तपासणी केली असता विकासकाने वरीलप्रमाणे ३ विंग असलेल्या इमारतीचे बांधकाम करून दिले असून त्या इमारती झोपडपट्टी विकास प्राधिकरणाला प्रत्यक्ष अधिमुल्या अेविंग रु.२३.४७ कोटी दिनांक ८/२०१० व बी व सी विंग रु.४७.२० कोटी १२/२००८ असे एकुण ७०.६७ कोटी मुंबई मंडळाच्या मिळकत व्यवस्थापक-५ या कार्यालयात भरणा केलेला आहे. यावरून मंडळाचा वार्षिक लेख्यात याबाबतची येणे रक्कम रु.३०.४२ कोटी मंडळाला प्राप्त होण्याचा प्रश्नचा उद्‌भवत नाही त्यामुळे सदर डेव्हलपर कडुन मंडळाला येणे म्हणुन दर्शविलेली रक्कम रु.३०.४२ कोटी सद्यस्थितीत येणे नसल्यामुळे ती सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यातुन समायोजित करण्यात आली आहे.

**४१.२३६** करारपत्रानुसार विकासकाकडुन फ्रीसेल मध्ये बांधकाम करून देण्यात आलेले आहे. सदर व्यवहार नुकताच पुर्ण झाला असल्यामुळे सदर रकमेचे समायोजन यापुर्वी करता आले नाही.

**४१.२३७** रू. ९९८.६५ लाख ही रक्कम शासनाकडील ठेवीवर व्याजाची परिगणना करताना काही तफावती झालेल्या आहेत. लेखा परिक्षकाचे आक्षेप मान्य असून भविष्यात याची पुनरावृत्ती होणार नाही यांची दक्षता घेण्यात येत असल्याचे नमूद केले आहे. याबाबत निश्चित काय उपाययोजना केली याची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी असे निदेश समितीने दिले यावर विभागाने अशी माहिती दिली की, शासनाकडील ठेवीवरील व्याजाच्या परीगणने मध्ये तफावती येऊ नये म्हणून प्राधिकरणाचे सनदी लेखापाल यांचेकडून परीगनणा करून घेण्यात येत आहे.

**४१.२३८** रोड मॅप मध्ये दिलेल्या आश्वासनाप्रमाणे सर्व पूरक नोंदवहया मंडळातर्फे ठेवण्यात येत आहेत व नोंदवहयातील तफावतीचा मेळ घालण्याचे काम प्रगतीपथावर आहे सदर काम लवकरात लवकर पूर्ण करून आवश्यकत्या समायोजन नोंदी २०१०-११ च्या लेख्यात घेण्यात येत आहेत. नोंदवहयानी तफावतीचा मेळ घालण्याचे काम कोणत्या वर्षापर्यंत पूर्ण करण्यात आले आहे ?

याची माहिती देण्याबाबत समितीने विभागास सांगितले असता विभागाने अशी माहिती दिली की, रोड मॅपच्या अनुषंगाने दिलेल्या सुचना नुसार सन २००६-०७ पासून नोंद वहया अद्ययावत ठेवण्यात आल्या आहेत. वार्षिक लेख्याशी ताळमेळ करण्यात आला आहे. मुंबई मंडळातील ठेवी नोंदवहया मार्च-२०१० अखेर अद्यावत केलेले आहे. त्या अनुषेगाने वार्षिक लेखयात २०१०-११ समायोजन करण्यात येईल. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाशी संबंधित खालील ठेव नोंद वहया अद्यावत करण्यात आले असून त्या वार्षिक लेख्यांतील रक्कमांशी जुळत आहेत व सन २००८-०९ च्या लेखा परिक्षणावेळी दाखविण्यात आली आहे.

१. कंत्राटदाराची अनामत ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

२. कंत्राटदाराची सुरक्षा ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

३. इतर संकिर्ण ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

**४१.२३९** औरंगाबाद मंडळाबाबत सादर करण्यात येते की, रोड मॅप मध्ये ठरवुन देण्यात आलेल्या निर्देशा प्रमाणे या मंडळाने डिसेंबर २०१० पर्यंत सर्व नोंद वहया अद्ययावत करण्यात आल्या आहेत. त्यात आढळुन आलेल्या किरकोळ तफावतीचे समायोजन सन २०१०-११ च्या लेख्यात करण्यात येत आहे. सन २००२-०३ ते डिसेंबर, २०१० पर्यंत नोंदवह्या अद्ययावत करण्यात आल्या आहेत.

**४१.२४०** आता मालमत्ता नोंदवहया अद्ययावत करण्यात आल्या असून मालमत्तेची प्रत्यक्ष तपासणी करून तसे तपासणी प्रमाणपत्र २००८-०९ च्या वार्षिक लेख्यासोबत जोडण्यात आले आहे सन २००७-०८ व सन २००८-०९ या वर्षाचे वार्षिक लेखे अद्याप सभागृहास का सादर करण्यात आले नाही याची कारणे समितीला देण्यात यावी यावर विभागाने पुढीलप्रमाणे माहिती दिली. प्राधिकरणांच्या मालमत्तेची तपासनि करण्यासबाबत प्राधिकरणास्थित कार्यालयाने सूचना दिल्या आहेत. सन २०१०-११ वार्षिक लेखांत करण्यात येईल. नागपूर मंडळातील मालमत्ता नोंदवह्याची प्रत्यक्ष तपासणी करून वार्षिक लेखे सन २००७-०८ व सन २००८-०९ च्या लेख्याशी जूळवणीत करण्यात आलेली आहे. अमरावती मंडळातील मालमत्ता नोंदवहीची तपासणी केली असून वार्षिक लेखे सन २००८-०९ व सन २००९-१० लेख्यासोबत प्रमाणपत्र सादर केली आहे.

**४१.२४१** मुंबई मंडळाचे माहे एप्रिल २००३ ते मार्च २००४ या कालावधीमधील ४१ बँकेच्या बँक ताळमेळाचे काम प्रलंबित आहे. सर्व मंडळाचे बँक ताळमेळाचे काम अद्यावत आहे याबाबत समितीला स्पष्टीकरण देण्यात यावे व लेखी स्वरूपात समितीला माहिती देण्यात यावी असे समितीने निदेश दिले या अनुषंगाने बॅक ताळमेळ ऑक्टोबर. २०१० पर्यन्त अदयावत आहेत. प्रलंबित रक्कमाचे समायोजन करण्याचे काम चालू आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडील सर्व चार बँक खात्यांचे

ताळमेळाचे काम माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत करण्यात आले असून त्यामध्ये आढळलेल्या तफावती दुर करण्यात आल्या आहेत अशी माहिती विभागाने दिली.

**४१.२४२** अंतर्गत लेखा परिक्षण पथक निर्माण करण्यास अद्याप परवानगी का मिळाली नाही याची माहिती समितीला देण्यात यावी असे समितीने सांगितले असता बॅक ताळमेळ ऑक्टोबर, २०१० पर्यन्त अद्ययावत आहेत. प्रलंबित रक्कमाचे समायोजन करण्याचे काम चालू आहे. मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाकडील सर्व चार बँक खात्यांचे ताळमेळाचे काम माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत करण्यात आले असून त्यामध्ये आढळलेल्या तफावती दुर करण्यात आल्या आहेत असा खुलासा विभागाने केला.

**४१.२४३ सन २००४-०५ च्या वार्षीक लेखे व लेखापरिक्षण अहवालासंदर्भात** समितीने को. ऑ. हो. सोसायटी आणि म्हाडा यांचे मधिल सांमजस्य करारानुसार गाळयाचे दूरूस्ती ही संबंधिताना कर्ज देऊन व पर्यवेक्षीय खर्च वसूल करून करावे असे अपेक्षित होते. संबंधित गाळेधारकांकडून वसूल झालेली कर्जाची वसुली ही **दू**रूस्तीवरील प्रत्यक्ष खर्चामध्ये समायोजित करण्याएवजी चुकीने ठेवखात्यामध्ये दर्शविण्यात आली होती यामध्ये दर्शवलेली रक्कम रु. २.४५ कोटी केव्हा समायोजित करण्यात आली ? विलंबाची कारणे काय ? चुकीने ठेव खात्यामध्ये दर्शविण्यास कोण जबाबदार आहे व त्यांच्यावर काय कारवाई करण्यात आली ? याबाबत समितीने विचारणा केली असता संबंधित गाळेधारकांकडून दुरूस्ती पोटी वसुल करण्यात आलेली रक्कम दुरूस्ती खर्चावर वर्ग करण्यापूर्वी ठेव शिर्षाखझली जमा करणे आवश्यक असल्याने प्रथम त्या शिर्षाखाली सदर रक्कम दर्शविण्यात आली. तथापी काम पूर्ण झझल्यानंतर सदर रक्कम प्रत्यक्ष खर्चामध्ये समायोजित करण्यास विलंब झाला असून यापुढे असा विलंब होऊ नये याची दक्षता घेण्यात येत आहे. सदर समायोजन नोंद क्र ८ अनुसार सन २०१०-११ च्या वार्षिक लेख्यात करण्यात येत आहे असा खुलासा विभागाने केला.

**४१.२४४** मुळ अभिलेख्यात दाखविण्यात आलेली कंत्राटदाराकडून जमा अनमत रक्कम व लेख्यात दर्शविलेली अनामत रक्कम यात रू. ४४.५३ लाख रूपयाची तफावत आहे याबाबत दिनांक ३१.१०.२०१० पर्यंत कार्यवाही करण्यात आलेली नाही. नोंदवहया महालेखाकारांना दाखविण्यात आल्या आहेत काय ? अशी विचारणा समितीने केली त्यावर नोंद वह्या पुर्ण असून लेखा परिक्षणाकरीता उपलब्ध आहेत असा खुलासा विभागाने केला.

**४१.२४५** सन २००३-०४ च्या लेखा परिक्षणात निदर्शनास आणूनही रू. १७५.५६ कोटी रूपयांचा तपशिल तपासणीस का प्राप्त झाला नाही त्याची कारणे काय आहे यास जबाबदार असणाऱ्यांवर काय कारवाई करण्यात आली आहे वा येत आहे ? याबाबत माहिती देताना विभागाने

पुढील खुलासा केला. विविध ठेव नोंद वह्या मार्च २०१० पर्यंत अद्ययावत केलेल्या आहेत व लेखा परिक्षणासाठी उपलब्ध करून देण्यात येतील. औरंगाबाद मंडळाबाबत सादर करण्यात येते की, एकुण आक्षेपीत रक्कम रुपये १७५.५६ कोटी पैकी या मंडळा संबंधीत रुपये २८.८९ कोटी असून त्याचा खालील प्रमाणे तपशील लेखा परिक्षण पथकास तपासणीसाठी यापुर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. तपशील खालील प्रमाणे पुन्हा सादर करण्यात येत आहे. औरंगाबाद मंडळासंबंधीत प्राप्त झालेली प्रारंभीची रक्कम रुपये ८३०.६९ लक्ष, गाळ्यांच्या विक्रीमधे समायोजीत करण्यात आली आहे. तसेच भाडेखरेदी हप्त्यातील भांडवली भागाची रक्कम रुपये ११४४.०९/- लाख डिपॉझीट पैकी ज्या गाळ्यांचा भाडे खरेदी हप्ता संपला आहे व संपुर्ण किंमत प्राप्त झाली आहे. अशा गाळ्यांच्या बाबतीत सदर रक्कम विक्री शिर्षाक्षझली वळती करण्यात आली आहे. आगाऊ अंशदानापोटी प्राप्त झालेली रक्कम रुपये १२५.८८ लक्ष रुपये सन २००४-०५ ते २००६-०७ च्या वार्षिक लेख्यात समायोजीत करण्यात आली आहे. अर्जदाराकडून प्राप्त झालेली ठेव रक्कम रुपये ३०६.९६ लक्ष. गाळ्याची संपुर्ण किंमत प्राप्त होईपर्यंत ठेव मध्ये असते व तदनंतर वार्षिक लेख्यामध्ये नियमीतपणे विक्री या लेखा शिर्षाकडे वर्ग करण्यात येते. रुपये १६१.८७ लक्ष ही कायम अनामत रकमेपोटी प्राप्त झालेली ठेव असून सन २००९-१० च्या वार्षिक लेख्येत संपुर्ण रक्कम भाडे खरेदी हप्ता या सदराखाली वळती करण्यात आली आहे. रुपये ३१९.९७ लाख ही रक्कम राष्ट्रीय झोपडपट्टी विकास कार्यक्रम या योजनेतील कपात केलेली रक्कम असून संबंधीत नगरपालीकेकडून प्रमाणपत्र प्राप्त न झाल्याने ठेव या सदराखाली प्रलंबीत आहे.

**४१.२४६** शासनाकडून प्राप्त रू. २.५५ कोटी रूपये झोपडपट्टी पुर्नवसनाच्या सार्वजानिक कामासाठी प्राप्त रक्कम करावयाच्या कामांकरीता अनामत म्हणून दाखविण्याएवजी वाल्मिकी आंबेडकर योजना आणि झोपडपट्टी विकासाची कामे या शिर्षाखाली दाखविण्याची कारणे काय आहे. शासनाकडून निधी प्राप्त होताना मार्गदर्शन तत्वे स्पष्ट असतानाही जाणिवपूर्वक निधी चुकीच्या शिर्षाखाली दाखविण्यात आला आहे निधी वेळेत खर्च करण्यात आला आहे काय? याबाबत समितीने विचारले असता शासनाकडून प्राप्त रु.२.५५ कोटी चूकीने वाल्मिकी आंबेडकर योजना आणि झोपडपट्टी विकासाची कामे या शिर्षाखाली दाखविण्यात आले होते. सदर नोंदीची दुरूस्ती समायोजन नोंद क्र.३७, दि. ३१/०३/२००७ नुसार वार्षिक लेख्यात घेण्यात आलेली आहे अशी माहिती विभागाने दिली.

**४१.२४७** लोक आवास योजने अंतर्गत ५.९६ कोटी रूपये आणि झोपडपट्टी सुधार योजनेच्या कामासाठी १.७३ कोटीची तरतूद वापरण्याची कारणे काय आहेत ? अशी विचारणा समितीने केली त्यावर लोकआवास योजनेअंतर्गत रु.५.९६ कोटी आणि झोपडपट्टी सुधार योजनेच्या कामांसाठी

रु.१.७३ कोटी या मंडळ कार्यालयाकडे अखर्चित शिल्लक रक्कमा असून सन २००५-०६ मध्ये या कार्यक्रमांसाठी खर्च करण्यात आलेला असून जे.व्ही.क्र. २ रु.७.७९ लक्ष एवढे रक्कमेद्वारे वार्षिक लेखा २००५-०६ मध्ये समायोजन केले असल्याचे विभागाने सांगितले.

**४१.२४८** अंशदायी भविष्य निर्वाह निधिची कर्मचाऱ्यांची वर्गणी प्रत्यक्षात केलेल्या वसूली पेक्षा ६.६२ लाख रूपयांनी अधिक भरली गेली. याबाबत सन २००३-०४ च्या लेखा परिक्षण अहवालात भाष्य करूनही दुरूस्ती करण्यात आली नाही यावरून असे दिसून येते की, महालेखाकाराच्या सूचनाकडे म्हाडा अधिकाऱ्याकडून दुर्लक्ष करण्यात येते. त्यामुळे याप्रकरणी जबाबदार अधिकाऱ्यांवर जबाबदारी निश्चित करून कारवाई करण्यात यावी असे समितीने निदेश दिले असता नागपूर मंडळाने ताळमेळाचे काम नागपूर कोषागार कार्यालय व महालेखाकार, नागपूर मार्फत सन २००८-०९ पर्यंत पूर्ण करण्यात आले असून तसे प्रमाणपत्र प्राप्त करण्यात आले आहे. सदर प्रमाणपत्र निवासी लेखा परीक्षा अधिकारी यांना सादर करण्यात येईल असा खुलासा विभागाने केला.

**४१.२४९** मुळ दस्तऐवज अथवा अपूर्ण कागदपत्र किंवा लेखा तपासणीसाठी नोंदवहया प्राप्त न झाल्यामुळे १२.९१ कोटी रूपयांच्या स्थावर मत्ता संबधी तपशिल तपासता आला नाही याबाबत महालेखाकारानी आपले अभिप्राय द्यावे. महालेखाकारानी आक्षेपात नोंद दिलेली रक्कम स्पष्टीकरणात नमूद केलेल्या रक्कमेचा मेळ लागत नाही त्यामुळे याची सद्य:स्थिती स्पष्ट करावी असे समितीने विभागास सांगितले. यावर विभागाने असा खुलासा केला की, स्थावर मालमत्ता संबंधी फर्निचर कार्यालयीन सामान व विद्युत उपकरणे पडताळणी करण्यात आली असून नोंद वहद्यया ठेवण्यात आल्या असून त्या निवासी लेखा परिक्षा अधिकारी यांना दाखविण्यात आल्या आहेत. मोकळया जमिनी कार्यालयीन इमारती व भाडे तत्वावरील गाळे यांची नोंद वही ठेवण्याबाबत आवश्यक ती कार्यवाही सुरू करण्यात आली आहे. रु.१२.९१ कोटी रक्कमेपैकी रु.४४.४४ लक्ष कोकण मंडळाशी संबंधित आहे. याबाबतचे समायोजन जे.वी. क्र. ७१, ७२, ७३ द्वारे सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात करण्यात आले असून स्थिर मालमत्तेची नोंद वही तपासणी करीता उपलब्ध आहे.

**४१.२५०** सन २००३-०४ च्या लेखा तपासणी अहवालात भाष्य करूनही १८३.०६ कोटी रूपयांचा तपशिल उपलब्ध नसल्याचे नमूद केले आहे या बाबी वारंवार घडण्याची कारणे काय आहे. यावर निमंत्रण कुणाचे आहे यापूर्वी याबाबत जबाबदारी निश्चित करण्यात आली होती काय? अशी विचारणा समितीने केली असता कोकण मंडळात इतर अग्रिमापोटीच्या नोदंवह्या तयार करण्यात आल्या असून तपासणी करीता उपलब्ध आहे तसेच औरंगाबाद मंडळात प्रश्नामध्ये उल्लेख केलेल्या एकुण रकमेपैकी औरंगाबाद मंडळासंबंधी फक्त रुपये ८.७४ कोटी होती. सदर रकमेचा तपशील यापुर्वीच लेखा परिक्षण पथकास उपलब्ध करून देण्यात आलेला आहे. या बाबतचा सविस्तर तपशील

सन २००४-०५ च्या वार्षीक लेख्या वरील लेखा परिक्षण अहवालातील परिच्छेद क्र.२२३१४ या परिच्छेदाच्या उत्तरात सादर करण्यात आलेला आहे असा खुलासा विभागाने समितीसमोर केला.

**४१.२५१** मालमत्तेच्या किमंतीपेक्षा अधिक रक्कमेवर आणि अस्तित्वात नसलेल्या मालमत्तेवर घसारा आकारण्याची कारणे काय आहे? या समितीच्या प्रश्नावर कोकण मंडळात अधिक घसारा आकारणी ही समायोजन जे.व्ही.क्र.६४ व ७२ द्वारे सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात समायोजीत करण्यात आली आहे. अधिक घसांरा आकारणी ही अनवधानाने झाली होती तरी त्याबाबत माहिती घेऊन पुढील कार्यवाही करण्यात येईल तसेच औरंगाबाद मंडळात मालमत्तेच्या किंमतीपेक्षा अधिक रकमेवर आणि अस्तीत्वात नसलेल्या मालमत्तेवर घसारा आकारण्यात आलेला नाही असे स्पष्टीकरण विभागाने केले.

**४१.२५२** रोडमॅपमध्ये आश्वासीत केल्यानुसार सर्व प्रकारच्या नोंदवहया ठेवण्यात आलेल्या आहेत सर्व नोंदवहयामधील अखेरच्या शिल्लक रक्कमा यासंबंधित वार्षिक लेख्यातील रक्कमेशी ताळमेळाचे काम कधी पर्यंत पूर्ण करणे अपेक्षित आहे नोंदवहयाच्या नमुना समितीसमोर सादर करण्याबाबत विभागास सूचित केले असता विभागाने खालील प्रमाणे माहिती दिली. मुंबई मंडळात रोड मॅप मध्ये आश्वासित केल्यानुसार नोंदवहयाचे मासिक लेख्याशी जुळवणी केली आहे. चालु वित्तीय वर्षाअखेर वार्षिक लेख्यातील रक्कमेशी ताळमेळाचे काम पुर्ण होईल असे अपेक्षित आहे.

**४१.२५३** मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळाशी संबंधित खालील ठेव नोंद वहया अद्यावत करण्यात आले असून त्या वार्षिक लेख्यांतील रक्कमांशी जुळत आहेत व सन २००८-०९ च्या लेखा परिक्षणावेळी दाखविण्यात आली आहे.

१. कंत्राटदाराची अनामत ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

२. कंत्राटदाराची सुरक्षा ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

३. इतर संकिर्ण ठेव नोंद वही माहे डिसेंबर २०१० पर्यंत अद्यावत आहे.

**४१.२५४** औरंगाबाद मंडळात रोडमॅपमध्ये आश्वासीत केल्यानुसार सर्व प्रकारच्या नोंदवह्या ठेवण्यात आलेल्या आहेत व त्यातील शिल्लक रकमा संबंधीत वार्षीक लेख्यात तसेच मासीक लेख्यात जुळवुन घेण्यात आलेल्या आहेत. नागपूर मंडळात रोडमॅपमध्ये आश्विासीत केल्यानुसार सर्वप्रकारच्या नांदवह्या माहे डिसेंबर, २०१० पूर्ण करण्यात आलेले आहे. अमरावती मंडळात रोडमॅपमध्ये आश्विासीत केल्यानुसार सर्वप्रकारच्या नोंदवह्या माहे डिसेंबर, २०१० पूर्ण करण्यात आलेले आहे.

**४१.२५५ सन २००५-०६ या वार्षीक लेखे व लेखापरिक्षण अहवालासंदर्भात** समितीने नोंदवहया अद्यावत करण्याबाबत मिळकत व्यवस्थापकानी काय कार्यवाही केली आहे? अशी विचारणा केली. यावर विभागाने मुंबई मंडळात निवासी लेखापरिक्षा अधिकारी यांनी पडताळणी केल्यानुसार

उपलब्ध असलेल्या नोंदवह्या अद्ययावत करण्यात आलेल्या आहेत. तसेच विविध ठेव नोंद वहया मार्च २०१० पर्यंत अद्ययावत केलेल्या असून औरंगाबाद मंडळात सन २००५-०६ च्या लेखा परिक्षण अहवालात हा मुद्दा औरंगाबाद मंडळा संबंधी घेण्यात आलेला नाही. तथापि, मिळकत व्यवस्थापक यांनी नोंद वह्या डिसेंबर २०१० पर्यंत अद्ययावत ठेवल्या आहेत असा खुलासा केला.

**४१.२५६** राष्ट्रीय झोपडपट्टी सुधार योजनेच्या देयकातून कपात केलेली १० % रक्कम नगरपालिका / महानगरपालिका यांना परत करण्यात येते मग या बाबतीत संबंधिताकडून प्रतिसाद का मिळत नाही ? अशी विचारणा समितीने केली असता मुंबई झोपडपट्टी सुधार मंडळ हे झ ोपडपट्टीमधील सुधार कामे स्वत: करत असल्यामुळे १० टक्के रक्कम कपात करून ठेवण्याचा प्रश्न या मंडळाशी संबंधीत नसल्याचे विभागाने सांगितले.

**४१.२५७** रू. १.५६ लाख आयकर, जीआयएस व घरबांधणी अग्रीम उणेती रक्कमेचा शोध घेण्याचे काम पूर्ण झाले आहे काय व त्याबाबत वार्षिक लेख्यामध्ये दुरूस्ती करण्यात आली आहे काय? अशी समितीने पृच्छा केली असता मुंबई मंडळात सन २००८-०९ च्या वार्षिक लेख्यात वेतन देयकातून कपात केलेल्या रकमा जसे आयकर जी.आय.एस. घरबांधणी अग्रीम इ. रकमा तसेच इतर कपात केलेल्या रकमांची तपासणी करून प्रत्यक्ष देय असलेल्या रकमा ठेऊन अधिक रक्कमा वार्षिक लेख्यातून समायोजित करण्यात आलेल्या आहेत तसेच दुरुस्ती व पुनर्रचना मंडळात कर्मचाऱ्यांच्या वेतनातून / देयकातून कपात केलेली पाठवायची उणे रु.८,८२,६७९/- रकमेची तपासणी करून समायोजन नोंद क्र.२२ अन्वये वार्षिक लेखा २००८-०९ मध्ये समायोजित करण्यात आली आहे असे विभागाने स्पष्ट केले.

**४१.२५८** शासनाकडे असलेल्या ठेवीवरील व्याजाची परिगणना करताना किती फरक आढळून आला व त्याच्या नोंदी वार्षिक लेख्यामध्ये घेण्यात आल्या आहेत काय ? यावर विभागाने व्याजाची परिगणना करतांना २.०४ कोटी फरक आढळून आला असून सन २०१०-११ मध्ये लेख्यामध्ये नोंदी घेण्यांत येतील असा खुलासा केला

**४१.२५९** सन २००१-०२ नंतरच्या प्रलंबित बँक ताळमेळाच्या कामाची सद्य:स्थितीबाबत मुंबई मंडळाचे बँक ताळमेळ सप्टेंबर २०१० पर्यंत अदयावत झालेले आहे असा खुलासा विभागाने केला.

## अभिप्राय व शिफारशी

**४२.** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या संदर्भात महालेखापरिक्षकांनी नोंदविलेल्या आक्षेपाच्या संदर्भात गृहनिर्माण व विशेष सहाय्य विभागाने समितीस सादर केलेली

स्पष्टिकरणात्मक ज्ञापने तसेच त्या अनुषंगाने साक्षीचे वेळी विभागाच्या सचिवांनी समितीस दिलेली माहिती याचा साकल्याने विचार करता समितीच्या असे निदर्शनास आले की, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९५-९६ ते २००६- २००७ च्या वार्षिक लेख्यावरील लेखा परीक्षण अहवालामध्ये महालेखाकारांनी लेखे पद्धती, खर्चाचा मेळ तसेच इतर त्रुटी दूर करण्याच्या संदर्भात गंभीर स्वरुपाचे आक्षेप नोंदविलेले आहेत. सदर त्रुटीचे निराकरण पाच पाच वर्षे करण्यात आले नाही.

**४२.१** यासंदर्भात महालेखाकारांकडून समितीला असे सांगण्यात आले की, लेखे ठेवण्याची पद्धत कशी असावी या मुद्यांच्या बाबतीत महालेखाकारांनी म्हाडाला कळविले होते परंतु त्याबाबत म्हाडाने कोणतीही पूर्तता व अनुपालन केलेले नाही. सदरहू बाब विभागाच्या दृष्टीने चांगली नाही व समिती देखील त्या बाबतीत समाधानी नाही तसेच यासंदर्भात वेळोवेळी म्हाडाला कळवूनसुध्दा म्हाडाकडून खुलासा होत नसल्याची खंत महालेखाकारांनी व्यक्त केली.

**४२.२** सन १९९५-९६ चा म्हाडाचा अहवाल विधानसभेला २००१ साली सादर करण्यात आला व सदर अहवालावर चर्चा समितीमध्ये २००९ साली करण्यात आली. परंतु अहवालासंदर्भात पूरक अशी माहिती आणि स्पष्टीकरणात्मक ज्ञापने समितीला वेळेवर प्राप्त झाली नाहीत. महालेखाकारांकडून सात आठ वर्षापूर्वी आक्षेप काढण्यात आले असतांना समितीला बैठकीच्या आधी ही माहिती मिळणे आवश्यक होते. विभागास वेळोवेळी स्मरणपत्रे पाठवूनसुध्दा माहिती वेळेवर प्राप्त होत नाही. त्यामुळे समितीचा वेळ वाया जातो. ही बाब अतिशय गंभीर असल्याचे नमूद करुन समितीने याबाबत तीव्र नापसंती व्यक्त केली. **महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन १९९४-९५ चे वार्षिक लेखे व लेखा अहवालावरील लोकलेखा समितीचा सातवा अहवाल दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी विधीमंडळास सादर करण्यात आला. सदर अहवालामध्ये देखील समितीने विभागाला अहवालाच्या संदर्भातील स्पष्टीकरणात्मक ज्ञापनाची माहिती विहित वेळेत पाठविण्याच्या दृष्टीने खबरदारी घेण्याबाबत संबंधिताना सूचित करण्याबाबत शिफारस केली होती.**

**४२.३** महालेखाकारांनी लेखे पध्दती खर्चाचा मेळ व इतर काही त्रुटीसंदर्भात नोंदविलेल्या आक्षेपांचे निराकरण ५-५ वर्षे करण्यात आलेले नाही व यासंदर्भात समितीला देखील काहीही कळविण्यात आले नाही. **या प्रकरणी झालेल्या विलंबाबाबत जबाबदार असणाऱ्या संबंधित अधिकाऱ्यांविरुध्द चौकशी करुन जबाबदारी निश्चित करावी व त्यानुसार**

**त्यांचेविरुध्द कारवाई करावी व त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात पाठवावी तसेच इत:पर समितीला अहवालाच्या संदर्भात स्पष्टीकरणात्मक ज्ञापने विहित वेळेत पाठविण्याच्या दृष्टीने खबरदारी घेण्याबाबत सर्व संबंधितांना सूचित करावे अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.४** म्हाडाची अल्प उत्पन्न गटातील घरे वितरीत करण्याच्या संदर्भात विभागाच्या सचिवांनी सांगितले की, संबंधित व्यक्तिना उत्पन्नाच्या आधारे घरे दिली जातात. त्यांच्याकडून ती रक्कम वसूल केली जाते. त्यांना कर्ज देण्यात येत नसल्यामुळे त्यांचेकडून हमी घेण्यात येत नाही. त्यांना कर्ज न देता म्हाडामार्फत घरे दिली जातात. तसेच अल्प उत्पन्न गटाच्या व्यक्तीकडून मासिक हप्त्याची वसुली म्हाडाच्या अधिका-यांकडून केली जाते. वसुली पूर्ण झाल्यानंतर अभिहस्तांतरण केले जाते. कमी उत्पन्न असलेल्या व्यक्तीकडून दहा ते वीस टक्के रक्कम घेतल्यानंतर उर्वरित रकमेचे मासिक हप्ते निश्चित केले जातात आणि ते हप्ते त्यांच्याकडून वसूल केले जातात. मात्र थकबाकी राहिल्यास सेक्शन ६६ नुसार संबंधिताविरुध्द कारवाई केली जाते.

**४२.५ याप्रकरणी समिती अशी शिफारस करते की, गेल्या पाच वर्षापासून थकबाकी असलेल्या एकूण व्यक्तींची संख्या त्यांच्याकडून किती रक्कम येणे आहे, जे थकबाकीदार आहेत त्यांच्याविरुध्द मंडळाने केलेली कारवाई याची माहिती समितीला ३ महिन्यात द्यावी.**

**४२.६** महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाकडून लेखे व्यवस्थित ठेवले जात नाहीत. शासनाच्या नियमाप्रमाणे व कायद्याप्रमाणे लेखे ठेवण्याबाबत असलेली मार्गदर्शक तत्वे व गाईडलाईन्स याबाबत वित्त सचिवांनी सांगितले की, वित्त व लेखा विभागाने लेखे ठेवण्याची पध्दत विहित केलेली आहे. त्या पध्दतीने लेखे ठेवणे गरजेचे होते. महालेखाकारांनी निर्देशित केल्याप्रमाणे मंडळामार्फत ठेवण्यात येणारे लेखे विहित नमुन्याप्रमाणे ठेवण्यात आलेले दिसत नाहीत. तसेच राजकोष नियमाप्रमाणे लेखे कसे ठेवावेत याचा विहित नमूना ठेवण्यात आलेला आहे. त्यानुसार म्हाडाकडून आणि म्हाडाच्या अधिपत्याखालील विविध मंडळाकडून लेखे ठेवण्यात कसूर झालेली आहे.

**४२.७** यासंदर्भात समितीने असे सूचित केले की, लेखे ठेवण्यात कसूर झालेली असली तरी त्यामध्ये सुधारणा करण्यात येत आहे. म्हाडाने लेख्यांमध्ये सुधारणा करण्यासाठी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसची नियुक्ती केलेली आहे व त्यादृष्टीने वर्षभर काम सुरु आहे. तेव्हा त्यांना नेमका वेळ देऊन, त्यावेळेत समितीला हवी ती माहिती त्यांच्याकडून मागवून घेण्यात

यावी, गत दहा वर्षापासून म्हाडाच्या लेख्यामध्ये महालेखाकारांनी नकारार्थी शेरे दिलेले असताना वित्त विभागाने वारंवार म्हाडाला मदत केलेली आहे. लेख्यामध्ये नकारार्थी शेरे दिलेले असताना म्हाडाला मदत करण्याऐवजी शासनाला मदत करावी असे वित्त विभागाला कां वाटले नाही? असे मत समितीने प्रदर्शित केले असता, वित्त सचिवांनी खुलासा केला की, अर्थसंकल्प तयार करताना वेगवेगळया विभागांचे उत्पन्न स्थान (Income Sources) बघूनच वित्त विभागाकडून निधी मुक्त केला जातो. शासनाच्या वतीने महामंडळाला अंशदान द्यावे लागणार आहे. **गत दहा वर्षापासून महालेखाकारांनी नकारार्थी शेरे दिले असतांना वित्त विभागाने म्हाडाला दहा वर्षापासून केलेली मदत चुकीची असून म्हाडाला ज्या योजनांसाठी पैसे दिले आहेत ते पैसे त्याच कामासाठी वापरले आहेत काय याबाबत वित्त विभागाकडून लक्ष दिले गेलेले नाही. तेव्हा याप्रकरणी योग्य ती चौकशी करुन त्याबाबतची माहिती समितीला ३ महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.८** म्हाडाचे काम वाणिज्यिक स्वरुपाचे असल्याने वाणिज्यिक स्वरुपाप्रमाणे (Commercial Pattern) लेखे ठेवून नियमाप्रमाणे त्याचे लेखापरिक्षण झाले पाहिजे. परंतु, म्हाडाने अंतर्गत लेखापरिक्षणसुध्दा केलेले नाही. तसेच लेख्याच्या नोंदी व्यवस्थित ठेवण्यात आलेल्या नाहीत. **सन २००१-२००२ मध्ये महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाच्या सन १९९४-१९९५ च्या लेखे अहवालासंदर्भात दिनांक ३ ऑगस्ट २००१ रोजी विधीमंडळाच्या दोन्ही सभागृहासमोर सादर करण्यात आलेल्या लोकलेखा समितीच्या सातव्या अहवालामध्ये "म्हाडामध्ये लेखापरीक्षण अधिकारी नेमून त्यांच्या हाताखाली वित्तीय बाबींबाबत सखोल माहिती असणारा पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा व सक्षम अशी अंतर्गत लेखा परीक्षण व्यवस्था म्हाडामध्ये निर्माण करण्यात यावी तसेच, म्हाडामध्ये सर्व कर्मचा-यांना लेखा व्यवस्था ठेवण्याबाबत प्रशिक्षण देण्यात यावे" अशी समितीने शिफारस केली आहे.** ७-८ वर्षाचा कालावधी गेल्यानंतरही या संदर्भात म्हाडाने ठोस कार्यवाही केलेली नाही. याबाबत विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सन २००१-२००२ च्या समितीच्या शिफारशीनुसार महाराष्ट्र गृहनिर्माण विकास मंडळामध्ये एक महिन्यापूर्वी अंतर्गत लेखापरीक्षण पथक स्थापन केलेले आहे. म्हाडाच्या लेखे ठेवण्याच्या पध्दतीमध्ये लोकलेखा समितीच्या अहवालात केलेल्या शिफारशींवर कार्यवाही करण्यास व त्याबाबतची माहिती पाठविणे दुर्लक्ष आणि विलंब झालेला आहे. यासाठी विभागाने एक "रोड मॅप " तयार करुन त्यामध्ये येत्या एक वर्षात महालेखाकारांनी

दाखविलेल्या अहवालामध्ये ज्या उणीवा राहिलेल्या आहेत त्या दृष्टीकोनातून हा "रोड मॅप " म्हाडाला एक प्रकारे वळण घालून देईल. वर्षभर या मॅपनुसार अंमलबजावणी केल्यानंतर सन २०१० च्या शेवटपर्यंत ही व्यवस्था व्यवस्थित झाल्याचे निदर्शनास येईल. **म्हाडाच्या लेखे ठेवण्याच्या पद्धती संदर्भातील "रोड मॅप" चा एक बृहत आराखडा गृहनिर्माण विभागाच्या मदतीने तयार करुन वित्त विभागाच्या व महालेखाकारांच्या संमतीनंतर तीन महिन्याच्या आत समितीला सादर करावा अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.९ तसेच म्हाडाची लेखापरीक्षण पध्दती किंवा लेखे पध्दती सदोष असल्याचे विभागाच्या सचिवांनी मान्य केलेले आहे. सन २००१-२००२ च्या लोकलेखा समितीच्या शिफारशींवर अंमलबजावणी होण्याकरिता सात वर्षाचा विलंब लागला हेही मान्य केलेले आहे. सबब, लोकलेखा समितीच्या शिफारशींवर कोणतीही कार्यवाही न होण्यास जबाबदार असलेल्या अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली याची माहिती देखील समितीला तीन महिन्याच्या आत देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.१०** म्हाडाच्या बँक ठेवींबद्दल महालेखाकारांनी मुद्दा उपस्थित केला की, म्हाडाने ४३ कोटी रुपये रक्कम बँकेमध्ये जमा केलेली आहे. परंतु, या जमा केलेल्या रकमेची नोंद त्यांच्या पासबुकमध्ये केल्याचे आढळून येत नाही किंवा बँकेच्या खात्यामध्ये शिल्लक असल्याचे आढळून येत नाही. आणखी असे की, बँकेने १७ कोटी रुपयांची रक्कम नावे दाखविलेली होती. तथापि, याची खात्यामध्ये किंवा कॅश बुकमध्ये नोंद घेण्यात आलेली नाव्हती.

**४२.११** यासंदर्भात समितीने मत व्यक्त केले की, रु. ४३ कोटी ही काही कमी रक्कम नाही. एवढी मोठी रक्कम बँकेत जमा केल्याची नोंद बँक पासबुक व बँकेच्या लेख्यांमध्ये का दिसून येत नाही ही बाब अतिशय गंभीर स्वरुपाची आहे.

**४२.१२** याबाबत वित्तीय सल्लागार, म्हाडा यांनी सांगितले की, बँकेच्या मेळाचा (Reconciliation) अनुशेष आहे. बँकेचे पास बुक व कॅश बुक ज्यावेळी जुळत नाही त्यावेळी प्रामुख्याने मेळ केला जातो. पास बुक व कॅश बुकमधील नोंद तपासण्याची आवश्यकता असते. परंतु बँकेने स्टेटमेंट तपासली आहेत. मुंबई मंडळाचे बँक मेळाचे काम जुलै पर्यंत पूर्ण करण्यात आलेले आहे. परंतु अद्यापपर्यंत ६९ महिन्यांचे काम अपूर्ण आहे. एकूण २२ बँकांच्या स्टेटमेंटसच्या मेळाचे काम करावे लागत असल्यामुळे हे काम अपूर्ण राहिले आहे. १७ कोटी रुपयांची शिल्लक राहिलेली रक्कम मागील ३ महिन्यातील म्हणजे सप्टेंबर, ऑक्टोबर व

नोव्हेंबर या महिन्यामधील आहे. बँक मेळाचे काम वेळेत पूर्ण होणे आवश्यक होते. म्हाडाची लेखे ठेवण्याची पध्दत (Accounting system) योग्य नाही, असे समितीचे स्पष्ट मत आहे. काम वेळेत पूर्ण न होण्यामध्ये जे अधिकारी जबाबदार आहेत, त्यांच्यावर कोणती कारवाई केली आणि जर आतापर्यंत कारवाई केली गेली नसेल तर त्यांचेवर योग्य ती कडक कारवाई करण्यात यावी तसेच **विभागाच्या सचिवांनी सुचविल्यानुसार मुंबई महानगरपालिकेमध्ये राबविण्यात आलेल्या Accounting system नुसार म्हाडाने १०० वर्षापूर्वीची अकाऊंटींग सिस्टिम न वापरता ॲक्रुअल बेस्ड अकाऊंटींग सिस्टिम (Accrual based system) वापरावी व या अकाऊंटींग सिस्टिमसाठी संपूर्ण संगणकीकरण करण्यात यावे. व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात कळविण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.१३** म्हाडा मंडळात असलेल्या एकूण अधिकारी / कर्मचारी यांची संख्या त्यामध्ये लेखा परिक्षणासाठी कार्यरत असलेल्या अधिकारी/कर्मचारी यांच्याबाबत माहिती देताना वित्तीय सल्लागार, म्हाडा यांनी सांगितले की, म्हाडाच्या प्रत्येक कार्यालयात एक मुख्य लेखा अधिकारी, एक सहाय्यक लेखा अधिकारी व एक अकाऊटंट अशी तीन पदे आहेत. म्हाडा मंडळातील अनेक पदे रिक्त आहेत. अकाऊटंट केडर नसल्यामुळे अकाऊटंटची बरीच पदे रिक्त आहेत. जुलै, २००९ पासून लेखाधिकारी हे पद रिक्त आहे. सदर पदे भरण्याबाबत गृहनिर्माण विभागास विनंती पत्र पाठविण्यात आले आहे.

**४२.१४** म्हाडामध्ये वित्तिय बाबींची सखोल माहिती असणारा खास असा समर्पित कर्मचारी वर्ग (Dedicated Accounting Staff) नाही. म्हाडाने त्यांच्या लेखा विभागातील कर्मचारी वर्गासाठी लेखे व्यवस्थित ठेवण्याच्या संदर्भात प्रशिक्षण केंद्र सुरु केल्यास लेखा पध्दतीत निश्चित सुधारणा होऊ शकेल. अशी सूचना महालेखाकारांनी केली असता विभागाच्या सचिवांनी सांगितले की, याबाबत बांद्रा कुर्ला कॉम्प्लेक्स येथे प्रशिक्षण सुरु करण्यात आले आहे. विभागाकडे जी सिस्टिम आहे त्यांचे प्रशिक्षण देण्यात येत आहे. संपूर्ण महाराष्ट्रात एकूण १५०० कर्मचारी कार्यरत आहेत. असे असूनही लेखापरिक्षणामधील (Audit) पाच तज्ञ कर्मचारी विभागाकडे नाहीत ही बाब योग्य नाही असे मत समितीने व्यक्त केले.

**४२.१५ महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणासंदर्भात दिनांक ३ ऑगस्ट, २००१ रोजी विधीमंडळास सादर करण्यात आलेल्या लोकलेखा समितीच्या सातव्या अहवालात "म्हाडामध्ये लेखा परीक्षण अधिकारी नेमून त्यांच्या हाताखाली वित्तीय बाबींची सखोल माहिती**

**असणारा पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा व सक्षम अशी अंतर्गत लेखापरीक्षण व्यवस्था म्हाडामध्ये निर्माण करण्यात यावी, तसेच म्हाडातील सर्व कर्मचाऱ्यांना लेखे व्यवस्थितरीत्या ठेवण्याबाबत पुरेसे प्रशिक्षण देण्यात यावे." अशी शिफारस केली होती.** म्हणजे गेल्या दहा वर्षापूर्वी समितीने शासनाकडे अशी शिफारस केलेली असूनही समितीने केलेल्या शिफारशीकडे शासनाने व म्हाडाने दुर्लक्ष केलेले आहे. ही अतिशय गंभीर बाब आहे. सबब, **म्हाडा मंडळात असलेली रिक्त पदे तात्काळ भरण्यात यावीत व म्हाडामध्ये लेखा परिक्षण अधिकारी नेमून सक्षम अशी अंतर्गत लेखापरीक्षण व्यवस्था म्हाडामध्ये निर्माण होण्यासाठी त्यांच्या हाताखाली वित्तिय बाबींची सखोल माहिती असणारा पुरेसा कर्मचारी वर्ग देण्यात यावा व याबाबत केलेल्या कार्यवाहीची माहिती समितीला तीन महिन्यात देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.१६** मालमत्ता कराचे संकलन नियमाप्रमाणे होते. परंतु, शासनाकडून येणारे अनुरुप अनुदान वर्षानुवर्षे वेळेवर मिळत नाही. या कामासाठी ४० कोटी रुपयांचे अनुरुप अनुदान मिळाले तरी, इमारत दुरुस्ती वगैरे कामांसाठी १०० कोटी रुपयांचा निधीही अपुरा ठरतो त्यामुळे हे अनुरुप अनुदान शासनाकडून वेळेवर मिळाले पाहिजे असे विभागाच्या सचिवांनी समितीस सांगितले. **याबाबत अनुरुप अनुदान शासनाकडून कधी पासून सुरू करण्यात आले व त्याअंतर्गत आतापर्यंत किती निधी केव्हा देण्यात आला याबाबतची सविस्तर माहिती समितीला देण्यात यावी.**

**४२.१७ मॅस्टेकच्या प्रतिनिधींनी सादरीकरणाच्या माध्यमातून म्हाडाच्या सर्व मंडळातील आकडेवारीची नोंद करण्यासाठी कोणकोणत्या गोष्टींची आवश्यकता आहे याबाबतची माहिती समितीस सादर केली. या सादरीकरणाची प्रत (Hard copy) समितीला उपलब्ध करुन देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.१८** जेव्हा कोणतीही नवीन पध्दत अंगिकारली जाते त्यावेळेस ती अद्ययावत असली पाहिजे. सदनिका वितरित करण्यासाठी आवश्यक असलेली लॉटरीची सिस्टीम सुध्दा अद्ययावत असली पाहिजे. परंतु म्हाडामध्ये पूर्वीच्या पध्दतीप्रमाणेच काम सुरु आहे. अंतर्गत लेखापरीक्षण होत नाही ही वस्तुस्थिती आहे. प्रगत महाराष्ट्रातील गृहनिर्माण मंडळाचे अंतर्गत लेखापरीक्षण होत नाही ही बाब महाराष्ट्र राज्याला भुषणावह नाही. **जमिनीच्या व्यवहाराच्या नस्त्या निरनिराळया योजना, विकसित झालेल्या योजना, विकासकाकडून येणा-या अतिरिक्त घरांच्या (Surplus Tenaments) पध्दती, इतर योजनांची माहिती तसेच म्हाडाच्या ९ प्रादेशिक**

**मंडळाची संकलित केलेली सर्व माहिती समितीला तीन महिन्यात उपलब्ध करून देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

**४२.१९** म्हाडाकडे ३०-३० वर्षापूर्वीचे रिक्त गाळे शिल्लक आहेत याबाबतची माहिती समितीला देणे आवश्यक आहे. याबाबत माहिती देताना विभागाच्या सचिवांनी सांगितले की, सन २००६ मधील ८४ गाळे शिल्लक असून सन २००६ सालापासून राज्यात ६,१६६ गाळे रिक्त राहिले आहेत. **समितीने सन २००६ च्या अगोदर रिक्त असलेले गाळे तसेच किती प्लॉटची विक्री झालेली आहे व किती बाकी आहेत याबाबतचा अद्ययावत तक्ता आणि म्हाडाच्या ९ मंडळातील उच्च उत्पन्न गट, मध्यम उत्पन्न गट व अल्प उत्पन्न गटातील सदनिकांच्या संदर्भातील सविस्तर माहिती समितीस उपलब्ध करुन देण्यात यावी अशी समितीची शिफारस आहे.**

# परिशिष्ट - अ

# परिशिष्ट - ब

# मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २००९
# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक २४ फेब्रुवारी, २००९ रोजी विधानभवन मुंबई, येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री. नामदेव उसेंडी, वि.स.स.
(३) श्री. ए. टी. पवार, वि.स.स.
(४) श्री. नवाब मलिक, वि.स.स.
(५) श्री. विलास लांडे, वि.स.स.
(६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(७) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. रामनाथ रा.काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव, (लेखा व कोषागरे).

**साक्षीदार :**

**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय**

श्री.सिताराम कुंटे, सचिव

महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण

श्री.सुभाष हजारे, मुख्य अधिकारी, मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन ११९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा अहवाला संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.**

# मंगळवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१०
# लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १२ ऑक्टोबर, २०१० रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री.नामदेव उसेंडी, वि.स.स.
(३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
(५) श्री.विलास लांडे, वि.स.स.
(६) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(७) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.अनंत कळसे, प्रधान सचिव
(२) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. रामनाथ रा.काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**

श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग :**

श्री.राजेश अग्रवाल, सचिव, (लेखा व कोषागरे).

**साक्षीदार :**

**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय**

(१) श्री.गौतम चॅटर्जी, प्रधान सचिव गृहनिर्माण विभाग व उपाध्यक्ष म्हाडा

(२) श्री.अण्णासाहेब मिसाळ, मुख्याधिकारी, स्लम इंम्प्रुव्हमेंट बोर्ड.

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन ११९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा अहवाला संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.**

# मंगळवार, दिनांक १८ जानेवारी, २०११

## लोकलेखा समिती

समितीची बैठक मंगळवार, दिनांक १८ जानेवारी, २०११ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी १२.०० वाजता सुरु होऊन दुपारी १.३० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स. तथा समिती प्रमुख

**सदस्य**

(२) श्री.नामदेव उसेंडी, वि.स.स.
(३) श्री.ए.टी.पवार, वि.स.स.
(४) श्री.नवाब मलिक, वि.स.स.
(५) श्री.विलास लांडे, वि.स.स.
(६) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(९) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री.सुर्यकांत दळवी, वि.स.स.
(११) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(१२) श्री.बाळा नांदगांवकर, वि.स.स.
(१३) श्री.विनोद तावडे, वि.प.स.
(१४) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. भाऊसाहेब कांबळे, सह सचिव
(२) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(३) श्री. रामनाथ रा.काठे, अवर सचिव (समिती)

**निमंत्रित :**

**महालेखाकार यांचे कार्यालय :**
श्रीमती अनिता पट्टनायक, प्रधान महालेखाकार

**वित्त विभाग :**
श्री.राजेश अग्रवाल, सचिव, (लेखा व कोषागरे).

**साक्षीदार :**

**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय**
श्री.गौतम चॅटर्जी, प्रधान सचिव

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई**
श्री.सतिश गवई, उपाध्यक्ष व मुख्य कार्यकारी अधिकारी

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन ११९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा अहवाला संदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.**

# बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०११

## लोकलेखा समिती

लोकलेखा समितीच्या उपसमितीची बैठक बुधवार, दिनांक २१ सप्टेंबर, २०११ रोजी महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण (म्हाडा) वांद्रे (पूर्व), मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.२० वाजता स्थगित झाली.

**सदस्य**

(१) श्री.नवाब मलिक, वि.स.स. तथा निमंत्रक
(२) श्री.संजय सावकारे, वि.स.स.
(३) श्री.भाई जगताप, वि.प.स.
(४) श्री.विनोद तावडे, वि.प.स.
(५) डॉ.दिपक सावंत, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(६) श्री.निलेश देशमुख-पारवेकर, वि.स.स.
(७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री.सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(२) श्री.ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव

**साक्षीदार :**

**गृहनिर्माण विभाग, मंत्रालय**
श्री.राजाराम साळवे, उपसचिव

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरण, मुंबई**
श्री.सतिश गवई, उपाध्यक्ष तथा मुख्य कार्यकारी अधिकारी

**महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास प्राधिकरणाचे सन ११९५-१९९६ ते २००६-२००७ या वर्षांचे वार्षिक लेखे व लेखा अहवालासंदर्भात प्रधान सचिव, गृहनिर्माण विभाग यांची साक्ष घेतली व पुर्ण झाली.**

# गुरुवार, दिनांक २५ जुलै, २०१३
# लोकलेखा समिती

समितीची बैठक गुरुवार, दिनांक २५ जुलै, २०१३ रोजी विधान भवन, मुंबई येथे दुपारी ३.०० वाजता सुरु होऊन दुपारी ४.०० वाजता स्थगित झाली.

**समिती प्रमुख**

(१) श्री. गिरीश बापट, वि.स.स.

**सदस्य**

(२) श्री.मधुकर उर्फ अण्णा चव्हाण, वि.स.स.
(३) श्री.गोपालदास अग्रवाल, वि.स.स.
(४) श्री.विनायक निम्हण, वि.स.स.
(५) श्री.राहूल बोंद्रे, वि.स.स.
(६) श्री.विजय वडेट्टीवार, वि.स.स.
(७) प्रा.राम शिंदे, वि.स.स.
(८) श्री.गिरीष महाजन, वि.स.स.
(९) श्री.नानाभाऊ पटोले, वि.स.स.
(१०) श्री.आर.एम.वाणी, वि.स.स.
(११) श्री.चंद्रकांत मोकाटे, वि.स.स.
(१२) श्री.विवेक (भाऊ) पंडित, वि.स.स.
(१३) श्री.नितीन सरदेसाई, वि.स.स.
(१४) श्री.मनिष जैन, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. यु.के.चव्हाण, अतिरिक्त सचिव
(२) श्री. सु.सा.गायकवाड, वित्तीय सल्लागार
(३) श्री. ऋतुराज कुडतरकर, अवर सचिव
(४) श्री. दिलीप येवला, अवर सचिव (समिती)
(५) श्री. सोमनाथ सानप, कक्ष अधिकारी

**समितीने चौदावा प्रारुप अहवाल विचारात घेतला व काही सुधारणांसह तो संमत केला.**